# अर्थशास्त्र

## इयत्ता बारावी



शासन निर्णय क्रमांक : अभ्यास - २११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.०४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक ३०.०१.२०२० रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# अर्थशास्त्र

## इयत्ता बारावी

H3F1A4

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

२०२०

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

प्रथमावृत्ती : २०२०

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**अर्थशास्त्र विषय समिती :**

डॉ. मंजूषा मुसमाडे (अध्यक्ष), पुणे
श्रीमती सुनिता सुनिल कामटे, मुंबई
श्री. राजेंद्र फकिर वेखंडे, ठाणे
श्रीमती. शितल संपत निमसे, अहमदनगर
श्रीमती. अर्चना श्रीनिवास, मुंबई
श्री. रविकिरण जाधव सदस्य-सचिव

**अर्थशास्त्र अभ्यास गट :**

श्री. सुभाष राजधर पाटील, जळगाव
श्रीमती. उषा भास्कर काळे, कोल्हापूर
श्रीमती शोभा सुभाष नागरे, नाशिक
श्रीमती स्वाती मिलिंद वाघ, मुंबई
श्री. रघुनाथ नारायण पाटील, कोल्हापूर
श्री. शरदकुमार उत्तम शेटे, सिंधुदुर्ग
श्रीमती वंदना दिलीप पाटील, पुणे
श्रीमती कविता विलास पोळ, कोल्हापूर
डॉ. सुधाकर रामकृष्ण कुटे, औरंगाबाद
श्री. काशिराम परशुराम बाविसाने, बुलढाणा

**चित्रकार :** श्री. भटू रामदास बागले

**मुखपृष्ठ व सजावट :** श्री. भटू रामदास बागले

**अक्षरजुळणी :** मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**कागद :** ७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश :**

**मुद्रक :**

**निर्मिती :**

**श्री. सच्चितानंद आफळे**
मुख्य निर्मिती अधिकारी
**श्री. लिलाधर आत्राम**
निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

**श्री. विवेक उत्तम गोसावी**
**नियंत्रक**
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**

दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

**विद्यार्थी मित्रांनो,**

इयत्ता बारावीच्या वर्गात तुमचे स्वागत आहे. स्वतंत्र विषय म्हणून इयत्ता अकरावीत 'अर्थशास्त्र' ह्या विषयाशी तुम्ही आता खऱ्या अर्थाने परिचित झाला आहात.

भारतीय अर्थव्यवस्थेतील अनेक महत्त्वाच्या बदलांची माहिती अकरावीच्या पुस्तकात समाविष्ट करण्यात आली, तसेच अनेक अर्थशास्त्रीय संज्ञा व संकल्पनांचा परिचयही त्या पाठ्यपुस्तकात तुम्हांला करून देण्यात आला. सोप्याकडून कठिणाकडे, मूर्ताकडून अमूर्ताकडे, इत्यादी शैक्षणिक उद्‌दिष्टे बारावीच्या पुनर्रचित अभ्यासक्रमासाठी निश्चित केलेली आहेतच, त्याच बरोबर ह्या अभ्यासक्रमात 'ज्ञानरचनावाद' ह्या सर्वांत महत्त्वाच्या उद्‌दिष्टाचेही पालन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे यांची निर्मिती असलेल्या अर्थशास्त्राच्या ह्या पुस्तकात सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्र ह्या दोन्हींचा परामर्ष घेण्यात आला आहे. उपयोगिता, मागणी, पुरवठा यांचे सिद्‌धांत, बाजारांचे प्रकार इत्यादी सूक्ष्म अर्थशास्त्रीय संकल्पनांचे विस्तृत विवेचन केले आहे. सार्वजनिक वित्त व्यवहार, भारतातील नाणेबाजार व भांडवल बाजार, विदेशी व्यापार ह्या स्थूल अर्थशास्त्रीय संकल्पना या अभ्यासक्रमात प्रथमच विद्यार्थ्यांसमोर ठेवत आहोत. महत्त्वपूर्ण बदल म्हणजे संख्याशास्त्रातील निर्देशांक मापकाचा ह्या अभ्यासक्रमात अंतर्भाव केला आहे. विद्यार्थ्यांना पुढील अभ्यासक्रमासाठी ह्या पाठाचा विशेष फायदा होणार आहे. माहिती आणि तंत्रज्ञान तसेच स्पर्धेवर आधारित आजच्या युगातील विद्यार्थ्यांना नवनवीन आव्हानांना सामोरे जावे लागते. त्या दृष्टीनेच संख्याशास्त्राचा समावेश करण्यात आला आहे.

'अर्थशास्त्र' हा देशाची विकास प्रक्रिया समजण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण विषय आहे. विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावी व बारावी या दोन्ही वर्षांमध्ये या विषयाची विस्तृत ओळख व्हावी आणि त्यात अभिरुची निर्माण व्हावी, या प्रामाणिक हेतूने या पुस्तकातील पाठांची रचना केलेली आहे. यासाठी अकरावीच्या पुस्तकाप्रमाणेच अर्थशास्त्रीय भाषेशी कुठेही तडतोड केलेली नाही. पाठातील विविध आकृत्या हा अर्थशास्त्र विषयाचा अविभाज्य भाग आहे. विषयाचे आकलन होण्यासाठी त्यांची नितांत आवश्यकता आहे. पुस्तकात अखेरीस परिशिष्टांचाही समावेश केलेला आहे. त्यामुळे अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्द समजणे विद्यार्थ्यांना सोपे जाईल. अतिरिक्त माहिती व संदर्भासाठी पाठ्यपुस्तकात दिलेल्या क्यु.आर. कोडचा वापर करावा.

मूळ शैक्षणिक सूत्रे, उद्‌दिष्टे यांना कुठेही धक्का न लावता नावीन्यपूर्ण परंतु व्यावहारिक महत्त्व असलेल्या अर्थशास्त्रीय संकल्पना, संख्याशास्त्र यांचा समावेश करून एकविसाव्या शतकातील विद्यार्थी हा सक्षम आणि सजग असावा, ह्यासाठी पाठांची निवड विचारपूर्वक केली आहे. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा देण्यासाठी उद्युक्त व्हावे म्हणून नावीन्यपूर्ण स्वाध्याय देखील पाठाच्या शेवटी समाविष्ट केले आहेत.

अर्थशास्त्र विषयाच्या पुनर्रचित अभ्यासक्रमाचा अंतर्भाव असलेल्या बारावीच्या ह्या पुस्तकाचे विद्यार्थी आणि शिक्षक निश्चितच स्वागत करतील, असा विश्वास आहे.

आपणा सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!

**विवेक गोसावी**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २१ फेब्रुवारी २०२०
भारतीय सौर : २ फाल्गुन १९४१

# इयत्ता १२ वी अर्थशास्त्र

## क्षमता विधाने

- सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्राचे विषय विवेचन करतो.
- सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये स्पष्ट करतो.
- सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्राचे व्यवहारातील महत्त्व स्पष्ट करतो.
- एकूण उपयोगिता व सीमान्त उपयोगितेची संकल्पना स्पष्ट करतो.
- घटत्या सीमान्त उपयोगितेचा सिद्धान्त तक्ता व आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट करतो.
- क्रमवाचक उपयोगिता दृष्टिकोनाचे मूल्यमापन करतो.
- मागणीच्या संकल्पनेची व्याख्या सांगतो.
- मागणीचा नियम तक्ता व मागणीवक्राच्या साहाय्याने स्पष्ट करतो.
- किंमत लवचिकता, उत्पन्न लवचिकता व छेदक लवचिकता यांच्या व्याख्या सांगतो.
- किंमत लवचिकतेचे प्रकार योग्य उदाहरणांच्या साहाय्याने विशद करतो.
- संख्यात्मक कौशल्यांचा वापर करून मागणीच्या लवचिकतेचे मापन करतो.
- 'पुरवठा' या संकल्पनेची व्याख्या सांगतो.
- पुरवठ्याचा नियम तक्ता व पुरवठा वक्राच्या माध्यमातून स्पष्ट करतो.
- प्राप्ती व खर्चाच्या विविध संकल्पनांच्या व्याख्या सांगतो व त्यांचे मापन करतो.
- 'बाजार' या संकल्पनेची व्याख्या सांगतो.
- पूर्ण स्पर्धा, मक्तेदारी, अल्पजनाधिकार व मक्तेदारीयुक्त स्पर्धा या बाजाराच्या प्रकारांची व्याख्या सांगतो.
- विविध बाजार प्रकारांची वैशिष्ट्ये स्पष्ट करतो.
- 'समतोल किंमत' ही संकल्पना उदाहरणांसह स्पष्ट करतो.
- 'निर्देशांक' या संकल्पनेची व्याख्या सांगतो व त्यांची वैशिष्ट्ये अभ्यासतो.
- साधा निर्देशांक आणि भारान्वित निर्देशांक यांमधील फरक स्पष्ट करतो.
- निर्देशांक रचनेच्या पद्धती स्पष्ट करतो.
- संख्यात्मक कौशल्यांचा वापर करून साधा व भारान्वित निर्देशांकाचे मापन करतो.
- राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या सांगतो.
- स्थूल देशांतर्गत उत्पादन, स्थूल राष्ट्रीय उत्पादन, निव्वळ देशांतर्गत उत्पादन व निव्वळ राष्ट्रीय उत्पादन या संकल्पनांच्या व्याख्या सांगतो.
- राष्ट्रीय उत्पन्नाच्या उत्पादन, उत्पन्न व खर्च पद्धती स्पष्ट करतो.
- सार्वजनिक वित्तव्यवहाराच्या रचनेचे परिक्षण करतो.
- सार्वजनिक उत्पन्न, सार्वजनिक खर्च आणि सार्वजनिक कर्ज यांची व्याख्या सांगतो.
- सार्वजनिक खर्चाच्या कर आणि करेत्तर स्रोतांचे विश्लेषण करतो.
- भारतातील वाढत्या सार्वजनिक खर्चाचे परीक्षण करतो.
- राजवित्तीय धोरण व अंदाजपत्रक यांच्या व्याख्या सांगतो.
- 'वित्तीय बाजार' या संकल्पनेचा अर्थ व वर्गीकरण स्पष्ट करतो.
- भारतातील नाणेबाजार व भांडवल बाजारांच्या रचनेचे स्पष्टीकरण करतो.
- 'व्यापारी बँक आणि मध्यवर्ती बँक' संकल्पना स्पष्ट करतो.
- भारतातील व्यापारी बँक आणि मध्यवर्ती बँकेची कार्ये स्पष्ट करतो.
- भारतातील नाणेबाजार आणि भांडवल बाजाराची भूमिका आणि समस्यांचे परीक्षण करतो.
- भारतातील नाणेबाजार आणि भांडवल बाजारातील सुधारणा स्पष्ट करतो.
- भारतातील विदेशी व्यापाराची भूमिका स्पष्ट करतो.
- भारताच्या विदेशी व्यापाराची संरचना व दिशा स्पष्ट करतो.
- व्यवहारतोल आणि व्यापारतोल या संकल्पनांच्या व्याख्या सांगतो.

# - शिक्षकांसाठी -

इयत्ता १२ वी चे पुनर्रचित पाठ्यपुस्तक आपल्या हातात देताना आम्हांला आनंद होत आहे. पाठ्यपुस्तक बनवताना अध्ययन-अध्यापन सूत्रांचा वापर केला आहे. त्याचबरोबर ज्ञानरचना वादाचा उपयोग करून अध्ययन क्षमता वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. कृतियुक्त, प्रायोगिक व नावीन्यपूर्ण शिक्षण ही काळाची गरज आहे. अभ्यासक्रम आराखडा हा विद्यार्थ्याला काय शिकवले जाते व विद्यार्थी बाहेरील जगातून काय अनुभव घेतो, यातील एक दुवा आहे. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया समृद्ध करणे आणि अपेक्षित अध्ययन परिणाम साध्य करणे यासाठी खाली दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचा उपयोग होईल.

- ✓ पाठ्यपुस्तक प्रथम स्वतः समजून घ्यावे.
- ✓ सदर पाठ्यपुस्तक रचनात्मक पद्धतीने व कृतियुक्त अध्यापनासाठी तयार केलेले आहे.
- ✓ विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करण्यासाठी व वैचारिक कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षकांनी प्रत्येक पाठातील कृतींचे कौशल्यपूर्वक नियोजन करावे.
- ✓ योग्य नियोजन करून पाठांचे अध्यापन करावे.
- ✓ विषयाच्या आकलनासाठी सुयोग्य शैक्षणिक साधनांचा वापर करावा.
- ✓ पाठांचे विषय-विवेचन सविस्तर करावे.
- ✓ अनुक्रमणिकेत दिल्याप्रमाणे पाठांचे अध्यापन करावे, कारण ज्ञान संवर्धन सुलभतेने होण्यासाठी घटकांचे नियोजन क्रमबद्ध केलेले आहे.
- ✓ संख्याशास्त्राशी संबंधित सहाव्या प्रकरणामध्ये आंतरक्रियात्मक दृष्टिकोनाच्या आधारे अध्यापन करावे. विद्यार्थ्यांना त्यापुढील प्रकरणांमधील अर्थव्यवस्थेसंबंधीच्या समस्या सोडविण्यासाठी संख्याशास्त्रीय ज्ञानाचा वापर करता येईल.
- ✓ संख्याशास्त्रीय माहितीवर आधारित प्रश्न विचारावेत. त्यांच्या कल व प्रकारांनुसार पर्यायी प्रश्न विचारावेत. अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करावा. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना तथ्य संकलन व तथ्य विश्लेषणाचे महत्त्व समजावून सांगावे.
- ✓ अर्थशास्त्राच्या बहुतांश संकल्पना या शास्त्रीय आधारावर व अमूर्त बाबींवर अवलंबून असतात. गटकार्य, परस्पर सहकार्याने शिकणे इत्यादींना प्रोत्साहन द्यावे त्यासाठी आवश्यकतेनुसार वर्गरचनेत बदल करावा.
- ✓ अध्ययन-अध्यापनामध्ये आंतरक्रिया, प्रक्रिया यांमध्ये सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग आवश्यक आहे आणि त्यासाठी आपले सक्रिय मार्गदर्शन आवश्यक आहे.
- ✓ '**तुम्हांला माहीत आहे का?**' हा भाग मूल्यमापनासाठी विचारात घेऊ नये व त्याबद्दल विद्यार्थी अधिक माहिती मिळवतील याची खातरजमा शिक्षकांनी करावी.
- ✓ '**तुम्हांला माहीत हवं**' हा भाग मूल्यमापनासाठी विचारात घ्यावा.
- ✓ पाठातील स्वाध्याय वेगवेगळ्या निकषांनुसार बनवलेले आहेत. उदा., निरीक्षण, सह-संबंध, टीकात्मक विवेचन, विश्लेषणात्मक तर्क इत्यादी. प्रत्येक पाठाला समान भारांक आहेत. मूल्यमापन योजना ही दिलेल्या निकषांवर आधारित असावी. प्रश्नांच्या स्वरूपामध्ये वैविध्यपूर्ण संयुक्तीकरण असावे. त्याचप्रमाणे एकाच प्रकारच्या प्रश्नाची पुनरावृत्ती टाळावी.
- ✓ पाठ्यपुस्तकात दिलेल्या QR कोडचा वापर करावा. अद्ययावत माहिती मिळविण्यासाठी QR कोड सतत तपासत राहावा.
- ✓ संदर्भासाठी संकेतस्थळे दिलेली आहेत व त्याचप्रमाणे संदर्भग्रंथांची यादीदेखील दिलेली आहे. याचा उपयोग शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी अवांतर वाचनासाठी आणि विषय सखोल समजण्यासाठी करावा.
- ✓ पारिभाषिक शब्दसूचीमधील शब्द पाठ्यपुस्तकातील प्रत्येक प्रकरणात निळ्या शाईने अधोरेखित केलेले आहेत.
- ✓ अर्थशास्त्रात वापरल्या जाणाऱ्या संक्षिप्त रूपांची यादी पाठ्यपुस्तकात शेवटी दिलेली आहे, त्याचा उपयोग अधिक स्पष्टीकरणासाठी करावा.

अध्यापन अनुभूतीसाठी हार्दिक शुभेच्छा!

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठक्रमांक | अपेक्षित/संभाव्य तासिका |
|---|---|---|---|
| १. | सूक्ष्म आणि स्थूल अर्थशास्त्राचा परिचय | १-७ | १० |
| २. | उपयोगिता विश्लेषण | ८-१६ | १० |
| ३.अ | मागणीचे विश्लेषण | १७-२६ | १० |
| ३.ब | मागणीची लवचिकता | २७-३६ | १० |
| ४. | पुरवठा विश्लेषण | ३७-४५ | १२ |
| ५. | बाजाराचे प्रकार | ४६-५२ | १० |
| ६. | निर्देशांक | ५३-६० | १० |
| ७. | राष्ट्रीय उत्पन्न | ६१-६९ | १६ |
| ८. | भारतातील सार्वजनिक वित्तव्यवहार | ७०-८९ | १६ |
| ९. | भारतातील नाणेबाजार आणि भांडवलबाजार | ८०-९० | १६ |
| १०. | भारताचा विदेशी व्यापार | ९१-९६ | १० |
| — | • अर्थशास्त्रीय संज्ञांचे परिशिष्ट<br>• संक्षिप्त रूपांची यादी<br>• संदर्भ सूची, महत्वाची संकेतस्थळे/दुवे | ९९-१०४ | **एकूण : १३०** |



**DISCLAIMER Note :** All attempts have been made to contact copy righters (©) but we have not heard from them. We will be pleased to acknowledge the copy right holder (s) in our next edition if we learn from them.


**मुखपृष्ठ :** इयत्ता अकरावीतून विद्यार्थी आता बारावीला आलेले आहेत. 'अर्थशास्त्र' हा स्वतंत्र विषय म्हणून ते अभ्यासणार आहेत. मुखपृष्ठावर पाठ्यपुस्तकात चर्चिलेल्या विविध आर्थिक संकल्पनांच्या दृश्य प्रतिमांचे सादरीकरण केलेले आहे.

**मलपृष्ठ :** विविध आर्थिक कृती आणि विविध वित्तीय संस्थांचे चिन्हात्मक सादरीकरण केलेले आहे.

# १ सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्राचा परिचय (Introduction to Micro Economics and Macro Economics)

**आठवून पाहू या!**

तुम्ही यापूर्वी ११ वीच्या वर्गात विविध अर्थतज्ज्ञांनी दिलेल्या व्याख्यांचा अभ्यास केला आहे.



**आकृती १.१**

**प्रस्तावना :**

आधुनिक अर्थशास्त्राच्या सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्र या मुख्य दोन शाखा आहेत. सूक्ष्म म्हणजे लहान किंवा दशलक्षावा भाग ही संज्ञा 'मायक्रोस'(Mikros) या ग्रीक शब्दापासून आली आहे. स्थूल म्हणजे मोठा. ही संज्ञा 'मॅक्रोस' (Makros) या ग्रीक शब्दापासून आलेली आहे. या शब्दांचा वापर १९३३ मध्ये ओस्लो विद्यापीठातील नॉर्वेजियन अर्थशास्त्रज्ञ रॅग्नर फ्रिश यांनी केला.

**अर्थशास्त्राच्या मुख्य शाखा**

- सूक्ष्म अर्थशास्त्र
- स्थूल अर्थशास्त्र

**तुम्हांला माहीत आहे का?**

रॅग्नर ॲन्टन किट्टील फ्रिश (१८९५-१९७३) हे नॉर्वेचे अर्थमिती व अर्थशास्त्राचे तज्ज्ञ होते. त्यांना १९६९ साली अर्थशास्त्रासाठी प्रथम नोबेल स्मृती पुरस्कार जॅन टिंबरजेन सोबत प्राप्त झाला. ते अर्थमिती शास्त्राचे जनक होते.



अर्थमिती शास्त्रामध्ये गणितीय प्रारूपे व संख्याशास्त्रीय तंत्रे यांचा वापर अर्थशास्त्रीय सामग्रीच्या आणि सिद्धांताच्या विश्लेषणासाठी करण्यात येतो. रॅग्नर फ्रिश यांनी अनेक अर्थशास्त्रीय संकल्पनांची सर्वप्रथम मांडणी केली. त्यांच्या व्यापार चक्रावरील लेखांमध्ये सर्वप्रथम वैयक्तिक उद्योग व (उत्पादकांच्या) अभ्यासाला 'सूक्ष्म अर्थशास्त्र' म्हटले आणि समग्र अर्थव्यवस्थेच्या अभ्यासाला 'स्थूल अर्थशास्त्र' असे म्हटले आहे.

**तुम्हांला माहीत हवं!**

**सूक्ष्म अर्थशास्त्राची ऐतिहासिक वाटचाल :**

सूक्ष्मलक्षी आर्थिक विश्लेषण प्रथम विकसित केले गेले असून हा एक पारंपरिक दृष्टिकोन आहे. या विश्लेषण पद्धतीचा प्रारंभ सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांच्या कालखंडात झालेला दिसतो. यात ॲडम स्मिथ, डेव्हीड रिकार्डो, जे. एस. मिल इत्यादींचा समावेश होतो. नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञ प्रा. मार्शल यांनी सूक्ष्मलक्षी आर्थिक विश्लेषण लोकप्रिय करण्याचे काम केले. प्रा. मार्शल यांचा 'अर्थशास्त्राची मूलतत्त्वे' हा ग्रंथ १८९० मध्ये प्रकाशित झाला. इतर अर्थशास्त्रज्ञ जसे प्रा.पिगू, जे.आर.हिक्स, प्रा. सॅम्यूल्सन, श्रीमती जोन रॉबिन्सन इत्यादी शास्त्रज्ञांनी सूक्ष्म अर्थशास्त्राच्या विकासात मोलाचे योगदान दिले.

**स्थूल अर्थशास्त्राची ऐतिहासिक वाटचाल :**

सूक्ष्म अर्थशास्त्राच्या उत्क्रांतीअगोदर स्थूल अर्थशास्त्र हा दृष्टिकोन अस्तित्वात होता. १६ व्या व १७ व्या शतकात व्यापारवादी विचारवंतांनी (Mercantilists) राष्ट्रीय उत्पन्न आणि संपत्ती या संकल्पनेचे विश्लेषण केले आहे. १८ व्या शतकात निसर्गवादी विचारवंतांनीसुद्धा (फ्रेंच विचारवंत -Physiocracy) राष्ट्रीय उत्पन्न आणि संपत्ती या संकल्पनांचे विश्लेषण केलेले आहे. तसेच शासनाला ज्या शिफारशी केल्या व धोरणे सुचविली ती स्थूल अर्थशास्त्राच्या आधारावर होती. तसेच सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ प्रा. ॲडम स्मिथ, प्रा. रिकार्डो, प्रा. जे. एस.

मिल यांच्या सिद्धांतातही राष्ट्रीय उत्पन्न व राष्ट्रीय संपत्ती यांची चर्चा केलेली आहे. परंतु त्यांचे समग्रलक्षी विश्लेषण हे सूक्ष्मलक्षी विश्लेषणात मिसळून एकत्र केलेले दिसते. त्यांच्या सूक्ष्मलक्षी आर्थिक विश्लेषणाने १९३० च्या जागतिक महामंदीपर्यंत अर्थशास्त्राच्या जगात राज्य केले. जागतिक महामंदीनंतर लॉर्ड जॉन मेनार्ड केन्स यांचे 'पैसा, व्याज व रोजगारविषयक सामान्य सिद्धान्त' हे प्रसिद्ध पुस्तक १९३६ मध्ये प्रकाशित झाले. लॉर्ड केन्स यांनी आर्थिक समस्यांचा अभ्यास समग्रलक्षी विश्लेषण पद्धतीने केला. त्यामुळे समग्रलक्षी दृष्टिकोनाच्या विकासाचे श्रेय हे लॉर्ड केन्स यांनाच दिले जाते. लॉर्ड केन्स यांच्या व्यतिरिक्त माल्थस, विकसेल, वॉलरा, आयर्विंग फिशर इत्यादी अर्थशास्त्रज्ञांचे स्थूल अर्थशास्त्राच्या विकासात मोलाचे योगदान आहे.

## सूक्ष्म अर्थशास्त्राचा अर्थ :

सूक्ष्म म्हणजे वस्तूचा लहान भाग किंवा हिस्सा होय. सूक्ष्म अर्थशास्त्र राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या लहान भागाशी संबंधित आहे. सूक्ष्म अर्थशास्त्रात वैयक्तिक उपभोक्ता, वैयक्तिक उत्पादक किंवा पेढी, विशिष्ट वस्तूची किंमत किंवा घटकाची किंमत यांसारख्या वैयक्तिक घटकांच्या आर्थिक क्रिया व वर्तनाचा अभ्यास केला जातो.

## सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याख्या :

तुम्ही यापूर्वी सूक्ष्म अर्थशास्त्राच्या काही महत्त्वाच्या व्याख्या अभ्यासल्या आहेत, अजून काही व्याख्यांची चर्चा करूया.


१) मॉरिस डॉब – "अर्थव्यवस्थेचे सूक्ष्मदर्शी अध्ययन म्हणजे सूक्ष्म अर्थशास्त्र होय."

२) ए.पी. लर्नर – "सूक्ष्म अर्थशास्त्राद्वारे, अर्थव्यवस्थेकडे जणू काही सूक्ष्म दर्शकाद्वारे पाहिले जाते. अर्थव्यवस्थारूपी शरीरातील लाखो पेशी म्हणजे व्यक्ती आणि कुटुंबे उपभोक्त्याच्या रूपाने आणि व्यक्ती व उत्पादनसंस्था उत्पादकाच्या रूपाने, अर्थव्यवस्थेच्या संचलनात कशा प्रकारे भूमिका पार पाडतात हे अभ्यासण्यासाठी सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र या पेशींकडे जणू काही सूक्ष्मदर्शकातून पाहते."

## सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती :

खालील तक्त्याद्वारे सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करता येते.

**सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती**




**अ) वस्तूंच्या किंमत निश्चितीचे सिद्धान्त :** वैयक्तिक वस्तूंच्या किमती बाजारपेठेतील मागणी व पुरवठ्याने निश्चित केल्या जातात. सूक्ष्म अर्थशास्त्र मागणी विश्लेषणाशी संबंधित आहे. ते वैयक्तिक उपभोक्त्याचे वर्तन आणि वैयक्तिक उत्पादकाचे वर्तन म्हणजे वैयक्तिक उत्पादकाच्या वर्तनाशी संबंधित आहे.

**ब) उत्पादन घटकांचा किंमत निश्चितीचे सिद्धान्त :** सूक्ष्म अर्थशास्त्रात भूमी, श्रम, भांडवल, संयोजक हे घटक उत्पादन प्रक्रियेत सहभागी होतात. सूक्ष्म अर्थशास्त्र भूमीला–खंड, श्रमाला–वेतन, भांडवलाला–व्याज आणि संयोजकाला–नफा या मोबदल्यांची निश्चिती करण्यास मदत करते.

**क) आर्थिक कल्याणाचे सिद्धान्त :** आर्थिक कल्याणाचा अभ्यास हा प्रामुख्याने साधनसामग्रीच्या कार्यक्षम वाटपाशी संबंधित आहे. जर साधनसामग्रीच्या झालेल्या वाटपामुळे संपूर्ण समाजाला महत्तम समाधान प्राप्त होत असेल तर ते वाटप कार्यक्षम वाटप आहे असे म्हणता येईल. साधनांच्या कार्यक्षम वाटपामुळे समाजाचे जास्तीतजास्त आर्थिक कल्याणाचे उद्दिष्ट साध्य होते. दुसऱ्या शब्दांत आर्थिक कार्यक्षमतांचा अभ्यास यात होतो. आर्थिक कार्यक्षमतेचा विचार तीन प्रकारे होतो.

१) उत्पादन क्षेत्रातील कार्यक्षमता

२) उपभोगाच्या क्षेत्रातील कार्यक्षमता

३) एकूण आर्थिक कार्यक्षमता

- उत्पादन क्षेत्रातील कार्यक्षमता : उत्पादन क्षेत्रातील

कार्यक्षमता म्हणजे उपलब्ध साधनसामग्रीच्या मदतीने जास्तीतजास्त उत्पादन घडवून आणणे.

- उपभोगाच्या क्षेत्रातील कार्यक्षमता : संपूर्ण समाजाचे जास्तीतजास्त समाधान होईल अशा पद्धतीने उत्पादित वस्तू व सेवांचे लोकांमध्ये वितरण होणे.
- एकूण आर्थिक कार्यक्षमता : लोकांना सर्वाधिक प्राधान्याने हव्या असणाऱ्या वस्तूंचे उत्पादन होणे.

या कार्यक्षमता साध्य करण्याच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या अटींचे विवेचन सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रात केले जाते.

सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्राचा अभ्यास हे प्रामुख्याने किंमत सिद्धान्त व साधनसामग्रीचे वाटप यांच्याशी संबंधित आहे. सूक्ष्म अर्थशास्त्र या शाखेत संपूर्ण अर्थव्यवस्थेशी संबंधित समग्र परिमाणांचा अभ्यास केला जात नाही. या शाखेत बेकारी, दारिद्र्य, उत्पन्नाची विषमता यांसारख्या राष्ट्रीय पातळीवरील आर्थिक समस्यांचा अभ्यास केला जात नाही. आर्थिक वृद्धीचे सिद्धान्त व्यापारचक्राचे सिद्धान्त, मौद्रिक व राज्यवित्तीय धोरणे इत्यादींचा अभ्यास सूक्ष्म अर्थशास्त्राच्या कक्षेबाहेर आहे.

### सूक्ष्म अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये :

१) **वैयक्तिक घटकांचा अभ्यास :** सूक्ष्म अर्थशास्त्रात विशिष्ट उद्योग संस्था, कुटुंब संस्था, वैयक्तिक किमती यांसारख्या लहान वैयक्तिक आर्थिक घटकांच्या वर्तनाचा अभ्यास केला जातो.

२) **किंमत सिद्धान्त :** सूक्ष्म अर्थशास्त्र वस्तू व सेवांच्या किंमत निश्चितींशी तसेच उत्पादन घटकांच्या किंमत निश्चितींशी संबंधीत आहे. म्हणून सूक्ष्म अर्थशास्त्राला किंमत सिद्धान्त असेही म्हणतात.

३) **आंशिक समतोल :** दोन घटकांमधील संतुलन म्हणजे समतोल होय. सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रीय विश्लेषण म्हणजे आंशिक समतोलाचे विश्लेषण होय. आंशिक समतोलामध्ये एक उपभोक्ता, एक उत्पादन संस्था, विशिष्ट उद्योग इत्यादी वैयक्तिक आर्थिक घटकांच्या समतोलाचे विश्लेषण केले जाते. आंशिक समतोल विश्लेषण पद्धतीत वैयक्तिक घटकाला इतर आर्थिक घटकांपासून बाजूला काढून त्यांच्या समतोलाचा स्वतंत्रपणे अभ्यास केला जातो.

४) **विशिष्ट गृहीतकांवर आधारित :** 'इतर परिस्थिती कायम' या मूलभूत गृहीतकाचाही आधार घेऊन विवेचनाची सुरुवात केली जाते. पूर्ण रोजगार, शुद्ध भांडवलशाही, पूर्ण स्पर्धा, सरकारचे निर्हस्तक्षेपाचे धोरण इत्यादी गृहीतकांवर आधारित असते. या गृहीतकांमुळे सिद्धांताचे विवेचन सोपे होते.

५) **विभाजन पद्धत :** सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रात अर्थव्यवस्थेचे लहानात लहान वैयक्तिक घटकांमध्ये विभाजन केले जाते व नंतर प्रत्येक घटकाचा स्वतंत्रपणे, तपशीलवार अभ्यास केला जातो. म्हणजे सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रात विभाजन-पद्धतीचा वापर केला जातो. उदा., राष्ट्रीय उत्पन्नामधील वैयक्तिक उत्पन्नाचा अभ्यास, समग्र मागणीमधील वैयक्तिक मागणीचा अभ्यास इत्यादी.

६) **सीमान्त तत्त्वाचा वापर :** सीमान्त संकल्पना ही सूक्ष्म-आर्थिक विश्लेषणाचे मुख्य साधन आहे. सीमान्त परिमाण म्हणजे एका वाढीव नगामुळे एकूण परिमाणात होणारा बदल होय. सीमान्त तत्त्वाचा वापर सूक्ष्म बदलांचा परिणाम, उत्पादक व उपभोक्त्याचे आर्थिक निर्णय घेताना केला जातो.

७) **बाजार रचनेचे विश्लेषण :** सूक्ष्म अर्थशास्त्र पूर्ण स्पर्धा, मक्तेदारीयुक्त स्पर्धा, मक्तेदारी, अल्पाधिकार बाजार या विविध बाजार रचनांचे विश्लेषण करते.

८) **मर्यादित व्याप्ती :** सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती तेजी-मंदी, व्यवहारतोल, राष्ट्रीय उत्पन्न, दारिद्र्य, बेरोजगारी, लोकसंख्या, आर्थिक वृद्धी यांसारख्या राष्ट्रव्यापी आर्थिक समस्यांशी संबंधित नसून फक्त वैयक्तिक घटकांपुरती मर्यादित आहे.

### सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व :

१) **किंमत निर्धारण :** विविध वस्तूंच्या किमती तसेच विविध उत्पादन घटकांच्या किमती यांचे स्पष्टीकरण करण्यास सूक्ष्म अर्थशास्त्र मदत करते.

२) **मुक्त बाजार अर्थव्यवस्था :** सूक्ष्म अर्थशास्त्र मुक्त बाजार अर्थव्यवस्थेची कार्यपद्धती समजण्यास मदत करते. मुक्त बाजारपेठ ही अशी अर्थव्यवस्था आहे की, ज्यात वस्तूच्या उत्पादनाबाबत कोणते उत्पादन करावे, कसे उत्पादन करावे, किती उत्पादन करावे,

यांसारखे आर्थिक निर्णय खाजगी पातळीवर घेतले जातात. त्यात शासन किंवा इतर कोणत्या यंत्रणेचा हस्तक्षेप नसतो.

३) **विदेशी व्यापार :** सूक्ष्म अर्थशास्त्र हे जकात शुल्काचे विशिष्ट वस्तूवरील परिणाम, कोणत्याही दोन देशांच्या चलन विनिमय दराची निश्चिती, आंतरराष्ट्रीय व्यापारातील फायदे, यांसारख्या विदेशी व्यापारातील विविध पैलूंचे स्पष्टीकरण करण्यास मदत करते.

४) **आर्थिक प्रारूपांची निर्मिती :** सूक्ष्म अर्थशास्त्र सुलभ प्रारूपाद्वारे विविध गुंतागुंतीच्या आर्थिक परिस्थितीचे आकलन करण्यास साहाय्य करते. विविध संज्ञा, संकल्पना, परिभाषा, नवीन आर्थिक विश्लेषणाची साधने यासारखे महत्त्वपूर्ण योगदान सूक्ष्म अर्थशास्त्राद्वारे दिले आहे.

५) **व्यावसायिक निर्णय :** व्यावसायिकांना महत्त्वपूर्ण व्यावसायिक निर्णय घेण्यास सूक्ष्म आर्थिक सिद्धान्त मदत करतात. या निर्णयामध्ये उत्पादन खर्चाची निश्चिती, वस्तूंची किंमत निश्चिती, महत्तम उत्पादन आणि नफा इत्यादींचा समावेश होतो.

६) **शासनास उपयुक्त :** सरकारी कर धोरण, सार्वजनिक खर्च धोरण, किंमत धोरण यांसारख्या आर्थिक धोरणांची आखणी करण्यासाठी सूक्ष्म अर्थशास्त्र उपयुक्त ठरते. ही धोरणे संसाधनांचे कार्यक्षम वितरण करण्यासाठी आणि सामाजिक आर्थिक कल्याणाच्या प्रसारासाठी शासनास मदत करतात.

७) **कल्याणकारी अर्थशास्त्राचा आधार :** सूक्ष्म अर्थशास्त्र उपलब्ध साधनांचा पर्याप्त वापर करून समाजाचे महत्तम कल्याण कसे साधता येईल, याचा अभ्यास करते. तसेच सामाजिक कल्याणावर करांचा कसा परिणाम होतो याबाबत अभ्यास करते.

### स्थूल अर्थशास्त्राचा अर्थ :

स्थूल अर्थशास्त्र संपूर्ण अर्थव्यवस्थेचे विश्लेषण करणारी अर्थशास्त्राची एक शाखा आहे. उदा. एकूण रोजगार, राष्ट्रीय उत्पन्न, राष्ट्रीय उत्पादन, एकूण गुंतवणूक, एकूण उपभोग, एकूण बचत, सर्वसाधारण किंमत, व्याजदर पातळी, व्यापार चक्रातील चढउतार, व्यवसायातील चढउतार इत्यादी. स्थूल अर्थशास्त्र समग्र घटकांचा अभ्यास करते.


### स्थूल अर्थशास्त्राच्या व्याख्या :

१) प्रा. जे. एल. हॅन्सेन – "स्थूल अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची अशी शाखा आहे की, ज्यात एकूण रोजगार, एकूण बचत, एकूण गुंतवणूक, राष्ट्रीय उत्पन्न यासारख्या मोठ्या समुच्चयांचा व त्यांच्यातील परस्परसंबंधांचा विचार करण्यात येतो."

२) प्रा. कार्ल शॅपिरो –"स्थूल अर्थशास्त्र अर्थव्यवस्थेच्या संपूर्ण कार्यपद्धतीशी संबंधित आहे."

खालील तक्त्याच्या आधारे स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करता येते.

**स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती**




१) **उत्पन्न व रोजगार सिद्धान्त :** स्थूल अर्थशास्त्र राष्ट्रीय उत्पन्न आणि रोजगार पातळी यांच्या निश्चितीचे विश्लेषण करते. तसेच उत्पन्न, उत्पादन, बेरोजगार पातळीतील बदल किंवा चढउतार यांची कारणे स्पष्ट करते. रोजगार पातळी कशी निश्चित केली जाते हे समजून घेण्यासाठी उपभोग फलन आणि गुंतवणूक फलन यांचा अभ्यास करावा लागतो. व्यावसायातील बदलाचे सिद्धान्त हा उत्पन्न व रोजगार सिद्धांताचा एक भाग आहे.

२) **सर्वसाधारण किंमतपातळी सिद्धान्त :** स्थूल अर्थशास्त्र सर्वसाधारण किंमत पातळी कशी निश्चित होते आणि त्यातील चढउताराची कारणे यांविषयी विश्लेषण करते. त्यामुळे तेजी व मंदी सामान्य पातळीमुळे निर्माण होणाऱ्या बदलांचे विश्लेषण करते. तेजी आणि मंदीने निर्माण होणाऱ्या समस्यांमुळे सर्वसाधारण किंमत पातळीचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो.

३) **आर्थिक वृद्धी व विकासाचे सिद्धान्त :** स्थूल अर्थशास्त्रात विकसित आणि विकसनशील देशांतील आर्थिक वृद्धी व विकाससंबंधित सिद्धांतांचा समावेश होतो. त्यात अल्पविकास आणि दारिद्र्य यांची कारणे व कार्यपद्धतीचे स्पष्टीकरण केले जाते. तसेच आर्थिक वृद्धी व विकासाचा वेग वाढविण्याची व्यूहरचना सुचविली जाते.

४) **विभाजनाचा समग्रलक्षी सिद्धान्त :** स्थूल अर्थशास्त्रीय सिद्धान्त, एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील खंड, वेतन, व्याज व नफा यांच्याशी संबंधित सापेक्ष भागाशी निगडित आहे.

### स्थूल अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये :

१) **समग्र घटकांचा अभ्यास :** स्थूल अर्थशास्त्र संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास करते. उदा. राष्ट्रीय उत्पन्न, राष्ट्रीय उत्पादन, राष्ट्रीय रोजगार, सर्वसाधारण किंमत पातळी, व्यापारचक्र इत्यादी.

२) **उत्पन्न सिद्धान्त :** स्थूल अर्थशास्त्र राष्ट्रीय उत्पन्नाची संकल्पना, त्याचे विविध घटक, मापनपद्धती आणि सामाजिक लेखांकनांचा अभ्यास करते. ते एकूण मागणी व एकूण पुरवठ्याशी संबंधित आहे. तसेच राष्ट्रीय उत्पन्नातील चढ-उतार, व्यापारचक्रातील तेजी-मंदी यांच्या कारणांचे व बदलांचे स्पष्टीकरण करते.

३) **सर्वसाधारण समतोलाचे विश्लेषण :** स्थूल अर्थशास्त्र एकूण घटकांच्या वर्तनाशी आणि त्यांच्या कार्यपद्धतीशी संबंधित आहे. सर्वसाधारण समतोल संपूर्ण अर्थव्यवस्थेतील मागणी, पुरवठा व किंमत यांच्या वर्तनाशी निगडित आहे.

४) **परस्परावलंबन :** स्थूल विश्लेषणात हे एकूण आर्थिक चले उदा. उत्पन्न, उत्पादन, रोजगार, गुंतवणूक, किंमतपातळी यांसारख्या आर्थिक चलांचे परस्परावलंबन लक्षात घेतले जाते. उदा., गुंतवणूक पातळीत होणाऱ्या बदलांचा अंतिम परिणाम, उत्पन्न, एकूण उत्पादन, रोजगार आणि अखेरीस आर्थिक वृद्धीच्या पातळीवर होतो.

५) **राशी पद्धत :** राशी पद्धतीत एका घटकाचा अभ्यास नसून संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास केला जातो. प्रा. बोल्डिंग यांच्या मते, "जंगल म्हणजे संपूर्ण झाडांचा समुच्चय असतो; परंतु त्यात एका विशिष्ट झाडाची गुणवैशिष्ट्ये दिसून येत नाहीत." यातून सूक्ष्म अर्थशास्त्र व स्थूल अर्थशास्त्र यांमधील फरक दर्शविला जातो.

६) **वृद्धीची प्रारूपे :** स्थूल अर्थशास्त्रात आर्थिक वृद्धी व आर्थिक विकासातील विविध घटकांचा सहभाग अभ्यासला जातो. स्थूल अर्थशास्त्र वृद्धीची प्रारूपे विकसित करण्यासाठी उपयुक्त ठरते. आर्थिक विकासाच्या अभ्यासासाठी ही प्रारूपे उपयोगी ठरतात. विकासाच्या वृद्धी अभ्यासासाठी उदा., मूलभूत व अवजड उद्योगांवर भर देणारे महालनोबिस वृद्धी प्रारूप.

७) **सर्वसाधारण किंमत पातळी :** स्थूल अर्थशास्त्रात सर्वसाधारण किंमत पातळी निश्चिती व त्यातील बदल यांचा अभ्यास असतो. सर्वसाधारण किंमत पातळी म्हणजे अर्थव्यवस्थेतील सद्य स्थितीत उत्पादित केलेल्या सर्व वस्तू व सेवांच्या किमतींची सरासरी होय.

८) **धोरणाभिमुख –** लॉर्ड केन्स यांच्या मते, "स्थूल अर्थशास्त्र हे आर्थिक समस्या सोडविण्याऱ्या धोरणांची चर्चा करणारे शास्त्र आहे." उदा., भाववाढ नियंत्रण, रोजगार निर्मिती अर्थव्यवस्थेला मंदीतून बाहेर काढणे इत्यादी.

### स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व

१) **अर्थव्यवस्थेची कार्यपद्धती :** स्थूल आर्थिक विश्लेषण आपल्याला आर्थिक व्यवस्थेच्या कार्यपद्धतीची कल्पना देते हे विश्लेषण व्यापक आणि गुंतागुंतीच्या अर्थव्यवस्थेतील एकूण आर्थिक चलांचे वर्तन समजून घेण्यास साहाय्य करते.

२) **आर्थिक चढउतार :** उत्पन्नातील चढ-उतार, उत्पादन आणि रोजगारातील चढ-उतारांची कारणे तसेच त्यांचे नियंत्रण आणि त्यांची तीव्रता कमी करण्यासाठी स्थूल अर्थशास्त्राचे विश्लेषण मदत करते.

३) **राष्ट्रीय उत्पन्न :** स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळे राष्ट्रीय उत्पन्न आणि सामाजिक लेखा यांचे अनन्यसाधारण महत्त्व समोर आले आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या अभ्यासाशिवाय नवीन आर्थिक धोरणांची मांडणी करता येत नाही.

४) **आर्थिक विकास :** स्थूल अर्थशास्त्रातील प्रगत अध्ययनामुळे विकसनशील देशांतील दारिद्र्य, उत्पन्न व

संपत्तीतील विषमता, लोकांच्या राहणीमानातील फरक इत्यादी समस्या समजण्यास मदत होते. ते आर्थिक विकास साध्य करण्यासाठी मदत करते.

५) **अर्थव्यवस्थेची कामगिरी :** संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या कामगिरीचे विश्लेषण करण्यासाठी स्थूल अर्थशास्त्र मदत करते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा उपयोग दीर्घकाळात अर्थव्यवस्थेच्या कामगिरीचे मापन करण्यासाठी केला जातो. एका कालावधीतील उत्पादित वस्तू व सेवांची तुलना दुसऱ्या कालावधीतील उत्पादित वस्तू व सेवांशी केली जाते.

६) **स्थूल आर्थिक चलांचा अभ्यास :** अर्थव्यवस्थेचे कार्य समजून घेण्यासाठी स्थूल आर्थिक चलांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. आपल्या अर्थव्यवस्थेतील मुख्य आर्थिक समस्या या एकूण उत्पन्न, उत्पादन व रोजगार आणि सामान्य किंमत पातळी यांसारख्या आर्थिक चलांशी संबंधित आहेत.

७) **सामान्य रोजगार पातळी :** स्थूल अर्थशास्त्र रोजगाराची सर्वसाधारण पातळी आणि उत्पादनाचे विश्लेषण करण्यास मदत करते.

**तुम्हांला माहीत हवं :**

**एका दृष्टिक्षेपात**

| तुलनेसाठी आधार | सूक्ष्म अर्थशास्त्र | स्थूल अर्थशास्त्र |
|---|---|---|
| **अर्थ** | सूक्ष्म अर्थशास्त्र हे अर्थव्यवस्थेतील वैयक्तिक घटकांच्या वर्तनाचा अभ्यास करते. | स्थूल अर्थशास्त्र हे संपूर्ण अर्थव्यवस्थेतील एकूण घटकांच्या वर्तनाचा अभ्यास करते. |
| **साधने** | वैयक्तिक मागणी आणि वैयक्तिक पुरवठा | समग्र मागणी आणि समग्र पुरवठा |
| **व्याप्ती** | वैयक्तिक मागणी आणि पुरवठा, उत्पादन किमती, उत्पादन घटकांच्या किमती, उत्पादन उपभोग, आर्थिक कल्याण इत्यादी | राष्ट्रीय उत्पन्न, सामान्य किंमत पातळी, रोजगार, पैसा इत्यादी. |
| **महत्त्व** | किंमत निर्धारण प्रारूपाची निर्मिती, व्यावसायिक निर्णय इत्यादी. | आर्थिक चढ-उतार, राष्ट्रीय उत्पन्नाचे अध्ययन, आर्थिक विकास इत्यादी. |
| **सिद्धान्त** | किंमत सिध्दान्त | उत्पन्न आणि रोजगार सिध्दान्त |
| **उदाहरण** | वैयक्तिक उत्पन्न, वैयक्तिक उत्पादन | राष्ट्रीय उत्पन्न, राष्ट्रीय उत्पादन इत्यादी. |

**हे करून पहा!**

नजीकच्या परिसरातील भाजी बाजाराला भेट द्या. आणि भाजी विक्रेत्याकडून त्याच्या उत्पन्न व खर्चविषयक बाबींची माहिती मिळवा.

## स्वाध्याय

**प्र.१. योग्य पर्याय निवडा :**

१) अर्थशास्त्राची शाखा, जी संसाधन वाटपाशी संबंधित आहे.

अ. सूक्ष्म अर्थशास्त्र    ब. स्थूल अर्थशास्त्र

क. अर्थमिती    ड. यांपैकी काहीही नाही

**पर्याय :** १) अ, ब, क    २) अ, ब

३) फक्त अ    ४) वरीलपैकी नाही

२) सूक्ष्म अर्थशास्त्रातील संकल्पना

अ. राष्ट्रीय उत्पन्न    ब. सामान्य किंमत पातळी

क. घटक किंमत    ड. उत्पादन किंमत

**पर्याय :** १) ब, क    २) ब, क, ड

३) अ, ब, क    ४) क, ड

३) सूक्ष्म अर्थशास्त्रीय विश्लेषणात वापरली जाणारी पद्धत.

अ. राशी पद्धत    ब. समग्र पद्धत

क. विभाजन पद्धत    ड. सर्वसमावेशक पद्धत

**पर्याय :** १) अ, क, ड    २) ब, क, ड

३) फक्त क    ४) फक्त अ

४) स्थूल अर्थशास्त्र खालील संकल्पनांचा अभ्यास करते.

अ. संपूर्ण अर्थव्यवस्था    ब. आर्थिक विकास

क. एकूण पुरवठा    ड. उत्पादन किंमत

**पर्याय :** १) अ, ब, क    २) ब, क, ड

३) फक्त ड    ४) अ, ब, क, ड

**प्र.२. सहसंबंध पूर्ण करा :**

१) सूक्ष्म अर्थशास्त्र : विभाजन पद्धत :: स्थूल अर्थशास्त्र : ______

२) सूक्ष्म अर्थशास्त्र : झाड :: स्थूल अर्थशास्त्र : ______

३) स्थूल अर्थशास्त्र : उत्पन्न आणि रोजगार सिद्धान्त :: सूक्ष्म अर्थशास्त्र :: ______

४) मॅक्रोस : स्थूल अर्थशास्त्र :: मायक्रोस : ______

५) सर्वसाधारण समतोल : स्थूल अर्थशास्त्र :: ______ : सूक्ष्म अर्थशास्त्र

**प्र.३. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा :**

१) गौरीने एका विशिष्ट उद्योगातील वैयक्तिक उत्पन्नाची माहीती गोळा केली.

२) रमेशने उत्पादनविषयक सर्व निर्णय स्वतः घेण्याचे ठरविले, उदा., काय आणि कसे उत्पादन करावे ?

३) शबानाने आपल्या कारखान्यातील कामगारांना वेतन आणि बँक कर्जावरील व्याज दिले.

**प्र. ४. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

१) सूक्ष्म अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व स्पष्ट करा.

३) स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करा.

**प्र. ५. खालील विधानांशी आपण सहमत किंवा असहमत आहात सकारण स्पष्ट करा :**

१) सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती अमर्याद आहे.

२) स्थूल अर्थशास्त्रात वैयक्तिक वर्तनाचा अभ्यास केला जातो.

३) स्थूल अर्थशास्त्र हे सूक्ष्म अर्थशास्त्रापेक्षा वेगळे आहे.

४) सूक्ष्म अर्थशास्त्रात विभाजन पद्धतीचा वापर केला जातो.

५) सूक्ष्म अर्थशास्त्र हे उत्पन्न सिद्धान्त म्हणून ओळखले जाते.

**प्र. ६. सविस्तर उत्तरे लिहा :**

१) सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व स्पष्ट करा.

२) स्थूल अर्थशास्त्राची संकल्पना वैशिष्ट्यांसह स्पष्ट करा.

# २ उपयोगिता विश्लेषण (Utility Analysis)

**आठवून पहा :**

१) गरज म्हणजे समाधानाच्या अभावाची जाणीव होय.

२) गरजा अमर्यादित असतात.

३) गरजा पुनरूद्भवी असतात.

४) गरजा वयोगट, लिंगपरत्वे, ऋतुमानानुसार, सवयीनुसार आणि संस्कृतीनुसार बदलतात.

५) उपयोगिता म्हणजे वस्तूमध्ये असणारी मानवी गरज भागविण्याची क्षमता होय.

**प्रस्तावना :**

तुम्ही यापूर्वी इयत्ता ११ वी मध्ये उपयोगिता या संकल्पनेबाबत ओळख करून घेतलेली आहेच. या घटकांत उपभोक्त्याच्या वर्तनाबाबत सविस्तर स्पष्टीकरण केले आहे.

प्रत्यक्ष व्यवहारात प्रत्येक व्यक्ती उपलब्ध साधनसामग्रीच्या साहाय्याने आपल्या गरजा भागविण्याचा प्रयत्न करते. खरे तर, सर्व मानवी गरजा एकाच वेळी पूर्ण होऊ शकत नाहीत. उपयोगिता विश्लेषणात उपभोक्त्याच्या महत्तम समाधान मिळविण्याच्या वर्तनाचे स्पष्टीकरण केले जाते.

**हे करून पहा!**

१) तुमच्या गरजा भागवणाऱ्या दहा वस्तूंची यादी करा.

२) विशिष्ट व्यक्तींच्या काही वैशिष्ट्यपूर्ण कृती करण्यासाठी व गरजा भागविण्यासाठी लागणाऱ्या दहा वस्तूंची यादी तयार करा. उदा. शिक्षकाला खडूमध्ये उपयोगिता जाणवते.

**उपयोगितेची वैशिष्ट्ये :**

उपयोगितेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१) **सापेक्ष संकल्पना :** उपयोगिता ही स्थल व कालसापेक्ष संकल्पना आहे. ती स्थलपरत्वे व कालपरत्वे बदलत जाते.

उदा., हिवाळ्यात लोकरीच्या कपड्यांमध्ये जास्त उपयोगिता जाणवते. समुद्रकाठापेक्षा बांधकामाच्या ठिकाणी वाळूमध्ये जास्त उपयोगिता जाणवते.

२) **व्यक्तिनिष्ठ संकल्पना :** उपयोगिता ही मानसशास्त्रीय संकल्पना आहे. उपयोगिता व्यक्तीनुसार बदलते. याचे कारण आवडी-निवडी, प्राधान्य, स्वभाव, पसंती, व्यवसाय इत्यादींमध्ये फरक असतो. उदा., डॉक्टरला स्टेथोस्कोपमध्ये उपयोगिता जाणवते; परंतु सर्वसामान्य व्यक्तीला जाणवत नाही.

३) **नैतिकदृष्ट्या तटस्थ :** उपयोगितेच्या संकल्पनेत नैतिकतेचा विचार नसतो. ही संकल्पना नैतिकदृष्ट्या तटस्थ असते. वस्तूने चांगले-वाईट, योग्य-अयोग्य, असा कोणताही विचार न करता व्यक्तीची कोणतीही गरज पूर्ण करायला हवी. उदा., सुरी किंवा चाकूचा वापर फळे किंवा भाजीपाला कापण्यासाठी गृहिणीकडून केला जातो. तर या वस्तूचा वापर एखाद्याला इजा करण्यासाठीही केला जातो. दोन्ही गरजा वेगळ्या आहेत. परंतु एकाच वस्तूचा वापर करून त्या भागवल्या जातात. म्हणून उपयोगिता नैतिकदृष्ट्या तटस्थ आहे.

४) **उपयोगिता व उपयुक्तता यांत फरक :** उपयोगिता म्हणजे वस्तूच्या अंगी असणारी मानवी गरजा भागविण्याची क्षमता आहे, तर उपयुक्तता म्हणजे वस्तूचे उपयोगमूल्य होय.

उदा., उपभोक्त्याला दुधामध्ये उपयोगिता व उपयुक्तताही जाणवते. मात्र व्यसनी व्यक्तीला दारूमध्ये उपयोगिता जाणवते; परंतू उपयुक्तता जाणवत नाही.

५) **उपयोगिता व आनंद यांत फरक :** वस्तूमध्ये उपयोगिता असली तरी त्यापासून उपभोक्त्याला आनंद मिळतोच असे नाही. उदा., आजारी व्यक्तीला इंजेक्शनमध्ये उपयोगिता जाणवते. कारण त्यामुळे आजार बरा होतो. पण त्यापासून त्याला आनंद मिळतोच असे नाही.

६. **उपयोगिता व समाधान यांतील फरक :** उपयोगिता हे उपभोगाचे कारण आहे, तर समाधान हे उपभोगाचा परिणाम आहे. उपयोगिता व समाधान परस्परसंबंधित असूनही भिन्न संकल्पना आहेत.

उदा., तहानलेली व्यक्ती एक ग्लास पाणी पिते. कारण पाण्यामध्ये तहान भागविण्याची क्षमता असते. पाण्यामधील उपयोगिता हे उपभोगाचे कारण आहे आणि मिळालेले समाधान हा उपभोगाचा परिणाम आहे.

७) **उपयोगितेचे केवळ तात्त्विक मापन शक्य :** उपयोगिता ही मानसशास्त्रीय संकल्पना आहे. ती अदृश्य व अमूर्त

संकल्पना आहे. त्यामुळे संख्यात्मक किंवा आकडेवारीत मापन करणे शक्य नाही. उदा., जेव्हा तहानलेली व्यक्ती पाणी पिते तेव्हा मिळणाऱ्या समाधानाची कमी-अधिक पातळीतून उपयोगिता जाणवते. म्हणून उपयोगिता फक्त अनुभवता येते आणि उपयोगिता धनात्मक, शून्य व ऋणात्मक जाणवते. ऋणात्मक उपयोगितेला नकारात्मक उपयोगिता असेही म्हणतात.

८) **उपयोगिता बहुपर्यायी आहे :** एका वस्तूमुळे एकापेक्षा जास्त व्यक्तींची गरज भागविली जाते. तसेच ती वस्तू विविध वापरासाठी उपयोगी ठरते. उदा., विजेचा वापर विविध व्यक्तींसाठी आणि एकाच वेळी विविध हेतू साध्य करण्यासाठी होतो.


९) **उपयोगिता गरजेच्या तीव्रतेवर अवलंबून असते :** वस्तूची उपयोगिता ही व्यक्तीच्या गरजेच्या तीव्रतेवर अवलंबून असते. जेवढी गरजेची तीव्रता जास्त तेवढी उपयोगिता अधिक जाणवते, तर गरजेची तीव्रता कमी झाल्यास उपयोगिता घटत जाते. उदा., भुकेलेल्या व्यक्तीला अन्नामध्ये भूक नसलेल्या व्यक्तीपेक्षा जास्त उपयोगिता जाणवते.

१०) **उपयोगिता मागणीचा आधार :** वस्तूमध्ये उपयोगिता असेल तरच व्यक्ती त्या वस्तूसाठी मागणी करेल. उदा. आजारी व्यक्तीला औषधामध्ये उपयोगिता जाणवते म्हणून ती औषधाची मागणी करते.

### उपयोगितेचे प्रकार

**उपयोगितेचे प्रकार खालीलप्रमाणे आहेत.**

१) **रूप उपयोगिता :** जेव्हा अस्तित्वात असलेल्या वस्तूचे आकारमान व स्वरूप बदलून उपयोगिता निर्माण केली जाते तेव्हा त्यास रूप उपयोगिता असे म्हणतात. उदा., मातीपासून खेळणी, लाकडापासून फर्निचर इत्यादी.



आकृती २.१

२) **स्थल उपयोगिता :** जेव्हा वस्तूचे स्थळ बदलल्याने वस्तूमध्ये उपयोगिता वाढते तेव्हा त्यास स्थल उपयोगिता म्हणतात. उदा., उष्ण हवामानाच्या प्रदेशापेक्षा थंड हवामानाच्या प्रदेशात उबदार व गरम कपड्यामध्ये जास्त उपयोगिता जाणवते. वस्तूचे स्थलांतर केल्याने स्थल उपयोगिता निर्माण होते.




आकृती २.२

३) **सेवा उपयोगिता :** समाजातील विविध व्यावसायिकांकडून इतरांना व्यक्तिगत सेवा पुरविल्या जातात म्हणजे सेवा उपयोगिता होय. उदा., डॉक्टर, वकील, शिक्षक, गायक इत्यादींच्या सेवा.



आकृती २.३

४) **ज्ञान उपयोगिता :** जेव्हा उपभोक्ता विशिष्ट वस्तूबद्दल ज्ञान प्राप्त करतो तेव्हा त्यास ज्ञान उपयोगिता म्हणतात. उदा. मोबाइल फोन किंवा संगणकाच्या विविध कार्यप्रणालींचे ज्ञान होते तेव्हा ज्ञान उपयोगिता निर्माण होते.




आकृती २.४

**५) स्वामित्व उपयोगिता :** वस्तूची मालकी एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरीत होते, तेव्हा स्वामित्व उपयोगिता निर्माण होते. उदा., विक्रेत्यांकडून ग्राहकांकडे वस्तू हस्तांतरीत होते.



आकृती २.५

**६) काल उपयोगिता :** काळ बदलल्याने काळानुसार वस्तूमध्ये उपयोगिता निर्माण होते. त्यास काल उपयोगिता असे म्हणतात. उदा., विद्यार्थ्याला सुट्टीच्या काळापेक्षा परीक्षा काळात पाठ्यपुस्तकामध्ये जास्त उपयोगिता जाणवते. तसेच वस्तूची साठवण करून आवश्यकतेनुसार दुर्मिळतेच्या काळात वस्तू वापरासाठी उपलब्ध करून देणे म्हणजे काल उपयोगिता निर्माण करणे होय. उदा., रक्तपेढी.




आकृती २.६ अ

**हे करून पहा!**

उपयोगितेचे प्रकार आणि त्यांची उदाहरणे खाली दिलेली आहेत. त्याच्या आधारे जोड्या जुळवा.

उपयोगितेचे प्रकारः- काल उपयोगिता, स्वामित्व उपयोगिता, सेवा उपयोगिता आणि स्थल उपयोगिता

उदाहरणे :

१) दंतवैद्य रोग्याच्या दातांवर इलाज करतात.

२) गिर्यारोहक उंच ठिकाणी जाण्यासाठी ऑक्सिजन सिलेंडर वापरतात.

३) शेतकरी हंगामाच्या शेवटी गोदामात साठवून ठेवलेल्या तांदळाची विक्री करतात.

४) किरकोळ विक्रेता १०० खुर्च्यांची खरेदी घाऊक व्यापाऱ्याकडून करतो.

**उपयोगितेच्या संकल्पना :**

उपयोगिता मापनाच्या दोन मुख्य संकल्पना खाली दिलेल्या आहेत.

**१) एकूण उपयोगिता (Total Utility(T.U.)) :** एकूण उपयोगिता म्हणजे वस्तूच्या सर्व नगांच्या उपभोगापासून उपभोक्त्याला प्राप्त होणाऱ्या एकत्रित उपयोगितांची बेरीज होय. तसेच ही सलगपणे उपभोग घेतलेल्या वस्तूच्या सर्व नगांपासून मिळालेली एकूण उपयोगिता असते.

**२) सीमान्त उपयोगिता (Marginal Utility(M.U.) :** सीमान्त उपयोगिता म्हणजे उपभोक्त्याकडून उपभोग घेतलेल्या वाढीव वस्तूपासून मिळालेली उपयोगिता होय. दुसऱ्या शब्दांत सीमान्त उपयोगिता म्हणजे उपभोग घेतलेल्या वाढीव नगापासून एकूण उपयोगितेत पडणारी भर होय.




आकृती २.६ ब



आकृती २.६ क



आकृती २.६ ड

### तुम्हांला माहीत हवं!

एकूण उपयोगिता व सीमान्त उपयोगिता यांतील परस्परसंबंध खालील सूत्रांच्या आधारे स्पष्ट होतो.

सूत्र – TU = ΣMU

TU = एकूण उपयोगिता, ΣMU = सीमान्त उपयोगितेची बेरीज

$TU = MU_{१} + MU_{२} + MU_{३} …….MU_{n}$

$MU_{१,२,३}$ = प्रत्येक नगाची सीमान्त उपयोगिता

$Mu_{n}$ = विशिष्ट नगाची सीमान्त उपयोगिता

$MU_{n} = TU_{n} - TU_{(n-१)}$

$TU_{n}$ = विशिष्ट पातळीवरील एकूण उपयोगिता

$TU_{(n-१)}$ = अगोदरच्या पातळीतील एकूण उपयोगिता

### एकूण उपयोगिता व सीमान्त उपयोगिता यांतील संबंध :


वस्तूच्या विविध नगांपासून मिळालेली सीमान्त उपयोगिता आणि एकूण उपयोगिता यांच्यात परस्परसंबंध असतो. तक्ता क्र.२.१ मधील उदाहरणावरून हे स्पष्ट करता येते.

**तक्ता क्र.२.१**

| क्ष वस्तूचे नग | एकूण उपयोगिता | सीमान्त उपयोगिता |
|---|---|---|
| १ | १० | १० |
| २ | १८ | ८ |
| ३ | २४ | ६ |
| ४ | २८ | ४ |
| ५ | ३० | २ |
| ६ | ३० | ० |
| ७ | २८ | –२ |

तक्ता क्र.२.१ च्या आधारे एकूण उपयोगिता व सीमान्त उपयोगिता वक्र खालील आकृतीव्दारे स्पष्ट करता येतो.

**एकूण उपयोगिता व सीमान्त उपयोगिता**




**आकृती क्र.२.७**

'क्ष' अक्षावर वस्तूचे नग आणि 'य' अक्षावर एकूण उपयोगिता व सीमान्त उपयोगिता दर्शविली आहे. आकृती २.७ मध्ये एकूण उपयोगिता वक्र डावीकडून उजवीकडे वर जाणारा आणि सीमान्त उपयोगिता वक्र डावीकडून उजवीकडे खाली जाणारा मिळतो. सीमान्त उपयोगिता वक्र शून्य आणि ऋणात्मक पातळी दर्शवतो. तर एकूण उपयोगिता वक्र महत्तम आणि स्थिर स्वरूपाची एकूण उपयोगिता दर्शवतो.

आकृती २.७ द्वारे खालीलप्रकारे परस्पर संबंध स्पष्ट करता येतो.

सीमान्त उपयोगिता व एकूण उपयोगिता यांमधील परस्पर संबंध.

१) सुरुवातीला एकूण उपयोगिता व सीमान्त उपयोगिता समान असतात.
   एकूण उपयोगिता = सीमान्त उपयोगिता

२) 'क्ष' वस्तूच्या नगाचा उपभोग जसजसा घेतला जातो तसतशी एकूण उपयोगिता घटत्या दराने वाढते आणि सीमान्त उपयोगिता घटत जाते.
   (ए.उ. ↑ सी. उ. ↓)

३) जेव्हा एकूण उपयोगिता महत्तम असते तेव्हा सीमान्त उपयोगिता शून्य होते. ही स्थिती सर्वाधिक समाधानाचा (तृप्ती) बिंदू दर्शवते.
   ए. उ. = महत्तम, सी.उ. = ०


४) जेव्हा एकूण उपयोगिता घटते तेव्हा सीमान्त उपयोगिता ऋण होते ही स्थिती उपभोक्त्याचे असमाधान दर्शवते.
   (ए.उ. ↓ सी. उ. ↑)

५) सर्वाधिक समाधानाचा (तृप्तीचा) बिंदू गाठल्यानंतर सर्वसाधारण उपभोक्ता वस्तूचा उपभोग घेण्याचे थांबवतो. कारण त्या बिंदूत त्याला सर्वाधिक समाधान मिळते आणि एकूण उपयोगितेत काहीही भर पडत नाही.

६) सर्वाधिक समाधानाच्या (तृप्तीच्या) बिंदूनंतर समाधानाचे रूपांतर असमाधानात होते. दुसऱ्या शब्दांत उपभोक्त्याला उपयोगितेचे दुष्परिणाम जाणवू लागतात.

### हे करून पहा!

एकूण उपयोगिता व सीमान्त उपयोगिता यांतील फरक लक्षात घेऊन खालील तक्ता पूर्ण करा.

| एकूण उपयोगिता | सीमान्त उपयोगिता |
|---|---|
| १) वस्तूच्या सर्व नगांच्या उपभोगांपासून व्यक्तीला प्राप्त होणाऱ्या उपयो-गितांची बेरीज म्हणजे एकूण उपयोगिता असते. | १) वस्तूच्या प्रत्येक वाढीव नगाच्या उपभोगातून व्यक्तीला प्राप्त होणारी अतिरिक्त उपयोगिता असते. |
| २) एकूण उपयोगिता घटत्या दराने वाढते. | २) |
| ३) | ३) सीमान्त उपयोगिता शून्य असते. |
| ४) समाधानाच्या बिंदूनंतर उपभोग चालू ठेवल्यास एकूण उपयोगिता कमी होत जाते. | ४) |
| ५) एकूण उपयोगिता वस्तूच्या वापराबाब-त(उपयोग) मूल्य निर्धारित करते. | ५) |
| ६) | ६) सीमान्त उपयोगिता धन,ऋण किंवा शून्य असू शकते. |
| ७) आकृती :   | ७) आकृती : |

## घटत्या सीमान्त उपयोगितेचा सिद्धांन्त (The Law of diminishing Marginal Utility(DMU) :

### प्रस्तावना :

घटत्या सीमान्त उपयोगितेचा सिद्धान्त सर्वप्रथम प्रा.गॉसेन यांनी मांडला. परंतु प्रा.आल्फ्रेड मार्शल यांनी १८९० साली प्रकाशित झालेल्या 'अर्थशास्त्राची मूलतत्त्वे' या ग्रंथात विस्तृत स्वरूपात स्पष्ट केला.

### सिद्धांताचे विधान :

प्रा.आल्फ्रेड मार्शल यांच्या मते, "इतर परिस्थिती स्थिर असताना, व्यक्तीजवळ आधीपासून असलेल्या एखाद्या वस्तूच्या साठ्यात वाढ होत गेल्यास त्यापासून मिळणारे अतिरिक्त समाधान कमी होत जाते."

दुसऱ्या शब्दांत "इतर परिस्थिती कायम असताना एखाद्या वस्तूच्या साठ्यात वाढ होत गेल्यास वस्तूच्या साठ्यात होणाऱ्या वाढीबरोबर प्रत्येक वाढीव नगापासून मिळणारी जादाची उपयोगिता क्रमशः घटत जाते."

थोडक्यात, एखादी वस्तू अधिक प्रमाणात असेल तर ती वस्तू अधिकाधिक प्रमाणात घेण्याची इच्छा कमी कमी होत जाते.

### गृहीतके :

घटत्या सीमान्त उपयोगिता सिद्धांताची गृहीतके खालीलप्रमाणे आहेत.

१) **विवेकशीलता :** उपभोक्ता विवेकशील आहे आणि त्याची वर्तणूक सर्वसामान्य आहे असे मानले जाते. त्यामुळे तो महत्तम समाधान मिळविण्याचा प्रयत्न करतो.

२) **संख्यात्मक मापन :** सिद्धांतात उपयोगितेचे संख्यात्मक मापन करता येते असे गृहीत धरले जाते. त्यामुळे गणिती प्रक्रिया सहज शक्य होतात. यामुळे वस्तूच्या प्रत्येक नगापासून मिळणारी उपयोगिता जाणून घेता येते व त्यांची तुलना करता येते.

३) **एकजिनसीपणा :** उपभोगातील वस्तूचे सर्व नग आकार, स्वरूप, रंग, चव इत्यादींबाबत समान आहेत.

४) **उपभोग सातत्य :** एखाद्या वस्तूच्या सर्व नगांचा उपभोग कोणताही खंड न पडता सलगपणे एकापाठोपाठ एक घेतला जातो.

५) **योग्य आकारमान :** उपभोग्य वस्तूंच्या सर्व नगांचे आकारमान योग्य किंवा साधारण असावे. ते अत्यंत मोठे किंवा लहान नसावे.

६) **स्थिरता :** उपभोगाच्या प्रक्रियेत उपभोक्त्याचे उत्पन्न, चव-पसंती, सवयी, आवडी-निवडी यांसारखे घटक स्थिर असावेत. पैशाची सीमान्त उपयोगिता सुध्दा स्थिर असल्याचे गृहीत धरले जाते.

७) **विभाज्यता :** सिद्धान्त असे गृहीत धरतो की, उपभोगात आणलेली वस्तू विभाज्य असावी. त्यामुळे वस्तूचे लहान भागात विभाजन करता येईल.

८) **एकच गरज :** एकच गरज पूर्णपणे भागविण्यासाठी वस्तूचा

वापर होतो असे सिद्धान्त गृहित धरतो.


तक्ता २.२ च्या आधारे घटत्या सीमान्त उपयोगितेचा सिद्धांत स्पष्ट होतो.

**तक्ता २.२**

| '$x$' ची नगसंख्या | सीमान्त उपयोगिता |
|---|---|
| १ | १० |
| २ | ०८ |
| ३ | ०६ |
| ४ | ०४ |
| ५ | ०२ |
| ६ | ० |
| ७ | -२ |

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, एखाद्या वस्तूच्या नगांचा उपभोग जसजसा वाढत जातो तसतशी त्यापासून मिळणारी सीमान्त उपयोगिता क्रमशः घटत जाते, शून्य व ऋण होत जाते.

**घटत्या सीमान्त उपयोगितेच्या सिद्धांताचा वक्र**




**आकृती २.८**

## आकृतीचे स्पष्टीकरण :

वरील आकृतीत 'क्ष' अक्षावर वस्तूचे नग दर्शविले आहेत व 'य' अक्षावर सीमान्त उपयोगिता दर्शविली आहे. तक्त्यानुसार सीमान्त उपयोगितेचे विविध बिंदू आलेखावर रेखाटून जोडले असता हा वक्र डावीकडून उजवीकडे खाली येतो व असे दर्शवितो की, वस्तूच्या उपभोगात सातत्याने वाढ झाल्यास सीमान्त उपयोगिता घटत जाते.

जेव्हा 'सीउ' वक्र हा 'क्ष' अक्षाला स्पर्श करतो तेव्हा सीमान्त उपयोगिता शून्य होते. हा बिंदू कमाल समाधानाची पातळी दर्शवितो. याला सर्वाधिक समाधानाचा सर्वोत्तम बिंदू (तृप्तीचा बिंदू) असे म्हणतात. या बिंदूनंतर वस्तूचा उपभोग घेतल्यास असमाधान (नकारात्मक) मिळते आणि सीमान्त उपयोगिता ऋण दर्शविली जाते, जी आकृतीत छायांकित करून दाखविली आहे.

## सिद्धांताचे अपवाद :

घटत्या सीमान्त उपयोगिता सिद्धांताचे अपवाद खालीलप्रमाणे आहेत :

१) **छंद :** पोस्टाची विविध तिकिटे, दुर्मिळ नाणी व दुर्मिळ चित्रे यांचा संग्रह करणे, संगीत ऐकणे, पुस्तकांचे वाचन करणे यासारख्या छंदांबाबत हा सिद्धान्त अनुभवास येत नाही. याचे कारण त्यांच्या साठ्यात होणारी वाढ अधिकाधिक आनंद देते. त्यामुळे सीमान्त उपयोगिता वाढते. परंतु यात एकजिनसीपणा व सातत्य या गृहीतकांचे उल्लंघन झाले आहे.

२) **कंजूष व्यक्ती :** कंजूष उपभोक्त्याच्या बाबतीत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक वाढीव नगापासून त्याला अधिकाधिक समाधान मिळते कारण तो लोभी असतो. अविवेकी असतो. त्यामुळे पैशाच्या साठ्यात होणाऱ्या वाढीबरोबर पैशाची सीमान्त उपयोगिता वाढते. परंतु यात विवेकशीलता या गृहीतकाचे उल्लंघन झालेले आहे.

३) **व्यसन :** व्यसनी व्यक्तींच्या बाबतीत असे आढळून येते की, मद्याच्या प्रत्येक वाढीव नगाच्या उपभोगाबरोबर त्याची नशेची पातळी वाढत जाते. त्यामुळे मद्यपी व्यक्तीची सीमान्त उपयोगिता वाढल्यासारखे वाटते. खरे तर हा आभास असतो. ही स्थिती जवळजवळ सर्वच व्यसनांच्या बाबतीत लागू होते. मात्र यात विवेकशीलता या गृहीतकाचे उल्लंघन झालेले आहे.

४) **सत्ता :** व्यक्तिला जसजशी सत्ता प्राप्त होते तसतशी सत्तेची लालसा वाढत जाते. ती जास्तीतजास्त सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करते. परंतु येथे विवेकशीलता या गृहीतकाचे उल्लंघन झालेले आहे.

५) **पैसा :** पैशाची सीमांत उपयोगिता कधीही शून्य होत नाही असे म्हटले जाते. पैशाच्या साठ्याच्या वाढीबरोबर सीमान्त उपयोगिता वाढत जाते. कारण विविध गरजा भागविताना अनेक वस्तू व सेवांची खरेदी करण्यासाठी विनिमय माध्यम म्हणून पैसा वापरला जातो. मात्र काही अर्थतज्ज्ञांच्या मते हा सिद्धांत पैशाला लागू होतो. उदा., श्रीमंत व्यक्तीपेक्षा गरीब व्यक्तीला पैशाची सीमान्त उपयोगिता जास्त जाणवते.

वरील सर्व बाबी सिध्दांताचे अपवाद मानले जातात पण त्यात कोणत्या ना कोणत्या गृहीतकांचे उल्लंघन होत असल्यामुळे घटत्या सीमान्त उपयोगितेचे अपवाद खरे अपवाद नसून केवळ भासमान असतात.

### या सिद्धांतावरील टीका :

पुढील मर्यादांच्या आधारे सिद्धांताचे टीकात्मक परीक्षण केले आहे.

१) **अवास्तव गृहीतके :** घटत्या सीमान्त उपयोगितेचा सिद्धान्त एकजिनसीपणा, सातत्य, स्थिरता, विवेकशीलता इत्यादी विविध गृहीतकांवर आधारित आहे. परंतु प्रत्यक्षात या सर्व अटी एकाच वेळी पूर्ण होऊ शकत नाहीत.

२) **संख्यात्मक मापन :** उपयोगिता संख्येत मोजता येते. तिची बेरीज व तुलना करता येते आणि कोष्टकाद्वारे सादर करता येते. पण प्रत्यक्षात उपयोगितेचे संख्यात्मक मापन करणे अशक्य असते. कारण उपयोगिता ही मानसशास्त्रीय संकल्पना आहे.

३) **अविभाज्य वस्तू :** हा सिद्धांत गाडी, रेफ्रिजरेटर, दूरदर्शन संच यांसारख्या अविभाज्य व अवजड वस्तूंसाठी लागू पडत नाही. कारण, साधारणपणे या वस्तूंची खरेदी एका वेळी एकाच वस्तूची केली जाते. अशा वस्तूच्या सीमान्त उपयोगितेची तुलना अशक्य असते.

४) **पैशाची स्थिर सीमान्त उपयोगिता :** सिद्धान्त गृहीत धरतो की पैशाच्या प्रत्येक एककाची सीमान्त उपयोगिता स्थिर असते पण टीकाकारांच्या मते पैशाची सीमान्त उपयोगिता व्यक्तिपरत्वे बदलते. तसेच किमतींतील बदल, पैशाचा साठा यांमुळे प्रभावित होते.

५) **एकच गरज :** हा सिद्धान्त विशिष्ट वेळी एकच गरज पूर्ण करून मिळणाऱ्या समाधानापुरता मर्यादित आहे. वास्तविक व्यक्ती एकाच वेळी अनेक गरजा पूर्ण करून समाधान मिळविते.

### सिद्धांताचे महत्त्व :

घटत्या सीमान्त उपयोगितेच्या सिद्धांतावर जरी टीका होत असली तरी त्या सिद्धांताच्या सार्वत्रिक वापरामुळे हा सिद्धान्त एक प्रसिद्ध व महत्त्वपूर्ण अर्थशास्त्रीय सिद्धान्त आहे.

१) **उपभोक्त्यांसाठी उपयुक्त :** मर्यादित साधनांमुळे महत्तम उपयोगिता प्राप्त करण्यासाठी वस्तूंच्या उपभोगामध्ये वैविध्य असणे आवश्यक आहे.

२) **सरकारसाठी उपयुक्त :** शासनाला विविध आर्थिक योजनांची आखणी करण्यासाठी हा सिद्धान्त उपयुक्त ठरतो. उदा. प्रगतशील कर धोरण, किंमत धोरण, व्यापार धोरण इत्यादी.

३) **मूल्य विरोधाभास :** वस्तूचे उपयोगिता मूल्य व विनिमय मूल्य यातील फरक दाखवून हा सिद्धान्त मूल्याचा विरोधाभास स्पष्ट करतो. ज्यामध्ये उपयोगिता मूल्य जास्त उदा. पाणी, हवा, सूर्यप्रकाश इत्यादी. घटकाचे विनिमय मूल्य कमी असते तसेच काही वस्तूंचे उपयोगिता मूल्य कमी असते, पण दुर्मिळतेमुळे विनिमय मूल्य जास्त असते. उदा. हिरे, सोने. हा सिद्धान्त वस्तूंचे उपयोगिता मूल्य व विनिमय मूल्य ह्यांतील विरोधाभास समजण्यासाठी साहाय्य करतो.

४) **मागणी सिध्दांताचा आधार :** मागणीचा सिद्धान्त घटत्या सिमांत उपयोगितेच्या सिद्धांतावर आधारित आहे. मागणी सिद्धांतानुसार वस्तूची किंमत कमी झाल्यास वस्तूची मागणी वाढते आणि किंमत जास्त झाल्यास मागणी कमी होते. जेव्हा वस्तूंच्या नगसंख्येची अधिकाधिक खरेदी उपभोक्त्याकडून केली जाते तेव्हा सीमान्त उपयोगिता क्रमशः घटत जाते. म्हणून फक्त कमी किमतीला वस्तूची जास्त नगसंख्या खरेदी केली जाते.

**हे करून पहा!**

मूल्य विरोधाभासावर उदाहरणाच्या आधारे माहितीवजा टीप लिहा.

### सीमान्त उपयोगिता व किंमत यांतील संबंध :

मागणीचा सिद्धान्त घटत्या सीमान्त उपयोगितेच्या सिद्धांतावर आधारित आहे हे समजून घेण्यासाठी सीमान्त उपयोगिता व किंमत यातील परस्परसंबंधाबाबत चर्चा करूया. हा सिद्धान्त व्यावहारिक उपयोजनाचे समर्पक उदाहरण आहे. कोष्टक क्र. २.३ च्या आधारे सीमान्त उपयोगिता आणि किंमत यांच्याशी संबंधित खालील निष्कर्ष काढता येतात.

बाजार किमतींशी तुलना करण्यासाठी सीमान्त उपयोगितेचे रूपांतर पैशात व्यक्त केले जाते असे गृहीत धरले की 'क्ष' वस्तूच्या एका नगाची बाजार किंमत ५० ₹. आहे आणि एका नगाची सीमान्त उपयोगिता १० ₹. बरोबर समतुल्य आहे. अशा प्रकारे एका नगाची सीमान्त उपयोगिता आणि बाजार किंमत ह्याची तुलना स्तंभ क्र.५ मध्ये दाखवली आहे.

पुढील कोष्टक क्र.२.३ द्वारे ही संकल्पना चांगल्या प्रकारे समजून घेता येईल.

**तक्ता क्र.२.३**

| 'क्ष' वस्तूचे नग | 'क्ष' वस्तूचे नग/ सीमान्त उपयोगिता | सीमान्त उपयोगिता ₹ मध्ये १ नग = १० ₹ सी.उ. × १०₹ | बाजार किंमत/ घटक नग किंमत (५० ₹) | सीमान्त उपयोगिता आणि किमतीची तुलना |
|---|---|---|---|---|
| १ | १० | १००(१०×१०₹) | ५० | १०० सी.उ.> ५० ₹ |
| २ | ८ | ८० (८ × १० ₹) | ५० | ८० सी.उ.> ५० ₹ |
| ३ | ७ | ७० (७ × १० ₹) | ५० | ७० सी.उ.> ५० ₹ |
| ४ | ५ | ५० (५ × १० ₹) | ५० | ५० सी.उ.= ५० ₹ |
| ५ | ३ | ३० (३ × १० ₹) | ५० | ३० सी.उ.< ५० ₹ |
| ६ | १ | १० (१ × १० ₹) | ५० | १० सी.उ.< ५० ₹ |

उपभोक्ता एकामागून एक सलगपणे वस्तूचा उपभोग घेतो. घटत्या सीमान्त उपयोगिता सिद्धांतानुसार खरेदी केलेल्या व उपभोग घेतलेल्या प्रत्येक वाढीव नगाची सीमान्त उपयोगिता घटणारी असते.

सीमान्त उपयोगिता बाजार किमतींपेक्षा जास्त असते. उदा.,कोष्टक क्र.२.३ मध्ये पहिल्या तीन नगांपासून मिळणारी सीमान्त उपयोगिता बाजार किंमत ₹ ५० पेक्षा अधिक आहे. याचे कारण उपभोक्त्याची गरज तीव्र असते. यानंतर सीमान्त उपयोगिता व किंमत समान होतात. म्हणून उपभोक्ता चौथा नग घेण्याचा विचार करू शकतो. पाचव्या आणि सहाव्या नगाच्या बाबतीत प्राप्त सीमान्त उपयोगिता बाजार किमतीपेक्षा कमी होते. या समतोल स्थितीनंतर विवेकी उपभोक्ता नगांची खरेदी थांबवतो.

१) जेव्हा उपभोक्ता इच्छेनुसार वस्तूंचा उपभोग घेतो तेव्हा सीमान्त उपयोगिता किमतीपेक्षा जास्त असते.
(MUx>Px) सीमान्त उपयोगिता = सी.उ. क्ष > कि.
यालाच 'सीमान्तपूर्व नग' म्हणतात.


२) ज्या नगाच्या वेळेस सीमान्त उपयोगिता व किंमत समान होतात त्या नगाला सीमान्त नग संबोधले जाते.
(MUx = Px) सी.उ. = कि. = उपभोक्त्याचा समतोल.

३) विवेकी उपभोक्ता जे नग विकत घेऊ इच्छित नाही त्या नगांना सीमान्तोत्तर नग असे म्हणतात.
(MUx < Px = सि.उ. < कि.)


अशाप्रकारे जेव्हा MUx = Px असते, तेव्हा विवेकी उपभोक्त्याचा समाधानाचा समतोल साधला जातो.

उपयोगिता व किंमत यांतील परस्पर संबंध हा मागणीच्या सिद्धांताचा पाया आहे.

**तुम्हांला माहीत आहे का?**



**जे. आर. हिक्स**



**आर.जी.डी. ॲलन**

ब्रिटिश अर्थतज्ज्ञ जे. आर. हिक्स आणि आर.जी.डी. ॲलन ह्यांनी समवृत्ती वक्र पद्धतीचा विकास केला. प्रा. अल्फ्रेड मार्शल यांच्या संख्यावाचक उपयोगिता सिद्धांताला वास्तववादी पर्याय म्हणून हा सिद्धान्त अस्तित्वात आला. समवृत्ती वक्र पद्धतीमध्ये क्रमवाचक उपयोगिता स्वीकारलेली आहे.

समवृत्ती वक्र हा दोन वस्तूंच्या संयोगाच्या विशिष्ट स्थानाला जोडणारा वक्र असून उपभोक्ता या वस्तूंच्या संयोजनाबद्दल तटस्थ असतो. कारण त्याला दोन्ही वस्तूंच्या उपभोगाने समान समाधानाची पातळी मिळते.

# स्वाध्याय

**प्र. १. खालील विधाने पूर्ण करा :**

१) घटत्या सीमान्त उपयोगितेच्या सिद्धांतात आल्फ्रेड मार्शल यांनी गृहीत धरलेली पैशाची उपयोगिता ................

अ) वाढते    ब) स्थिर राहते

क) घटते    ड) वाढते आणि नंतर घटते

२) घटत्या सीमान्त उपयोगितेच्या सिद्धांतात सीमान्त उपयोगितेची संकल्पना ................

अ) क्रमवाचक संकल्पना

ब) संख्यात्मक संकल्पना

क) क्रमवाचक संकल्पना आणि संख्यात्मक संकल्पना दोन्हीही

ड) यांपैकी नाही

३) जेव्हा सीमान्त उपयोगिता ऋण होते, तेव्हा एकूण उपयोगिता ................

अ) वाढते    ब) स्थिर असते

क) घटते    ड) शून्य असते

४) घटत्या सीमान्त उपयोगितेच्या सिद्धांतात सर्वाधिक समाधानाचा (तृप्ती) बिंदू म्हणजे जेव्हा ................

अ) एकूण उपयोगिता वाढते आणि सीमान्त उपयोगिता घटते.

ब) एकूण उपयोगिता घटते आणि सीमान्त उपयोगिता ऋण होते.

क) एकूण उपयोगिता महत्तम होते आणि सीमान्त उपयोगिता शून्य होते.

ड) सीमान्त उपयोगिता घटते आणि एकूण उपयोगिता वाढते.

५) घटत्या सीमान्त उपयोगितेच्या सिद्धांतात जेव्हा सीमान्त उपयोगिता घटते तेव्हा एकूण उपयोगिता ................

अ) वाढते    ब) घटते

क) बदलत नाही    ड) महत्तम होते.

**प्र.२. योग्य जोडीचा पर्याय निवडा :**

**१)**

| अ | ब |
|---|---|
| १) काळ उपयोगिता | अ) वाहतूक |
| २) स्थल उपयोगिता | ब) रक्तपेढी |
| ३) सेवा उपयोगिता | क) मोबाइल फोन |
| ४) ज्ञान उपयोगिता | ड) डॉक्टर |

**पर्याय :** अ) १-ड, २-ब, ३-अ, ४-क

ब) १-ब, २-अ, ३-ड, ४-क

क) १-अ, २-ब, ३-क, ४-ड

ड) १-ब, २-क, ३-ड, ४-अ

**२)** उपभोक्त्याचा समतोल दर्शविणारे विधान ................

अ) सीमान्त उपयोगिता किंमतीपेक्षा जास्त

ब) सीमान्त उपयोगिता व किंमती समान

क) सीमान्त उपयोगिता किंमतीपेक्षा कमी

ड) किंमत एकापेक्षा कमी

**पर्याय :** i) अ आणि ब

ii) अ, ब आणि क

iii) अ, ब, क आणि ड

iv) फक्त ब

**प्र. ३. खालील उदारहणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा :**

१) सलमाने हिवाळ्यात तिच्या वडिलांसाठी स्वेटर खरेदी केले.

२) निलेशने त्याच्या बहिणीसाठी दागिने खरेदी केले.

३) कविताने संत्र्यांचे एकामागे एक पाच नग सेवन केले.

४) भूषणने चार चपात्या खाल्ल्यानंतर पाचवी चपाती खाण्यास नकार दिला.

५) ललिताने वही-पेनचा वापर करून निबंध लेखनाची गरज पूर्ण केली.

**प्र. ४. खालील तक्त्याचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा :**

| वस्तूचे नग | एकूण उपयोगिता | सीमान्त उपयोगिता |
|---|---|---|
| १ | ६ | ६ |
| २ | ११ | ५ |
| ३ | १५ | ४ |
| ४ | १५ | ० |
| ५ | १४ | -१ |

१) एकूण उपयोगिता व सीमान्त उपयोगिता वक्र काढा.

२) अ) जेव्हा एकूण उपयोगिता महत्तम असते तेव्हा सीमान्त उपयोगिता ☐

ब) जेव्हा एकूण उपयोगिता घटते तेव्हा सीमान्त उपयोगिता ☐

**प्र. ५. सविस्तर उत्तरे लिहा :**

१) घटत्या सीमान्त उपयोगितेचा सिद्धान्त अपवादासह स्पष्ट करा.

# ३ अ) मागणीचे विश्लेषण – (Demand Analysis)

**प्रस्तावना :**

मागील प्रकरणामध्ये आपण उपयोगितेच्या संकल्पनेचा अभ्यास केला आहे. उपयोगिता मागणीचा आधार आहे. विशिष्ट वस्तूंमध्ये असणारी उपयोगिता इच्छा निर्माण करते. पण उपयोगिता स्वतःहून वस्तूला मागणी निर्माण करत नाही. या प्रकरणामध्ये मागणीचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. मागणीचे विश्लेषण उपभोक्त्याच्या वर्तनाशी निगडित आहे.

**मागणीची संकल्पना :**

सर्वसाधारणपणे मागणी म्हणजे इच्छा. एखादी वस्तू हवीहवीशी वाटणे म्हणजे इच्छा होय. अर्थशास्त्रीयदृष्ट्या मागणी म्हणजे अशी इच्छा जिला खरेदीशक्तीचे पाठबळ आणि ते खर्च करण्याची मानसिक तयारी असते. अशा इच्छेचे रूपांतर मागणीत होते. उदा., एखाद्या व्यक्तीला दूरदर्शन संच खरेदी करण्याची इच्छा असेल पण त्यासाठी पुरेशी क्रयशक्ती उपलब्ध नसेल, तर ती केवळ इच्छा असेल मागणी नाही.

थोडक्यात, 'सर्व इच्छा म्हणजे मागणी नाही. परंतु मागणी म्हणजे परिणामकारक इच्छा.'

**मागणी = इच्छा असणे + खरेदी करण्याची तयारी + खरेदी क्षमता**

**हे करून पहा.**

**संकल्पनांची नावे लिहा.**

१) गरीब व्यक्तीला कार हवी आहे.

२) एखाद्या श्रीमंत व्यक्तीने कार विकत घेतली.

**मागणीची व्याख्या :**

बेनहॅम यांच्या मते, "विशिष्ट वेळी विशिष्ट किमतीला विशिष्ट वस्तूची खरेदी केलेली नगसंख्या म्हणजे त्या वस्तूची मागणी होय."

यावरून मागणीची खालील वैशिष्ट्ये स्पष्ट होतात.

१) मागणी ही सापेक्ष संकल्पना आहे.

२) मागणीला विशिष्ट वेळेचा व किमतीचा संदर्भ आवश्यक असतो.

**मागणी पत्रक :**

एखाद्या विशिष्ट वस्तूची किंमत आणि त्या वस्तूची मागणी यांतील कार्यात्मक संबंध ज्या सारणीद्वारे दर्शविला जातो, त्यास मागणी पत्रक असे म्हणतात.

मागणी पत्रक हे वैयक्तिक मागणी पत्रक आणि बाजार मागणी पत्रक असते.

**अ) वैयक्तिक मागणी पत्रक :**

विशिष्ट काळात, विशिष्ट किमतीला एका उपभोक्त्याने केलेली मागणी म्हणजे वैयक्तिक मागणी पत्रक होय.

विशिष्ट वेळेला व वेगवेगळ्या किमतींना वैयक्तिक उपभोक्ता किती नगसंख्या खरेदी करतो हे ज्या पत्रकात दर्शविलेले असते, त्यास वैयक्तिक मागणी पत्रक म्हणतात. खाली दिलेल्या वैयक्तिक मागणी पत्रकाद्वारे ह्याचे स्पष्टीकरण देता येईल.

**तक्ता ३.१ वैयक्तिक मागणी पत्रक**

| 'क्ष' वस्तूची किंमत (₹) | 'क्ष' वस्तूला असलेली मागणी (किलो) |
|---|---|
| १० | १ |
| ८ | २ |
| ६ | ३ |
| ४ | ४ |
| २ | ५ |


वरील तक्त्यात एका उपभोक्त्याची 'क्ष' वस्तूची विविध किमतींना केलेली खरेदी दर्शवलेली आहे. यावरून असे दिसून येते की, अधिक किंमतीला कमी नगसंख्येची मागणी केली जाते आणि कमी किमतीला अधिक नगसंख्येची मागणी केली जाते. यावरून किंमत आणि मागणी यांमध्ये व्यस्त संबंध आहे.

**वैयक्तिक मागणी वक्र :**

वैयक्तिक मागणी वक्र हा वैयक्तिक मागणी तक्त्याचे आलेखीय सादरीकरण असते.

तक्ता ३.१ च्या आधारे वैयक्तिक मागणीवक्र खालील आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट करता येईल.

**वैयक्तिक मागणी वक्र**




**'क्ष' वस्तूची मागणी (कि.ग्रॅ.)**

**आकृती ३.१**

आकृती ३.१ मध्ये 'क्ष' अक्षावर 'क्ष' वस्तूची मागणी व 'य' अक्षावर किंमत दर्शविली आहे. किंमत व मागणी यांमधला व्यस्त संबंध दाखवणारा 'मम' हा मागणी वक्र डावीकडून उजवीकडे खाली जाणारा आहे.



**आकृती ३.२**

## ब) बाजार मागणी पत्रक :

विशिष्ट काळात विशिष्ट किंमतीला बाजारातील सर्व उपभोक्त्यांनी केलेली मागणी होय.

विशिष्ट वेळेला व वेगवेगळ्या किंमतींना बाजारातील सर्व उपभोक्ते किती नगसंख्या खरेदी करतात हे ज्या पत्रकात दर्शविलेले असते, त्यास बाजार मागणी पत्रक असे म्हणतात.

हे पत्रक सर्व ग्राहकांनी विविध किंमतींना केलेल्या मागणीच्या रकान्याची आडवी बेरीज करून प्राप्त करता येते. किंमत व मागणी यांत व्यस्त संबंध आहे, असेही यावरून दिसून येते.

हे खालील बाजार मागणी पत्रकाच्या सहाय्याने स्पष्ट करता येते.

**तक्ता क्र.३.२ बाजार मागणी पत्रक**


| 'क्ष' वस्तूची किंमत (₹) | 'क्ष' वस्तूची मागणी (किलो) | | | बाजार मागणी (किलो) अ+ब+क |
|---|---|---|---|---|
| | ग्राहक 'अ' | ग्राहक 'ब' | ग्राहक 'क' | |
| १० | ५ | १० | १५ | ३० |
| ८ | १० | १५ | २० | ४५ |
| ६ | १५ | २० | २५ | ६० |
| ४ | २० | २५ | ३० | ७५ |
| २ | २५ | ३० | ३५ | ९० |

वरील तक्त्यात वेगवेगळ्या अ,ब, क उपभोक्त्यांची 'क्ष' वस्तूंची विविध किमतींना केलेली खरेदी दर्शविलेली आहे. यावरून असे दिसून येते की, अधिक किंमतीला कमी नगसंख्येची मागणी केली जाते आणि कमी किंमतीला अधिक नगसंख्येची मागणी केली जाते. अशा प्रकारे किंमत आणि मागणी यांमध्ये व्यस्त संबंध आहे.

## बाजार मागणी वक्र :

आलेखीयदृष्ट्या बाजार मागणी वक्र हा वैयक्तिक ग्राहकांच्या मागणी तक्त्याची आडवी बेरीज होय. तक्ता क्र.३.२ च्या आधारे बाजार मागणी वक्र खालील आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट केला आहे.


**बाजार मागणी वक्र**




**मागणी (कि.ग्रॅ.)**

**आकृती ३.३**

आकृती ३.३ मध्ये एका महिन्यातील 'क्ष' वस्तूंच्या विविध किमतींना असलेल्या मागणीच्या आधारे 'क्ष' वस्तूसाठीचा मागणी वक्र काढलेला आहे. यावरून असे दिसून येते की, मागणी वक्राचा उतार ऋणात्मक स्वरूपाचा आहे आणि हा वक्र डावीकडून उजवीकडे वरून खाली येणारा आहे.



**आकृती ३.४ बाजार मागणी**

**हे करून पहा!**

तुमचे कुटुंब मागवित असलेल्या विविध वस्तूंच्या मागणीचा मासिक तक्ता तयार करा. उदा., भाज्या, फळे, औषधे इत्यादी.

**मागणीवक्र डावीकडून उजवीकडे वरून खाली येण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत :**

१) **घटत्या सीमान्त उपयोगितेचा नियम :** एखाद्या वस्तूच्या साठ्यात वाढ झाली असता सीमान्त उपयोगिता क्रमशः घटत जाणारी असते. म्हणून एखाद्या वस्तूची किंमत कमी झाली तर उपभोक्ता जास्त नगसंख्येची मागणी करतो.

२) **उत्पन्न परिणाम (वास्तव उत्पन्न) :** जेव्हा किंमत घटते, तेव्हा उपभोक्त्यांची खरेदीशक्ती (वास्तव उत्पन्न) वाढते. त्यामुळे ते सर्वसाधारण वस्तूंची जास्त प्रमाणात मागणी करू शकतात, त्याला उत्पन्न परिणाम असे म्हणतात.

३) **पर्यायता परिणाम :** पर्यायी वस्तूंबाबत असे दिसून येते की, एखाद्या वस्तूची किंमत वाढली तर उपभोक्ता पर्यायी वस्तूंची जास्त मागणी करतो आणि ज्या वस्तूंच्या किमती वाढतात त्यांची मागणी कमी करतो. यावरून असे दिसून येते की, किंमत व मागणी यांत व्यस्त संबंध असतो.

४) **विविध उपयोगी वस्तू :** जेव्हा एखादी वस्तू अनेक गरजा भागविण्यासाठी वापरली जाते अशा वस्तूची किंमत कमी झाली असता मागणी वाढते. याउलट अशा वस्तूची किंमत वाढली असता मागणी कमी होते.

५) **नवीन उपभोक्ते :** जेव्हा वस्तूंच्या किंमती कमी होतात तेव्हा नवीन ग्राहकवर्ग निर्माण होतो, ज्यांना या वस्तू खरेदी करणे परवडते अशा वस्तूंच्या किंमती कमी झाल्याने वस्तूंच्या एकूण मागणीत वाढ होते.

**हे करून पहा!**

खालील काल्पनिक मागणी पत्रक पूर्ण करा.

| 'क्ष' वस्तूची किंमत (₹) | मागणी (किलो) |
|---|---|
| ३५० | ३ |
| ३०० | |
| २५० | १० |
| २०० | |
| १५० | |
| १०० | ३० |

**मागणीचे प्रकार :**

**मागणीचे प्रकार**
- १) प्रत्यक्ष मागणी
- २) अप्रत्यक्ष मागणी
- ३) पूरक मागणी
- ४) संमिश्र मागणी
- ५) स्पर्धात्मक मागणी

१) **प्रत्यक्ष मागणी :** प्रत्यक्ष गरजा पूर्ण करण्यासाठी उपभोक्त्यांकडून ज्या वस्तूंना मागणी केली जाते, त्याला प्रत्यक्ष मागणी असे म्हणतात. या वस्तू उपभोक्त्यांच्या गरजा प्रत्यक्ष भागवितात. अशा प्रकारच्या उपभोग्य वस्तूंना मागणी केली जाते. उदा., अन्नाची मागणी, कपडे इत्यादी.

२) **अप्रत्यक्ष मागणी :** अप्रत्यक्ष मागणीला परोक्ष मागणी असेही म्हणतात. या वस्तूंची मागणी वस्तूंच्या उत्पादनासाठी आवश्यक असते. ही मागणी उत्पादनाच्या वस्तूंची असते. अशा प्रकारे उत्पादन घटकांची मागणी अप्रत्यक्ष मागणी असते. उदा., साखर कारखान्यातील कामगारांची मागणी ही अप्रत्यक्ष मागणी असते.

३) **पूरक मागणी :** जेव्हा एखाद्या वस्तूची मागणी इतर कोणत्याही वस्तूबरोबर केली जाते, तेव्हा त्यास पूरक मागणी असे म्हणतात. पूरक मागणीलाच संयुक्त मागणी असेही म्हणतात. विशिष्ट गरज पूर्ण करण्यासाठी दोन किंवा अधिक वस्तूंची एकत्रित मागणी केली जाते, तेव्हा ती अस्तित्वात येते. उदा., शाईपेन आणि शाईची मागणी, कार आणि इंधनाची मागणी इत्यादी.

४) **संमिश्र मागणी :** एका वस्तूची मागणी अनेक उपयोगांसाठी केली जाते, तेव्हा त्यास संमिश्र मागणी असे म्हणतात. उदा., विजेची मागणी. याची मागणी वेगवेगळ्या उपयोगांसाठी जसे, विद्युत दिवे, पंखा, धुलाईयंत्र इत्यादींसाठी केली जाते.

५) **स्पर्धात्मक मागणी :** ही अशा वस्तूंची मागणी असते, जी एकमेकांना पर्याय असतात. उदा., चहा आणि कॉफी, साखर आणि गूळ इत्यादी.

**हे करून पहा!**

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| मागणीचे प्रकार | उदाहरण |
|---|---|
| प्रत्यक्ष मागणी | ☐ ☐ |
| ☐ | कापड उद्योगातील कामगार |
| पूरक मागणी | कॉफी तयार करण्यासाठी → कॉफी पावडर, ☐, ☐, ☐ |
| ☐ | सीएनजी आणि पेट्रोल, पेन आणि पेन्सिल |
| ☐ | दूध → चहा, दही, प्रत्यक्ष उपभोग, मिठाई |

## मागणी निर्धारित करणारे घटक :

वस्तूंची मागणी निर्धारित करणारे घटक खालीलप्रमाणे :

१) **किंमत :** वस्तूंची मागणी निर्धारित करणारा महत्त्वपूर्ण घटक म्हणजे किंमत होय. उपभोक्ते जेव्हा वस्तूंची किंमत कमी असते तेव्हा अधिक प्रमाणात वस्तू खरेदी करतात आणि जेव्हा वस्तूंची किंमत अधिक असते तेव्हा कमी प्रमाणात वस्तू खरेदी करतात.

२) **उत्पन्न :** उपभोक्त्यांच्या उत्पन्नाचा खरेदीशक्तीवर परिणाम होतो. त्याचा वस्तूच्या मागणीवर परिणाम होतो. उत्पन्नात वाढ झाल्याने वस्तूंच्या मागणीत वाढ होते आणि उत्पन्नात घट झाल्याने वस्तूंच्या मागणीत घट होते.

३) **पर्यायी वस्तूंच्या किमती :** जर कमी किंमतीत पर्याय उपलब्ध असतील तर व्यक्ती महाग वस्तूंपेक्षा स्वस्त पर्यायी वस्तूंची मागणी करतील. उदा., साखर आणि गूळ. जर साखरेच्या किमतीत वाढ झाली तर गुळाची मागणी वाढेल.

४) **पूरक वस्तूंच्या किमती :** एका वस्तूच्या किंमतीत बदल झाल्यास त्याचा परिणाम इतर वस्तूंच्या मागणीवर होतो. उदा., कार आणि इंधन. जर इंधनाच्या किंमतीत वाढ झाली तर कारची मागणी कमी होईल.

५) **वस्तूचे स्वरूप :** जर एखाद्या वस्तूचा उपभोग अत्यावश्यक व टाळता येण्यासारखा नसेल तर त्या वस्तूची मागणी किमतीशी निगडित न राहता स्थिर राहील. उदा., रक्तदाब नियंत्रणाचे औषध.

६) **लोकसंख्येचे आकारमान :** लोकसंख्येचे आकारमान जास्त असेल तेव्हा वस्तूंची मागणी जास्त असते आणि लोकसंख्येचे आकारमान कमी असेल तेव्हा वस्तूंची मागणी कमी असते.

७) **भविष्यकालीन किमतीचा अंदाज :** वस्तूची किंमत भविष्यात कमी होईल असा उपभोक्त्याचा अंदाज असेल तर सद्यस्थितीला उपभोक्ता त्या वस्तूंची कमी खरेदी करेल. त्याचप्रमाणे वस्तूंची किंमत भविष्यात वाढेल असा उपभोक्त्याचा अंदाज असेल, तर सद्य:स्थितीला उपभोक्ता वस्तूंची जास्त खरेदी करेल.

८) **जाहिरात :** जाहिरात, विक्री प्रोत्साहन योजना आणि प्रभावी विक्री कौशल्य ग्राहकांच्या आवडी-निवडीत बदल घडवून आणतात व अनेक वस्तूंची मागणी निर्माण करतात. उदा., सौंदर्य प्रसाधने, टुथब्रश इत्यादी.

९) **आवडीनिवडी, सवयी व फॅशन्स :** उपभोक्त्यांच्या आवडीनिवडी आणि सवयींचा मागणीवर प्रभाव पडतो.

उदा., चॉकलेटची आवड आणि चहाची सवय इत्यादी. याचप्रमाणे जेव्हा बाजारात नवीन फॅशन येते तेव्हा उपभोक्ता त्या प्रकारच्या वस्तूंची मागणी करतो. परंतु जेव्हा फॅशन कालबाह्य होते. त्यानंतर अचानक त्या वस्तूंची मागणी कमी होते.

१०) **कररचना :** वस्तू व सेवांवर जास्त कर दर आकारल्यास वस्तू व सेवांची किंमत वाढून मागणी कमी होईल आणि वस्तू व सेवांवर कमी कर आकारल्यास वस्तू व सेवांची किंमत कमी होऊन मागणी वाढेल.

११) **इतर घटक :**

१) नैसर्गिक परिस्थिती

२) तंत्रज्ञानातील बदल

३) सरकारी धोरण

४) रूढी आणि परंपरा इत्यादी

## मागणीचा नियम (Law of Demand)

### प्रस्तावना :

सन १८९० मध्ये प्रकाशित झालेल्या 'अर्थशास्त्राची मूलतत्त्वे' या ग्रंथात प्रा.आल्फ्रेड मार्शल यांनी मागणीच्या नियमाची मांडणी केली आहे. या नियमाद्वारे किंमत व मागणी यातील परस्पर संबंध स्पष्ट केला आहे.

### सिद्धांताचे विधान :

प्रा. आल्फ्रेड मार्शल यांच्या मते, '' इतर परिस्थिती स्थिर असताना वस्तूची किंमत वाढली असता मागणी घटते आणि वस्तूची किंमत कमी झाली असता मागणी वाढते.''

दुसऱ्या शब्दांत, इतर परिस्थिती कायम असताना, वस्तूच्या किमतीत वाढ होते तेव्हा वस्तूच्या मागणीत घट होते आणि जेव्हा वस्तूच्या किंमतीत घट होते तेव्हा वस्तूच्या मागणीत वाढ होते. अशा प्रकारे किंमत आणि मागणीचा संबंध व्यस्त स्वरूपाचा म्हणजेच परस्परविरोधी असतो.

मागणी व किंमत यांचा फलनसंबंध खालील प्रकारे स्पष्ट करता येतो.

$Dx = f(Px)$

येथे D = वस्तूची मागणी (Demand for the commodity)

$x$ = वस्तू (Commodity)

$f$ = फलन (Function of )

$Px$ = वस्तूची किंमत (Price of the commodity)

### गृहीतके :

मागणीचा नियम खालील गृहीतकांवर आधारित आहे.

१) **स्थिर उत्पन्नपातळी :** मागणीचा नियम जर अनुभवायचा असेल तर उपभोक्त्याचे उत्पन्न स्थिर असावे. जर उत्पन्न पातळीत वाढ झाली तर उपभोक्त्यांकडून किमतीत वाढ होऊनही मागणीत वाढ केली जाईल.

२) **लोकसंख्येच्या आकारमानात बदल नाही :** देशातील लोकसंख्येचा आकारमान आणि रचना वस्तूंची एकूण मागणी प्रभावित करते. त्यामुळे असे गृहीत धरले जाते की, लोकसंख्येचे आकारमान स्थिर आहे.

३) **पर्यायी वस्तूंच्या स्थिर किमती :** पर्यायी वस्तूंच्या किमतीत बदल होत नाही, असे गृहीत धरले आहे. कारण पर्यायी वस्तूंच्या किमतीत बदल झाला तर त्याचा परिणाम वस्तूंच्या मागणीवर होतो.

४) **पूरक वस्तूंच्या स्थिर किमती :** पूरक वस्तूंच्या किमतीत बदल होत नाही, असे गृहीत धरले आहे. कारण पूरक वस्तूंच्या किमतीत बदल झाला तर त्याचा परिणाम वस्तूच्या मागणीवर होतो.

५) **भविष्यात किंमत बदलाची अपेक्षा नाही :** उपभोक्त्यांची भविष्यात किंमतविषयक बदल घडून येण्याची कोणतीही अपेक्षा नाही, असे गृहीत धरले आहे. जर भविष्यात वस्तूची किंमत वाढण्याचा अंदाज असेल तर उपभोक्ते सध्या किंमत वाढत असतानाही जास्त मागणी करू शकतात.

६) **आवडीनिवडी, सवयी, प्राधान्य, फॅशन्स इत्यादींमध्ये बदल होत नाही :** उपभोक्त्यांच्या आवडीनिवडी, सवयी, प्राधान्य, फॅशन इत्यादींमध्ये बदल होत नाही, असे गृहीत धरले आहे. यामध्ये बदल झाल्यास मागणीमध्ये बदल होतो.

७) **करविषयक धोरणात बदल नाही :** प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांबाबतच्या सरकारी धोरणांचा विविध वस्तू व सेवांच्या मागणीवर मोठा प्रभाव पडतो. सरकारने जाहीर केलेल्या

करविषयक सरकारी धोरणांमध्ये कोणताही बदल होत नाही, असे गृहीत धरले आहे.


खालील उदाहरणाच्या साहाय्याने मागणीचा नियम पत्रक व आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट केला आहे.

**तक्ता क्र.३.३ मागणी पत्रक**

| 'क्ष' वस्तूची किंमत (₹) | 'क्ष' वस्तूची मागणी (किलो) |
|---|---|
| ५० | १ |
| ४० | २ |
| ३० | ३ |
| २० | ४ |
| १० | ५ |

तक्ता क्र.३.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे, जेव्हा 'क्ष' वस्तूची किंमत प्रतिकिलोस ५० ₹ असते, तेव्हा मागणी १ किलो आहे. परंतु जेव्हा किंमत ५० ₹ वरून ४० ₹ पर्यंत कमी होते, तेव्हा मागणी १ किलोवरून २ किलोपर्यंत वाढते. ज्या वेळेस वस्तूची किंमत ३० ₹ असते, तेव्हा मागणी ३ किलो होते. त्याचप्रमाणे किंमत २० ₹ प्रति किलो असताना ४ किलो मागणी केली जाते आणि किंमत १० ₹ पर्यंत घटते तेव्हा मागणी ५ किलोपर्यंत वाढते. यावरून असे स्पष्ट होते की, जेव्हा वस्तूची किंमत कमी होते तेव्हा मागणीत वाढ होते आणि वस्तूंची किंमत वाढते तेव्हा मागणीत घट होते. म्हणजेच किंमत व मागणी यांत व्यस्त स्वरूपाचा संबंध असतो.

**मागणी वक्र**




**मागणी (किलो)**

**आकृती ३.५**

आकृती ३.५ मध्ये, 'क्ष' अक्षावर वस्तूची मागणी आणि 'य' अक्षावर किंमत दर्शविली आहे. 'मम' हा मागणी वक्र आहे. जो डावीकडून उजवीकडे वरून खाली येणारा असतो. म्हणजे मागणी वक्राचा आकार ऋणात्मक असतो. कारण हा वक्र किंमत आणि मागणीचा व्यस्त संबंध दर्शवितो.

**हे करून पहा!**


खालील मागणी तक्त्याच्या साहाय्याने मागणी वक्र काढा.

| सफरचंदाची प्रतिकिलो किंमत (₹) | सफरचंदाची मागणी (किलो) |
|---|---|
| ४० | ५ |
| ५० | ४ |
| ६० | ३ |
| ७० | २ |
| ८० | १ |

**मागणीच्या नियमाचे अपवाद :**

मागणीच्या नियमाचे काही अपवाद आहेत. याचाच अर्थ काही अपवादात्मक परिस्थितीत वस्तूंची किंमत वाढते तेव्हा उपभोक्ता अधिक वस्तूंची खरेदी करतो आणि किंमत कमी झाल्यावर कमी वस्तूंची खरेदी करतो. अशा वेळी मागणी वक्र डावीकडून उजवीकडे खालून वर जाणारा असतो. मागणी वक्रातील धनात्मक संबंध आकृती ३.६ च्या साहाय्याने स्पष्ट केला आहे.

**अपवादात्मक मागणी वक्र**




**मागणी किलो**

**आकृती ३.६**

**मागणीच्या नियमाचे अपवाद खालीलप्रमाणे आहेत :**

१) **गिफेनचा विरोधाभास :** कनिष्ठ वस्तू किंवा हलक्या प्रतीच्या वस्तू म्हणजे गिफेन वस्तू, की ज्या वस्तूंच्या किमती कमी झाल्या तरी त्यांच्या मागणीत वाढ होत नाही. अशा वेळी जेव्हा वस्तूची किंमत कमी होते, तेव्हा त्या वस्तूची मागणी कमी होते. सर रॉबर्ट गिफेन यांनी इंग्लंडमध्ये कनिष्ठ दर्जाच्या वस्तूंमधील संबंध शोधून काढला, जेव्हा पावाच्या किंमती कमी होतात तेव्हा व्यक्ती त्यांची अधिक खरेदी करत नाहीत. कारण त्याची खरेदीशक्ती आणि वास्तव उत्पन्नात वाढ होते आणि त्याऐवजी ते उच्च दर्जाच्या वस्तू. उदा., मांस खरेदी करण्यास प्राधान्य देतात, यालाच गिफेनचा विरोधाभास असे म्हणतात.

२) **प्रतिष्ठेच्या वस्तू :** मौल्यवान वस्तू जसे, हिरे, सोने इत्यादी प्रतिष्ठादर्शक वस्तू आहेत. म्हणून श्रीमंत व्यक्ती अशा वस्तूंच्या किमतीत वाढ झाली तरीही अधिक वस्तू खरेदी करतात.

३) **भविष्यकालीन किमतीचा अंदाज :** जेव्हा लोकांना भविष्यकाळात वस्तूंच्या किंमती वाढतील असा अंदाज असेल, तेव्हा हा मागणीचा नियम खरा ठरणार नाही. अशा परिस्थितीत, वस्तूंच्या किंमती वाढत असताना देखील उपभोक्ते अधिक मागणी करतात. उदा., दीपावलीच्या अगोदर साखर, तेल यांसारख्या वस्तूंच्या किंमती वाढत असतानाही उपभोक्ते वाढत्या किंमतीला मागणी करतात. कारण दीपावलीमध्ये किंमती अधिक वाढण्याची शक्यता असते.

४) **किमतीचा आभास :** अनेक वेळा उपभोक्त्यांना असे वाटते की, जास्त किमतीच्या वस्तू चांगल्या दर्जाच्या असतात आणि म्हणून या वस्तूंच्या मागणीत मोठ्या प्रमाणात वाढ होते. उदा., उच्च दर्जाच्या वस्तू.

५) **अज्ञान :** काही वेळेस व्यक्ती अज्ञानामुळे अधिक किंमत असतानाही वस्तू खरेदी करतात. हे तेव्हाच होऊ शकते जेव्हा उपभोक्त्याला इतर ठिकाणी त्या वस्तूंवरील किमतीबद्दल माहिती नसते.

६) **सवयीच्या वस्तू :** चहासारख्या विशिष्ट वस्तूंच्या उपभोगाची सवय असल्यास अधिक किंमतीलाही गरजेनुसार खरेदी केली जाते.

**हे करून पहा!**

मागणीच्या नियमांच्या अपवादांची आणखी उदाहरणे शोधा.

१) प्रतिष्ठेच्या वस्तू – ______ ______

२) सवयीच्या वस्तू – ______ ______

३) विख्यात उत्पादन संस्थेच्या वस्तू – ______ ______


**मागणीतील विचलन :**

इतर परिस्थितीत बदल न होता केवळ किंमतीतील बदलामुळे जेव्हा मागणीत चढउतार होतात. तेव्हा त्याला मागणीतील विचलन म्हणतात. याचे दोन प्रकार आहेत.

१) **मागणीतील विस्तार (प्रसरण) :** इतर परिस्थितीत, जसे आवडनिवड, उपभोक्त्याचे उत्पन्न, लोकसंख्येचे आकारमान इत्यादींमध्ये कोणताही बदल न होता फक्त किंमत कमी झाल्याने मागणीत वाढ होते, तेव्हा त्यास मागणीतील विस्तार असे म्हणतात.

मागणी वक्र ही त्याच मागणी वक्रावर खालच्या दिशेने सरकते. हे आकृती ३.७ च्या साहाय्याने स्पष्ट केले आहे.

**मागणीतील विस्तार**





**आकृती ३.७**

आकृती ३.७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे 'मम' हा मागणी वक्र आहे. 'स' बिंदूकडून 'स$_१$', बिंदूकडे त्याच मागणी वक्रावर खालच्या दिशेने होणारे हे विचलन मागणीतील विस्तार दर्शविते.

**२) मागणीतील संकोच (आकुंचन) :** इतर परिस्थितीत जसे, आवडनिवड, उपभोक्त्याचे उत्पन्न, लोकसंख्येचे आकारमान इत्यादीमध्ये कोणताही बदल न होता फक्त किमतीत वाढ झाल्याने मागणीत घट होते, तेव्हा त्यास मागणीतील संकोच असे म्हणतात.

मागणी ही त्याच मागणी वक्रावर वरच्या दिशेने जाते. हे आकृती ३.८ च्या सहाय्याने स्पष्ट केले आहे.

**मागणीतील संकोच/आकुंचन**




**आकृती ३.८**

आकृती ३.८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे, ‘मम’ हा मागणी वक्र आहे. ‘स’ बिंदूकडून ‘स$_{२}$’ बिंदूकडे त्याच मागणी वक्रावर वरच्या दिशेने जाणारे हे विचलन मागणीतील संकोच (आकुंचन) दर्शवते.


**मागणीतील बदल :**

किंमत स्थिर असते आणि इतर घटकांतील बदलाचा परिणाम म्हणून जेव्हा वस्तूची मागणी वाढते किंवा कमी होते, त्याला मागणीतील बदल असे म्हणतात. याचे दोन प्रकार आहेत.

**१) मागणीतील वृद्धी (वाढ) :** इतर परिस्थितीमध्ये जसे उपभोक्त्यांच्या आवडीनिवडी, उपभोक्त्याचे उत्पन्न, नैसर्गिक परिस्थिती इत्यादींमध्ये अनुकूल बदल होतो आणि किंमत स्थिर असल्याने मागणीत वाढ होते, तेव्हा त्यास मागणीतील वृद्धी असे म्हणतात.

मागणी वक्र हा मूळ मागणी वक्राच्या उजवीकडे स्थानांतरीत होतो. हे आकृती ३.९ च्या साहाय्याने स्पष्ट केले आहे.

**मागणीतील वृद्धी**





**आकृती ३.९**

आकृती ३.९ मध्ये दर्शविल्याप्रमाणे ‘म’ हा मूळ मागणी वक्र आहे. ‘मम’ वरून ‘म,म$_{१}$’ पर्यंत स्थानांतरीत झालेला ‘मम$_{१}$’ हा मागणी वक्र मागणीमध्ये झालेली वृद्धी दर्शवितो.

**२) मागणीतील ऱ्हास (घट) :** इतर परिस्थितीमध्ये जसे उपभोक्त्यांच्या आवडीनिवडी, उपभोक्त्यांचे उत्पन्न, नैसर्गिक परिस्थिती इत्यादींमध्ये प्रतिकूल बदल होतो आणि किंमत स्थिर असल्याने मागणीत घट होते, तेव्हा त्यास मागणीतील ऱ्हास असे म्हणतात.

मागणी वक्र हा मूळ मागणी वक्राच्या डावीकडे स्थानांतरीत होतो. हे आकृती ३.१० च्या साहाय्याने स्पष्ट केले आहे.

**मागणीतील ऱ्हास**




**आकृती ३.१०**

आकृती ३.१० मध्ये दर्शविल्याप्रमाणे ‘मम’ हा मूळ मागणीवक्र आहे. ‘मम’ वरून ‘म$_{२}$,म$_{२}$’ पर्यंत स्थानांतरीत झालेला ‘मम’ हा मागणी वक्र मागणीमध्ये झालेला ऱ्हास दर्शवितो.

**तुम्हांला माहीत हवं!**

१) मागणी – मागणी ही सूक्ष्म अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. व्यक्ती एखाद्या विशिष्ट वेळी विशिष्ट किमतीत वस्तूची जी नगसंख्या खरेदी करण्यास तयार असते, त्याला मागणी म्हणतात.

२) समग्र मागणी – समग्र मागणी ही स्थूल अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. विशिष्ट रोजगार पातळी असताना उत्पादित झालेल्या वस्तूंच्या विक्रीमधून आलेले अपेक्षित विक्री मूल्य म्हणजे समग्र मागणी होय.

## स्वाध्याय

**प्र. १. खालील विधाने पूर्ण करा :**

१) पर्यायी वस्तूंची किंमत आणि मागणी यांत ................

अ) प्रत्यक्ष संबंध असतो.
ब) व्यस्त संबंध असतो.
क) कोणताही बदल नाही.
ड) प्रत्यक्ष आणि व्यस्त संबंध असतो.

२) हलक्या प्रतीच्या बाबतीत उत्पन्न व मागणी यांत ................

अ) प्रत्यक्ष संबंध असतो.
ब) व्यस्त संबंध असतो.
क) कोणताही बदल नाही.
ड) प्रत्यक्ष आणि व्यस्त संबंध असतो.

३) मागणी व किंमत यांचा फलनसंबंध खालील सूत्राने असा ................ .

अ) Dx = f(Px) ब) $Dx = f(P_y)$
क) Dx = f(y) ड) Dx = (Tx)

४) जेव्हा अधिक किमतीला कमी नगसंख्येला मागणी केली जाते, हे असे दर्शविते की, ................ .

अ) मागणीतील वृद्धी
ब) मागणीतील विस्तार
क) मागणीतील ऱ्हास
ड) मागणीतील संकोच

**प्र. २. अर्थशास्त्रीय योग्य पारिभाषिक शब्द सुचवा :**

१) अशी परिस्थिती, जेथे कमी किमतीत अधिक प्रमाणात मागणी केली जाते ................

२) मागणी पत्रकाचे आलेखीय सादरीकरण ................

३) अशी वस्तू,जी अनेक उपयोगांसाठी वापरली जाते ................

४) किंमत स्थिर असताना इतर घटकांतील बदलाचा परिणाम म्हणून जेव्हा मागणी वाढते ................

५) अशी इच्छा, जीला खरेदीशक्तीचे पाठबळ आणि ते खर्च करण्याची मानसिक तयारी असते................

**प्र. ३. फरक स्पष्ट करा :**

१) इच्छा आणि मागणी
२) मागणीतील विस्तार आणि मागणीतील संकोच
३) मागणीतील वृद्धी आणि मागणीतील ऱ्हास.

**प्र. ४. खालील विधानांशी तुम्ही सहमत की असहमत ते सकारण स्पष्ट करा :**

१) मागणी वक्र हा डावीकडून उजवीकडे वरून खाली येतो.
२) मागणी निर्धारित करणारा किंमत हा एकमेव घटक आहे.
३) जेव्हा गिफेन वस्तूंची किंमत कमी होते, तेव्हा त्याची मागणी वाढते.


**प्र. ५. १) खालील तक्त्याचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा :**

| किंमत (₹) | मागणी (किलो) | | | बाजार मागणी (किलो) अ+ब+क |
|---|---|---|---|---|
| | उपभोक्ता 'अ' | उपभोक्ता 'ब' | उपभोक्ता 'क' | |
| २५ | १६ | १५ | १२ | ☐ |
| ३० | १२ | ११ | १० | ☐ |
| ३५ | १० | ०९ | ०८ | ☐ |
| ४० | ०८ | ०६ | ०४ | ☐ |

अ) बाजार मागणी पत्रक पूर्ण करा.

ब) वरील बाजार मागणी पत्रकाच्या साहाय्याने बाजार मागणी वक्र तयार करा.

**२) खालील आकृतीचे निरीक्षण करा आणि प्रश्नांची उत्तरे द्या.**




१) उजवीकडे स्थानांतरीत होणारा मागणी वक्र


२) डावीकडे स्थानांतरीत होणारा मागणी वक्र

३) वस्तूची किंमत


४) मागणीतील वृद्धी आणि ऱ्हास संकल्पना स्पष्ट करा.

**३) खालील आकृतीचे स्पष्टीकरण करा.**

**'अ'**




**'ब'**




**'अ'**

१)'अ' या आकृतीत मागणीतील ...... दर्शविला आहे.

२) 'अ' या आकृतीत मागणी वक्र ...... च्या दिशेने सरकतो.

**'ब'**

१) 'ब' या आकृतीत मागणीतील ...... दर्शविला आहे.

२) 'ब' या आकृतीत मागणी वक्र ...... च्या दिशेने सरकतो.

## प्र. ६. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :

१) मागणीचा नियम अपवादांसह स्पष्ट करा.

२) मागणीचे निर्धारक सविस्तर स्पष्ट करा.

# ३ ब) मागणीची लवचिकता – (Elasticity Of Demand)

**प्रस्तावना :**

मागील प्रकरणात तुम्ही वस्तूची किंमत आणि मागणीचा संबंध व्यस्त स्वरूपाचा असतो, असे अभ्यासले आहे. एखाद्या वस्तूची किंमत वाढली असता मागणीत किती प्रमाणात घट होते आणि वस्तूची किंमत कमी झाली असता मागणीत किती प्रमाणात वाढ होते, हे आपल्याला मागणीच्या नियमावरून समजत नाही. अशा प्रकारे मागणीचा नियम हा वस्तूची किंमत व मागणी यांतील संख्यात्मक संबंध स्पष्ट करण्यास अपुरा पडतो. म्हणून प्रा. आल्फ्रेड मार्शल यांनी मागणीची लवचिकता ही संकल्पना मांडली.

**मागणीच्या लवचिकतेची संकल्पना :**

एका चलातील बदलाचा दुसऱ्या चलावर होणारे परिणाम लवचिकतेची संकल्पना स्पष्ट करते. मागणीची लवचिकता ही संकल्पना किंमत आणि इतर घटकांतील बदलांचा मागणीतील बदलावर होणारा परिणाम दर्शविते.

प्रा. मार्शल यांच्या मते, "ज्या प्रमाणात किंमतीत घट होते त्यानुसार मागणी जास्त अथवा कमी प्रमाणात वाढते तसेच ज्या प्रमाणात किमतीत वाढ होते त्यानुसार मागणी जास्त अथवा कमी प्रमाणात घटते, यालाच 'मागणीची लवचिकता' म्हणतात."

वरील व्याख्येवरून असे स्पष्ट होते की, मागणीची लवचिकता ही एक तांत्रिक संकल्पना असून ती किंमतीतील बदलामुळे मागणीतील बदलावर होणाऱ्या परिणामाचे मापन दर्शविते. दुसऱ्या शब्दांत, किंमतीतील प्रमाणशीर बदलांमुळे मागणीत घडून येणाऱ्या प्रमाणशीर बदलांस मागणीची लवचिकता म्हणतात.

**मागणीच्या लवचिकतेचे प्रकार :**

१) उत्पन्न लवचिकता
२) छेदक लवचिकता
३) किंमत लवचिकता

**१) उत्पन्न लवचिकता :** उत्पन्नातील बदलाचा परिणाम म्हणून मागणीत घडून येणाऱ्या बदलाच्या संबंधाला उत्पन्न लवचिकता असे म्हणतात. उत्पन्नाव्यतिरिक्त मागणीवर परिणाम करणारे अन्य घटक स्थिर असतात. हे खालीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

$$\text{मागणीची उत्पन्न लवचिकता} = \frac{\text{मागणीतील शेकडा बदल}}{\text{उत्पन्नातील शेकडा बदल}}$$

**सूत्ररूपाने –**

$$\text{मागणीतील उत्पन्न लवचिकता} = \frac{\%\ \triangle \text{म}}{\%\ \triangle \text{य}},$$

$$= \frac{\triangle \text{म}}{\text{म}} \div \frac{\triangle \text{य}}{\text{य}}$$

$$= \frac{\triangle \text{म}}{\text{म}} \times \frac{\text{य}}{\triangle \text{य}}$$

येथे, म = मूळ मागणी
य = मूळ उत्पन्न
$\Delta$ म म्हणजे मागणीतील बदल
$\Delta$ य म्हणजे उत्पन्नातील बदल

**तुम्हांला माहीत हवं.**

- **धन उत्पन्न लवचिकता :** (धनात्मक) सर्वसाधारण वस्तू ज्याची मागणी वाढत्या उत्पन्नाबरोबर वाढते.
- **ऋण उत्पन्न लवचिकता :** (ऋणात्मक) कनिष्ठ वस्तू ज्याची मागणी वाढत्या उत्पन्नाबरोबर घटते.
- **शून्य उत्पन्न लवचिकता :** अत्यावश्यक वस्तू ज्यांची मागणी वाढत्या उत्पन्नाबरोबर स्थिर राहते.

**२) छेदक लवचिकता :** छेदक लवचिकता म्हणजे एका वस्तूच्या किंमतीतील बदलाचा अन्य (पर्यायी आणि पूरक) वस्तूंच्या मागणीत घडून येणारा बदल होय.

हे खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

$$\text{मागणीची छेदक लवचिकता} = \frac{\text{अ वस्तूच्या मागणीतील शेकडा बदल}}{\text{ब वस्तूच्या किंमतीतील शेकडा बदल}}$$

(अ = मूळ वस्तू, ब = अन्य वस्तू)

**सूत्ररूपाने ,**

$$\text{मागणीची छेदक लवचिकता} = \frac{\% \triangle \text{म}_{\text{अ}}}{\% \triangle \text{कि}_{\text{ब}}}$$

$$= \frac{\triangle \text{म}_{\text{अ}}}{\text{म}_{\text{अ}}} \div \frac{\triangle \text{क}_{\text{ब}}}{\text{क}_{\text{ब}}}$$

$$= \frac{\triangle \text{म}_{\text{अ}}}{\text{म}_{\text{अ}}} \times \frac{\text{क}_{\text{ब}}}{\triangle \text{क}_{\text{ब}}}$$

येथे,

$\text{म}_{\text{अ}}$ – अ वस्तूची मूळ मागणी

$\Delta$ अ म्हणजे 'अ' या मूळ वस्तूच्या मागणीतील बदल

$\text{क}_{\text{ब}}$ – ब वस्तूची मूळ किंमत

$\Delta$ ब म्हणजे 'ब' या पर्यायी वस्तूच्या किंमतीतील बदल

**तुम्हांला माहीत आहे का ?**

१) धनात्मक छेदक लवचिकता – पर्यायी वस्तू उदा., चहा आणि कॉफी

२) ऋणात्मक छेदक लवचिकता – पूरक वस्तू उदा., चहा आणि साखर

३) शून्य छेदक लवचिकता – असंबंधित वस्तू उदा., चहा आणि पुस्तके

**३) किंमत लवचिकता :** प्रा. अल्फ्रेड मार्शल यांच्या मते, ''किमतीतील प्रमाणित बदलांमुळे मागणीत जो प्रमाणित बदल होतो त्याला मागणीची किंमत लवचिकता असे म्हणतात. हे खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.''

$$\text{मागणीची किंमत लवचिकता} = \frac{\text{मागणीतील शेकडा बदल}}{\text{किंमतीतील शेकडा बदल}}$$

**सूत्ररूपाने ,**

$$\text{मागणीची किंमत लवचिकता} = \frac{\% \Delta \text{ म}}{\% \Delta \text{ क}}$$

$$\text{मागणीची किंमत लवचिकता} = \frac{\triangle \text{ म}}{\text{म}} \div \frac{\triangle \text{ क}}{\text{क}}$$

येथे, म = मूळ मागणी $\quad = \dfrac{\triangle \text{ म}}{\text{म}} \times \dfrac{\text{क}}{\triangle \text{ क}}$

$\Delta$ म – नवीन मागणी व जुनी मागणी यांतील फरक

क – मूळ किंमत

$\Delta$ क – नवीन किंमत आणि जुनी किंमत यांतील फरक

## मागणीच्या किंमत लवचिकतेचे प्रकार :


**१) अनंत/संपूर्ण लवचीक मागणी : (Ed = ∞) :** किंमतीत अल्प किंवा मुळीच बदल न होता मागणीत अनंत बदल होतो. तेव्हा त्याला अनंत/संपूर्ण लवचीक मागणी म्हणतात.

उदा., सोन्याच्या किंमतीत बदल न होता मागणी सतत वाढते.

$$\text{मागणीची किंमत लवचिकता} = \frac{\text{मागणीतील शेकडा बदल}}{\text{किमतीतील शेकडा बदल}} = \infty$$

मागणीची किंमत लवचिकता = ∞ (अनंत बदल)

**संपूर्ण लवचीक मागणी वक्र.**




**आकृती ३.११**

आकृतीत दर्शविल्याप्रमाणे क या किंमतीला मागणी अनंत लवचिक (∞) आहे, जी 'मम' या मागणी वक्राने दर्शविली आहे. मागणी जेव्हा अनंत लवचीक असते. तेव्हा मागणी वक्र 'क्ष' अक्षाला समांतर असतो.

**२) संपूर्ण अलवचीक मागणी : (Ed = 0) :** किंमतीमध्ये कितीही शेकडा बदल झाला तरी मागणीत कोणताच बदल होत नाही, तेव्हा त्याला संपूर्ण अलवचीक मागणी किंवा ताठर मागणी म्हणतात.

उदा., किमतीत २०% ने घट झाली तरी मागणीत कोणताही बदल होत नाही.

$$\text{मागणीची किंमत लवचिकता} = \frac{\text{मागणीतील शेकडा बदल}}{\text{किंमतीतील शेकडा बदल}}$$


$$\text{मागणीची किंमत लवचिकता} = \frac{\% \Delta \text{ म}}{\% \Delta \text{ क}}$$

$$\text{मागणीची किंमत लवचिकता} = \frac{०}{२०} = ०$$

मागणीची किंमत लवचिकता = ०

व्यवहारात ही परिस्थिती कमी प्रसंगी आढळते. उदा., मीठाला, दुधाला असलेली मागणी.

**संपूर्ण अलवचीक मागणी वक्र.**




**मागणी**

**आकृती ३.१२**


आकृती ३.१२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे 'मम' हा मागणीवक्र य अक्षास समांतर असतो. 'अक' या किंमतीस 'अम' ही मागणी आहे. किंमतीमध्ये 'अक$_१$', 'अक$_२$' असे बदल झाले तरी मागणीत काही बदल होत नाही.

३) **एकक लवचीक मागणी : (Ed = 1) :** किंमतीतील शेकडा बदलाच्या प्रमाणाइतकेच वस्तूच्या मागणीतील बदलाचे प्रमाण असेल तेव्हा त्यास एकक लवचीक मागणी म्हणतात. उदा., किमतीत ५०% ने घट झाल्यास मागणीत ५०% ने वाढ होते.

$$\text{मागणीची किंमत लवचिकता} = \frac{\text{मागणीतील शेकडा बदल}}{\text{किमतीतील शेकडा बदल}}$$

$$\text{मागणीची किंमत लवचिकता} = \frac{५०}{५०} = १$$

**एकक लवचीक मागणी वक्र**




**मागणी**

**आकृती ३.१३**

आकृती ३.१३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे 'कक$_१$' हा किमतीतील बदल आहे. तर 'बब$_१$' हा मागणीतील बदल आहे. हे दोन्हीही बदल एकसारखे असल्याने 'मम' हा मागणी वक्र एकक लवचीक मागणी दर्शविते व तो आयताकृती परिवलयाचा असतो.


४) **जास्त लवचीक मागणी : (Ed > 1) :** किमतीतील शेकडा बदलाच्या प्रमाणापेक्षा जेव्हा मागणीतील बदलाचे प्रमाण जास्त असते, तेव्हा त्याला जास्त लवचीक मागणी म्हणतात. उदा., किमतीत ५०% ने घट झाल्यास मागणीत १००% ने वाढ होते.

$$\text{मागणीची किंमत लवचिकता} = \frac{\text{मागणीतील शेकडा बदल}}{\text{किमतीतील शेकडा बदल}}$$

$$\text{मागणीची किंमत लवचिकता} = \frac{१००}{५०} = २.०$$

(Ed > 1)

**जास्त लवचीक मागणी वक्र**




**मागणी**

**आकृती ३.१४**


आकृती ३.१४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे 'बब$_१$' हा मागणीतील बदल 'कक$_१$' या किमतीतील बदलाच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. त्यामुळे मम हा मागणीवक्र लवचीक मागणी दर्शविते. या प्रकारात मागणी वक्र पसरट असतो.

५) **कमी लवचीक मागणी : ( Ed < १) :** जेव्हा किमतीतील शेकडा बदलाच्या प्रमाणापेक्षा मागणीतील बदलाचे प्रमाण कमी असते तेव्हा त्याला कमी लवचीक मागणी म्हणतात. उदा., किमतीत ५०% ने घट झाल्यास मागणीत २५% ने वाढ होते.

$$\text{मागणीची किंमत लवचिकता} = \frac{\text{मागणीतील शेकडा बदल}}{\text{किंमतीतील शेकडा बदल}}$$

$$\text{मागणीची किंमत लवचिकता} = \frac{२५}{५०} = ०.५$$

**कमी लवचीक मागणी वक्र**




**मागणी**

**आकृती क्र. ३.१५**

आकृती ३.१५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे 'बब$_१$' हा मागणीतील बदल 'कक$_१$' या किमतीतील बदलापेक्षा कमी आहे. म्हणून मम हा मागणी वक्र कमी लवचीक मागणी दर्शवितो. हा मागणी वक्र तीव्र उताराचा असतो.

**हे करून पहा!**

खालील वस्तूंच्या मागणीची लवचिकता किती असेल याची नोंद घ्या.

१. सौंदर्य प्रसाधने

२. औषधे

३. शाळेचा गणवेश

४. एअर कंडिशनर्स/वातानुकूलित यंत्र

**हे करून पहा!**

**तक्ता पूर्ण करा.**

| अ. क्र. | मागणीच्या लवचिकतेचे मूल्य | मागणीच्या लवचिकतेचे प्रकार | स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| १ | | संपूर्ण अलवचीक मागणी | किंमतीतील शेकडा बदलाचा मागणीवर कोणताही परिणाम होत नाही. |
| २ | Ed = १ | | किंमतीतील प्रमाणशीर बदलाइतकाच मागणीतील बदल असतो. |
| ३ | Ed > 1 | अधिक लवचीक मागणी | |
| ४ | | कमी लवचीक मागणी | किंमतीतील प्रमाणशीर बदलापेक्षा मागणीतील बदल कमी असतो. |
| ५ | Ed = ∞ | | किंमतीत अल्पसा किंवा शून्य बदल झाला असता मागणीत अनंत बदल होतो. |

## मागणीच्या किंमत लवचिकता मोजमापाच्या पद्धती :

### १. गुणोत्तर/शेकडेवारी पद्धत

प्रा. मार्शल यांनी ही पद्धत विकसित केली आहे. या पद्धतीमध्ये मागणीतील शेकडा बदलाला किंमतीतील शेकडा बदलाने भागाकार करून मागणीची लवचिकता मोजली जाते. शेकडेवारी पद्धतीला प्रमाणित पद्धत असेही म्हणतात. ती खालीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

$$\text{मागणीची लवचिकता} = \frac{\text{मागणीतील शेकडा बदल}}{\text{किंमतीतील शेकडा बदल}}$$

$$Ed = \frac{\% \Delta Q}{\% \Delta P}$$

गणितीय पद्धतीने पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

$$Ed = \frac{\triangle Q}{Q} \div \frac{\triangle P}{P} \quad \therefore Ed = \frac{\triangle Q}{Q} \times \frac{P}{\triangle P}$$

येथे, Q = मूळ मागणी

$\Delta Q$ = मागणीतील बदल

P = मूळ किंमत

$\Delta P$ = किंमतीतील बदल

**संख्यात्मक विश्लेषण**

| किंमत (₹) | मागणी किलो | सूत्र |
|---|---|---|
| २० | १० | $Ed = \frac{\triangle Q}{Q} \times \frac{P}{\triangle P}$ |
| २५ | ०९ | |

Q = १

$\Delta Q$ = १ (नवीन व मूळ मागणीतील फरक)

मूळ किंमत = १० आणि नवीन किंमत = ९

P = २० (१०−९ = १) म्हणजेच $\Delta Q$ = १

$\Delta P$ = ५ (मूळ किंमत व नवीन किमतीतील फरक)

(२०−२५ = ५) म्हणजेच P = ५

$$\text{मागणीची लवचिकता} = \frac{\text{मागणीतील शेकडा बदल}}{\text{किंमतीतील शेकडा बदल}}$$

$$Ed = \frac{\triangle Q}{Q} \div \frac{\triangle P}{P} \therefore Ed = \frac{\triangle Q}{Q} \times \frac{P}{\triangle P}$$

$$Ed = \frac{१}{१०} \times \frac{२०}{५}$$

Ed = ०.४

Ed < १

याचाच अर्थ, मागणी कमी लवचीक आहे.

**तुम्हांला माहीत आहे का?**

मागणीची लवचिकता मोजण्यासाठी शेकडेवारी

पद्धतीचा वापर करताना खालील मुद्दे लक्षात ठेवा.

१) मागणीच्या लवचिकतेचे मूल्य हे ऋणात्मक असते. मागणीवक्र हा ऋणात्मक असतो. पण सुसूत्रता येण्यासाठी ऋणात्मक चिन्हाकडे आपण दुर्लक्ष करतो.

२) मागणीची लवचिकता ही केवळ संख्येत असते. वस्तूची किंमत व त्याची संख्या मोजण्यासाठी ती कोणत्याही मापनावर अवलंबून नसते.

२) **एकूण खर्च पद्धत :** ही पद्धत प्रा. मार्शल यांनी विकसित केली आहे. मूळ किमतीला वस्तूंवर येणारा खर्च व बदललेल्या किमतीला होणारा खर्च यांची तुलना करून मागणीची लवचिकता मोजता येते. एकूण खर्च म्हणजे किंमत व मागणी यांचा गुणाकार होय.

**या संदर्भात मार्शल यांनी खालील संकल्पना स्पष्ट केल्या आहेत :**

**अ) जास्त लवचीक मागणी :** जेव्हा वस्तूच्या किंमतीतील बदलामुळे एकूण खर्चात वाढ होते, तेव्हा ती जास्त लवचीक मागणी असते.
मागणीची लवचिकता >१, येथे मागणीची लवचिकता एकापेक्षा जास्त असते.

**आ) एकक लवचीक मागणी :** जेव्हा किंमत कमी होते किंवा वाढते, एकूण खर्चात बदल होत नाही किंवा स्थिर राहते.
मागणीची लवचिकता = १. येथे मागणीची लवचिकता एक असते.

एकूण खर्च = किंमत × मागणी

बदलामुळे एकूण खर्चात घट होते, तेव्हा ती कमी लवचीक मागणी असते.
मागणीची लवचिकता <१, येथे मागणीची लवचिकता एकापेक्षा कमी असते. हे खालील उदाहरणाच्या आधारे स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र.३.४ एकूण खर्च पद्धत**

| | किंमत (₹) | मागणी नग | एकूण खर्च (₹) | मागणी लवचिकता |
|---|---|---|---|---|
| अ | १० | ६ | ६० | एकापेक्षा जास्त |
| | २० | ५ | १०० | |
| आ | ३० | ४ | १२० | एकक |
| | ४० | ३ | १२० | |
| इ | ५० | २ | १०० | एका पेक्षा कमी |
| | ६० | १ | ६० | |

तक्ता क्र.३.४ मध्ये उदा., 'अ' मध्ये मूळ किंमत १० ₹ तर मूळ मागणी '६' नग आहे. म्हणजे वस्तूवर ६० ₹ एवढा एकूण खर्च होतो. जेव्हा किंमत २० ₹ पर्यंत वाढते, तेव्हा मागणी ५ नगापर्यंत कमी होते व १०० ₹ एवढा एकूण खर्च होतो. हा एकूण खर्च मूळ खर्चापेक्षा जास्त असल्याने मागणीची लवचिकता एकापेक्षा जास्त आहे. (Ed > १) म्हणजे ही जास्त लवचीक मागणी आहे.

उदा., 'ब' मध्ये मूळ किंमत ३० ₹ तर मूळ मागणी '४' नग आहे. म्हणजे वस्तूवर ₹ १०० एवढा एकूण खर्च होतो. जेव्हा किंमत '४० ₹' पर्यंत वाढते तेव्हा मागणी '३' नगांपर्यंत कमी होते व ₹ १२० एवढा एकूण खर्च होतो. हा एकूण खर्च मूळ खर्चाएवढा असल्याने मागणी एकक लवचीक आहे. (Ed = १)

उदा., 'क' मध्ये मूळ किंमत ५०₹ तर मूळ मागणी '२' नग आहे. म्हणजे वस्तूवर ₹ १०० एवढा एकूण खर्च होतो. जेव्हा किंमत ६० ₹ पर्यंत वाढते, तेव्हा मागणी '१' नगापर्यंत कमी होते व एकूण खर्च ₹ ६० एवढा होतो. हा एकूण खर्च मूळ खर्चापेक्षा कमी असल्याने मागणीची लवचिकता एकापेक्षा कमी आहे. म्हणजे ही कमी लवचीक मागणी आहे.

(Ed < १)

**शोधा पाहू!**

शेंगदाणा पाकिटाची किंमत ५% ने वाढली. म्हणून शेंगदाणा पाकिटांच्या मागणीत ५% ने घट झाली, तर शेंगदाणा पाकिटांच्या मागणीची लवचिकता किती आहे?

$$Ed = \frac{\% \triangle Q}{\% \triangle P}$$


३) **बिंदू पद्धत/भूमिती पद्धत :** प्रा. मार्शल यांनी मागणीची लवचिकता मोजण्याची आणखी एक पद्धत विकसित केली आहे. तिला बिंदू पद्धत किंवा भूमिती पद्धत असेही म्हणतात. कारण गुणोत्तर पद्धत आणि एकूण खर्च पद्धतीत आपण मागणी वक्रावरील एखाद्या बिंदूची लवचिकता मोजू शकत नाही.

या पद्धतीत खालील सूत्राच्या साहाय्याने मागणी वक्रावरील (रेषीय मागणी वक्र व वक्राकार मागणी वक्र) बिंदूची लवचिकता मोजता येते.

बिंदूची मागणी लवचिकता = $\dfrac{\text{मागणी वक्रावरील बिंदूपासूनचे खालचे अंतर}}{\text{मागणी वक्रावरील बिंदूपासूनचे वरचे अंतर}}$

**अ) रेषीय मागणी वक्र –** जेव्हा मागणी वक्र हा रेषीय किंवा सरळ रेषा असतो, तेव्हा हा मागणी वक्र य अक्षावर 'म' बिंदूपर्यंत आणि क्ष अक्षावर 'म' बिंदूपर्यंत वाढविता येतो. मागणीची किंमत लवचिकता 'क्ष' अक्षावर शून्य आणि 'य' अक्षावर अनंत लवचीक असते. या 'मम' रेषेवरील प्रत्येक बिंदूची लवचिकता वेगवेगळी असते. हे खालील आकृतीत दर्शविले आहे.

**बिंदू पद्धत – रेषीय मागणी वक्र**




**आकृती क्र.३.१४**

समजा 'कब' हे अंतर ८ से.मी. आहे.

१) समजा, 'म' हा बिंदू विचारात घेतला, हा बिंदू मागणी वक्राचे दोन खंडांत विभागणी करतो. यात वरील अंतर 'मक' आणि खालील अंतर 'मब' आहे.
(मब) = ४ से.मी, (मक) = ४ से.मी.

$$Ed = \frac{(\text{मब})}{(\text{मक})} = \frac{४}{४} = ०१$$

जर, वरील अंतर = हे खालील अंतर असेल तर येथे म = १, म्हणजेच मागणी एकक लवचीक आहे.

२) समजा, '$म_१$' हा बिंदू विचारात घेतला, येथे खालील अंतर '$म_१$'ब हे '$म_१$क' पेक्षा कमी आहे.
($म_१$ ब)= २ से.मी., ($म_१$क) = ६ से.मी.

$$\therefore Ed = \frac{(म_१ब)}{(म_१क)} = \frac{२}{६} = ०.३३$$

$$\therefore Ed < 1$$

३) समजा '$म_२$' हा बिंदू विचारात घेता येथे खालील अंतर '$म_२$ब' हे '$म_२$क' पेक्षा जास्त आहे.
$म_२$ ब = ६, ($म_२$ क)= २

$$Ed = \frac{(म_२ब)}{(म_२क)} = \frac{६}{२} = ३$$

$$\therefore Ed > 1$$

जर खालील अंतर हे वरील अंतरापेक्षा जास्त असेल तर येथे $म_२$ = ३ म्हणजेच मागणी अधिक लवचीक आहे.

४) 'क' बिंदूवर, बिंदूची लवचिकता अनंत (∞) आहे. कारण वरील अंतर शून्य आहे. येथे संपूर्ण लवचीक मागणी आहे.


५) 'ब' बिंदूवर, बिंदूची लवचिकता शून्य आहे. कारण खालील अंतर शून्य आहे. येथे मागणी संपूर्ण अलवचीक आहे.

२) **अरेखीय मागणी वक्र :** जेव्हा मागणी वक्र हा अरेखीय स्वरूपाचा असतो, तेव्हा मागणीची किंमत लवचिकता मोजण्यासाठी दिलेल्या बिंदूला स्पर्श करणारी 'कब' ही स्पर्शरेषा काढावी लागते. आणि ही स्पर्शरेषा य अक्षावर 'क' बिंदूला स्पर्शरेषा काढावी लागते आणि ही स्पर्शरेषा य अक्षावर 'क' बिंदूला आणि क्ष अक्षावर 'ब' बिंदूला स्पर्श करते.

सूत्र –

मागणीची किंमत लवचिकता = $\dfrac{\text{स्पर्शरेषेवरील बिंदूपासूनचे खालचे अंतर}}{\text{स्पर्शरेषेवरील बिंदूपासूनचे वरचे अंतर}}$

**अरेखीय मागणी वक्र**




**आकृती ३.१५**

जर, सब = सक (Ed = 1) – एकक लवचीक मागणी
सब > सक (Ed > 1) – अधिक लवचीक मागणी
सब < सक (Ed < 1) – कमी लवचीक मागणी

### मागणीची लवचिकता निर्धारित करणारे घटक :

मागणीची लवचिकता अनेक घटकांवर अवलंबून असते. त्यातील महत्त्वाचे स्पष्टीकरण खाली दिलेले आहे.

१) **वस्तूचे स्वरूप :** वस्तूंच्या स्वरूपानुसार जीवनावश्यक वस्तू, सुखसोईच्या वस्तू आणि चैनीच्या वस्तू असे वर्गीकरण केले जाते. जीवनावश्यक वस्तू, उदा., अन्नधान्य, औषधे, पुस्तके इत्यादींची मागणी अलवचीक असते. सुखसोई आणि चैनीच्या वस्तू उदा., कार, अत्तर (सुगंधी द्रव्ये), फर्निचर इत्यादींची मागणी लवचीक असते.

२) **पर्यायी वस्तूंची उपलब्धता :** जेव्हा वस्तूला बाजारात अनेक पर्याय उपलब्ध असतात अशा वस्तूंची मागणी सर्वसाधारणपणे लवचीक असते. उदा., लिंबू सरबत, उसाचा रस इत्यादी. पण वस्तूला बाजारात जवळचा पर्याय उपलब्ध नसेल. उदा., मीठ; तर अशा वस्तूंची मागणी अलवचीक असते.

३) **वस्तूचे अनेक उपयोग :** एकाच उपयोगासाठी असणाऱ्या वस्तूची लवचिकता कमी लवचीक असते. विविधोपयोगी वस्तूंची मागणी जास्त लवचीक असते. उदा., कोळसा, वीज इत्यादी.

४) **व्यसनाच्या वस्तू :** सवयीच्या वस्तूंची मागणी अलवचीक असते. उदा., व्यसन, अमली पदार्थ इत्यादी.

५) **टिकाऊपणा :** टिकाऊ वस्तूची मागणी जास्त लवचीक असते. उदा., फर्निचर, धुलाईयंत्र इत्यादी. तर नाशवंत वस्तूंची मागणी अलवचीक असते. उदा., दूध, भाजीपाला इत्यादी.

६) **पूरक वस्तू :** एक गरज पूर्ण करण्यासाठी अनेक वस्तूंना मागणी केली जाते. अशा पूरक वस्तूंची मागणी अलवचीक असते. उदा., मोबाइलची किंमत कमी झाली तर सिमकार्डची मागणी वाढू शकते.

७) **उपभोक्त्यांचे उत्पन्न :** उपभोक्त्यांची उत्पन्न पातळी उच्च असेल तर मागणी अलवचीक असते. उच्चभ्रू व्यक्ती आणि गरीब व्यक्तींच्या मागणीवर किंमत बदलाचा परिणाम क्वचितच होतो.

८. **गरजेची तीव्रता :** ज्या वस्तूची गरज अधिक तीव्र असते. त्या वस्तूची मागणी कमी लवचीक असते. उदा., औषधे. ज्या वस्तूची गरज कमी तीव्र असते. त्या वस्तूची मागणी जास्त लवचीक असते. उदा., मोटारगाडी.

९) **कालावधी :** सामान्यपणे असे सांगता येईल की, कालावधी जेवढा अधिक तेवढी मागणीची किंमत लवचिकता अधिक असते आणि कालावधी जेवढा कमी तेवढी मागणीची किंमत लवचिकता कमी असते. कारण उपभोक्त्याच्या उपभोगप्रवृत्ती दीर्घ कालावधीत स्वस्त व पर्यायी वस्तूंच्या बाजूने बदलू शकतात.

**तुम्हांला माहीत हवं.**

| निर्धारक घटक | स्वरूप | मागणीची किंमत लवचिकता |
|---|---|---|
| १. घटकाची उपलब्धता | जास्त | अधिक लवचीक मागणी |
| | कमी | कमी लवचीक मागणी |
| २. वस्तूचे स्वरूप | अत्यावश्यक वस्तू | कमी लवचीक मागणी |
| | चैनीच्या वस्तू | अधिक लवचीक मागणी |
| ३.सवयी | सवयीच्या वस्तू | कमी अलवचीक मागणी |
| | सवयीच्या नसलेल्या | अधिक लवचीक मागणी |
| ४. कालावधी | अल्पकालावधी | कमी लवचीक मागणी |
| | दीर्घकालावधी | अधिक लवचीक मागणी |
| ५.उपभोग पुढे ढकलण्याची शक्यता | शक्य | अधिक लवचीक मागणी |
| | अशक्य | कमी लवचीक मागणी |
| ६. वस्तूचे उपयोग | अनेक | अधिक लवचीक मागणी |
| | विशिष्ट | कमी लवचीक मागणी |

### मागणीच्या लवचिकतेचे महत्त्व

मागणीच्या लवचिकतेची संकल्पना उत्पादक, शेतकरी, कामगार आणि शासनाला मोठ्या प्रमाणावर उपयोगी असते. खालील घटकांवरून संकल्पनेचे महत्त्व स्पष्ट करता येईल.

१) **उत्पादकासाठी महत्त्वपूर्ण :** प्रत्येक उत्पादक तो विक्री करत असलेल्या उत्पादनांची किंमत ठरवित असतो. ही ठरविताना त्याला मागणीची लवचिकता उपयोगी ठरते. जर वस्तूची मागणी जास्त अलवचीक असेल तर तो किंमत अधिक ठरवेल. तसेच जर वस्तूची मागणी अलवचीक असेल तर तो किंमत कमी करेल. जर उत्पादक मक्तेदार असेल तर त्याचे मूल्यभेद धोरण भिन्न बाजारपेठांतील मागणीच्या लवचिकतेवर अवलंबून असेल.

२) **शासनासाठी महत्त्वपूर्ण :** कर लागू करताना देशाचे अर्थमंत्री या संकल्पनेचा वापर करतात. ते त्या वस्तूंवर कर आकारतात. ज्यांची मागणी तुलनेने अलवचीक असते. कारण अशा वस्तूंच्या मागणीवर फारसा परिणाम होत नाही आणि अर्थमंत्री करादूवारे सहजपणे महसूलात वाढ करू शकतात.

३) **उत्पादन घटकांचे मोबदले ठरविताना महत्त्वपूर्ण :** मागणीच्या लवचिकतेची संकल्पना उत्पादन घटकांच्या किमती ठरविण्यासाठी उपयुक्त आहे. ज्या उत्पादन घटकांची मागणी लवचीक आहे. त्यांच्यापेक्षा ज्या उत्पादन घटकांची मागणी अलवचीक आहे त्यांचे मोबदले जास्त असतात.

उदा., ज्या कामगारांच्या उत्पादनाची मागणी अलवचीक आहे, त्यांच्या वेतनात सहज वाढ होते.

४) **विदेशी व्यापारासाठी महत्त्वपूर्ण :** आंतरराष्ट्रीय व्यापारातील नियम व अटी निश्चित करण्यासाठी मागणीची लवचिकता उपयुक्त ठरते. किंमतीमध्ये वाढ करता येतील अशा अलवचीक वस्तूंची निर्यात देश करतात. उदा., ओपेक – पेट्रोलियम निर्यात करणाऱ्या देशांच्या संस्थेने अनेक वेळा त्यांच्या किंमतीत वाढ केली आहे.

देशाचे आयात-निर्यात धोरण ठरविण्यासाठी देखील या संकल्पनेचा उपयोग होतो.

५) **सार्वजनिक सुविधा :** रेल्वेसारख्या अलवचीक मागणी असणाऱ्या सार्वजनिक सुविधांच्या बाबतीत उपभोक्त्यांचे शोषण टाळण्यासाठी सरकार एकतर अनुदान देते किंवा त्यांचे राष्ट्रीयीकरण करते.

६) **उत्पन्नातील खर्चाचे प्रमाण :** वस्तूवरील खर्चाचे एकूण उत्पन्नातील प्रमाण कमी असेल तर मागणी अलवचीक असते. उदा., वर्तमानपत्रे. जेव्हा वस्तूवरील खर्चाचे प्रमाण जास्त असेल तर मागणी जास्त लवचीक असते.

## स्वाध्याय

**प्र. १. खालील विधाने पूर्ण करा :**

१) रेषीय मागणी वक्रावरील 'क्ष' अक्षावर असलेली मागणीची किंमत लवचिकता ................ .

अ) शून्य
ब) एक
क) अनंत
ड) Ed < 1

२) रेषीय मागणी वक्रावरील 'य' अक्षावर असलेली मागणीची किंमत लवचिकता ................ .

अ) शून्य
ब) एक
क) अनंत
ड) Ed > 1

३) 'क्ष' अक्षास समांतर असलेला किंमत लवचिकतेचा मागणी वक्र ................ .

अ) संपूर्ण लवचीक मागणी
ब) संपूर्ण अलवचीक मागणी
क) जास्त लवचीक मागणी
ड) कमी लवचीक मागणी

४) किमतीतील बदलापेक्षा जेव्हा मागणीतील बदलाचे प्रमाण जास्त असते, तेव्हा असणारा मागणी वक्र ................ .

अ) पसरट
ब) तीव्र उताराचा
क) आयताकृती परिवलयाचा
ड) समांतर

५) Ed =० हा अनुभव येणाऱ्या वस्तू ................ .

अ) सुखसोईच्या
ब) सर्वसाधारण
क) जीवनावश्यक
ड) अत्यावश्यक

### प्र. २. योग्य अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्द सूचवा :

१) फक्त उत्पन्नातील बदलाचा परिणाम म्हणून मागणीत घडून येणारा बदल

२) एका वस्तूच्या किमतीतील बदलाचा अन्य वस्तूंच्या मागणीत घडून येणाऱ्या बदलाचा परिणाम.

३) किमतीतील बदलांमुळे वस्तूच्या मागणीत घडून येणारा बदल.

४) मागणीतील अनंत बदलामुळे होणारी लवचिकता

५) किमतीतील शेकडा बदलाच्या प्रमाणाइतकीच वस्तूच्या मागणीत शेकडा बदल घडवणारी लवचिकता.

### प्र. ३. खालील सहसंबंध पूर्ण करा :

१) संपूर्ण लवचीक मागणी : Ed = ∝ :: ☐ : Ed = ०

२) परिवलयाचा मागणी वक्र : ☐ :: क्ष अक्षाकडे झुकणारा तीव्र उताराचा मागणी वक्र : कमी लवचीक मागणी

३) सरळ रेषेतील मागणीवक्र : लिनिअर मागणी वक्र ☐ :: अरेखीय मागणी वक्र.

४) पेन आणि शाई : ☐ :: चहा, कॉफी : पर्यायी वस्तू.

५) गुणोत्तर पद्धत : मागणीतील शेकडा बदल :

$$\frac{\text{मागणीची लवचिकता}}{\text{किमतीतील शेकडा बदल}} :: \boxed{\phantom{xx}} : \text{बिंदूची मा. ल.} = \frac{\text{मागणी वक्रावरील बिंदूपासूनचे खालचे अंतर}}{\text{मागणी वक्रावरील बिंदूपासूनचे वरचे अंतर}}$$

### प्र. ४. विधान आणि तर्क प्रश्न :

१) **विधान 'अ' :** एक चलातील बदलाचा परिणाम दुसऱ्या चलावर होतो हे लवचिकता स्पष्ट करते.

**तर्क विधान 'ब' :** मागणीची लवचिकता ही संकल्पना किंमत आणि इतर घटकांतील मागणीवर होणाऱ्या बदलाचा परिणाम दर्शविते.

**पर्याय :** अ) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

ब) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

२) **विधान 'अ' :** एका वस्तूच्या किंमतीतील बदल हा अन्य वस्तूच्या मागणीत बदल घडवतो.

**तर्क विधान 'ब' :** उपभोक्त्याच्या उत्पन्नातील बदल हा वस्तूच्या मागणीत बदल घडवतो.

**पर्याय :** अ) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

ब) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

३) **विधान 'अ' :** कमी लवचिकतेमध्ये किंमतीची लवचिकता ही एकापेक्षा कमी असते.

**तर्क विधान 'ब' :** किंमतीतील बदलाच्या प्रमाणापेक्षा मागणीतील बदलाचे प्रमाण कमी असते.

**पर्याय :** अ) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

ब) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

### प्र. ५. फरक स्पष्ट करा :

१) अधिक लवचीक मागणी आणि कमी लवचीक मागणी

२) संपूर्ण लवचीक मागणी आणि संपूर्ण अलवचीक मागणी

### प्र. ६. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :


१) मागणीची लवचिकता निर्धारित करणारे घटक स्पष्ट करा.


२) मागणीची लवचिकता मोजण्याची एकूण खर्च पद्धत स्पष्ट करा.


३) मागणीच्या लवचिकतेचे महत्त्व विशद करा.


**प्र. ७. खालील आकृतींचे निरीक्षण करा आणि प्रश्नांची उत्तरे लिहा :**

१) खालील मागणी वक्रांची लवचिकता कोणती आहे ते सांगा आणि स्पष्ट करा.





२) आकृतीमधील 'मम' हा रेषीय मागणी वक्र आहे. आकृतीच्या आधारावर खालील विधाने सत्य की असत्य ते लिहा. त्याची कारणे स्पष्ट करा.




१) म$_{३}$ या बिंदूवर मागणी अधिक लवचीक आहे.

२) म$_{१}$ या बिंदूवर मागणी एकक लवचीक आहे.

३) म$_{२}$ या बिंदूवर मागणी कमी लवचिक आहे.

४) म या बिंदूवर मागणी संपूर्ण लवचिक आहे.

# ४ पुरवठा विश्लेषण (Supply Analysis)

## प्रस्तावना :

मागणीच्या अभ्यासाप्रमाणे पुरवठ्याचाही अभ्यास महत्त्वाचा आहे. पुरवठा ही मूलभूत आर्थिक संकल्पना आहे; जी विक्रेत्याकडे उपलब्ध असलेल्या विशिष्ट वस्तू आणि सेवांच्या एकूण नगसंख्येचे वर्णन करते. कोणत्याही विशिष्ट किमतीला विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या एकूण वस्तू आणि सेवा यांची संख्या म्हणजे पुरवठा होय.

## एकूण उत्पादन, साठा आणि पुरवठा या संकल्पना :

### एकूण उत्पादन :

उत्पादन हे उत्पादन प्रक्रियेद्वारे केले जाते. विशिष्ट कालावधीत अर्थव्यवस्थेत उत्पादित केलेल्या वस्तूंच्या नगसंख्येची एकूण बेरीज म्हणजे एकूण उत्पादन होय. उत्पादन हे उपभोगाचे माध्यम आहे. उत्पादन प्रक्रियेत आदानांचे रूपांतर प्रदानांमध्ये किंवा वस्तूच्या उत्पादनामध्ये होते.


### साठा :

विशिष्ट कालावधीत विक्रेत्याकडे विक्रीसाठी उपलब्ध असलेली एकूण नगसंख्या म्हणजे साठा होय. हे पुरवठ्याचे स्रोत आहे. तो संभाव्य पुरवठा आहे. उत्पादन वाढले की साठा वाढू शकतो. सामान्यतः साठा हा पुरवठ्यापेक्षा जास्त असतो आणि तो स्थिर असून अलवचीक असतो. नाशवंत वस्तूच्या बाबतीत साठा आणि पुरवठा समान असतो. उदा., दूध, मासे यांसारख्या वस्तू. टिकाऊ वस्तूंचा साठा हा त्यांच्या पुरवठ्यापेक्षा अधिक असू शकतो. उदा., फर्निचर, कपडे इत्यादी.

### पुरवठा :

पुरवठा ही सापेक्ष संकल्पना आहे. ती नेहमी किंमत, वेळ आणि नगसंख्या या संदर्भांत स्पष्ट केली जाते.

पुरवठा हा शब्द काळ आणि किंमत यांच्याशी संबंधित असतो. दिलेल्या विशिष्ट काळामध्ये विशिष्ट किंमत असताना उत्पादकाकडून विक्रीसाठी पुरविलेली नगसंख्या म्हणजे पुरवठा होय. पुरवठा ही प्रवाही संकल्पना आहे. उत्पादकाने उत्पादित केलेल्या वस्तूंची नगसंख्या आणि विशिष्ट काळ जसे की, एक दिवस, एक आठवडा, एक महिना, एक वर्ष यामध्ये विक्रीसाठी बाजारात उपलब्ध केलेली नगसंख्या म्हणजे पुरवठा होय.




आकृती ४.१

**प्रयत्न करा.**
साठा व पुरवठा यांमधील फरक स्पष्ट करा.

## पुरवठ्याची व्याख्या :

**पॉल सॅम्युअल्सन –** ''बाजारात अस्तित्वात असलेल्या किमती आणि विक्रेता विक्रीसाठी इच्छुक असलेल्या वस्तूंची नगसंख्या यातील संबंध म्हणजे पुरवठा होय.''

विशिष्ट वेळी विशिष्ट किमतीला साठ्यातील जो भाग प्रत्यक्ष बाजारात विक्रीसाठी आणला जातो त्यास पुरवठा असे म्हणतात. पुरवठ्याचा संबंध वस्तूंच्या नगसंख्येशी असून विशिष्ट काळात विशिष्ट किमतीला विक्रेत्याची वस्तू विकण्याची इच्छा आणि तयारी असते हे स्पष्ट होते. उदा., समजा, शेतकऱ्याने ४००० किग्रॅ. तांदळाचे एकूण उत्पादन केले तो त्याचा साठा होय. या साठ्यातील प्रति कि.ग्रॅ.४० ₹ दराने १००० कि.ग्रॅ. तांदूळ विक्रीसाठी बाजारात आणला. तर १००० कि.ग्रॅ. तांदूळ हा बाजारातील प्रत्यक्ष पुरवठा होय.

## पुरवठा पत्रक :

एखाद्या विशिष्ट वस्तूची किंमत आणि त्या वस्तूचा पुरवठा यातील कार्यात्मक संबंध ज्या सारणीद्वारे दर्शविला जातो त्यास पुरवठा पत्रक म्हणतात.

१) **वैयक्तिक पुरवठा पत्रक :** एका विशिष्ट कालखंडात बाजारात वस्तूच्या निरनिराळ्या किमती असताना

बाजारातील एका विक्रेत्याकडून विक्रीसाठी आणलेल्या नगसंख्या दर्शविणारे पत्रक म्हणजे वैयक्तिक पुरवठा पत्रक होय.


**तक्ता क्र.४.१**

| 'क्ष' वस्तूची प्रतिकिलो किंमत (₹) | 'क्ष' वस्तूचा पुरवठा (कि.ग्रॅ.) |
|---|---|
| १० | १०० |
| २० | २०० |
| ३० | ३०० |
| ४० | ४०० |
| ५० | ५०० |

तक्ता क्र.४.१ मध्ये पुरवठा नगसंख्या आणि किंमत यांतील कार्यात्मक संबंध स्पष्ट केला आहे. कमी किमतीला कमी नगसंख्येचा पुरवठा होतो. उदा., १० ₹ किमान किमतीला वस्तूचा पुरवठा देखील १०० कि.ग्रॅ. किमान नगसंख्येचा आहे आणि ५०₹ कमाल किमतीला ५०० कि.ग्रॅ. कमाल नगसंख्येचा पुरवठा होतो.

### वैयक्तिक पुरवठा वक्र :

वैयक्तिक पुरवठा वक्र हा वैयक्तिक पुरवठा पत्रकाचे आलेखीय सादरीकरण आहे.




**पुरवठा (कि.ग्रॅ.)**

**आकृती क्र.४.२**

आकृती क्र.४.२ मध्ये 'क्ष' अक्षावर पुरवठा नगसंख्या आणि 'य' अक्षावर किंमत दाखविली आहे. पुरवठा वक्र पप हा डावीकडून उजवीकडे वरती जाणारा आहे. पुरवठा नगसंख्या आणि किंमत यांचा प्रत्यक्ष संबंध दर्शविला आहे.

२) **बाजार पुरवठा पत्रक** – एका विशिष्ट कालावधीत बाजारात निरनिराळ्या किमती असताना बाजारातील सर्व विक्रेत्यांनी विक्रीसाठी आणलेल्या विविध नगसंख्या दर्शविणारे पत्रक म्हणजे बाजार पुरवठा होय.


**तक्ता क्र.४.२**

| वस्तूची किंमत रुपये | वस्तूचा पुरवठा (नगसंख्या) (कि.ग्रॅ.) | | | बाजारातील पुरवठा (अ+ब+क) |
|---|---|---|---|---|
| | विक्रेता अ | विक्रेता ब | विक्रेता क | कि.ग्रॅ. |
| १० | १०० | २०० | ३०० | ६०० |
| २० | २०० | ३०० | ४०० | ९०० |
| ३० | ३०० | ४०० | ५०० | १२०० |
| ४० | ४०० | ५०० | ६०० | १५०० |
| ५० | ५०० | ६०० | ७०० | १८०० |

तक्ता क्र.४.२ मध्ये निरनिराळ्या किमती असताना अ,ब,क या विक्रेत्यांनी बाजारात केलेल्या पुरवठ्याची बेरीज केली असता एकूण बाजार पुरवठा मिळतो. ५०₹ कमाल किमतीला बाजार पुरवठा वाढून कमाल १८०० कि.ग्रॅ. होतो आणि १० ₹ किमान किमतीला बाजार पुरवठा किमान ६०० कि.ग्रॅ. होतो.

### बाजार पुरवठा वक्र :

बाजार पुरवठा वक्र हा बाजार पुरवठा पत्रकाचे सादरीकरण आहे.




**पुरवठा (कि.ग्रॅ.)**

**आकृती क्र.४.३**

आकृती ४.३ मध्ये 'क्ष' अक्षावर पुरवठा नगसंख्या आणि 'य' अक्षावर किंमत दाखविली आहे. पुरवठा वक्र 'पप' हा डावीकडून उजवीकडे वरती जाणारा आहे. बाजार पुरवठा नगसंख्या आणि किंमत यांचा संबंध प्रत्यक्ष दाखविला आहे.

**हे करून पहा!**

काल्पनिक पुरवठा पत्रक तयार करून पुरवठा वक्र काढा.

## पुरवठा निर्धारक घटक :

१) **वस्तूची किंमत :** किंमत हा वस्तूच्या पुरवठ्यावर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक आहे. जास्त किमतीला अधिक पुरवठा केला जातो व कमी किमतीला कमी पुरवठा केला जातो. अशा प्रकारे किंमत व पुरवठा यांचा सम संबंध असतो.

२) **तंत्रज्ञानाची स्थिती :** उत्पादन तंत्रातील सुधारणांमुळे उत्पादन खर्च कमी होऊन उत्पादन वाढते व पुरवठाही वाढतो.

३) **उत्पादन खर्च :** उत्पादन घटकांच्या किमती वाढल्या तर उत्पादन खर्च वाढतो. परिणामी पुरवठा कमी होतो.

४) **पायाभूत सुविधा :** वीज, वाहतूक, दळणवळण इत्यादी पायाभूत सुविधांचा परिणाम उत्पादन प्रक्रिया व पुरवठ्यावर होतो. या सुविधांच्या अभावामुळे पुरवठा कमी होतो आणि सुविधांची अधिक उपलब्धता असल्यास पुरवठा जास्त केला जातो.

५) **सरकारची धोरणे :** अनुकूल शासकीय धोरणामुळे पुरवठा वाढतो आणि प्रतिकूल शासकीय धोरणामुळे पुरवठा कमी होतो. सरकारचे करविषयक, अर्थसाहाय्य, औद्योगिक धोरणे इत्यादी धोरणामुळे उत्पादन आणि पुरवठा कमी जास्त होऊ शकतो. त्यामुळे सरकारच्या धोरणावर पुरवठा अवलंबून आहे.

६) **नैसर्गिक परिस्थिती :** कृषी उत्पादनांचा पुरवठा नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून असतो. उदा., चांगला पाऊस आणि योग्य हवामान असल्यास चांगले उत्पादन होते. त्यामुळे कृषी उत्पादन वाढून पुरवठा वाढतो. याउलट प्रतिकूल हवामानामुळे पुरवठा कमी होतो.

७) **भविष्यकालीन किमतीचा अंदाज :** नजीकच्या भविष्यात किमती वाढण्याची शक्यता असल्यास उत्पादक साठा वाढवेल. त्यामुळे पुरवठा कमी होईल आणि याउलट किमती कमी होण्याची शक्यता असल्यास उत्पादक साठा कमी करून पुरवठा वाढवेल.

८) **इतर घटक :**

- बाजाराचे स्वरूप,
- इतर वस्तूंच्या सापेक्ष किमती
- आयात निर्यात संबंध
- औद्योगिक संबंध
- उत्पादन घटकांची उपलब्धता

इत्यादी घटक अनुकूल असतील तर वस्तूचा पुरवठा वाढतो आणि घटक प्रतिकूल असतील तर पुरवठा घटतो.

## पुरवठ्याचा नियम

### प्रस्तावना :

आर्थिक सिद्धांतात जसे मागणी नियमाप्रमाणेच पुरवठा हा नियमसुद्धा मूलभूत नियम आहे. प्रा. आल्फ्रेड मार्शल यांनी सन १८९० मध्ये प्रकाशित केलेल्या 'अर्थशास्त्राची मूलतत्त्वे' या पुस्तकात मागणी नियमाप्रमाणेच पुरवठ्याचा नियमही मांडला आहे. या नियमाद्वारे किंमत व पुरवठा यांतील परस्पर संबंध स्पष्ट केला आहे.

### नियम :

"इतर परिस्थिती स्थिर असताना वस्तूच्या अधिक किमतीला जादा नगसंख्येचा पुरवठा केला जातो व वस्तूच्या कमी किमतीला कमी नगसंख्येचा पुरवठा केला जातो."

दुसऱ्या शब्दात इतर घटक स्थिर असताना किंमत वाढल्यास वस्तूच्या नगसंख्येचा पुरवठा वाढतो, तर किंमत कमी झाल्यास पुरवठा कमी होतो. अशा प्रकारे नगसंख्या आणि किंमत यांचा सम संबंध असतो. किंमत व पुरवठा यांतील सहसंबंध खालील प्रकारे स्पष्ट करता येतो.

$$Sx = f(Px)$$

जिथे, S = पुरवठा

x = वस्तू

f = फलन

P = किंमत

### गृहीतके (Assumption)

पुरवठ्याचा नियम हा खालील गृहीतकांवर आधारित आहे.

१) **स्थिर उत्पादन खर्च :** उत्पादन खर्चात बदल होत नाही असे गृहीत धरले आहे. कारण उत्पादन खर्चातील बदलामुळे विक्रेत्याच्या नफ्यात बदल होईल आणि त्याच किमतीला पुरवठा कमी केला जाईल.

२) **स्थिर उत्पादन तंत्र :** उत्पादन तंत्रात बदल होत नाही असे गृहीत धरले आहे. सुधारित तंत्रामुळे उत्पादनात वाढ होते. त्याच किमतीला पुरवठा वाढतो.

३) **हवामानाच्या स्थितीत बदल नाही :** हवामानाच्या स्थितीत बदल होत नाही हे गृहीत धरले आहे. पूर, भूकंप, दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्तींमुळे पुरवठा घटू शकतो.

४) **सरकारी धोरणात बदल नाही :** सरकारच्या व्यापार विषयक व कर विषयक धोरणात कोणताही बदल होत नाही असे गृहीत धरण्यात आले आहे.

५) **वाहतूक खर्च स्थिर :** वाहतूक खर्च व वाहतूक सुविधा यांत कोणताही बदल होत नाही, असे गृहीत धरण्यात आले आहे. उदा., चांगल्या वाहतूक सुविधांमुळे किंमत तीच असताना पुरवठ्यात वाढ होईल.

६) **इतर वस्तूंच्या किमती स्थिर :** इतर वस्तूंच्या किमती स्थिर आहेत असे गृहीत धरण्यात आले आहे. जर इतर वस्तूंच्या किमतीत बदल झाला तर उत्पादक उत्पादन घटकांचा वापर इतर वस्तूंच्या उत्पादनासाठी करेल.

७) **भविष्यकालीन किमतीचा अंदाज नाही :** भविष्यकाळात वस्तूंच्या किमतीत होणाऱ्या बदलाविषयी उत्पादक विक्रेत्याला कोणताही अंदाज करता येत नाही, असे गृहीत धरण्यात आले आहे.

पुरवठ्याचा नियम खालील पत्रक व आकृतीच्या साहाय्याने अधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट करता येतो.


**तक्ता क्र.४.३**

**पुरवठा पत्रक**

| क्ष वस्तूची प्रतिकिलो किंमत रूपये (₹) | क्ष वस्तूचा पुरवठा (नगसंख्या कि.ग्रॅ.) |
|---|---|
| १० | १०० |
| २० | २०० |
| ३० | ३०० |
| ४० | ४०० |
| ५० | ५०० |

तक्ता क्र.४.३ मध्ये क्ष वस्तूची किंमत आणि नगसंख्या यांमधील प्रत्यक्ष संबंध स्पष्ट केला आहे. जेव्हा किंमत १० ₹ पासून २०,३०,४० व ५० रुपयांपर्यंत अनुक्रमे वाढते तेव्हा पुरवठा सुद्धा १००,२००,३००,४०० व ५०० नगसंख्येपर्यंत पुरवठा वाढतो. याचा अर्थ जेव्हा किंमत वाढते तेव्हा पुरवठाही वाढतो आणि किंमत कमी होते तेव्हा पुरवठाही कमी होतो. वस्तूची किंमत आणि पुरवठा यांचा सम संबंध असतो. हे आकृती ४.४ मध्ये दर्शविले आहे.

**पुरवठा वक्र**




**पुरवठा**

**आकृती ४.४**

आकृती ४.४ मध्ये वस्तूचा पुरवठा नगसंख्या 'क्ष' अक्षावर आणि किंमत 'य' अक्षावर दाखविली आहे. 'पप' हा पुरवठा वक्र डावीकडून उजवीकडे वर जाणारा असून किंमत आणि पुरवठा यांचा प्रत्यक्ष संबंध दाखविला आहे.

### पुरवठा नियमाचे अपवाद :

पुरवठा नियमाचे अपवाद खालीलप्रमाणे :


१) **श्रमाचा पुरवठा :** दिलेल्या वेतनदरावर श्रमिकांनी केलेल्या कामाचे तास म्हणजे श्रमाचा पुरवठा होय. तो पुरवठा वक्र आलेखाच्या सहाय्याने दाखविता येतो. यामध्ये मजूरीचा दर वाढत असताना (कामाचे तास) श्रमाचा पुरवठा वाढतो. त्यामुळे पुरवठा वक्र वर जातो. परंतु मजूरीचा दर पुढे वाढल्यास श्रमाचा पुरवठा (कामाचे तास) कमी होतो आणि श्रमाचा पुरवठा वक्र मागे वळतो. कारण मजुरीच्या स्वरुपात जास्त रक्कम मिळाल्यानंतर श्रमिक विश्रांतीच्या अपेक्षेने श्रमाचा पुरवठा कमी करतो. म्हणजेच एका विशिष्ट पातळीनंतर वेतन दर वाढल्यास श्रमाचा पुरवठा कमी होतो. हे श्रमाच्या मागे वळणाऱ्या पुरवठा वक्राच्या सहाय्याने स्पष्ट करता येते. पत्रक क्र.४.४ आणि आकृती क्र.४.५ च्या सहाय्याने मागे वळणारा श्रमाचा पुरवठा वक्र स्पष्ट करता येतो.

**पत्रक क्र.४.४**

**श्रमाचे पुरवठा पत्रक**

| वेतन दर (₹) प्रति तास | कामाचे तास दर दिवशी | एकूण मजूरी (₹) |
|---|---|---|
| १०० | ५ | ५०० |
| २०० | ७ | १४०० |
| ३०० | ६ | १८०० |

**मागे वळणारा श्रमाचा पुरवठा वक्र**




श्रमाचा पुरवठा (कामाचे तास) **आकृती ४.५**

पन = हा वाढता श्रम पुरवठा वक्र

नप हा विश्रांतीचा काळ

आकृती ४.५ मध्ये क्ष अक्षावर श्रमाचा पुरवठा (कामाचे तास) दाखविला आहे आणि 'य' अक्षावर मजुरीचा दर दाखविला आहे. पनप हा मागे वळणारा पुरवठा वक्र आहे. वेतन दर १०० पर्यंत वाढल्यास श्रमाचा पुरवठा ५ तासाचा होतो. त्यांची एक दिवसाची एकूण मजुरी ५००₹ होते. तो मजूरीचा दर १०० ₹ वरून २०० ₹ झाल्यास कामाचे तास सुध्दा ५ वरून ७ पर्यंत वाढतात. त्यांची एकूण मजूरी सुध्दा ५००₹ वरून १४०० ₹ पर्यंत वाढते. जर यांनतर मजूरी दर २००₹ वरून ३०० ₹ पर्यंत वाढल्यास श्रमिक विश्रांतीला पसंती देतो आणि काम कमी करतो. अशाप्रकारे तो श्रमिक फक्त ६ तास काम करण्यास तयार असतो. या स्थितीत नप₁ पुरवठा वक्र मागे वळतो. म्हणून हा पुरवठा सिध्दांताचा अपवाद आहे.

२) **कृषी उत्पादने :** विशिष्ट वेळी उत्पादन होणारा शेतमाल या नियमाला अपवाद ठरतो. कारण शेतीचे उत्पादन हंगामी असते. हवामानात प्रतिकूल बदल झाल्यास शेतीचे उत्पादन कमी होईल. तेव्हा जास्त किमतीलाही वस्तूचा पुरवठा वाढणार नाही.

३) **रोख रकमेची तीव्र गरज :** जर विक्रेत्याला रोख रकमेची तीव्र गरज असेल तर विक्रेता आपला माल बाजार किमतीपेक्षा ही कमी किमतीला विकेल किंवा पुरवठा वाढवेल. किमती वाढत नसतानाही विक्री करेल व त्यामुळे पुरवठ्यात वाढ होईल.


४) **नाशवंत वस्तू :** नाशवंत वस्तूंच्या बाबतीत नुकसान टाळण्यासाठी विक्रेते कमी किमतीला जास्त पुरवठा करू शकतात. उदा., भाजीपाला, अंडी इत्यादी.

५) **दुर्मिळ वस्तू :** ज्या वस्तू सहजासहजी उपलब्ध होऊ शकत नाहीत, अशा वस्तूंच्या बाबतीत सुद्धा पुरवठा नियम सिद्ध होत नाही. उदा., दुर्मिळ चित्रे, नाणी, मौल्यवान वस्तू इत्यादी. या वस्तूंची निर्मिती पुन्हा करता येत नाही. म्हणून अशा वस्तूंच्या किमती वाढल्या तरी पुरवठा वाढविता येत नाही.

### पुरवठ्यातील विचलन (Variations in Supply) :

इतर परिस्थिती स्थिर असताना वस्तूच्या किंमतीत बदल झाल्याने वस्तूंच्या नगसंख्येतही बदल होतो, त्यास पुरवठ्यातील विचलन असे म्हणतात. पुरवठ्यातील विचलन दोन प्रकारचे असते.

१) **पुरवठ्याचा विस्तार (Expansion of Supply) :** इतर घटक स्थिर असताना किंमतीत वाढ झाल्यामुळे पुरवठ्यातदेखील वाढ होते, त्यास पुरवठ्याचा विस्तार असे म्हणतात. किंमत वाढल्यामुळे पुरवठा त्याच पुरवठा वक्रावर वरच्या बाजूस सरकतो. आकृती क्र.४.६ मध्ये अधिक स्पष्ट केले आहे.





**पुरवठा नगसंख्या**

**आकृती क्र.४.६**

आकृती क्र.४.६ मध्ये 'क्ष' अक्षावर पुरवठा व 'य' अक्षावर किंमत दाखविली आहे. किंमत 'क' वरून 'क$_{१}$' वाढली असता पुरवठा 'ब' नगसंख्येवरून 'ब$_{१}$' असा होतो. पुरवठ्यातील हा बदल 'पप' या पुरवठा वक्रावर 'मन' ने दाखविला आहे. यालाच पुरवठ्यातील विस्तार असे म्हणतात.

**२) पुरवठ्याचा संकोच (Contraction of Supply) :** इतर घटक स्थिर असताना किंमत कमी झाल्यामुळे पुरवठा देखील कमी होतो. त्यास पुरवठ्याचा संकोच असे म्हणतात. किंमत कमी झाल्यामुळे पुरवठा हा त्याच पुरवठा वक्रावर खालच्या बाजूस सरकतो. हे आकृती क्र.४.७ मध्ये स्पष्ट केले आहे.




**पुरवठा नगसंख्या**


**आकृती क्र.४.७**

आकृती क्र.४.७ मध्ये 'क्ष' अक्षावर पुरवठा नगसंख्या आणि 'य' अक्षावर वस्तूची किंमत दर्शविली आहे. किंमत 'क' वरून 'क$_{२}$' वर आली असता पुरवठा नगसंख्या 'ब' वरून 'ब$_{२}$' एवढी कमी होते. हा पुरवठ्यातील बदल 'पप' या पुरवठा वक्रावर 'नम' या दिशेने दर्शविला आहे यालाच पुरवठ्यातील संकोच असे म्हणतात.

**पुरवठ्यातील बदल (Changes in Supply) :**

किंमत स्थिर असताना इतर घटकांतील बदलामुळे वस्तूचा पुरवठा बदलतो, तेव्हा त्यास पुरवठ्यातील बदल असे म्हणतात. पुरवठ्यातील बदल दोन प्रकारचे आहेत, ते खालीलप्रमाणे :

**१) पुरवठ्यातील वाढ/वृद्धी :** किंमत स्थिर असताना इतर घटकांत बदल झाल्यामुळे म्हणजे उत्पादन घटकांच्या किमतीत घट, कराच्या प्रमाणात घट, तांत्रिक सुधारणा इत्यादींमध्ये अनुकूल बदल झाल्यामुळे पुरवठा वाढतो, त्यास पुरवठ्यातील वृद्धी असे म्हणतात. त्यामुळे पुरवठा वक्र मूळ पुरवठा वक्राच्या उजवीकडे सरकतो. हे आकृती क्र.४.८ मध्ये दाखविले आहे.





**पुरवठा नगसंख्या**

**आकृती ४.८**

आकृती ४.८ मध्ये 'क्ष' अक्षावर पुरवठा नगसंख्या आणि 'य' अक्षावर किंमत दर्शविली आहे. 'क' या स्थिर किमतीला पुरवठा 'ब' नगसंख्येवरून 'ब$_{१}$' नगसंख्या एवढा वाढतो. त्यामुळे पुरवठा वक्र 'पप' वरून 'प$_{१}$प$_{१}$' हा वक्र उजवीकडे सरकतो. त्यालाच पुरवठ्यातील वृद्धी असे म्हणतात.

**२) पुरवठ्यातील घट/ऱ्हास (Decrease in Supply) :** स्थिर किंमत असताना इतर घटकांत प्रतिकूल बदल झाल्यामुळे म्हणजे उत्पादन घटकांच्या किमतीतील वाढ, करांच्या प्रमाणात वाढ, जुने उत्पादन तंत्र इत्यादींत बदल झाल्यामुळे पुरवठा कमी होतो. त्यास पुरवठ्यातील घट असे म्हणतात. त्यामुळे पुरवठा वक्र मूळ पुरवठा वक्रांच्या डावीकडे सरकतो. हे पुढील आकृती क्र.४.९ मध्ये स्पष्ट केले आहे.




**पुरवठा नगसंख्या**

**आकृती क्र.४.९**

आकृती क्र.४.९ मध्ये 'क्ष' अक्षावर पुरवठा नगसंख्या दाखविली आहे व 'य' अक्षावर किंमत दाखविली आहे. 'क' या स्थिर किमतीला पुरवठा 'ब' नगसंख्येवरून 'ब$_२$' एवढा कमी होतो. त्यामुळे पुरवठा वक्र 'पप' वरून 'प$_२$प$_२$' असा डावीकडे सरकतो. त्यालाच पुरवठ्यातील घट असे म्हणतात.

**तुम्हांला माहीत हवं!**

**पुरवठा –** पुरवठा ही सूक्ष्म अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. विशिष्ट वेळी विशिष्ट किमतीला साठ्यातील जो भाग प्रत्यक्ष बाजारात विक्रीसाठी आणला जातो तो पुरवठा होय.

**समग्र पुरवठा –** समग्र पुरवठा ही स्थूल अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. विशिष्ट रोजगार पातळी असताना संयोजकाला अपेक्षित असलेले उत्पादनाचे किमान विक्री मूल्य म्हणजे समग्र पुरवठा होय.

## खर्च आणि प्राप्तीच्या संकल्पना :

### अ) खर्च संकल्पना :

संयोजक जेव्हा उत्पादनाचे कार्य करतो, तेव्हा त्याला विविध उत्पादनांचे घटक वापरावे लागतात. जसे, कच्चा माल, श्रम, भांडवल इत्यादी. या घटकांचा मोबदला द्यावा लागतो. या घटकांवर केल्या जाणाऱ्या खर्चालाच उत्पादन खर्च असे म्हणतात. उत्पादनात वाढ झाल्यास उत्पादन खर्चदेखील वाढतो. या खर्चामध्ये खालील तीन संकल्पनांचा समावेश असतो.

१) **एकूण खर्च –** संयोजकाने वस्तूच्या उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या उत्पादन घटकांवर केलेला खर्च म्हणजेच एकूण खर्च होय. उत्पादनाच्या विविध पातळ्यांवर केला जाणारा एकूण स्थिर खर्च आणि एकूण बदलता खर्च यांची बेरीज केल्यास एकूण खर्च मिळतो.

**सूत्र – एकूण खर्च = एकूण स्थिर खर्च + एकूण बदलता खर्च**

$$TC = TFC + TVC$$

स्थिर खर्च – स्थिर घटकांवर केला जाणारा खर्च. उदा., जमीन, यंत्रे इत्यादी.

बदलता खर्च – बदलत्या घटकांवर केला जाणारा खर्च. हा खर्च उत्पादनाच्या प्रमाणात बदलला जातो. उदा., श्रम, कच्चा माल, ऊर्जा, इंधन इत्यादी.

२) **सरासरी खर्च :** सरासरी खर्च म्हणजेच प्रत्येक नगसंख्येच्या उत्पादनासाठी येणारा खर्च होय. एकूण खर्चाला एकूण नगसंख्येने भागल्यास सरासरी खर्च मिळतो.

$$\text{सरासरी खर्च} = \frac{\text{एकूण खर्च}}{\text{एकूण नगसंख्या}}$$

$$AC = \frac{TC}{TQ}$$

उदा., समजा ४० नगसंख्येच्या उत्पादनासाठी येणारा खर्च ८०० ₹ एवढा आहे तर सरासरी खर्च किती?

$$\text{सरासरी खर्च} = \frac{\text{एकूण खर्च}}{\text{एकूण नगसंख्या}}$$

$$AC = \frac{TC}{TQ}$$

$$= \frac{८००}{४०}$$

$\therefore$ सरासरी खर्च = २० ₹

३) **सीमान्त खर्च :** एका जादा नगसंख्येचे उत्पादन केल्यानंतर एकूण खर्चात झालेली निव्वळ वाढ म्हणजे सीमान्त खर्च होय.

**सूत्र : सीमान्त खर्च = अधिक नगसंख्येच्या उत्पादनानंतरचा खर्च – एकूण खर्च**

**उदा.,** समजा ४ नगसंख्येचा एकूण उत्पादन खर्च २००₹ असेल आणि पाचव्या नगसंख्येचे उत्पादन केल्यास एकूण उत्पादन खर्च २५० ₹ एवढा येतो. तर सीमान्त खर्च किती?

**सूत्र :** सीमान्त खर्च = अधिक एक नगसंख्येच्या उत्पादनानंतरचा खर्च– एकूण खर्च

$$MCn = TCn - TCn\text{-}1$$

$$= २५० - २००$$

$$= ५०$$

सीमान्त खर्च = ५० ₹

**शोधा पाहू!**

प्रतिदिन ६०० नगसंख्येच्या उत्पादनासाठी येणारा एकूण खर्च ३०,००० ₹ आहे. तर सरासरी खर्च काढा.

### आ) प्राप्ती संकल्पना :

विविध किमतींना बाजारात वस्तूंच्या विक्रीनंतर उद्योग संस्थेला मिळणारी रक्कम म्हणजे प्राप्ती होय. प्राप्तीची संकल्पना ही एकूण प्राप्ती, सरासरी प्राप्ती आणि सीमान्त प्राप्ती यांच्याशी संबंधित आहे.

१) **एकूण प्राप्ती :** वस्तूच्या विक्रीनंतर उद्योग संस्थेला मिळणारी एकूण रक्कम म्हणजे एकूण प्राप्ती होय. हे उद्योगसंस्थेचे एकूण उत्पन्न होय. पुढील सूत्राच्या साहाय्याने एकूण प्राप्ती मोजली जाते.

**सूत्र – एकूण प्राप्ती = एकूण नगसंख्या × किंमत**

उदा., समजा उद्योगसंस्थेने ₹ २०० प्रमाणे १५ टेबलांची विक्री केली. तर एकूण प्राप्ती किती ?

**एकूण प्राप्ती = एकूण नगसंख्या × किंमत**

= १५ टेबल × २०० ₹

एकूण प्राप्ती = ३०००₹

२) **सरासरी प्राप्ती :** प्रत्येक नगसंख्येच्या विक्रीनंतर मिळणारी रक्कम म्हणजेच सरासरी प्राप्ती होय. एकूण प्राप्तीला एकूण नगसंख्येने भागले असता सरासरी प्राप्ती मिळते.

$$\therefore \text{सरासरी प्राप्ती} = \frac{\text{एकूण खर्च}}{\text{एकूण नगसंख्या}}$$

उदा., समजा १५ टेबल विकल्यानंतर एकूण प्राप्ती ३०००₹ असेल तर सरासरी प्राप्ती किती ?

$$\therefore \text{सरासरी प्राप्ती} = \frac{\text{एकूण खर्च}}{\text{एकूण नगसंख्या}}$$

$$AR = \frac{TR}{TQ}$$

$$\therefore \text{सरासरी प्राप्ती} = \frac{३०००}{१५}$$

= २०० ₹

३) **सीमान्त प्राप्ती :** एका जादा नगसंख्येच्या विक्रीनंतर एकूण प्राप्तीत झालेली निव्वळ वाढ म्हणजे सीमान्त प्राप्ती होय. खालील सूत्राच्या साहाय्याने सीमान्त प्राप्ती काढली जाते.

**∴ सीमान्त प्राप्ती = अधिक एक नगसंख्येच्या विक्रीनंतरची प्राप्ती – एकूण प्राप्ती**

उदा., समजा २० टेबलाच्या विक्रीनंतर एकूण प्राप्ती ४००० ₹ असेल आणि २१ व्या टेबलाच्या विक्रीनंतर एकूण प्राप्ती ४२००₹ एवढी झाली असेल तर सीमान्त प्राप्ती किती ?

**∴ सीमांत प्राप्ती = अधिक एक नगसंख्येच्या विक्रीनंतरची प्राप्ती – एकूण प्राप्ती**

$$MR_n = TR_n - TR_{n-1}$$

= ४२०० – ४०००

सीमान्त प्राप्ती = २००₹

**शोधा पाहू!**

जर उद्योगसंस्थेने ९५ ₹ दराने ४०० नग विकले तर त्याची एकूण प्राप्ती व सरासरी प्राप्ती काढा.

## स्वाध्याय

### प्र. १. खालील विधाने पूर्ण करा :

१) जेव्हा पुरवठा वक्र वरच्या दिशेने जातो, तेव्हा त्याचा असणारा उतार ................ .

१) धनात्मक

२) ऋणात्मक

३) प्रथम धनात्मक नंतर ऋणात्मक असतो.

४) शून्य

२) पुरवठा वक्र त्याच वक्रावर वरच्या दिशेने सरकणे म्हणजेच ................ .

१) पुरवठा संकोच २) पुरवठ्याचा ऱ्हास

३) पुरवठ्याचा विस्तार ४) पुरवठ्यातील वाढ

३) जेव्हा पुरवठा वक्र मूळ पुरवठा वक्राच्या उजव्या बाजूस सरकतो त्यास ................ म्हणतात.

१) पुरवठा संकोच २) पुरवठ्याचा ऱ्हास

३) पुरवठ्याचा विस्तार ४) पुरवठ्यातील वाढ

४) इतर परिस्थिती स्थिर असताना केवळ किंमत कमी झाल्यामुळे नगसंख्या कमी होणे म्हणजेच ................

१) पुरवठा संकोच  २) पुरवठ्याचा ऱ्हास

३) पुरवठ्याचा विस्तार  ४) पुरवठ्यातील वाढ

५) एकूण जादा नगसंख्येच्या विक्रीनंतर एकूण प्राप्तीत झालेली निव्वळ वाढ म्हणजे ................ .

१) एकूण प्राप्ती  २) सीमान्त प्राप्ती

३) सरासरी प्राप्ती  ४) सीमान्त खर्च

## प्र. २. सहसंबंध पूर्ण करा :

१) पुरवठ्याचा विस्तार : किंमत वाढ :: पुरवठ्याचा संकोच : ☐

२) एकूण प्राप्ती : ☐ :: सरासरी प्राप्ती : $\frac{\text{एकूण खर्च}}{\text{एकूण नगसंख्या}}$

३) एकूण खर्च : एकूण स्थिर खर्च + एकूण बदलता खर्च:: सरासरी खर्च : ☐

४) मागणी वक्र : ☐ :: पुरवठा वक्र : वर जाणारा

५) ☐ : पुरवठ्यातील बदल:: इतर घटक स्थिर : पुरवठ्याचे विचलन

## प्र. ३. योग्य आर्थिक पारिभाषिक शब्द सुचवा :

१) स्थिर घटकावर केला जाणारा खर्च

२) प्रत्येक नगसंख्येच्या उत्पादनाचा खर्च

३) एका जादा नगसंख्येच्या उत्पादनामुळे एकूण खर्चात होणारी निव्वळ वाढ.

४) प्रत्येक नगसंख्येच्या विक्रीनंतर मिळणारी प्राप्ती.

## प्र. ४. फरक स्पष्ट करा :

१) साठा आणि पुरवठा

२) पुरवठ्याचा विस्तार आणि पुरवठ्यातील वाढ

३) पुरवठ्याचा संकोच आणि पुरवठ्याचा ऱ्हास

४) सरासरी खर्च आणि सरासरी प्राप्ती

## प्र. ५. खालील पत्रकावरून प्रश्नांची उत्तरे द्या :

**अ) चॉकलेटचे पुरवठा पत्रक**

| किंमत | पुरवठा नगसंख्या |
|---|---|
| १० | २०० |
| १५ | |
| २० | ३०० |
| २५ | ३५० |
| ३० | |
| ३५ | |
| ४० | |

१) वरील पुरवठा पत्रक पूर्ण करा.

२) वरील पुरवठा पत्रकाच्या साहाय्याने आकृती काढा आणि वरील आकृतीचे स्पष्टीकरण करा.

३) किंमत आणि पुरवठा यांतील सहसंबंध स्पष्ट करा.

**ब) बटाटा बाजार पत्रकाचे निरीक्षण करून खालील उत्तरे द्या.**

| किंमत ₹ | उद्योग संस्था(कि.ग्रॅ.) | | | बाजार पुरवठा(कि.ग्रॅ.) |
|---|---|---|---|---|
| | अ | ब | क | |
| १ | ☐ | २० | ४५ | १०० |
| २ | ३७ | ३० | ४५ | ☐ |
| ३ | ४० | ☐ | ५५ | १३५ |
| ४ | ४४ | ५० | ☐ | १५४ |

१) बाजारात उद्योगसंस्थांनी केलेल्या बटाटा नगसंख्येचा पुरवठा वरील पत्रकामध्ये पूर्ण करा.

२) पत्रकाच्या साहाय्याने बाजार पुरवठा वक्र काढून त्याचे स्पष्टीकरण करा.

## प्र. ६. खालील प्रश्नांची उत्तरे द्या :

१) एकूण खर्च व एकूण प्राप्ती या संकल्पना स्पष्ट करा.

२) पुरवठा निर्धारित करणारे घटक स्पष्ट करा.

## प्र. ७. सविस्तर उत्तरे द्या :

१) पुरवठ्याचा नियम अपवादासह स्पष्ट करा.

# ५ बाजाराचे प्रकार (Forms Of Market)

### प्रस्तावना :

सामान्यत: बाजार म्हणजे विशिष्ट ठिकाण किंवा स्थळ होय; जिथे वस्तू व सेवांची खरेदी-विक्री केली जाते. पण अर्थशास्त्रात बाजार म्हणजे एक विशिष्ट ठिकाण नसून अशी व्यवस्था आहे की ज्यामध्ये विक्रेते व ग्राहक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या एकमेकांच्या संपर्कात येतात आणि वस्तू व सेवांची देवाणघेवाण करतात.

### बाजाराची व्याख्या :

ऑगस्टीन कुर्नो या अर्थशास्त्रज्ञाच्या मतानुसार ज्या ठिकाणी वस्तूंची खरेदी-विक्री केली जाते अशी एखादी विशिष्ट जागा म्हणजे बाजार नसून असा संपूर्ण भूप्रदेश, की ज्यात खरेदीदार आणि विक्रेते यांचा परस्परांशी इतका जवळचा संबंध असतो की ज्यामुळे एकाच वस्तूची किंमत सर्वत्र सहज आणि लवकर समान होण्याची प्रवृत्ती असते.

अशा प्रकारे, 'बाजार ही संभाव्य ग्राहक आणि संभाव्य विक्रेते यांच्यातील परस्पर संबंधाचे एक जाळे आहे.'

जेव्हा खालील गोष्टी अस्तित्वात असतात तेव्हाच बाजार निर्माण होतो.

१) ग्राहक आणि विक्रेते

२) वस्तू किंवा सेवा यांची खरेदी आणि विक्री

३) वस्तूची किंमत

४) ग्राहक आणि विक्रेते यांच्यातील जवळचा संबंध

५) बाजारविषयक ज्ञान

### बाजारांचे वर्गीकरण :

बाजारांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येते. खाली दिलेल्या आकृती ५.१ मध्ये हे दर्शविले आहे.

#### I) स्थळानुसार :


**१) स्थानिक बाजारपेठ :** स्थानिक बाजार म्हणजे असा बाजार, की ज्यात ग्राहक वस्तूचे उत्पादन ज्या ठिकाणी होते त्याच ठिकाणाहून वस्तू खरेदी करतात.

**२) राष्ट्रीय बाजारपेठ :** राष्ट्रीय बाजार हा देशांतर्गत बाजार होय. प्रत्येक राष्ट्रीय बाजारपेठेला त्या देशातील नियम लागू होतात.

**३) आंतरराष्ट्रीय बाजारपेठ :** आंतरराष्ट्रीय बाजारपेठ ही जागतिक बाजारपेठ असून ज्यामध्ये राष्ट्रीय सीमा ओलांडून वस्तू व सेवांचे आदानप्रदान होते.

#### II) काळानुसार :

**१) अत्यल्पकाळ :** अत्यल्पकाळ म्हणजे असा काळ की ज्यामध्ये वस्तूंचा पुरवठा वाढवता येत नाही. त्यामुळे वस्तूंची किंमत मागणी निर्धारित करते. हा काळ काही दिवसांचा किंवा आठवड्याचा असतो. ज्यात वस्तूचा पुरवठा वाढविता येत नाही.




आकृती ५.१

२) **अल्पकाळ :** अल्पकाळ हा एका वर्षापेक्षा कमी कालावधीचा काळ आहे. या काळात वस्तू व सेवांचा पुरवठा काही प्रमाणात आदानांचे (उदा. श्रम) समायोजन करून वस्तूचा पुरवठा वाढविता येणे शक्य आहे.

३) **दीर्घकाळ :** दीर्घकाळ हा असा कालावधी होय, ज्यात उत्पादनाचे घटक आणि उत्पादन खर्च बदलणे शक्य असते. दीर्घकाळात उद्योगसंस्थांना सर्व प्रकारच्या खर्चाशी जुळवून घेणे शक्य होते. हा कालावधी काही वर्षांचा असतो. उदा. साधारणपणे ५ वर्षांपर्यंत.

४) **अतिदीर्घकाळ :** अतिदीर्घकाळ म्हणजे असा काळ ज्यामध्ये उत्पादनाची सर्व आदाने (स्थिर आणि बदलते) बदलता येणे शक्य असते. हा कालावधी ५ वर्षांपेक्षा अधिक असतो.

### III) स्पर्धेनुसार :

अर्थशास्त्रात विक्रेते व ग्राहक यांच्यातील स्पर्धा हा बाजाराच्या वर्गीकरणातील अतिशय महत्त्वाचा निकष आहे. विक्रेत्यांमधील स्पर्धेवर आधारित बाजारातील विविध प्रकारांचा अभ्यास करू या.

### अ) पूर्ण स्पर्धा

**अर्थ व व्याख्या :** पूर्ण स्पर्धा ही प्रत्यक्ष बाजारापेक्षा एक आदर्श आणि काल्पनिक संकल्पना आहे. मिसेस जोन रॉबिन्सन यांच्या शब्दांत ''जेव्हा प्रत्येक उत्पादकाच्या उत्पादनाला असणारी मागणी पूर्ण लवचीक असते तेव्हा पूर्ण स्पर्धा अस्तित्वात येते.''

पूर्ण स्पर्धा हा असा बाजार आहे की ज्यात विक्रेते व ग्राहक असंख्य असतात. सर्व विक्रेते आणि ग्राहक कोणत्याही निर्बंधाशिवाय एकजिनसी वस्तूंची खरेदी विक्री करण्यात गुंतलेले असतात. तसेच ग्राहक व विक्रेते यांना बाजार स्थितीचे पूर्ण ज्ञान असते.

१) **असंख्य विक्रेते व असंख्य ग्राहक :** पूर्ण स्पर्धेत असंख्य विक्रेते व असंख्य ग्राहक असतात. अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे एकूण बाजारात प्रत्येक विक्रेता व ग्राहक यांचा सहभाग नगण्य असतो. त्यामुळे कोणताही एक विक्रेता बाजारातील किमतीवर प्रभाव पाडू शकत नाही. अशा प्रकारे पूर्ण स्पर्धेत विक्रेते किंमत स्वीकारणारे असतात.

तसेच ग्राहकांचीही संख्या प्रचंड असते. प्रत्येक ग्राहकाची खरेदी ही एकूण खरेदीचा अल्पसा भाग असतो. त्यामुळे वस्तूच्या किमतीवर कोणताही ग्राहक प्रभाव पाडू शकत नाही.

२) **एकजिनसी वस्तू :** पूर्ण स्पर्धेचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे असंख्य विक्रेत्यांकडून विकली जाणारी वस्तू ही ग्राहकाच्या दृष्टीने आकार, रूप, रंग, चव इ. बाबतीत एकजिनसी असली पाहिजे. सर्व वस्तू परस्परांना पूर्णत: पर्यायी असतात.

३) **मुक्त प्रवेश आणि निर्गमन :** या बाजारपेठेत प्रवेश आणि निर्गमनावर कुठलेही निर्बंध नसतात. जर नफ्याची आशा असेल तर उद्योगसंस्था बाजारात प्रवेश करतात आणि तोट्याची शक्यता असेल तर बाजारातून निर्गमन करतात.

४) **एकच किंमत :** पूर्ण स्पर्धेच्या बाजारात एकच किंमत असते, जी मागणी आणि पुरवठा यांच्या आंतरक्रियेने निर्धारित होते.

५) **बाजाराचे संपूर्ण ज्ञान :** ग्राहक आणि विक्रेते यांना बाजार स्थितीचे संपूर्ण ज्ञान असते. प्रत्येक ग्राहक आणि विक्रेता यांना वस्तूची किंमत, गुणवत्ता, दर्जा, पुरवठ्याचा स्रोत इ. चे ज्ञान असते.

६) **उत्पादन घटकाची पूर्ण गतिशीलता :** पूर्ण स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्य असे की उत्पादनाचे घटक हे पूर्णत: गतिशील असतात. म्हणजेच श्रम, भांडवल यांसारखे घटक भौगोलिकदृष्ट्याच नव्हे, तर व्यावसायिकदृष्ट्याही गतिशील असतात.

७) **वाहतूक खर्चाचा अभाव :** पूर्ण स्पर्धेत वस्तूंची किंमत सर्वत्र सारखी असते. कारण वाहतूक खर्च गृहीत धरलेला नसतो. या गृहीतकामुळे किंमत समानता निर्माण होते.

८) **सरकारी हस्तक्षेप नाही :** निर्हस्तक्षेप धोरण हे पूर्ण स्पर्धेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. याचा अर्थ आर्थिक घडामोडीमध्ये शासकीय हस्तक्षेपाचा पूर्णत: अभाव असतो.

### पूर्ण स्पर्धेतील किंमत निश्चिती :

पूर्ण स्पर्धेत वस्तूची किंमत मागणी आणि पुरवठा यांच्या आंतरप्रकियेतून निश्चित होते. याला समतोल किंमत असे

म्हणतात. मार्शलने किंमत निश्चितीच्या या प्रक्रियेची तुलना कात्रीने कापड कापण्याच्या प्रक्रियेशी केली आहे. ज्याप्रमाणे कापड कापण्यासाठी कात्रीची दोन्ही पाती आवश्यक असतात, त्याप्रमाणे समतोल किंमत निश्चितीसाठी मागणी आणि पुरवठा हे दोन्ही घटक महत्त्वाचे असतात. हे खालील कोष्टकाच्या व आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ५.१**

**मागणी आणि पुरवठा कोष्टक**

| सफरचंदाची किंमत (प्रति किलो ₹) | मागणी (किं.) | पुरवठा (किं.) | मागणी व पुरवठा संबंध |
|---|---|---|---|
| १०० | ५००० | १००० | मा. > पु. |
| २०० | ४००० | २००० | मा. > पु. |
| **३००** | **३०००** | **३०००** | **मा. = पु.** |
| ४०० | २००० | ४००० | मा. < पु. |
| ५०० | १००० | ५००० | मा. < पु. |

**कोष्टक स्पष्टीकरण :**

कोष्टक ५.१ वरून खालील निष्कर्ष काढता येतात.


१) जेव्हा किंमत १०० रुपयांवरून २०० ₹ पर्यंत वाढते तेव्हा मागणी ५००० किलोवरून ४००० किलोपर्यंत कमी होते, तर पुरवठा १००० किलोवरून २००० किलो पर्यंत वाढतो. कारण किंमत वाढल्यामुळे मागणी कमी होते तर किंमतवाढीबरोबर पुरवठाही वाढतो. ही अशी स्थिती आहे की, जेथे मागणी ही पुरवठ्यापेक्षा जास्त आहे. याला अतिरिक्त मागणी म्हणतात.

२) जेव्हा किंमत ३०० ₹ पर्यंत वाढते तेव्हा मागणी आणि पुरवठा ३००० किलो, इतका समान होतो. ही अशी स्थिती आहे की ज्या ठिकाणी मागणी आणि पुरवठा समान होतात. ही समतोलाची स्थिती आहे. म्हणून ३०० ₹ ही समतोल किंमत आहे. याला अतिरिक्त पुरवठा म्हणतात.

३) जेव्हा किंमत ४०० ₹ वरून ५०० ₹ पर्यंत वाढते, तेव्हा मागणी २००० किलोवरून १००० किलोपर्यंत कमी होते आणि पुरवठा ४००० किलो वरून ५००० किलोपर्यंत वाढतो. अशा प्रकारे पुरवठा हा मागणीपेक्षा जास्त होतो.

किंमत निश्चितीची ही प्रक्रिया खालील आकृती ५.२ मध्ये दर्शविली आहे.

**वस्तूची मागणी व पुरवठा**




मागणी व पुरवठा (कि.ग्रॅ.)

**आकृती क्र. ५.२**

आकृतीत 'क्ष' अक्षावर मागणी व पुरवठा दर्शविला आहे. तर 'य' अक्षावर किंमत दर्शविली आहे. 'मम' हा मागणी वक्र आहे. तो खाली सरकणारा असून किंमत आणि मागणी यातील व्यस्त संबंध दर्शवितो. तर 'पप' हा वर सरकत जाणारा पुरवठा वक्र असून तो किंमत आणि पुरवठा यांचा सम संबंध दर्शवितो. मागणी आणि पुरवठा वक्र एकमेकांना 'स' बिंदूत छेदतात म्हणून 'स' हा समतोल बिंदू आहे. ३०० ₹ ही समतोल किंमत आणि ३००० किलो ही समतोल संख्या निश्चित होते. ही समतोल किंमत बाजार मागणी आणि बाजार पुरवठा यांनी निश्चित केली आहे.

**ब) अपूर्ण स्पर्धा :**

अपूर्ण स्पर्धा हा बाजाराचा असा प्रकार आहे की ज्यात स्पर्धायुक्त बाजाराची सर्व वैशिष्ट्ये आढळत नाहीत, तर काही वैशिष्ट्ये आढळतात.

**१) मक्तेदारी :**

**अर्थ आणि व्याख्या :** मक्तेदारी (monopoly) या शब्दाची उत्पत्ती 'Mono' म्हणजे 'एक' आणि 'Poly' म्हणजे 'विक्रेता' या ग्रीक शब्दापासून झाली आहे. मक्तेदारी म्हणजे असा बाजार, ज्यात एकच विक्रेता असून त्याचे संपूर्ण बाजार पुरवठ्यावर नियंत्रण असते व त्याच्या वस्तूला जवळचा पर्याय नसतो.

इ. एच. चेंबरलीन यांच्या मते, ''मक्तेदारी म्हणजे एक उद्योगसंस्था जी संपूर्ण पुरवठ्यावर नियंत्रण ठेवते आणि जिला बाजारात अगदी जवळचा पर्याय नसतो.''

मक्तेदारीची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :

१) **एकच विक्रेता :** मक्तेदारीत वस्तूचा उत्पादक किंवा विक्रेता एकच असल्यामुळे विक्रेत्यांमध्ये स्पर्धा नसते. परंतु ग्राहकांची संख्या जास्त असते.

२) **पर्यायी वस्तूंचा अभाव :** मक्तेदाराच्या उत्पादनाला जवळचे पर्याय नसतात. त्यामुळे ग्राहकांच्या पसंतीला वाव नसतो. त्यांना मक्तेदाराकडून एकतर वस्तू विकत घ्यावी लागते किंवा वस्तूपासून वंचित राहावे लागते. मक्तेदारीत मागणीची छेदक लवचिकता शून्य किंवा नकारात्मक असते.

३) **प्रवेशावर निर्बंध :** कायदेशीर, नैसर्गिक व तांत्रिक बंधनामुळे इतर स्पर्धकांच्या बाजारातील प्रवेशावर बंधने येतात.

४) **बाजार पुरवठ्यावर पूर्ण नियंत्रण :** मक्तेदाराचे बाजारपुरवठ्यावर पूर्ण नियंत्रण असते. तो वस्तूचा एकमेव उत्पादक व विक्रेता असतो.

५) **किंमतकर्ता :** मक्तेदाराचे संपूर्ण बाजार पुरवठ्यावर नियंत्रण असते. त्यामुळे मक्तेदारी उद्योगसंस्था स्वत:च्या मालाची/उत्पादनाची किमत निश्चित करते. त्यामुळे मक्तेदार हा किंमतकर्ता असतो.

६) **मूल्यभेद :** मक्तेदार हा किंमतकर्ता असल्यामुळे तो एकाच वस्तूला वेगवेगळ्या ग्राहकांना कालपरत्वे, स्थलपरत्वे वेगवेगळ्या किंमती आकारू शकतो. अशा प्रकारे मूल्यभेद हे मक्तेदारी बाजाराचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. रेल्वेच्या प्रवासात विद्यार्थी व जेष्ठ जागरिक यांना तिकीटात सवलत दिली जाते.

७) **उद्योगसंस्था हाच उद्योग :** मक्तेदार हा त्याच्या उत्पादनाचा एकमेव उत्पादक व विक्रेता असतो. त्यामुळे मक्तेदारीत उद्योगसंस्था हाच उद्योग असतो.

### ✲ मक्तेदारीचे प्रकार :

**मक्तेदारीचे प्रकार खालीलप्रमाणे आहेत.**

१) **खाजगी मक्तेदारी :** जेव्हा एखादी व्यक्ती/खाजगी संस्था मक्तेदारी उद्योगसंस्थेचे नियंत्रण करते तेव्हा त्यास खाजगी मक्तेदारी म्हणतात. खाजगी मक्तेदारी ही नफ्याने प्रेरित झालेली असते. उदा., टाटा समूह.

२) **सार्वजनिक मक्तेदारी :** जेव्हा एखादी उत्पादनसंस्था पूर्णत: सरकारच्या मालकीची, सरकारने नियंत्रित केलेली आणि सरकारने चालविलेली असते, तेव्हा त्यास सार्वजनिक मक्तेदारी असे म्हणतात. ही मक्तेदारी कल्याणकारी हेतूने प्रेरित झालेली असते. उदा., भारतीय रेल्वे.

३) **कायदेशीर मक्तेदारी :** पेटंट, बोधचिन्ह, स्वामित्व अधिकार यांसारख्या शासनाच्या कायदेशीर तरतुदींमुळे निर्माण झालेल्या मक्तेदारीस कायदेशीर मक्तेदारी असे म्हणतात. नोंदणीकृत झालेल्या व्यापारी चिन्हांच्या अंतर्गत संभाव्य स्पर्धकांना प्रवेश करण्यास या मक्तेदारीत मनाई केली जाते. तसेच त्या चिन्हाचे किंवा आकाराचे अनुकरण करण्यासाठी मनाई केली जाते. उदा., अमूलची उत्पादने.


४) **नैसर्गिक मक्तेदारी :** विशिष्ट स्थल, हवामान, पर्जन्यमान इ. नैसर्गिक परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या मक्तेदारीस नैसर्गिक मक्तेदारी असे म्हणतात. उदा., पंजाबचा गहू.

५) **साधी मक्तेदारी :** साध्या मक्तेदारीत विक्रेता किंवा उद्योगसंस्था एका प्रकारच्या उत्पादनासाठी सर्व ग्राहकांना एकच किंमत आकारते.

६) **मूल्यभेदात्मक मक्तेदारी :** मूल्यभेदात्मक मक्तेदारीत उद्योगसंस्था एकाच प्रकारच्या उत्पादनासाठी वेगवेगळ्या किमती आकारते. उदा., डॉक्टर वेगवेगळ्या रुग्णांकडून वेगवेगळी फी आकारतात.

७) **ऐच्छिक मक्तेदारी :** गळेकापू स्पर्धा टाळण्यासाठी काही मक्तेदार स्वेच्छेने एकत्र येतात व मक्तेदारांचा गट स्थापन करतात. उत्पादित केलेल्या वस्तूंची विक्री करून महत्तम नफा मिळविणे यामुळे सोयीचे होते. उदा., ओपेक (OPEC)

**तुम्हांला माहीत हवं!**



**शोधा पाहू!**

खालील उत्पादनानुसार मक्तेदारीचे प्रकार.

१) आसामधील चहा ______

२) अणुउर्जा ______

३) एखादया व्यापारी बँकेचे बोधचिन्ह ______

**तुम्हांला माहीत आहे का?**

ग्राहकाची मक्तेदारी ही मक्तेदारीच्या विरुद्ध आहे. जेव्हा एक ग्राहक व अनेक विक्रेते असतात, तेव्हा ग्राहकाची मक्तेदारी निर्माण होते. ग्राहकाची मक्तेदारी हा दुर्मिळ प्रकार आहे. मक्तेदारीत विक्रेता ज्याप्रमाणे ग्राहकांचे शोषण करू शकतो. त्याप्रमाणे ग्राहकांच्या मक्तेदारीत ग्राहक हा विक्रेत्यांचे शोषण करू शकतो. श्रमबाजारात जेव्हा एखादा नियोक्ता (मालक) विशिष्ट प्रकारच्या मजुरांचा उपयोग करून घेतो तेव्हा ग्राहकाची मक्तेदारी निर्माण होते.

### २) अल्पाधिकार (Oligopoly) :

'अल्पाधिकार'(Oligopoly) या शब्दाची उत्पत्ती ग्रीक शब्द 'oligoi' म्हणजे अल्पसंख्य आणि 'polis' म्हणजे विक्रेते या शब्दांपासून झाली आहे. अल्पाधिकार म्हणजे असा बाजार की ज्यात काही विक्रेते एकजिनसी वस्तूंचे किंवा विभेदित वस्तूंचे उत्पादन करतात. उदा. मोबईल सेवा पुरविणारे, सिमेंट कंपनी इत्यादी.

अल्पाधिकार बाजाराची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१) **काही विक्रेते :** अल्पाधिकार बाजारात काही उद्योगसंस्था किंवा विक्रेते असतात. बाजारपेठेवर काही संस्थांचे वर्चस्व असते. तसेच त्यांचे किमतीवर व वस्तूच्या उत्पादनावरही लक्षणीय नियंत्रण असते.

२) **परस्परावलंबन :** प्रतिस्पर्धकांनी घेतलेल्या कोणत्याही निर्णयाच्या बाबतीत विक्रेत्यांना दक्ष राहावे लागते. या बाजारात काही विक्रेते असल्यामुळे एखादया उद्योगसंस्थेने वस्तूच्या किमतीत बदल केल्यास इतर उद्योगसंस्थानांही स्पर्धेत टिकून राहण्यासाठी त्यांच्याशी जुळवून घ्यावे लागते.

३) **जाहिरात :** अल्पाधिकार बाजारात जाहिरात हे प्रभावी साधन आहे. अल्पाधिकारात उद्योगसंस्था जास्तीतजास्त बाजारपेठा काबीज करण्याच्या उद्देशाने आक्रमक व आकर्षक जाहिरात मोहीम हाती घेऊ शकते.

४) **प्रवेशावर निर्बंध :** कंपन्या जेव्हा पाहिजे तेव्हा सहजपणे उद्योगातून बाहेर पडू शकतात. परंतु त्यात प्रवेश करण्यासाठी विशिष्ट अडथळ्यांना तोंड द्यावे लागते. जसे की सरकारी परवाना, पेटंट इत्यादी.

५) **समानतेचा अभाव :** उद्योगसंस्थांच्या आकाराच्या बाबतीत असमानता असते. काही आकाराने लहान तर काही मोठ्या असतात.

६) **अनिश्चितता :** या बाजारात लक्षणीय/विचारात घेण्याइतपत अनिश्चितता असते. कारण या बाजारात उत्पादकाच्या वर्तनाचे स्वरूप विविध प्रकारचे असते. प्रतिस्पर्धी उद्दिष्टांच्या बाबतीत एकमेकांशी हातमिळवणी करून एकमेकांना सहकार्यही करू शकतात किंवा एकमेकांशी संघर्षही करू शकतात.

### ३) मक्तेदारीयुक्त स्पर्धा :

**स्वच्छतेसाठी वापरण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या कंपन्यांची उत्पादने**




आकृती ५.३

**अर्थ व व्याख्या :** प्रत्यक्ष व्यवहारात आढळून येणारा बाजाराचा प्रकार म्हणजे मक्तेदारीयुक्त बाजार होय. यामध्ये पूर्ण स्पर्धा व मक्तेदारीची काही वैशिष्ट्ये एकत्रितपणे आढळून येतात. प्रा. इ. एच. चेंबरलीन यांनी १९३३ साली प्रकाशित झालेल्या त्यांच्या 'Theory of Monopolistic Competition' या पुस्तकात मक्तेदारीयुक्त स्पर्धेची संकल्पना प्रथम मांडली.

चेंबरलीन यांच्या मते, ''मक्तेदारीयुक्त स्पर्धा म्हणजे अशी स्पर्धा की ज्यात अनेक विक्रेते अगदी जवळचा पर्याय असलेल्या परंतु पूर्ण पर्याय नसलेल्या वस्तूंचे उत्पादन करतात.''

मक्तेदारीयुक्त स्पर्धेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :

१) **अनेक विक्रेते :** मक्तेदारीयुक्त स्पर्धेत विक्रेत्यांची संख्या जास्त असते. परंतु तुलनेने पूर्ण स्पर्धेतील विक्रेत्यांपेक्षा कमी असते. या कारणामुळे विक्रेत्याचे वर्तन मक्तेदारी प्रमाणे असते.

२) **असंख्य ग्राहक :** मक्तेदारीयुक्त स्पर्धेत असंख्य ग्राहक असतात. परिणामी, कोणताही ग्राहक वैयक्तिकपणे आपल्या मागणीत बदल करून वस्तूच्या किमतीत बदल घडवून आणू शकत नाही.

३) **वस्तुभेद :** वस्तुभेद हे मक्तेदारीयुक्त स्पर्धेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. या बाजारात अनेक उद्योगसंस्था विशिष्ट वस्तूंचे उत्पादन करतात. परंतु प्रत्येक उद्योगसंस्थेचे उत्पादन हे बाजारातील दुसऱ्या उद्योगसंस्थेच्या उत्पादनापेक्षा वेगळे असते. यालाच वस्तुभेद असे म्हणतात. हा वस्तुभेद ब्रॅण्ड (छाप), व्यापारी चिन्ह (ट्रेड मार्क), वस्तूची आकर्षक बांधणी, दर्जा, नक्षीकाम, रंग, वेष्टन, आकार इ. बाबतींत आढळतो. याचा अर्थ उद्योगसंस्थेच्या उत्पादनाला जवळचे पर्याय आढळतात आणि त्यांच्या मागणीची छेदक लवचिकता अधिक आहे. उदा. भ्रमणध्वनी (मोबाईल), शीतपेय इ.

४) **मुक्त प्रवेश व निर्गमन :** पूर्ण स्पर्धेप्रमाणे याही बाजारात नवीन व्यवसाय संस्थांना मुक्त प्रवेश असतो. त्याचप्रमाणे तोटा होत असल्यास कोणतीही उद्योगसंस्था उत्पादन बंद करून स्पर्धेतून बाहेर पडू शकते.

५) **विक्री खर्च :** विक्री खर्च हा मक्तेदारीयुक्त स्पर्धेतच आढळतो. उत्पादकाच्या उत्पादनाला अधिक मागणी निर्माण करण्यासाठी व वस्तूची विक्री वाढविण्यासाठी करावा लागणारा खर्च म्हणजेच विक्री खर्च होय. जाहिरात, दूरदर्शन, आकाशवाणी, फलक जाहिराती, प्रदर्शन, खिडकी प्रदर्शन, मोफत भेट वस्तू, मोफत नमुना वस्तू इत्यादींचा समावेश विक्री खर्चात होतो.

६) **जवळचे पर्याय :** मक्तेदारीयुक्त स्पर्धेत वस्तूंना अगदी जवळचे पर्याय उपलब्ध असतात. उदा., विविध कंपन्यांचे साबण, शीतपेय इ.

७) **गटसंकल्पना :** मक्तेदारीयुक्त स्पर्धेत चेंबरलीन यांनी उद्योग या संकल्पनेऐवजी गटाची संकल्पना वापरली. एकजिनसी वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या संस्थांचा समुदाय म्हणजे उद्योग होय, तर एकमेकांना जवळचा पर्याय असणाऱ्या व वस्तुभेद निर्माण करणाऱ्या संस्थांचा समुदाय म्हणजे गट होय. उदा., औषध उत्पादित करणाऱ्या संस्थांचा समूह.

**शोधा पाहू!**

खाली दिलेल्या उत्पादनाला जवळचा पर्याय शोधा.

| क्र. | उत्पादन | पर्यायी वस्तू |
|---|---|---|
| १. | जेमिनी तेल | |
| २. | कोलगेट टूथपेस्ट | |
| ३. | रेड लेबल चहा | |
| ४. | ब्रु कॉफी | |
| ५. | ॲक्टिव्हा दुचाकी | |

## स्वाध्याय

**प्र. १. अ) योग्य पर्याय निवडा :**

१) अर्थशास्त्रीयदृष्ट्या बाजारात खालील घटकांचा समावेश हातो.

अ) ज्या ठिकाणी वस्तू व सेवांची खरेदी-विक्री केली जाते.

ब) ग्राहक आणि विक्रेते एकमेकांच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संपर्कात येतात.

क) वस्तूंची विक्री करणारे दुकान

ड) वरील सर्व

**पर्याय :** १) अ, ब  २) ब, क  ३) अ, ब, क  ४) फक्त ड

२) बाजारपेठेचे वर्गीकरण स्थळाच्या आधारावर खालीलप्रमाणे केले जाते.

अ) स्थानिक बाजार, राष्ट्रीय बाजार, आंतरराष्ट्रीय बाजार

ब) अत्यल्पकालीन बाजार, स्थानिक बाजार, राष्ट्रीय बाजार

क) अल्पकालीन बाजार, राष्ट्रीय बाजार, आंतरराष्ट्रीय बाजार

ड) स्थानिक बाजार, राष्ट्रीय बाजार, अल्पकालीन बाजार.

**पर्याय :** १) अ, ब, क  २) ब, क, ड  ३) फक्त अ  ४) अ आणि ड

३) एकजिनसी वस्तू हे या बाजाराचे वैशिष्ट्य आहे.

अ) मक्तेदारी ब) मक्तेदारीयुक्त

क) पूर्ण स्पर्धा ड) अल्पाधिकार

**पर्याय** : १) क, ड २) अ, ब, क

३) अ, क, ड ४) फक्त क

४) पूर्ण स्पर्धेत विक्रेत्याची भूमिका पुढील प्रकारची असते.

अ) किंमतकर्ता ब) किंमत स्वीकारणारा

क) किंमतभेद करणारा ड) यांपैकी नाही.

**पर्याय** : १) अ, ब, क २) फक्त ब

३) फक्त क ४) अ आणि क

**प्र.२. पारिभाषिक शब्द सुचवा :**

१) काही विक्रेते असलेला बाजार

२) मागणी वक्र व पुरवठा वक्र एकमेकांना ज्या बिंदूत छेदतात असा बिंदू

३) वस्तूची विक्री वाढविण्यासाठी करावा लागणारा खर्च

४) एकजिनसी वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या संस्थांचा समुदाय

५) एकच वस्तू व सेवेसाठी वेगवेगळ्या ग्राहकांना वेगवेगळ्या किंमती आकारणे.

**प्र. ३. सहसंबंध स्पष्ट करा :**

१) पूर्ण स्पर्धा : मुक्त प्रवेश आणि निर्गमन :: ☐ : प्रवेशावर निर्बंध

२) किंमत स्वीकारणारा : ☐ :: किंमत कर्ता : मक्तेदारी

३) एकच किंमत : पूर्ण स्पर्धा : : भिन्न किंमत : ☐

**प्र.४. गटात न बसणारा शब्द ओळखा :**

१) विक्री खर्च : मोफत भेटवस्तू, फलक जाहिरात, खिडकी प्रदर्शन, पेटंट

२) बाजार प्रकार : पूर्ण स्पर्धा, मक्तेदारी, अल्पाधिकार, अत्यल्पकालीन बाजार

३) मक्तेदारीचे प्रकार : किंमतकर्ता, प्रवेश निर्गमन, अनेक विक्रेते, पर्यायी वस्तूंचा बाजार अभाव

४) कायदेशीर मक्तेदारी : पेटंट, ओपेक कॉपीराइट, बोधचिन्ह

**प्र. ५.थोडक्यात उत्तरे लिहा :**

१) अल्पाधिकार बाजाराची वैशिष्ट्ये सांगा.

२) मक्तेदारीचे प्रकार सांगा.

**प्र. ६.खालील तक्त्याचे निरीक्षण करून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

| केळीची किंमत (₹) (प्रतिडझन) | मागणी प्रतिडझन | पुरवठा प्रतिडझन | मागणी व पुरवठा संबंध |
|---|---|---|---|
| १० | ५०० | १०० | मा > पु |
| २० | ४०० | ☐ | मा > पु |
| ३० | ☐ | ३०० | मा = पु |
| ४० | २०० | ☐ | मा < पु |
| ५० | ☐ | ☐ | मा < पु |

१) तक्त्यातील रिकाम्या जागा भरा.

२) तक्त्याच्या आधारे समतोल किंमतनिश्चिती आकृतीच्या साहाय्याने दाखवा.

**प्र. ७. सविस्तर उत्तरे लिहा :**

१) मक्तेदारीयुक्त स्पर्धेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) पूर्ण स्पर्धेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

# ६ निर्देशांक (Index Number)

**प्रस्तावना :**

निर्देशांक हे अर्थशास्त्रामधील सर्वाधिक वापरले जाणारे संख्याशास्त्रीय साधन आहे. निर्देशांक म्हणजे एका ठराविक कालावधीत चलामधील बदल (किंवा चलाच्या समुदायामधील बदल) मोजण्यासाठीचे एक साधन होय.

निर्देशांक हा मूलतः किंमतपातळीमधील बदल मोजण्यासाठी विकसित केला होता. आजच्या काळात भागभांडवल बाजारातील किमती, राहणीमानाचा निर्देशांक, औद्योगिक आणि कृषी मालाचे उत्पादन, निर्यात व आयातीमधील बदल इत्यादी घटकांसह विविध क्षेत्रांतील कल मोजण्यासाठी याचा उपयोग केला जातो. निर्देशांकाचे प्रत्यक्षपणे मोजमाप करता येत नाही. पण त्यातून सापेक्ष बदल दर्शविता येतात.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**निर्देशांकाचा उगम :** १७ व्या शतकातील एक प्रख्यात इंग्रजी लेखक राईस वॉन हे त्यांच्या जन्मभूमीच्या मागील शतकातील किंमत वाढीबद्दल जाणून घेण्यासाठी उत्सुक होते. १८ व्या शतकाच्या सुरुवातीला निर्देशांकाचा वापर करून अभ्यास झाला होता. १७०७ मध्ये विल्यम फ्लीटवूडने १४४०–१४६० आणि १६८६–१७०६ या कालावधीतील गहू, ओट्स, बीन्स, कापड, मांस इत्यादी वस्तूंच्या किमतींची तुलना केली होती. या अभ्यासाचे निकष क्रोनिकॉन प्रीसीओसम(१७०७) यांच्या कामात सादर केले आहेत. १७३८ मध्ये फ्रान्सचा चार्ल्स डी फेरे ड्युटो याने १५०८ आणि १७३५ या दोन कालावधींसाठी एक साधा सरासरी निर्देशांक तयार केला आणि समान वस्तूंच्या यादीतील खर्चाशी तुलना केली. जी.आर. कार्ली इटालियन असून त्यांच्या कामात निर्देशांक प्रथमच नोंदविलेला दिसून येतो. त्यांनी १७६४ मध्ये सापेक्ष किंमतीसाठी साध्या सरासरी पद्धतीचे सुधारित रूप वापरले.

**निर्देशांकाच्या व्याख्या :**

१) **स्पाईगेल :** "भौगोलिक स्थान, वेळ या संदर्भात किंवा इतर वैशिष्ट्ये म्हणजे उत्पन्न, व्यवसाय इत्यादींच्या सापेक्ष बदलासाठी किंवा बदलाचे प्रमाण दाखविण्यासाठी वापरलेले सांख्यिकीय साधन म्हणजे निर्देशांक होय."

२) **क्रॉक्स्टन आणि कावडन :** "निर्देशांक ही संख्यांची अशी शृंखला आहे की जिच्या आधारे काल व स्थान पदमालेतील बदलाचे मापन करता येते."

**निर्देशांकाची वैशिष्ट्ये :**

१) निर्देशांक हे सांख्यिकीय साधन आहे.

२) निर्देशांक हे सरासरी काढण्याचे एक विशिष्ट साधन आहे आणि ते शेकडेवारी काढण्यास उपयुक्त ठरते.

३) एका विशिष्ट काळात किंवा दोन भिन्न काळांत किंवा दोन भिन्न स्थानांतील एक किंवा जास्त संबंधित चलांचे परिमाण मोजण्यासाठी निर्देशांक या सांख्यिकीय साधनाचा उपयोग होतो.

४) जो निर्देशांक एका चलाच्या साहाय्याने मोजला जातो त्याला एकीकृत निर्देशांक म्हणतात. याउलट जो निर्देशांक चलाच्या गटापासून तयार केला जातो त्याला संयुक्त निर्देशांक असे म्हणतात.

५) निर्देशांक हा चालू वर्षासाठी तयार केला जातो.

६) ज्या वर्षापासून बदल मोजले जातात त्याला मूळ वर्ष असे म्हणतात.

७) मूळवर्षाचा किंमत निर्देशांक हा नेहमी १०० गृहीत धरला जातो आणि त्यानुसार चालू वर्षातील मूल्याप्रमाणे मोजला जातो.

८) अर्थव्यवस्थेतील कल व बदल मोजण्यासाठी निर्देशांकांचा वापर केला जातो. म्हणून त्याला आर्थिक क्रियांचे 'वायुभारमापक' असे म्हटले जाते.

**तुम्हांला माहीत हवं!**

निर्देशांकात परिभाषेचा वापर

मूळ वर्ष : निवडलेल्या वर्षाची तुलना मूळ वर्षाशी केली जाते. ते वर्ष निर्देशित करण्यासाठी '०' हा प्रत्यय वापरला जातो.

चालू वर्ष : निवडलेल्या वर्षाशी तुलना करण्यासाठी चालू वर्षाची गरज भासते. चालू वर्षासाठी '१' हा प्रत्यय वापरला जातो.

**सांकेतिक लिपी**


$P_0$ = मूळ वर्षातील वस्तूची किंमत

$p_{१}$ = चालू वर्षातील वस्तूची किंमत

$q_{०}$ = मूळ वर्षातील उपभोग्य वस्तू किंवा खरेदीच्या वस्तूंची संख्या

$q_{१}$ = चालू वर्षातील उपभोग्य वस्तू किंवा खरेदीच्या वस्तूंची संख्या

**निर्देशांकाचे प्रकार :**




१) **किंमत निर्देशांक :** हे वस्तूच्या किमतीतील सामान्य बदलाचे मापन करते. ते दोन भिन्न कालावधी दरम्यान किमतीच्या पातळीची तुलना करते.

२) **संख्यात्मक निर्देशांक :** याला प्रमाणबद्ध निर्देशांक असेही म्हणतात. अर्थव्यवस्थेच्या उत्पादनातील किंवा उत्पादनाच्या भौतिक प्रमाणातील बदल मोजते. उदा., कृषी उत्पादन व औद्योगिक उत्पादनाच्या परिमाणात काही कालावधीत झालेला बदल.

३) **मूल्य निर्देशांक :** वस्तूचे मूल्य म्हणजे किंमत व परिमाण यांचा गुणाकार होय.($p \times q$) मूल्य निर्देशांक हा चलाच्या मूल्यातील बदलाचे रुपयाच्या स्वरूपात मोजमाप करतो. हा निर्देशांक किंमत आणि परिमाण या दोन्हींतील बदलाचे एकत्रीकरण करतो. त्यामुळे तो अधिक माहितीपूर्ण आहे.

४) **विशिष्ट हेतू निर्देशांक :** काही विशिष्ट हेतूने हे निर्देशांक तयार केले जातात. उदा. आयात निर्यात निर्देशांक, श्रम उत्पादकता निर्देशांक, शेअर किमतीचा निर्देशांक इत्यादी.

**तुम्हांला माहीत आहे का?**

भारत सरकारकडून व्यापकपणे वापरण्यात येणारे निर्देशांक :

१) ग्राहक किंमत निर्देशांक

२) घाऊक किंमत निर्देशांक

३) कृषी उत्पादनाचा निर्देशांक

४) औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक

५) सेवा निर्मितीचा निर्देशांक

६) आयात-निर्यात निर्देशांक

७) मानव विकास निर्देशांक

**निर्देशांकांचे अर्थशास्त्रातील महत्त्व :**

निर्देशांक हे आर्थिक विश्लेषणाची अनिवार्य साधने आहेत. पुढील मुद्दे निर्देशांकाचे महत्त्व स्पष्ट करतात.

१) **योग्य धोरण ठरवणे :** निर्देशांक हे धोरण निर्मात्यांना योग्य आर्थिक धोरण तयार करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे प्रदान करतात. जसे की कृषी धोरण, औद्योगिक धोरण, मजुरीचे निर्धारण व महागाई भत्ता इत्यादी.

२) **कल आणि प्रवृत्तीचा अभ्यास :** उत्पादन किमती, निर्यात, आयात इत्यादी आर्थिक चलातील बदल मोजण्यासाठी निर्देशांक व्यापकपणे वापरले जातात. उदा. गेल्या ५ वर्षांपासून औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक तपासून आपण महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढू शकतो. औद्योगिक उत्पादनात वाढ झाली की घट झाली ते दर्शविते.

३) **भविष्यातील आर्थिक घडामोडींचा अंदाज :** भूतकाळ आणि वर्तमान काळातील विश्लेषणाच्या आधारे आर्थिक घडामोडीतील अंदाज व्यक्त करण्यासाठी निर्देशांक उपयोगी ठरतो. उदा., उपलब्ध माहितीच्या आधारे आयात आणि निर्यातीशी संबंधित भविष्यातील अंदाज करता येतो. भविष्यातील अंदाजावरून योग्य निर्णय घेण्याचे मार्गदर्शन मिळते.

४) **चलनवाढीचे मोजमाप :** निर्देशांकाचा वापर वेळोवेळी होणाऱ्या किंमत पातळीतील बदल मोजण्यासाठी केला जातो. तो सरकारला महागाईविरुद्ध योग्य उपाययोजना करण्यास सक्षम बनवितो.

५) **आर्थिक माहिती वास्तव स्वरूपात सादर करण्यास मदत :** चलनफुगवटा कमी करणे म्हणजे मूळ माहितीची तडजोड करणे होय. उदा., निर्देशांकाच्या साहाय्याने किंमत बदल, वेतन बदल यांच्याशी तडजोड केली जाते. यामुळे आर्थिक

माहिती वास्तव स्वरूपात स्थिर किमतीला सादर करण्यास मदत होते.

**निर्देशांकाची रचना :**

निर्देशांकाच्या रचनेमध्ये खालील पायऱ्यांचा समावेश होतो.

१) **किंमत निर्देशांकाचा हेतू :** निर्देशांक तयार करण्यासाठी असणारा बाह्य भाग त्याची व्याप्ती तसेच कोणता बदल मोजावयाचा आहे याचा स्पष्ट फलदायी निर्णय घेतला पाहिजे.

२) **मूळ वर्षाची निवड :** मूळ वर्षाला संदर्भ वर्ष असेही म्हणतात. हे असे वर्ष आहे, ज्यात तुलना केली जाते. मूळ वर्ष हे सर्वसाधारण वर्ष असावे. जसे ते वर्ष नैसर्गिक आपत्ती, युद्धजन्य परिस्थिती, आणीबाणी इत्यादींनी मुक्त असावे. मूळ वर्ष अतिशय मागचे नसावे.

> **तुम्हांला माहीत आहे का?**
>
> सन २०१५ साली स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या मोजणीकरीता संख्याशास्त्रीय मंत्रालयाच्या केंद्रीय सांख्यिकी कार्यालयाने मूळ वर्ष २००४-०५ हे बदलून ते २०११-१२ असे केले. बदलती आर्थिक रचना व सापेक्ष किमती विचारात घेऊन निर्देशांकाच्या मूळ वर्षाचे प्रत्येक ७ ते १० वर्षांत काळानुसार पूर्नरचित बदल केला जातो. त्याशिवाय औद्योगिक उत्पादन निर्देशांकाचे व घाऊक किंमत निर्देशांकाचे मूळ वर्षही २००४-०५ बदलून २०११-१२ करण्यात आले. सध्या मूळ वर्षाची पूर्नरचना करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

३) **वस्तूची निवड :** निर्देशांकाच्या रचनेमध्ये निवड केलेल्या वस्तूंचा नमुना निवडणे आवश्यक आहे. उदा., किंमत निर्देशांकांच्या निर्मितीमध्ये प्रत्येक वस्तूचा समावेश करणे अशक्य आहे. निवडल्या जाणाऱ्या वस्तूनी लोकांच्या अभिरुची, सवयी आणि चालीरीतींचे प्रतिनिधित्व केले पाहिजे. याशिवाय चांगले परिणाम देण्यासाठी केवळ प्रमाणित वस्तूंचा समावेश केला पाहिजे.

४) **वस्तूंच्या किमतीची निवड :** निवडलेल्या वस्तूंच्या किमती एकाच बाजारात दुकानपरत्वे व स्थानपरत्वे बदलण्याची शक्यता असते. म्हणूनच किमतीचे दरपत्रक नि:पक्षपातीपणे चांगल्या दुकानातून मिळविणे योग्य असते. अचूकता राखण्यासाठी प्रातिनिधिक स्थळे व व्यक्तींची निवड करणे गरजेचे असते.

५) **योग्य सरासरीची निवड :** निर्देशांकांची रचना तयार करण्यासाठी अंकगणितीय मध्याचा वापर केला जातो. कारण तुलनात्मकदृष्ट्या त्यांची गणना करणे सोपे असते.

६) **योग्य भाराची निवड करणे :** निर्देशांकांच्या निर्मितीत वेगवेगळ्या वस्तूंच्या भारांना विशेष महत्त्व असते. भारांश हे दोन प्रकारचे असतात, संख्यात्मक भार (q), मूल्यभार (p × q). सर्व वस्तूंना समान महत्त्व नसल्यामुळे विशिष्ट भाराने अधिक चांगले परिणाम मिळू शकतात.


७) **योग्य सूत्रांची निवड :** निर्देशांकाची रचना करण्यासाठी अनेक सूत्रांचा वापर केला जातो. त्यापैकी योग्य सूत्राची निवड केली जाते. योग्य सूत्रांची निवड ही निर्देशांकाचा हेतू आणि आकडेवारीची उपलब्धता यांच्यावर अवलंबून असते.

**निर्देशांक रचनेच्या पद्धती :**

निर्देशांक रचनेच्या दोन पद्धती आहेत :

अ) साधा निर्देशांक

ब) भारान्वित निर्देशांक




**अ) साधा निर्देशांक :** या पद्धतीमध्ये प्रत्येक वस्तूला समान महत्त्व दिले जाते. निर्देशांक तयार करण्यासाठी ही पद्धत सर्वांत सोपी आहे. म्हणून ही पद्धत खालील प्रकारच्या निर्देशांकांसाठी वापरली जाते.

१) किंमत निर्देशांक

२) संख्यात्मक निर्देशांक

३) मूल्य निर्देशांक इत्यादी.

या निर्देशांकांचे मापन खालीलप्रमाणे :

**१) किंमत निर्देशांक :**

किंमत निर्देशांक $P_{०१} = \frac{\Sigma P_{१}}{\Sigma P_{०}} \times १००$

$\Sigma P_१$ = चालू वर्षातील किमतीची एकूण बेरीज

$\Sigma P_०$ = मूळ वर्षातील किमतीची एकूण बेरीज

**उदा. १.** साध्या पद्धतीचा वापर करून किंमत निर्देशांकाची रचना करा.

**टप्पे :** १) $\Sigma P_०$ = मिळविण्यासाठी मूळ वर्षातील निरनिराळ्या वस्तूंच्या किमतीची बेरीज करा.

२) $\Sigma P_१$ = मिळविण्यासाठी निरनिराळ्या वस्तूंच्या चालू वर्षातील किमतीची बेरीज करा.

हे सूत्र वापरा = $P_{०१} = \frac{\Sigma P_१}{\Sigma P_०} \times १००$

| वस्तू | २०१० च्या किमती (मूळ वर्ष) $P_०$ (₹) | २०१५ च्या किंमती (चालू वर्ष) $P_१$ (₹) |
|---|---|---|
| अ | २० | ३० |
| ब | ६० | ८० |
| क | १०० | १३० |
| ड | ४० | ६० |
| **एकूण** | $\Sigma P_० = २२०$ | $\Sigma P_१ = ३००$ |

किंमत निर्देशांक $P_{०१} = \frac{\Sigma P_१}{\Sigma P_०} \times १००$

$= \frac{३००}{२२०} \times १०० = १३६.३६$

$P_{०१} = १३६.३६$

## २) संख्यात्मक निर्देशांक (परिमाण निर्देशांक) :

या निर्देशांकाचे मापन खालीलप्रमाणे :

संख्यात्मक किंमत निर्देशांक $Q_{०१} = \frac{\Sigma q_१}{\Sigma q_०} \times १००$

$\Sigma q_१$ = चालू वर्षातील नगसंख्येची एकूण बेरीज

$\Sigma q_०$ = मूळ वर्षातील नगसंख्येची एकूण बेरीज

**उदा. २.** साध्या पद्धतीचा वापर करून संख्यात्मक निर्देशांकाची रचना करा.

**टप्पे :** १) $\Sigma q_१$ = मिळविण्यासाठी निरनिराळ्या वस्तूंच्या चालू वर्षातील नगसंख्येची बेरीज करा.

२) $\Sigma q_०$ = मिळविण्यासाठी निरनिराळ्या वस्तूंच्या मूळ वर्षातील नगसंख्येची बेरीज करा.

**हे सूत्र वापरा –** $Q_{०१} = \frac{\Sigma q_१}{\Sigma q_०} \times १००$

| वस्तू | २००० मधील वस्तूंची संख्या (मूळ वर्ष) $q_०$ | २००१ मधील वस्तूंची संख्या (चालू वर्ष) $q_१$ |
|---|---|---|
| अ | ३० | ४५ |
| ब | ५५ | ७० |
| क | ९० | १०५ |
| ड | ३५ | ६० |
| **एकूण** | $\Sigma q_० = २१०$ | $\Sigma q_१ = २८०$ |

$Q_{०१} = \frac{\Sigma q_१}{\Sigma q_०} \times १००$

$= \frac{२८०}{२१०} \times १०० = १३३.३३$

$Q_{०१} = १३३.३३$

## ३) मूल्य निर्देशांक –

या निर्देशांकाचे मापन खालीलप्रमाणे –

मूल्य निर्देशांक $V_{०१} = \frac{\Sigma p_१ q_१}{\Sigma p_0 q_०} \times १००$

$\Sigma P_१ q_१$ = चालू वर्षातील वेगवेगळ्या वस्तूंची किंमत व संख्या यांच्या गुणाकारांची बेरीज

$\Sigma P_0 q_०$ = मूळ वर्षातील वेगवेगळ्या वस्तूंची किंमत व संख्या यांच्या गुणाकाराची बेरीज

**उदा. ३.** साध्या पद्धतीचा वापर करून मूल्य निर्देशांकाची रचना करा.

**टप्पे :** १) मूळ वर्षामधील वस्तूंची किंमत व संख्या यांचा गुणाकार करून $P_०q_०$ काढणे. त्यांची बेरीज करून $\Sigma P_०q_०$ मिळवणे.

२) चालू वर्षामधील वस्तूंची किंमत व संख्या यांचा गुणाकार $P_१ q_१$ काढणे व त्यांची बेरीज करून बेरीज करून $\Sigma P_१ q_१$ मिळवणे.

३) मूल्य निर्देशांक $V_{०१} = \frac{\Sigma P_१ q_१}{\Sigma P_0 q_०} \times १००$

| मूळ वर्ष | | | | चालू वर्ष | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वस्तू | $p_0$ | $q_0$ | $p_0 q_0$ | $p_1$ | $q_1$ | $p_1 q_1$ |
| प | ५ | ४ | २० | २० | १० | २०० |
| फ | १० | ३ | ३० | ३० | ८ | २४० |
| ब | १५ | २ | ३० | ४० | ६ | २४० |
| भ | २० | १ | २० | ५० | ४ | २०० |
| एकूण | $\Sigma p_0 q_0 =$ १०० | | | $\Sigma p_1 q_1 =$ ८८० | | |

मूल्य निर्देशांक $Vo_1 = \dfrac{\Sigma p_1 q_1}{\Sigma p_0 q_0} \times$ १००

$= \dfrac{८८०}{१००} \times$ १००

$Vo_1 =$ ८८०

**ब) भारान्वित निर्देशांक :**



लासपेअर

या पद्धतीत विविध वस्तूंना योग्य भार देण्यात येतो. हेच समूहातील वस्तूंना सापेक्ष महत्त्व देते. बहुतेक प्रकरणांमध्ये 'संख्या' भारांश म्हणून वापरली जाते. भारांश मापनाच्या अनेक पद्धती आहेत. यामध्ये लासपेअर, पाश्चे इत्यादीचा समावेश होतो. निवडलेल्या मूळ वर्षातील संबंधित वस्तूंच्या चालू किमती किंवा संख्या यांचा निर्देशांक मोजण्यासाठी जर्मन अर्थशास्त्रज्ञ एटीन लासपेअर (१८३४-१९१३) यांनी निर्देशांक तयार केला. तुलनेसाठी मूळ वर्षात खरेदी केलेल्या वस्तूंचा समूह वापरणे हे लासपेअरच्या निर्देशांकाचे खास वैशिष्ट्य आहे.

१) **लासपेअर किंमत निर्देशांक :** या तंत्रामध्ये मूळ वर्षातील वस्तूंच्या संख्येचा भार समाविष्ट केला जातो.

$$P_{01} = \frac{\Sigma p_1 q_0}{\Sigma p_0 q_0} \times १००$$

**उदा.१.** खालील माहितीवरून लासपेअरचा निर्देशांक तयार करा.

| मूळ वर्ष | | | चालू वर्ष | |
|---|---|---|---|---|
| वस्तू | किंमत $p_0$ | परिमाण $q_0$ | किंमत $P_1$ | परिमाण $q_1$ |
| अ | २० | ४ | ३० | ६ |
| ब | १० | ५ | २० | ८ |
| क | ४० | ८ | ६० | ५ |
| ड | ३० | ४ | ४० | ४ |

**रीत :**

| मूळ वर्ष | | | चालू वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वस्तू | किंमत $p_0$ | परिमाण $q_0$ | किंमत $P_1$ | परिमाण $q_1$ | $p_1 q_0$ | $p_0 q_0$ |
| अ | २० | ४ | ३० | ६ | १२० | ८० |
| ब | १० | ५ | २० | ८ | १०० | ५० |
| क | ४० | ८ | ६० | ५ | ४८० | ३२० |
| ड | ३० | ४ | ४० | ४ | १६० | १२० |
| एकूण | | | | | ८६० | ५७० |

**रीत :**

१) वेगवेगळ्या वस्तूंचा $p_1 q_0$ ह्यांचा गुणाकार करा.

२) वेगवेगळ्या वस्तूंचा $p_0 q_0$ ह्यांचा गुणाकार करा.

३) मिळवलेल्या $p_1 q_0$ यांची बेरीज करून $\Sigma p_1 q_0$ मिळवा.

४) मिळवलेल्या $p_0 q_0$ यांची बेरीज करून $\Sigma p_0 q_0$ मिळवा.

५) खालील सूत्राचा वापर करा.

$$p_{01} = \frac{\Sigma p_1 q_0}{\Sigma p_0 q_0} \times १००$$

$$po_1 = \frac{८६०}{५७०} \times १०० = १५०.८७$$

म्हणून लासपेअर किंमत निर्देशांक : $po_1 =$ १५०.८७

**तुम्हांला माहीत आहे का?**

सेन्सेक्स आणि निफ्टी निर्देशांक हे अनुक्रमे मुंबई शेअर बाजार (BSE) व राष्ट्रीय शेअर (NSE) बाजारांचे प्रतिनिधित्व करणारे शेअर बाजार निर्देशांक आहेत.

सेन्सेक्स निर्देशांकाला (BSE) बी.एस.ई. ३० असेही म्हणतात. मुंबई शेअर बाजारातील आर्थिक दृष्टीने सक्षम असलेल्या ३० कंपन्यांच्या बाजार निर्देशांकाचा समावेश BSE ३० मध्ये होतो. सेन्सेक्सचे मूळ वर्ष १९७८-७९ आहे.

निफ्टीला निफ्टी ५० असेही म्हणतात. भारताच्या राष्ट्रीय शेअर बाजारातील (NSE) आर्थिक दृष्टीने सक्षम असलेल्या ५० कंपन्यांच्या बाजार निर्देशांकांचा समावेश निफ्टी ५० मध्ये होतो. निफ्टीचे मूळ वर्ष १९९५ हे आहे.

## २) पाश्चेचा किंमत निर्देशांक :



हरमन पाश्चे

जर्मन अर्थतज्ज्ञ हरमन पाश्चे (१८५१–१९२५) यांनी निवडलेल्या मूळ वर्षातील संबंधीत वस्तूंच्या चालू किंमत किंवा संख्या मोजण्यासाठी निर्देशांक तयार केला. पाश्चेचा निर्देशांक चालू वर्षातील भारांकनाचा वापर करतो.

या निर्देशांकामध्ये चालू वर्षाच्या परिमाणाच्या भाराचा समावेश केला जातो. पाश्चेचा किंमत निर्देशांक खालीलप्रमाणे काढला जातो.

$$p_{०१} = \frac{\Sigma p_१ q_१}{\Sigma p_० q_१} \times १००$$

उदा.२. खालील माहितीवरून पाश्चेचा निर्देशांक तयार करा.

| वस्तू | मूळ वर्ष | | चालू वर्ष | |
|---|---|---|---|---|
| | किंमत $p_०$ | परिमाण $q_०$ | किंमत $p_१$ | परिमाण $q_१$ |
| य | २ | १० | ५ | ८ |
| र | ४ | ५ | ८ | ३ |
| ल | १ | ७ | २ | १० |
| व | ५ | ८ | १० | ५ |

**रीत :**

| मूळ वर्ष | | | चालू वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वस्तू | किंमत $p_०$ | परिमाण $q_०$ | किंमत $p_१$ | परिमाण $q_१$ | $p_१q_१$ | $p_०q_१$ |
| य | २ | १० | ५ | ८ | ४० | १६ |
| र | ४ | ५ | ८ | ३ | २४ | १२ |
| ल | १ | ७ | २ | १० | २० | १० |
| व | ५ | ८ | १० | ५ | ५० | २५ |
| एकूण | | | | | १३४ | ६३ |

**रीत :**

१) वेगवेगळ्या वस्तूंचा $p_१ q_१$ ह्यांचा गुणाकार करा.

२) वेगवेगळ्या वस्तूंचा $p_० q_१$ ह्यांचा गुणाकार करा.

३) मिळवलेल्या $p_१ q_१$ यांची बेरीज करून $\Sigma p_१ q_१$ मिळवा.

४) मिळवलेल्या $p_० q_१$ यांची बेरीज करून $\Sigma p_० q_१$ मिळवा.

५) खालील सूत्राचा वापर करा.

$$p_{०१} = \frac{\Sigma p_१ q_१}{\Sigma p_० q_१} \times १००$$

$$p_{०१} = \frac{१३४}{६३} \times १०० = २१२.६९$$

म्हणून पाश्चे किंमत निर्देशांक = $p_{०१}$ = २१२.६९

**शोधा पाहू!**

- भारतातील कृषी उत्पादन निर्देशांकात समाविष्ट झालेल्या पिकांची यादी तयार करा.
- भारतातील औद्योगिक उत्पादन निर्देशांकात समाविष्ट झालेल्या उत्पादनांची यादी तयार करा.

## निर्देशांकाच्या मर्यादा :

व्यवहारात निर्देशांक फार उपयोगी आहे. आर्थिक हालचालींचा तो वायुभारमापक आहे. परंतु निर्देशांक संपूर्ण खात्रीशीर नाही. त्यावर पुढील मर्यादा येतात.

१) **नमुन्यावर आधारित :** निर्देशांक हा नमुन्यावर आधारित आहे. निर्देशांकाच्या रचनेत सर्व घटकांचा समावेश होत नाही. म्हणून तो नमुना चुकांपासून मुक्त होत नाही.

२) **आकडेवारींवर आधारित :** निरनिराळ्या प्रकारच्या अपुऱ्या आकडेवारींवर निर्देशांक आधारित आहे. त्याच आधारावर आकडेवारी गोळा केली आहे. याचा परिणाम निर्देशांकाच्या निष्कर्षावर होतो.

३) **निर्देशांकाचा चुकीचा उद्देश :** निर्देशांक हा चुकीच्या उद्देशाने वापरला जातो. मूळ वर्षातील परिस्थितीबरोबर चालू वर्षातील परिस्थितीशी तुलना केली जाते. म्हणून व्यक्ती मूळ वर्षाची निवड करते. परंतु त्याचा हेतू योग्य असला पाहिजे. उदा., व्यावसायिक माणसाने मूळ वर्ष म्हणून जास्त नफा असलेले वर्ष निवडले आणि चालू वर्षातील नफा कमी असेल तर हे योग्य नाही.

४) **सूत्राची उणीव :** निर्देशांकाच्या रचनेसाठी अचूक सूत्र नाही. ही फक्त सरासरी आहे. त्यामुळे त्याला सरासरीच्या सर्व मर्यादा पडतात.

५) **अर्थव्यवस्थेतील बदल :** देशातील लोकांच्या सवयी, आवडी आणि अपेक्षा नेहमीच बदलत असतात. त्या सर्व बदलांचा समावेश निर्देशांकात केला जात नाही.

६) **गुणवत्तेत बदल :** वस्तूच्या गुणवत्तेत झालेल्या बदलाकडे

निर्देशांक दुर्लक्ष करतो. चांगल्या वस्तूंना पर्याय असलेल्या सर्वसामान्य वस्तूपेक्षा दिलेल्या वेळेत चांगल्या दर्जाच्या वस्तूंचा उत्पादन खर्च जास्त असतो आणि किंमतही जास्त असते.

७) **बैजिक भार :** निरनिराळ्या वस्तूंना दिलेला भार बैजिक असतो.

८) **मर्यादित व्याप्ती :** निर्देशांकाला मर्यादित व्याप्ती आहे. कारण एका हेतूने तयार केलेले निर्देशांक दुसऱ्या कोणत्याही हेतूसाठी वापरले जात नाहीत.

**शोधा पाहू!**

वृत्तपत्रांतील ठळक बातम्यांचा संबंध खालील निर्देशांकाच्या प्रकाराशी जोडा.

१) किंमत निर्देशांक

२) कृषी उत्पादकता निर्देशांक

३) औद्योगिक उत्पादन निर्देशांक

४) भाग किंमत निर्देशांक

## स्वाध्याय

**प्र. १. योग्य पर्याय निवडा :**

१) किंमत निर्देशांकाचा अयोग्य संबंध असलेली विधाने शोधा.

अ) निर्देशांकाचे भौगोलिक साधन.

ब) हवेच्या दाबाचे मोजमाप निर्देशांकात केले जाते.

क) आर्थिक चलातील सापेक्ष बदलाचे मोजमाप निर्देशांकात केले जाते.

ड) निर्देशांक हा विशिष्ट सरासरीमध्ये असतो.

**पर्याय :** १) क आणि ड २) अ आणि ब ३) ब आणि क ४) अ, ब, क आणि ड

२) निर्देशांकाचे महत्त्व खालील विधानांतून शोधा.

अ) भविष्यकाळाचे पूर्वानुमान काढण्यासाठी निर्देशांक उपयुक्त

ब) भाववाढीचे मोजमाप करण्यासाठी निर्देशांक उपयुक्त

क) योग्य धोरणाची आखणी करण्यासाठी निर्देशांक उपयुक्त

ड) निर्देशांक चुकीच्या वापरासाठी केला जातो.

**पर्याय :** १) ब,क आणि ड २) अ, क आणि ड ३) अ, ब आणि ड ४) अ, ब आणि क

३) भारान्वित निर्देशांकाला लागू असणारी विधाने

अ) प्रत्येक वस्तूंना सारखेच महत्त्व दिले जाते.

ब) विविध वस्तूंना योग्य भारांश दिला जातो.

क) बहुतेक वेळा संख्या ही भारांश म्हणून वापरली जाते.

ड) भारान्वित निर्देशांक मोजण्यासाठी लासपेअर आणि पाश्चेची पद्धत वापरली जाते.

**पर्याय :** १) ब,क आणि ड २) अ, क आणि ड ३) अ, ब आणि ड ४) अ, ब, क आणि ड

४) निर्देशांकाच्या मर्यादांशी संबंधित विधाने

अ) निर्देशांक संपूर्णपणे खात्रीशीर नसतात.

ब) गोळा केलेली माहिती पूर्वग्रहदूषित असू शकते.

क) प्रत्येक सूत्रामध्ये काहीतरी उणीव असते.

ड) निर्देशांक वस्तूंमधील गुणात्मक बदलांकडे दुर्लक्ष करतात.

**पर्याय :** १) अ, क आणि ड २) अ, ब, क आणि ड ३) अ, ब आणि ड ४) ब, क आणि ड

५) योग्य जोडीचा पर्याय निवडा.

| **गट अ** | **गट ब** |
|---|---|
| १) किंमत निर्देशांक | $\frac{\Sigma p_1 q_1}{\Sigma p_0 q_0} \times १००$ |
| २) मूल्य निर्देशांक | $\frac{\Sigma q_1}{\Sigma q_0} \times १००$ |
| ३) संख्यात्मक निर्देशांक | $\frac{\Sigma p_1 q_1}{\Sigma p_0 q_1} \times १००$ |
| ४) पाश्चे निर्देशांक | $\frac{\Sigma p_1}{\Sigma p_0} \times १००$ |

**पर्याय :** १) १-ड, २-क, ३-अ, ४-ब
२) १-ड, २-अ, ३-ब, ४-क
३) १-ब, २-क, ३-ड, ४-अ
४) १-क, २-ड, ३-अ, ४-ब

### प्र. २. सहसंबंध पूर्ण करा :

१) निर्देशांक :: भाववाढ :: ______ : शेती उत्पादन

२) ______ : मूळ वर्ष किंमत :: $P_1$ : चालू वर्ष किंमत

३) लासपेअर निर्देशांक : ______ :: पाश्चे निर्देशांक : चालू वर्षाचे परिमाण

४) ______ : एक चल :: संयुक्त निर्देशांक : चलांचा गट

### प्र. ३. खालील उदाहरणे सोडवा :

१) खालील आकडेवारीवरून किंमत निर्देशांक काढा.

| वस्तू | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| २००५ च्या किंमती (₹) | ६ | १६ | २४ | ४ |
| २०१० च्या किंमती (₹) | ८ | १८ | २८ | ६ |

२) खालील आकडेवारीवरून संख्यात्मक निर्देशांक काढा.

| वस्तू | अ | आ | इ | ई | उ |
|---|---|---|---|---|---|
| मूळ वर्षातील परिमाण | १७० | १५० | १०० | १९५ | २०५ |
| चालू वर्षातील परिमाण | ९० | ७० | ७५ | १५० | ९५ |

३) खालील आकडेवारीवरून मूल्य निर्देशांक काढा.

| वस्तू | मूळ वर्ष | | चालू वर्ष | |
|---|---|---|---|---|
| | किंमत | परिमाण | किंमत | परिमाण |
| अ | ४० | १५ | ७० | २० |
| ब | १० | १२ | ६० | २२ |
| क | ५० | १० | ९० | १८ |
| ड | २० | १४ | १०० | १६ |
| ई | ३० | १३ | ४० | १५ |

४) खालील आकडेवारीवरून लासपेअर आणि पाश्चेचा किंमत निर्देशांक काढा.

| वस्तू | मूळ वर्ष | | चालू वर्ष | |
|---|---|---|---|---|
| | किंमत | परिमाण | किंमत | परिमाण |
| क्ष | ८ | ३० | १२ | २५ |
| य | १० | ४२ | २० | १६ |

### प्र. ४. फरक स्पष्ट करा :

१) साधा निर्देशांक आणि भारान्वित निर्देशांक

२) किंमत निर्देशांक आणि संख्यात्मक निर्देशांक

३) लासपेअर निर्देशांक आणि पाश्चेचा निर्देशांक

### प्र. ५. खालील विधानांशी तुम्ही सहमत की असहमत आहात ते सकारण स्पष्ट करा :

१) निर्देशांकामध्ये फक्त किंमत पातळीतील बदल मोजले जातात.

२) निर्देशांकाला कोणत्याही मर्यादा नाहीत.

३) निर्देशांक हा मूळ वर्षाशिवाय तयार करता येतो.

### प्र.६. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :

१) निर्देशांकाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) निर्देशांकाचे अर्थशास्त्रातील महत्त्व स्पष्ट करा.

### प्र. ७. सविस्तर उत्तरे लिहा :

१) निर्देशांकाच्या रचनेच्या पायऱ्या स्पष्ट करा.

# राष्ट्रीय उत्पन्न (National Income)




आकृती ७.१

**प्रस्तावना :**

राष्ट्रीय उत्पन्न हा स्थूल अर्थशास्त्राचा एक महत्त्वाचा अभ्यासविषय आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत शेती आणि उद्योग, व्यापार आणि बाजारपेठा, बँका आणि वित्तीय संस्था, विविध विभाग आणि त्यांची कार्यालये, इत्यादींचा समावेश होतो. राष्ट्रीय उत्पन्न हे उत्पादन, वितरण, विनिमय आणि उपभोग या आर्थिक क्रियांचे एकत्रित मापक असते. याचबरोबर ते देशातील लोकांच्या आर्थिक कल्याणाचेही वस्तुनिष्ठ निर्देशक आहे.

भारतात १९४९ मध्ये राष्ट्रीय उत्पन्न समितीची स्थापना करून सरकारने राष्ट्रीय उत्पन्नाच्या नियमित संकलनाला सुरुवात केली. सद्य:स्थितीत केंद्रीय सांख्यिकीय संघटना (CSO) दरवर्षी देशातील राष्ट्रीय उत्पन्न आणि इतर संबंधित सांख्यिकीय माहिती संकलित करून प्रकाशित करते.

**अर्थ :**

आधुनिक अर्थव्यवस्था ही पैशावर आधारित आहे. म्हणून देशाचे राष्ट्रीय उत्पन्न हे पैशांमध्ये व्यक्त केले जाते. देशाचे एकूण उत्पन्न म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय.

खऱ्या अर्थाने, राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एका वर्षाच्या कालावधीत देशात उत्पादित होणाऱ्या वस्तू व सेवांचा प्रवाह होय.

**राष्ट्रीय उत्पन्नाच्या व्याख्या :**

राष्ट्रीय उत्पन्नाच्या काही महत्वाच्या व्याख्या खालीलप्रमाणे :

१) **राष्ट्रीय उत्पन्न समिती :** प्रा. पी. सी. महालनोबिस यांच्या अध्यक्षतेखाली भारत सरकारद्वारे ऑगस्ट १९४९ मध्ये नियुक्त केलेल्या राष्ट्रीय उत्पन्न समितीत प्रा. डी. आर. गाडगीळ आणि डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव हे सदस्य होते.


पी.सी.महालनोबिस


व्ही.के.आर.व्ही.राव


डी.आर. गाडगीळ

या समितीची व्याख्या पुढीलप्रमाणे : "राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एखाद्या विशिष्ट कालखंडात निर्माण करण्यात आलेल्या वस्तू आणि सेवांचे दुहेरी मोजदाद होऊ न देता केलेले मापन होय."

२) **प्रा. ए. सी. पिगू :** "समाजाच्या वस्तुनिष्ठ उत्पन्नाच्या ज्या भागाची पैशात मोजदाद करता येते असा भाग म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय." या उत्पन्नात निव्वळ विदेशी उत्पन्नाचा समावेश केला जातो.



३) **प्रा. आयर्विंग फिशर :** "राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एका वर्षाच्या कालावधीत राष्ट्राच्या निव्वळ उत्पादनांपैकी जो भाग प्रत्यक्षपणे उपभोगासाठी वापरला जातो, असा भाग होय."



**राष्ट्रीय उत्पन्नाची वैशिष्ट्ये :**

१) **स्थूल आर्थिक संकल्पना :** एकूण राष्ट्रीय उत्पन्न एखाद्या व्यक्तीशी संबंधित नसून ते संपूर्ण अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचे प्रतिनिधित्व करते. म्हणूनच ही एक स्थूल अर्थशास्त्रीय संकल्पना आहे.

२) **राष्ट्रीय उत्पन्नात अंतिम वस्तू व सेवांचे मूल्य :** दुहेरी गणना टाळण्यासाठी फक्त अंतिम वस्तू आणि अर्थव्यवस्थेत उत्पादित सेवांचे मूल्य विचारात घेतले जाते. अर्धसिद्ध वस्तू किंवा कच्च्या मालाच्या किमती विचारात घेऊ नयेत.

उदा., शर्टाचे मूल्य निश्चित करताना कापसाच्या मूल्याचा विचार केला जात नाही. कारण ते शर्टच्या किमतीत आधीपासूनच समाविष्ट केलेले असते.

३) **निव्वळ समग्र मूल्य :** राष्ट्रीय उत्पन्नात उत्पादित वस्तू आणि सेवांच्या निव्वळ मूल्याचा समावेश केला जातो. यात घसारा निधीचा समावेश केला जात नाही. उदा. भांडवली वस्तूंची होणारी झीज.

४) **विदेशी निव्वळ उत्पन्न :** राष्ट्रीय उत्पन्नात परदेशांतून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाचा समावेश केला जातो. निर्यात मूल्य आणि आयात मूल्य (X–M) आणि परदेशातून मिळालेले उत्पन्न आणि परदेशाला दिलेली देणी (R–P) यांच्यातील निव्वळ फरक विचारात घेतला जातो.

५) **आर्थिक वर्ष :** राष्ट्रीय उत्पन्न नेहमी कालावधीच्या संदर्भात व्यक्त केले जाते. भारतात आर्थिक वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे आहे.

६) **प्रवाही संकल्पना :** राष्ट्रीय उत्पन्न ही एक प्रवाही संकल्पना असून एका आर्थिक वर्षाच्या कालावधीत अर्थव्यवस्थेत उत्पादित वस्तू व सेवांचा प्रवाह दर्शविते.

७) **पैशांत व्यक्त केलेले मूल्य :** राष्ट्रीय उत्पन्न नेहमी पैशांत व्यक्त केले जाते. ज्या वस्तू आणि सेवांना पैशाच्या स्वरूपातील मूल्य/विनिमय मूल्य असते. अशाच वस्तू व सेवांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जातो.

### राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्रीय प्रवाह :

राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्रीय प्रवाह ही स्थूल अर्थशास्त्रातील मूलभूत संकल्पना आहे. आर्थिक देवाणघेवाणीतून उत्पादन प्रवाह आणि पैशाच्या प्रवाहांची निर्मिती राष्ट्रीय उत्पन्नाच्या चक्रीय प्रवाहात होते.

### राष्ट्रीय उत्पन्नाचे चक्रीय प्रवाह खालीलप्रमाणे :

१) द्विक्षेत्रीय राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्रियप्रवाह = कुटुंबसंस्था + उद्योगसंस्था (Y=C+I) उत्पन्न = उपभोग+गुंतवणूक

२) त्रिक्षेत्रीय राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्रीय प्रवाह = कुटुंबसंस्था + व्यवसाय+ सरकारी क्षेत्र (Y = C+I+G)


३) चारक्षेत्रीय राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्रियप्रवाह = कुटुंबसंस्था+ व्यवसाय+ सरकारी क्षेत्र + परकीय क्षेत्र (Y = C+I+G+(x–m))

द्विक्षेत्रीय राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्रीय प्रवाह खाली स्पष्ट केला आहे.

### राष्ट्रीय उत्पन्नाचे चक्रीय प्रवाहाचे द्विक्षेत्र प्रतिमान :

कुटुंबसंस्था आणि व्यवसाय क्षेत्र अशी दोन विभागात द्विक्षेत्र प्रतिमान विभागणी होते. आकृतीच्या वरच्या भागात उत्पादन घटकांची बाजारपेठ आणि खालच्या भागात वस्तू व सेवांची बाजारपेठ स्पष्ट केली आहे. याला उत्पादन घटकांचा प्रवाह म्हणतात. हे आकृतीत बाहेरील बाजूस दर्शविले आहे.

**राष्ट्रीय उत्पन्नाचे चक्रीय प्रवाह द्विक्षेत्र प्रतिमान**




**आकृती क्र.७.२**

वरील आकृतीत असे दर्शविले आहे की, उत्पादन घटकांचा प्रवाह हा कुटुंबसंस्थेकडून उद्योगसंस्थेकडे जातो. उद्योगसंस्था उत्पादन घटकांचा वापर करून कुटुंब संस्थेला आवश्यक असणाऱ्या वस्तू व सेवा उपलब्ध करून देतात, तर उलट दिशेने वस्तू व सेवांचा प्रवाह उत्पादन संस्थेकडून कुटुंबसंस्थेकडे जातो हे आकृतीत आतील बाजूस दर्शविले आहे. ही प्रक्रिया सतत चालू राहते. यासारखीच प्रक्रिया पैशाच्या प्रवाहातही चालू राहते. पैशाचा प्रवाह हा उद्योगसंस्थेकडून कुटुंबसंस्थेकडे उत्पादन घटकांच्या मोबदल्याच्या खंड, वेतन, व्याज व नफा या स्वरूपात प्रवाहित होतो. कुटुंबसंस्था त्या उत्पन्नाचा वापर वस्तू व सेवांच्या खरेदीसाठी करतात. अशा प्रकारे पैशातील उत्पन्नप्रवाह उद्योग संस्थांकडून कुटुंबसंस्थेकडे प्रवाहीत होतो. तर उलट दिशेने कुटुंबसंस्थांकडून प्रवाह उद्योगसंस्थेकडे जातो.

राष्ट्रीय उत्पन्नाच्या प्रवाहात उत्पादन घटकांचे उत्पन्न हे खर्चात रूपांतरीत होते. कारण व्यक्तीच्या गरजा कधीच संपत नाहीत. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचा सातत्याने चालू राहणारा चक्रीय प्रवाह तयार होतो.

### तुम्हांला माहीत आहे का?

- **राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्रिय प्रवाह तीन क्षेत्र प्रतिमान –** द्विक्षेत्रीय प्रतिमानातील कुटुंबसंस्था आणि उद्योगसंस्था यात शासकीय क्षेत्राचा समावेश करून तीन क्षेत्र प्रतिमान तयार केले आहे.
- **राष्ट्रीय उत्पन्नाच्या चक्रिय प्रवाहाचे चारक्षेत्र प्रतिमान –** चार क्षेत्र प्रतिमानामध्ये त्रिक्षेत्रीय प्रतिमानातील कुटुंबसंस्था, उत्पादनसंस्था व शासन या बरोबरच परकीय क्षेत्राचा समावेश केला आहे.

### राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पना :

राष्ट्रीय उत्पन्नाच्या विविध संकल्पना असून काही महत्त्वाच्या संकल्पना खालीलप्रमाणे :

१) **स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP) :** दिलेल्या वर्षात देशाच्या भौगोलिक सीमारेषेच्या आत उत्पादित होणाऱ्या अंतिम वस्तू व सेवांचे बाजारभावानुसार येणारे मूल्य म्हणजे 'स्थूल देशांतर्गत उत्पादन' होय.

GDP = C+I+G+(x–m)

**स्थू.दे.उ. = उपभोग खर्च + गुंतवणूक खर्च + सरकारी खर्च + (निर्यात–आयात)**

२) **निव्वळ देशांतर्गत उत्पादन (NDP) :** देशाच्या भौगोलिक सीमारेषेत एका वर्षाच्या कालावधीत उत्पादित केलेल्या सर्व अंतिम वस्तू व सेवांचे बाजारभावानुसार येणारे स्थूल मूल्य म्हणजे निव्वळ देशांतर्गत उत्पादन होय.

∴ NDP = GDP – Depreciation

**∴ नि.दे.उ. = स्थू.दे.उ. – घसारा खर्च**

३) **एकूण राष्ट्रीय उत्पादन (GNP) :** दिलेल्या वर्षात देशात उत्पादित होणाऱ्या अंतिम वस्तू व सेवांचे बाजारानुसार येणारे मूल्य म्हणजे राष्ट्रीय उत्पादन होय. यात बाजारभावानुसार किमतीचा विचार केला जातो.

GNP = C+I+G+(x–m) + (R–P)

**R = मिळकत (येणी), P = देणी**

**स्थू. रा.उ. = उपभोग खर्च + गुंतवणूक खर्च + सरकारी खर्च + (निर्यात–आयात) + (निव्वळ येणी – देणी)**

४) **निव्वळ राष्ट्रीय उत्पादन (NNP) :** निव्वळ राष्ट्रीय उत्पादन म्हणजे एका वर्षात देशात उत्पादित झालेल्या निव्वळ वस्तू व सेवांचे उत्पादन होय.

∴ NNP = GNP– Depreciation

**नि. रा.उ. = स्थू. रा.उ. – घसारा खर्च**

### शोधा पाहू

भारताची GDP अधिकृत आकडेवारी

### तुम्हांला माहीत हवं!

**हरित स्थूल राष्ट्रीय उत्पादन (Green GNP) :**

हरित स्थूल राष्ट्रीय उत्पादन नैसर्गिक पर्यावरणाचा शाश्वत वापर आणि विकासाच्या लाभांचे न्याय्य वितरण करणे होय.

हरित स्थूल राष्ट्रीय उत्पादन पर्यावरणीय प्रदूषण आणि नैसर्गिक स्रोतांचे प्रमाण उत्पादनामुळे कमी होणार नाही याचा विचार करते. आर्थिक कल्याणाचे मोजमाप करताना एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली म्हणजे जीवनमान सुधारले असे नाही. जर पर्यावरण प्रदूषण वाढले आणि नैसर्गिक संसाधने भविष्यातील पिढ्यांसाठी घटली तर केवळ एकूण राष्ट्रीय उत्पनात झालेली वाढ म्हणजे जीवनमान सुधारल्याचे द्योतक नाही. म्हणून हरित स्थूल राष्ट्रीय उत्पादन आर्थिक कल्याणासाठी विचारात घ्यावे लागते.

**हरित स्थूल राष्ट्रीय उत्पादनाची संकल्पना खालील वैशिष्ट्ये दर्शविते :**

अ) शाश्वत आर्थिक विकासामुळे पर्यावरणीय (प्रदूषण) व्यवस्था आणि नैसर्गिक संसाधनांची कमतरता निर्माण होत नाही.

आ) विकासाच्या लाभांचे न्याय्य वितरण करणे.

इ) दीर्घकालीन आर्थिक कल्याणासाठी प्रोत्साहन देणे.

**सूत्र :** Green GNP = GNP – Net Fall in the Natural Capital

म्हणजे, हरित स्थूल राष्ट्रीय उत्पादन = स्थूल राष्ट्रीय उत्पादन– नैसर्गिक भांडवलसाठ्यातील निव्वळ घसरण



**शोधा पाहू**

हरित स्थूल राष्ट्रीय उत्पादन ही संकल्पना राबवणाऱ्या ५ देशांची नावे शोधा.


**राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या पद्धती :**

राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या तीन पद्धती आहेत.

१) उत्पादन पद्धती

२) उत्पन्न पद्धती

३) खर्च पद्धती




१) **उत्पादन पद्धती :** राष्ट्रीय उत्पन्न मापनाची उत्पादन पद्धत किंवा मालसाठा पद्धत म्हणून ओळखली जाते. या पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करण्यासाठी उत्पादनावर लक्ष केंद्रित केले जाते. अर्थव्यवस्थेची शेती, खाणव्यवसाय, यांत्रिक उत्पादन, लहान उपक्रम, वाणिज्य, वाहतूक, दळणवळण आणि इतर सेवा अशा विविध क्षेत्रांत विभागणी केली जाते. एका वर्षाच्या कालावधीत उत्पादित केलेल्या अंतिम वस्तू तयार होईपर्यंत वस्तूच्या उत्पादनातील प्रत्येक टप्प्यात झालेल्या वर्धित मूल्यांची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन केले जाते.

स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचे दुहेरी मापन टाळण्यासाठी उत्पादन पद्धतीत दोन पर्यायी पद्धती सांगितल्या आहेत.

अ) **अंतिम वस्तू पद्धती :** अंतिम वस्तू म्हणजे अशा वस्तू, ज्या उपभोगासाठी वापरल्या जातात. या पद्धतीनुसार प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय क्षेत्रातून उत्पादित केलेल्या सर्व अंतिम वस्तू व सेवांच्या बाजारमूल्यांची बेरीज केली जाते. मध्यम वस्तू आणि सेवांचे मूल्य विचारात घेतले जात नाही. अंतिम वस्तूंच्या उत्पादन प्रक्रियेत मध्यम वस्तूंचा वापर करतात. म्हणजेच अंतिम वस्तूंच्या मूल्यात मध्यम वस्तूंच्या मूल्याचा समावेश केलेला असतो.

उदा., ब्रेडच्या किमतीत गव्हाच्या, तसेच गव्हाचे पीठ तयार करण्याच्या किमतीचा समावेश केलेला असतो. गहू, गव्हाचे पीठ या मध्यम वस्तू आहेत. उत्पादन प्रक्रियेत या वस्तूंचे मूल्य दिलेले असते. म्हणून ब्रेड या अंतिम वस्तूत मध्यम वस्तूंचे मूल्य मोजलेले असते.

म्हणजेच अंतिम वस्तूंच्या मूल्याबरोबर जेव्हा मध्यम वस्तूंचे मूल्य मोजले जाते तेव्हा दुहेरी गणना होते. दुहेरी मापन टाळण्यासाठी फक्त अंतिम वस्तूंचेच मूल्य मोजले पाहिजे.

ब) **मूल्यवर्धित पद्धती :** राष्ट्रीय उत्पन्नाची दुहेरी गणना टाळण्यासाठी मूल्यवर्धित पद्धती वापरतात. यामध्ये वस्तूच्या उत्पादनातील प्रत्येक टप्प्यावर तिच्या मूल्यात झालेली वाढ विचारात घेतली जाते. उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यात अंतिम वस्तूचे मूल्य आणि उत्पादन आदाने यांच्या मूल्यांतील फरक म्हणजे मूल्यवृद्धी होय. थोडक्यात, अंतिम वस्तू तयार होईपर्यंत प्रत्येक टप्प्यात झालेल्या वर्धित मूल्यांची बेरीज करून स्थूल राष्ट्रीय उत्पादन काढले जाते.

मूल्यवर्धित पद्धतीने स्थूल राष्ट्रीय उत्पादनाची गणना कशी केली जाते हे खालील उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्ट होईल.

**तक्ता क्र.७.१ मूल्यवर्धित उत्पादन दृष्टिकोन**

| उत्पादनाची पायरी | उत्पादनाचे बाजारमूल्य (₹) | आदानांचे मूल्य (₹) | वर्धित मूल्य (₹) |
|---|---|---|---|
| कापूस | १५० | ० | १५० |
| सूत | २५० | १५० | १०० |
| कापड | ४०० | २५० | १५० |
| शर्ट (अंतिम वस्तू) | ५०० | ४०० | १०० |
| **एकूण मूल्य** | | | ५०० |

मूल्यवर्धित उत्पादन पद्धतीत प्रत्येक टप्प्यावर समाविष्ट केलेले मूल्य हे अंतिम उत्पादनामधून कच्च्या मालाचे मूल्य कमी करून मोजदाद केली जाते. विविध टप्प्यांत समाविष्ट केलेले मूल्यांची बेरीज हे एकूण राष्ट्रीय उत्पादनात समाविष्ट केली जाते. वरील तक्त्यामध्ये अंतिम वस्तू (शर्ट) ₹ ५००/- आहे. उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यावर समाविष्ट केल्या जाणाऱ्या उत्पादनाचे मूल्यवर्धित मूल्य १०० + १५० + १५० + १०० = ₹ ५००/- इतके आहे. अशा प्रकारे समाविष्ट केलेले मूल्य हे अंतिम वस्तूंच्या मूल्याइतकेच आहे.

**दक्षता :**

उत्पादन पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना घ्यावयाची दक्षता.

१) दुहेरी गणना टाळण्यासाठी फक्त अंतिम वस्तू व सेवांचे मूल्य मोजले जाते.

२) शेतकऱ्यांनी स्वत:च्या उपभोगासाठी वापरलेल्या वस्तूंचे मूल्य अंदाजे काढले जाते. म्हणजे स्वत:च्या उपभोगासाठी

उत्पादित केलेल्या वस्तूंच्या मूल्यांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करावा.

३) राष्ट्रीय उत्पन्नाच्या अचूक अंदाजासाठी बाजार किमतीत समाविष्ट केलेली अप्रत्यक्ष कराची रक्कम वगळली जाते. तसेच काही वस्तूंसाठी शासनाने दिलेली अनुदानाची रक्कम मोजावी.

४) राष्ट्रीय उत्पन्न मोजताना वेगवेगळ्या वर्षांतील वस्तूंच्या किमतीतील बदलांची दखल घ्यावी.

५) निर्यात मूल्य मिळविले जाते आणि आयात मूल्य वगळले जाते.

६) भांडवली वस्तूंची झालेली झीज/घसारा मूल्य राष्ट्रीय उत्पन्नात मोजू नये.

७) जुन्या वस्तूंची खरेदी-विक्री राष्ट्रीय उत्पन्नात मोजली जात नाही. कारण ते चालू वर्षातील उत्पादन नसते.

अविकसित देशांत मोठ्या प्रमाणावर उत्पादन पद्धतीचा वापर करतात. उत्पादन पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना अनेक अडचणी येत असल्यामुळे या पद्धतीची विश्वासार्हता कमी आहे. भारतात या पद्धतीने शेती, खाणकाम, हस्तव्यवसाय, यांत्रिक उत्पादन या क्षेत्रांतील उत्पन्नाची मोजणी केली जाते. पण उत्पादन पद्धतीने वाहतूक, वाणिज्य आणि दळणवळण क्षेत्रांतील राष्ट्रीय उत्पन्न मोजले जात नाही.

## २) उत्पन्न पद्धती :

राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या उत्पन्न पद्धतीला घटक खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न पद्धती असेही म्हणतात. या पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करण्यासाठी विभाजनावर लक्ष केंद्रित केले जाते.

या पद्धतीत एका वर्षाच्या कालावधीत देशातील नागरिकांना मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्न मोजले जाते. वस्तू व सेवांच्या उत्पादनासाठी सर्व उत्पादन घटकांना खंड, मजुरी, व्याज आणि नफा या स्वरूपात उत्पन्न प्राप्त होते. सर्व उत्पादन घटकांना मिळणाऱ्या घटक मोबदल्यांची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्न मोजले जाते. सर्व उत्पादन घटकांना वितरित केलेल्या उत्पन्नाची बेरीज राष्ट्रीय उत्पन्नाइतकी येते. या पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्न मोजताना हस्तांतरित देणी वगळली जातात. करविषयक माहितीपत्रके, अहवाल, लेखापुस्तके, अल्प उत्पन्नासंबंधीचे अंदाज या स्रोतांपासून उत्पन्नाची आकडेवारी प्राप्त करता येते. दिलेल्या कालावधीत वस्तू आणि सेवांच्या उत्पादन कार्यात सहभागी झालेल्या उत्पादन घटक मालकांना मिळणाऱ्या घटक मोबदल्यांची बेरीज करून जे उत्पन्न येते, त्याला स्थूल राष्ट्रीय उत्पादन मानले जाते.

उत्पन्न पद्धतीनुसार स्थूल राष्ट्रीय उत्पादन मापनाचे सूत्र

NI =rent + wages + interest + profit + mixed income + net income from abroad.

राष्ट्रीय उत्पन्न = खंड+ वेतन+ व्याज+ नफा+ मिश्र उत्पन्न+ निव्वळ विदेशी उत्पन्न

### दक्षता :

उत्पन्न पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना घ्यावयाच्या दक्षता.

१) शिष्यवृत्ती, भेटी, देणग्या, दान, निवृत्ती वेतन, बेकारी भत्ता इ. सारख्या हस्तांतरित उत्पन्न किंवा हस्तांतरीत देणी यांची रक्कम एकूण उत्पन्नातून वगळावी.

२) गृहिणींच्या सेवा, शिक्षकांनी स्वत:च्या पाल्याला शिकवणे, अशा विनामूल्य सेवा राष्ट्रीय उत्पादनात मोजू नये.

३) घर, गाडी यांसारख्या जुन्या वस्तूंची विक्री करून जे उत्पन्न मिळते त्याचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करू नये.

४) समभाग आणि रोख्यांच्या विक्रीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करू नये. कारण त्यामुळे वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात कोणतीही भर पडत नाही.

५) प्रत्यक्ष करापासून शासनाला मिळणारा महसूल राष्ट्रीय उत्पन्नात धरू नये. कारण हा महसूल म्हणजे शासनाला मिळणारे हस्तांतरित उत्पन्न असते.

६) उद्योगसंस्थांचा अवितरित नफा, शासकीय मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्न, पाणीपुरवठा यांसारख्या सार्वजनिक उपक्रमांपासून मिळणारा नफा राष्ट्रीय उत्पन्नात मोजावा.

७) स्वत:च्या उपभोगासाठी वापरलेल्या वस्तूंचे मूल्य आणि स्वत:च्या मालकीच्या घराचे मूल्य राष्ट्रीय उत्पन्नात मोजावे.

भारतात मध्यवर्ती सांख्यिकीय संघटनेची राष्ट्रीय उत्पन्न समिती व्यापार, वाहतूक, व्यावसायिक, सार्वजनिक प्रशासन, घरगुती सेवा इ. क्षेत्रांतील उत्पन्न, उत्पन्न पद्धतीच्या साहाय्याने मोजले जाते.

### ३) खर्च पद्धती :

खर्च पद्धतीनुसार एका वर्षाच्या कालावधीत देशात होणाऱ्या एकूण खर्चाचे मोजमाप केले जाते. एका वर्षाच्या कालावधीत सर्व व्यक्ती, उद्योगसंस्था आणि शासनाने केलेल्या उपभोगावरील खर्चाची आणि गुंतवणुकीवरील खर्चाची बेरीज म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय.

खर्च पद्धतीनुसार स्थूल राष्ट्रीय उत्पादन मापनाचे सूत्र :

NI = C + I + G + [X–M] + [R–P]

राष्ट्रीय उत्पन्न = उपभोग + गुंतवणूक + सरकारी खर्च + (निर्यात+आयात)+(परकीय निव्वळ प्राप्ती)

१) **खाजगी अंतिम उपभोग खर्च (C) :** खासगी अंतिम उपभोग खर्च म्हणजे कुटुंबांनी अन्न, वस्त्र यांसारख्या वस्तूंवर केलेला खर्च, ज्या लगेच वापरल्या जातात. टिकाऊ वस्तूंवरील खर्च, जसे गाडी, संगणक, दूरदर्शन, धुलाई यंत्र इ. वरील खर्च ज्या जास्त दिवस वापरल्या जातात आणि सेवांवरील खर्च जसे वाहतूक सेवा, वैद्यकीय सेवा इ.

२) **स्थूल देशांतर्गत खाजगी गुंतवणूक खर्च (I) :** खाजगी उद्योजकांनी पुन:स्थापन, नविनीकरण आणि नवीन गुंतवणुकीवर केलेला खर्च म्हणजे स्थूल देशांतर्गत खाजगी गुंतवणूक खर्च होय.

३) **सरकारी अंतिम उपभोग खर्च आणि गुंतवणूक खर्च (G):**

अ) सरकारकडून प्रशासकीय सेवा, कायदा आणि सुव्यवस्था, संरक्षण, शिक्षण, आरोग्य इ. वर केलेला खर्च म्हणजे सरकारी अंतिम उपभोग खर्च होय.

ब) सरकारी गुंतवणूक खर्च म्हणजे रस्ते, रेल्वे, पूल, धरणे, कालवे इ. आधारभूत संरचना निर्माण करण्याकरिता केलेला खर्च.

४) **निव्वळ विदेशी गुंतवणूक/निव्वळ निर्यात (X–M) :** एका वर्षाच्या कालावधीतील देशाच्या निर्यात मूल्य आणि आयात मूल्यातील फरक म्हणजे निव्वळ निर्यात होय.

५) **निव्वळ प्राप्ती (R–P) :** परदेशी नागरिकांनी देशातील वस्तू व सेवांवर केलेला खर्च आणि देशातील नागरिकांनी परदेशी वस्तू व सेवांवर केलेला खर्च यातील फरक म्हणजे निव्वळ प्राप्ती होय.

R = परदेशी नागरिकांनी देशातील वस्तू व सेवांवर केलेला खर्च

P = देशातील नागरिकांनी परदेशी वस्तू व सेवांवर केलेला खर्च.

### दक्षता :

खर्च पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना घ्यावयाच्या दक्षता.

१) दुहेरी गणना टाळण्यासाठी सर्व प्रकारच्या अंतरिम वस्तूंवरील खर्च राष्ट्रीय उत्पन्नात समाविष्ट करू नये.

२) जुन्या वस्तूंच्या विक्रीसाठी केलेल्या खर्चाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करू नये. कारण तो चालू वर्षाच्या उत्पादनावर केला जात नाही.

३) शिष्यवृत्ती, निवृत्तीवेतन, बेकारी भत्ता यांसारखी हस्तांतरित देणी राष्ट्रीय उत्पन्नात समाविष्ट करू नयेत.

४) भाग, रोखे, कर्जरोखे इ. सारख्या वित्तीय जिंदगीवरील खर्चाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करत नाहीत. कारण या व्यवहारांमुळे वस्तू आणि सेवांच्या प्रवाहात वाढत होत नाही.

५) अप्रत्यक्ष कराची रक्कम राष्ट्रीय उत्पन्नात मोजू नये.

६) अंतिम वस्तू आणि सेवांवरील खर्चाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करावा.

७) अनुदानाची रक्कम राष्ट्रीय उत्पन्नात मोजावी.

वरील तिन्ही पद्धतींपैकी उत्पादन पद्धतीचा आणि उत्पन्न पद्धतीचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. अमेरिका आणि इंग्लंडसारख्या प्रगत देशांमध्ये उत्पन्न पद्धती लोकप्रिय आहे. काही व्यवहारिक अडचणींमुळे खर्च पद्धतीचा वापर क्वचित केला जातो. भारताचे राष्ट्रीय उत्पन्न मोजण्यासाठी केंद्रिय सांख्यिकीय संघटना उत्पादन पद्धतीचा आणि उत्पन्न पद्धतीचा उपयोग करते.

**तुम्हांला माहीत हवं!**

मिश्र उत्पन्न म्हणजे स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्तींचे उत्पन्न होय. जे स्वत:ची जमीन, कामगार, भांडवल आणि उद्योजकतेचा वापर विविध वस्तू आणि सेवांच्या निर्मितीसाठी करतात.

### राष्ट्रीय उत्पन्न गणनेतील (मापनातील) अडचणी :

राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करणे अतिशय अवघड आणि क्लिष्ट काम आहे. राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना खालील अडचणी उद्भवतात.

अ) **तात्त्विक अडचणी :** यालाच संकल्पनात्मक अडचणी असेही म्हणतात.

१) **हस्तांतरित देणी :** व्यक्तीला मिळणारे निवृत्तीवेतन, बेकारी भत्ता याला हस्तांतरित देणी म्हणतात. याचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करणे कठीण असते. कारण एका बाजूने हे व्यक्तीला मिळणारे उत्पन्न असते, तर दुसऱ्या बाजूने तो सरकारचा खर्च असतो. म्हणून अशी हस्तांतरित देणी राष्ट्रीय उत्पन्नात मोजली जात नाहीत.

२) **बेकायदेशीर व्यवहारांपासून मिळणारे उत्पन्न :** जुगार, काळ्या बाजारातील खरेदी-विक्री, तस्करी इ. बेकायदेशीर व्यवहारांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही. अशा सर्व वस्तूंना मूल्य असते व त्या उपभोक्त्यांच्या गरजादेखील भागवितात. अशा उत्पन्नास सरकारी मान्यता नसल्याने त्याचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही. तेवढ्या प्रमाणात राष्ट्रीय उत्पन्नाचे न्यून अनुमान होते.

३) **विनामूल्य सेवा :** राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप नेहमीच पैशात केले जाते. परंतु बऱ्याच वस्तू आणि सेवा अशा असतात, ज्यांचे मूल्य पैशात मोजता येत नाही. उदा., छंद म्हणून व्यक्तीने काढलेली चित्रे, आईने मुलांचे केलेले संगोपन इ. सेवा राष्ट्रीय उत्पन्नात मोजल्या जात नाहीत कारण या सेवांचा मोबदला दिला जात नाही. त्याचबरोबर गृहिणींच्या सेवा, सहानुभूती, आपुलकी, दया, करुणा या भावनेतून पुरविलेल्या सेवा राष्ट्रीय उत्पन्नात समाविष्ट करत नाहीत, कारण त्या विनामोबदला असतात. अशा विनामोबदला सेवांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नसल्यामुळे, आहे त्यापेक्षा राष्ट्रीय उत्पन्न कमी होते.

४) **स्व-उपभोगासाठीचे उत्पादन :** अन्नधान्य, भाजीपाला आणि इतर शेती उत्पादने जी स्व-उपभोगासाठी उत्पादित केली जातात, ती बाजारात विक्रीसाठी येत नाहीत. पण अशा वस्तूंचे मूल्य बाजारभावानुसार निश्चित करून, अशा वस्तूंची अंदाजे किंमत राष्ट्रीय उत्पन्नात समाविष्ट केली जाते.

५) **परकीय कंपन्यांचे उत्पन्न :** आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संघटनेच्या मते परकीय कंपन्या ज्या देशात उत्पादन करतात त्या उत्पादित वस्तूंचा समावेश त्या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात केला जातो. परकीय कंपन्यांना होणाऱ्या नफ्याचा समावेश मात्र त्यांच्या मूळ देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात केला जातो.

६) **सरकारी क्षेत्र :** शासनाकडून संरक्षण, सार्वजनिक प्रशासन, कायदा आणि सुव्यवस्था इ. अनेक सार्वजनिक सेवा पुरविल्या जातात. अशा सार्वजनिक सेवांचे मूल्य निश्चित करणे अवघड असते. कारण अशा सेवांचे वास्तव मूल्य माहीत नसते म्हणून अशा सार्वजनिक सेवा अंतिम सेवा म्हणून राष्ट्रीय उत्पन्नात समाविष्ट केल्या जातात.

७) **किमतीतील बदल :** किमतीत होणाऱ्या बदलामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना अडचणी येतात. देशातील वस्तू आणि सेवांच्या किमती वाढल्या तर बाजार किमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाल्याचे दिसून येते. म्हणजे देशातील वस्तुरूप उत्पादन कमी झाले तरी किमतवाढीमुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढत होते.

### ब) व्यावहारिक अडचणी :

राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना उत्पादकाची पूर्ण आणि खात्रीशीर सांख्यिकीय माहिती संकलित करताना अनेक अडचणी येतात. त्यांपैकी काही अडचणी पुढीलप्रमाणे,

१) **दुहेरी गणनेची समस्या :** राष्ट्रीय उत्पन्न मोजताना येणारी सर्वांत मोठी अडचण म्हणजे दुहेरी गणना. एखादी वस्तू मध्यम आहे की अंतिम आहे हे निश्चित करणे अवघड असल्यामुळे बऱ्याच वस्तूंची गणना दोनदा होण्याची भीती असते. त्यामुळे वास्तविक राष्ट्रीय उत्पन्न अनेक पटींनी अधिक दिसते. उदा., बेकरीत जे पीठ वापरले जाते त्याला मध्यम वस्तू म्हणून संबोधले जाते. पण तेच पीठ जर कुटुंबाकडून वापरले गेले तर ते अंतिम वस्तू म्हणून गणले जाते.

२) **अमौद्रिक क्षेत्राचे अस्तित्व :** भारतासारख्या विकसनशील देशात मोठ्या प्रमाणावर अमौद्रिक क्षेत्र अस्तित्वात आहे. शेती व्यवसाय अजूनही उदरनिर्वाहासाठी केला जातो. शेती उत्पादनाचा बराच मोठा भाग वैयक्तिक उपभोगासाठी वापरला जातो. तसेच उत्पादनाच्या काही भागाचा इतर वस्तू आणि सेवांच्या बदल्यात विनिमय केला जातो. अशा उत्पादनाचे आणि उपभोगाचे मापन राष्ट्रीय उत्पन्नात केले जाऊ शकत नाही.

३) **अपुरी आणि अविश्वसनीय सांख्यिकी आकडेवारी :** विकसनशील देशांत उत्पादन आणि खर्चाविषयीची पुरेशी आणि अचूक माहिती उपलब्ध नसते. शेती, मत्स्य व्यवसाय, पशुपालन, वनउत्पादने, किरकोळ व्यावसायिक, बांधकामावरील कामगार, छोटे व्यावसायिक इ. च्या उत्पन्नासंबंधीची अचूक व विश्वासार्ह माहिती उपलब्ध नसते. उत्पन्न पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना अनर्जित उत्पन्नासंबंधीची माहिती, ग्रामीण व शहरी

भागातील उपभोग आणि गुंतवणुकीचा खर्च यांची देखील माहिती उपलब्ध नसते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाची नेमकी आकडेवारीच उपलब्ध होत नाही.

४) **घसारा :** भांडवली वस्तूंच्या वापरामुळे भांडवली वस्तूंची जी झीज होते त्याचे मापन करणे अवघड असते. उत्पादन प्रक्रियेमध्ये वापरल्या जाणाऱ्या भांडवली वस्तू व यंत्रसामग्रीची होणारी झीज म्हणजे घसारा होय. भांडवली वस्तू व यंत्रसामग्रीची होणारी झीज भांडवली मालमत्तेचे तांत्रिक आयुष्य, भांडवली वस्तूंचा वापर, वस्तूचे स्वरूप, वस्तूची नियमित आणि काळजीपूर्वक देखभाल इ. अनेक गोष्टींवर अवलंबून असते. भांडवली वस्तू वेगवेगळ्या प्रकारच्या असल्यामुळे घसारा मोजण्यासाठी एकसमान, सामाईक, स्वीकार्य असे प्रमाणदर अस्तित्वात नाहीत. घसारा मोजण्यासाठी बऱ्याच गोष्टी गृहीत धराव्या लागतात. त्यामुळे घसाऱ्याची अचूक रक्कम उपलब्ध होणे अवघड असते.

५) **भांडवली लाभ किंवा भांडवली तोटा :** मालमत्ताधारकांना मागणीतील बदलामुळे किंवा बाजारभावात वाढ झाल्यामुळे जो भांडवली लाभ होतो किंवा बाजारभावात घट झाल्यामुळे जो भांडवली तोटा होतो, त्याचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही. कारण चालू आर्थिक व्यवहारांमुळे हे बदल घडून येत नाहीत.

६) **निरक्षरता आणि अज्ञान :** विकसनशील देशांत बहुतांश छोटे उत्पादक निरक्षर आणि अज्ञानी असतात. त्यामुळे ते आपल्या उत्पादनासंबंधीच्या नोंदी ठेवू शकत नाहीत. म्हणून स्वत:च्या उत्पादनाची किंवा उत्पादनमूल्याची माहिती देऊ शकत नाहीत. म्हणजे त्यांच्या उत्पादनाचे किंवा अर्जित उत्पन्नाचे अंदाज व्यक्त केले जातात.

७) **व्यावसायिक विशेषीकरणाचा अभाव :** विकसनशील देशात व्यावसायिक विशेषीकरणाचा अभाव असल्याने उत्पादन पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना अडचणी येतात. उदा., विकसनशील देशात शेतकरी शेती या प्रमुख व्यवसायाबरोबरच दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, कपडे शिवणे इ. इतर व्यवसायदेखील करतात. इतर व्यवसायांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची माहिती राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना दिली जात नाही. त्यामुळे देशाचे खरे उत्पन्न समजत नाही.

८) **मालाच्या साठ्याचे मूल्य :** उत्पादकाकडे कच्चा माल, मध्यम वस्तू, अर्धसिद्ध वस्तू, अंतिम वस्तू यांचा असणारा साठा म्हणजे मालसाठा होय. मालसाठ्याच्या मूल्यात होणाऱ्या सकारात्मक आणि नकारात्मक बदलांचा समावेश स्थूल राष्ट्रीय उत्पादनात केला जातो. मालसाठ्याच्या मूल्यमापनात झालेली चूक अंतिम वस्तूच्या मूल्यात बदल करू शकते. म्हणून मालसाठ्याचे मूल्यमापन काळजीपूर्वक करावे लागते.

### राष्ट्रीय उत्पन्नाचे महत्त्व :

राष्ट्रीय उत्पन्नाचे महत्त्व खालील मुद्द्यांवरून स्पष्ट करता येते.

१) **अर्थव्यवस्थेला उपयुक्त :** देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी राष्ट्रीय उत्पन्नाची माहिती असणे महत्त्वाचे आहे. सध्या राष्ट्रीय उत्पन्नाची माहिती अर्थव्यवस्थेतील महत्त्वपूर्ण भाग आहे. याला सामाजिक लेखाखाती म्हणून ओळखले जाते. या खात्यात देशाचे एकूण उत्पन्न, उत्पादन आणि विविध वैयक्तिक स्तरांवरील उत्पादनाचे निष्कर्ष, उद्योगांचे उत्पादन आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातून मिळणारे उत्पन्न इत्यादी एकमेकांशी संबंधित आहेत.

२) **राष्ट्रीय धोरणे :** राष्ट्रीय धोरणात राष्ट्रीय उत्पन्नाची माहिती आधार म्हणून उपयुक्त ठरते. जसे की, रोजगार धोरण, औद्योगिक धोरण, कृषी धोरण इत्यादी. औद्योगिक उत्पादन, गुंतवणूक आणि बचत इत्यादी वाढीसाठी यातून दिशा मिळते. तसेच राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारींची मदत आर्थिक प्रतिमानाच्या निर्मितीसाठी होते. जसे – गुंतवणूक प्रतिमान, वृद्धी प्रतिमान इत्यादी अर्थव्यवस्था योग्य मार्गावर आणण्यासाठी बदल करता येतात.

३) **आर्थिक नियोजन :** आर्थिक नियोजनाकरिता राष्ट्रीय उत्पन्नाशी संबंधित असलेली आकडेवारी अतिशय महत्त्वपूर्ण असते. या आकडेवारीत विविध साधनसामग्रीतून प्राप्त केलेले एकूण उत्पन्न, उत्पादन, बचत, गुंतवणूक आणि उपभोग यांचा समावेश होतो.

४) **आर्थिक संशोधन :** अर्थशास्त्राचे संशोधक, तज्ज्ञ यांच्याकडून राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा वापर केला जातो. ते देशातील विविध माहितींचा वापर करतात. कच्चा माल, उत्पादन, उत्पन्न, बचत, उपभोग, गुंतवणूक, रोजगार इत्यादी सामाजिक घटकांचा विचार होतो.

५) **राहणीमानाची तुलना :** वेगवेगळ्या देशांतील लोकांच्या राहणीमानाची तुलना करण्यास राष्ट्रीय उत्पन्नाच्या

अभ्यासाची मदत होते आणि सारख्याच देशातील वेगवेगळ्या काळांतील राहणीमानाची तुलना करण्यास मदत करते.

६) **उत्पन्नाचे वितरण :** राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून आपणांस देशाच्या उत्पन्नाच्या वितरणाबद्‌दल माहिती मिळवता येते. मजुरी, खंड, व्याज आणि नफा यांच्याशी संबंधित माहितीतून आपणांस समाजातील विविध घटकांमध्ये असणारी तफावत लक्षात येते.

## स्वाध्याय

**प्र. १. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा :**

१) राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना फक्त अंतिम वस्तू व सेवांचे मूल्य समाविष्ट होते कारण –
अ) गणना करणे सोपे होते.
ब) दुहेरी मोजमाप टाळले जाते.
क) देशातील लोकांचे महत्तम कल्याण साधले जाते.
ड) राष्ट्राच्या एकूण आर्थिक कामगिरीचे मूल्यमापन केले जाते.

२) निव्वळ देशांतर्गत उत्पादनाचे मापन करण्याची पद्धत खालीलप्रमाणे आहे –
अ) स्थूल राष्ट्रीय उत्पादनातून घसारा मूल्य वजा करणे.
ब) स्थूल देशांतर्गत उत्पादनातून घसारा वजा करणे.
क) स्थूल देशांतर्गत उत्पादनात घसाऱ्याचा समावेश करणे.
ड) स्थूल राष्ट्रीय उत्पादनात घसाऱ्याचा समावेश करणे.

३) भारतात राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना या पद्‌धतीचा वापर केला जातो.
अ) उत्पादन पद्‌धती
ब) उत्पन्न पद्‌धती
क) खर्च पद्‌धती
ड) उत्पादन पद्‌धती आणि उत्पन्न पद्‌धती यांचे एकत्रीकरण

**प्र. २. सहसंबंध पूर्ण करा :**

१) [ ] : उपभोग खर्च + गुंतवणूक खर्च +: सरकारी खर्च + (निर्यात–आयात) :: स्थूल राष्ट्रीय उत्पादन : उपभोग खर्च + गुंतवणूक खर्च+ सरकारी खर्च + (निर्यात–आयात) + (निव्वळ येणी–देणी)

२) उत्पादन पद्‌धत : [ ] :: उत्पन्न पद्‌धत : घटक पद्‌धती

३) तात्त्विक अडचण : हस्तांतरित देणी :: [ ] : मालाच्या साठ्याचेमूल्य

**प्र. ३. योग्य पर्याय निवडा :**

**१) चुकीची जोडी शोधा.**

| | |
|---|---|
| १) राष्ट्रीय उत्पन्न समिती | अ) १९४९ |
| २) आर्थिक वर्ष | ब) १ एप्रिल–३१ मार्च |
| ३) उत्पन्न पद्‌धत | क) राष्ट्रीय उत्पन्न = खंड+वेतन + व्याज+नफा+एकत्रित/मिश्र उत्पन्न+निव्वळ विदेशी उत्पन्न |
| ४) खर्च पद्‌धत | ड) राष्ट्रीय उत्पन्न = खंड+ वेतन+ व्याज+नफा |

**पर्याय :** १) अ २) ब ३) क ४) ड

**प्र. ४. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा :**

१) वृंदाला राज्य सरकारकडून दरमहा ₹ ५००० /– निवृत्तीवेतन मिळते.

२) वीरूने ५०० कि.ग्रॅ. गहू उत्पादनापैकी १०० कि.ग्रॅ. उत्पादन त्याच्या कुटुंबासाठी बाजूला ठेवले.

३) शितलने तिच्या बेकरीसाठी पिठाच्या गिरणीतून गव्हाचे पीठ विकत घेतले.

४) शोभाने देशातील २०१९–२०२० या आर्थिक वर्षातील सर्व अंतिम वस्तू व सेवांच्या आर्थिक मूल्यासंबंधी माहिती गोळा केली.

५) राजेंद्रच्या दुकानात एकूण ५०० जेलपेनचा साठा आहे ज्यात मागील आर्थिक वर्षातील २०० जेलपेनचा समावेश आहे.

**प्र. ५. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

१) राष्ट्रीय उत्पन्नाच्या चक्रीय प्रवाहाचे द्विक्षेत्र प्रतिमान स्पष्ट करा.

२) राष्ट्रीय उत्पन्नाचे महत्त्व स्पष्ट करा.

३) राष्ट्रीय उत्पन्नाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४) हरित स्थूल राष्ट्रीय उत्पादनाची संकल्पना स्पष्ट करा.

**प्र. ६. खालील विधानांशी आपण सहमत आहात किंवा नाही ते सकारण स्पष्ट करा :**

१) राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना अनेक तात्त्विक अडचणी येतात.


२) दुहेरी गणना टाळण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न मोजताना उत्पादन पध्दतीतील मूल्यवर्धित पध्दतीचा वापर केला जातो.

**प्र. ७. सविस्तर उत्तरे लिहा :**

१) राष्ट्रीय उत्पन्न मापनात येणाऱ्या व्यवहारिक अडचणी स्पष्ट करा.

२) राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या उत्पन्न पद्‌धती आणि खर्च पद्‌धती स्पष्ट करा.

# ८ भारतातील सार्वजनिक वित्त व्यवहार (Public Finance in India)



आकृती ८.१

**प्रस्तावना :**

सार्वजनिक वित्तव्यवहार ही अभ्यासशाखा अर्थशास्त्राच्या जुन्या शाखांपैकी एक असून यात अर्थव्यवस्थेतील शासनाच्या भूमिका आणि कार्यावर प्रकाश टाकला जातो. शासन म्हणजे विशिष्ट प्रदेशातील विविध कार्ये पार पाडण्यासाठी नागरिकांनी निर्माण केलेली औपचारिक किंवा अनौपचारिक संस्था होय. परकीय आक्रमणापासून संरक्षण, खाजगी मालमत्तेचे संरक्षण, रोजगार निर्मिती, अंतर्गत शांतता व सुव्यवस्था राखणे, आरोग्य, शिक्षण अशा सामाजिक गरजांची तरतूद करणे वगैरे कार्ये शासनाकडे सोपवली जातात.

या कार्याचे वर्गीकरण असे करता येते.

१) **सक्तीची कार्ये :** परकीय आक्रमणापासून संरक्षण अंतर्गत कायदा व सुव्यवस्था राखणे इत्यादी शासनाची सक्तीची कार्ये आहेत.

२) **ऐच्छिक कार्ये :** शिक्षण व आरोग्य सेवांची तरतूद, निवृत्ती वेतन आणि इतर कल्याणकारी सामाजिक सुरक्षा, उपाय योजनाची तरतूद इत्यादी ही शासनाची ऐच्छिक कार्ये आहेत.

**शोधा पाहू!**

शासनाच्या वरील कार्यांव्यतिरिक्त इतर सक्तीची कार्ये आणि ऐच्छिक कार्ये शोधा.

**सार्वजनिक वित्त व्यवहाराचे अर्थ व स्वरूप**

वर उल्लेख केलेली कार्ये पुरेशा प्रमाणात आणि कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी कोणत्याही शासनाला विविध मार्गांनी मिळणाऱ्या निधीची आवश्यकता असते. 'सार्वजनिक वित्तव्यवहार' ही संकल्पना 'सार्वजनिक' आणि 'वित्त व्यवहार' या दोन शब्दांचे मिश्रण आहे. 'सार्वजनिक' हे समुच्चित नाव एखाद्या प्रशासकीय भूभागात राहणाऱ्या व्यक्ती समूहासाठी संबोधले जाते. 'वित्त व्यवहार' म्हणजे सोप्या शब्दांत 'उत्पन्न' आणि 'खर्च' होय. अशा प्रकारे 'सार्वजनिक वित्त व्यवहार' म्हणजे केंद्र, राज्य व स्थानिक शासनाच्या उत्पन्न आणि खर्चाच्या तत्त्वांचा अभ्यास होय. हा अभ्यास अर्थशास्त्रातील 'सार्वजनिक वित्त व्यवहार' या शाखेत केला जातो.

**सार्वजनिक वित्त व्यवहारांच्या व्याख्या :**

विविध अर्थशास्त्रज्ञांनी 'सार्वजनिक वित्त व्यवहाराच्या' व्याख्या आपापल्या परीने केलेल्या आहेत. यांपैकी काही व्याख्यांचा अभ्यास करू या.

१) **ह्यू डॅल्टन यांच्या मते :** "सार्वजनिक वित्त व्यवहार हा अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र यांच्या सीमारेषेवर असलेल्या विषयांपैकी एक विषय आहे. सार्वजनिक वित्त व्यवहार सार्वजनिक अधिपत्याखालील उत्पन्न व खर्चाशी आणि एक दुसऱ्यामधील समायोजनाशी संबंधित आहे."

शासनाच्या कार्यांचा अभ्यास राज्यशास्त्रातही केला जात असल्यामुळे सार्वजनिक वित्त व्यवहार हा राज्यशास्त्राच्या अभ्यासाचाही एक भाग आहे.


२) **प्रा. फिंडले शिराज यांच्या मते :** "सार्वजनिक सत्तेचा निधी खर्च करणे व निधी उभारणे याबाबतच्या तत्त्वांचा अभ्यास म्हणजे सार्वजनिक वित्त व्यवहार होय."

### सार्वजनिक वित्त व्यवहार व खाजगी वित्त व्यवहार यांतील फरक :

| अ.क्र. | फरकाचे मुद्दे | सार्वजनिक वित्त व्यवहार | खाजगी वित्त व्यवहार |
|---|---|---|---|
| १. | उद्दिष्ट्ये | समाजाला महत्तम लाभ मिळवून देणे. | स्वहिताची पूर्तता करणे. |
| २. | खर्चाचे निर्धारण | शासन सर्वप्रथम आपल्या खर्चाची पातळी आणि खर्चाचे भिन्न भिन्न मार्ग निश्चित करते. | व्यक्ती प्रथम आपले वैयक्तिक उत्पन्न, विचारात घेते आणि खर्चाचे मार्ग निश्चित करते. |
| ३. | पत स्थिती | शासनाची बाजारपेठेतील पत मोठ्या प्रमाणावर असते. | खाजगी व्यक्तीची पत मर्यादित असते. |
| ४. | चलन छापण्याचा अधिकार | भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे चलनाची छपाई केली जाते. | खाजगी व्यक्तीला तसा अधिकार नाही. |
| ५. | वित्त व्यवहारातील लवचिकता | सार्वजनिक वित्त व्यवहार अधिक लवचीक असतात. | खाजगी वित्त व्यवहारात फारसे बदल करण्यास वाव नसतो. |
| ६. | अर्थव्यवस्थेवरील परिणाम | सार्वजनिक वित्त व्यवहाराचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर प्रचंड प्रभाव पडतो. | खाजगी वित्त व्यवहाराचा राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर नगण्य परिणाम होतो. |

### सार्वजनिक वित्तव्यवहार :

आकृती ८.२ च्या आधारे सार्वजनिक वित्त व्यवहारांतील प्रमुख घटक पुढीलप्रमाणे दाखविले जातात.




**आकृती ८.२ च्या आधारे पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण करता येईल**

## १) सार्वजनिक खर्च (Public Expenditure) :

सार्वजनिक खर्च म्हणजे केंद्रशासन, राज्य शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांनी नागरिकांचे संरक्षण, त्यांच्या सामुहिक गरजांची पूर्ती आणि लोकांच्या आर्थिक व सामाजिक कल्याणासाठी केलेला खर्च म्हणजे सार्वजनिक खर्च होय.

विसाव्या शतकापर्यंत बहुसंख्य देशांनी निर्हस्तक्षेपाचे धोरण स्विकारले होते. या धोरणांतर्गत शासनाच्या कार्यशक्तीच्या कार्यापर्यंत मर्यादित होती. परंतु आधुनिक शासन केवळ संरक्षण आणि नागरी प्रशासन अशी सक्तीची कार्येच करतात असे नाही, तर आपल्या देशात आर्थिक व सामाजिक विकासाचा प्रसार करण्यासाठीही ऐच्छिक कार्ये करत असतात. त्यामुळे अलीकडील काळात सर्व खर्चांत सातत्याने वाढ होत आहे म्हणून सार्वजनिक वित्त व्यवहारात खर्चाचा अभ्यास हा महत्त्वपूर्ण भाग आहे.

### सार्वजनिक खर्चांचे वर्गीकरण :

निरनिराळ्या अर्थशास्त्रज्ञांनी भिन्न भिन्न आधारावर सार्वजनिक खर्चांचे वर्गीकरण केलेले आहे. सार्वजनिक खर्चांच्या काही महत्त्वपूर्ण प्रकारांचा आता आपण अभ्यास करू या.

अ) **महसुली खर्च :** महसुली खर्च हा सर्वसाधारणपणे शासकीय खात्यांवर आणि विविध सेवांवर केला जातो. हा खर्च नियमितपणे उद्‌भवतो. उदा., शासनाचा प्रशासकीय खर्च, शासकीय कर्मचाऱ्यांचे पगार व भत्ते, निवृत्ती वेतन, वैद्यकीय सेवा आणि सार्वजनिक आरोग्यांचा खर्च इत्यादी.

ब) **भांडवली खर्च :** भांडवली खर्च म्हणजे देशाच्या वृद्धी व विकासासाठी नव्याने केला जाणारा खर्च होय. उदा., विविध विकास प्रकल्पांतील मोठ्या गुंतवणूका, शासकीय कर्जाची परतफेड, राज्य शासन व शासकीय कंपन्यांना दिलेले कर्ज इत्यादी भांडवली खर्चाची उदाहरणे आहेत.

क) **विकासात्मक खर्च :** विकासात्मक खर्च हा उत्पादक स्वरूपाचा असतो. ज्या खर्चामुळे रोजगार निर्मिती, उत्पादन वाढ, किंमतस्थैर्य इत्यादी बदल घडून वाढ होते. त्याला विकासात्मक खर्च असे म्हणतात. उदा., आरोग्य शिक्षण, औद्योगिक विकास, सामाजिक कल्याण, संशोधन आणि विकास यांवरील खर्च इत्यादी.

ड) **विकासेतर खर्च :** शासनाच्या ज्या खर्चामुळे देशात कोणताही प्रत्यक्ष उत्पादक परिणाम होत नाही, त्याला विकासेतर किंवा बिगर विकास खर्च असे म्हणतात. उदा., प्रशासकीय खर्च, युद्ध खर्च इत्यादी हे खर्च अनुत्पादक स्वरुपाचे असतात.

**तुम्हांला माहीत आहे का?**

स्वातंत्र्योत्तर काळातील सार्वजनिक खर्चाच्या प्रवृत्ती

| अ. क्र. | वर्ष | एकूण खर्च (कोटी ₹) |
|---|---|---|
| १ | १९९१-१९९२ | ७२,३१७ |
| २ | २००१-०२ | ३,६२,४५० |
| ३ | २००५-०६ | ५,०६,१२३ |
| ४ | २००९-१० | १०,२४,४८७ |
| ५ | २०१५-१६ | ११,९५,०२५ |
| ६ | २०१६-१७ | १३,७४,२०३ |
| ७ | २०१७-१८ | १४,३५,२३३ |
| ८ | २०१८-१९ | १७,२९,६८२ |

**स्रोत :** संबंधित वर्षातील भारत सरकारचा आर्थिक पाहणी अहवाल २०१८-२०१९

वर दिलेल्या कोष्टकानुसार स्वातंत्र्योत्तर काळातील १९९१-९२ पासून काही निवडक वर्षातील सार्वजनिक खर्चातील प्रवृत्ती दाखवली आहे. या निरीक्षणावरून स्पष्ट होते की, एकूण सार्वजनिक खर्चात फार मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

### शासनाच्या सार्वजनिक खर्चात वाढ होण्याची कारणे :

भारतासारख्या विकसनशील देशाच्या एकूण सार्वजनिक खर्चात वाढ होताना दिसून येते काही महत्त्वाच्या कारणांचा अभ्यास करू या.

१) **शासनाच्या कार्यात वाढ :** या अगोदर वर उल्लेख केल्याप्रमाणे देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाकरिता आधुनिक शासन अनेक कार्ये पार पाडत असते. शिक्षण प्रसार, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, मनोरंजन, समाजकल्याणकारी योजना इत्यादी बाबींचा या कार्यात समावेश होतो. यावरून असे आढळून येते की, शासन सातत्याने नवनवीन कार्ये स्वीकारत आहे आणि जुनी कार्ये अधिक कार्यक्षमतेने मोठ्या प्रमाणावर पार पाडत आहे. यामुळे सार्वजनिक खर्चात वाढ होते.

२) **लोकसंख्येची वेगाने होणारी वाढ :** भारतासारख्या विकसनशील देशाची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. इ.स. २०११ च्या जनगणनेनुसार ती लोकसंख्या १२१.०२ कोटी इतकी होती. परिणामी, वाढत्या लोकसंख्येच्या गरजांची पूर्ती करण्यासाठी शासनाला अधिक खर्च करावा लागतो.

३) **वाढते शहरीकरण :** वाढते शहरीकरण ही सध्याची जागतिक स्थिती आहे. यामुळे पाणीपुरवठा, रस्ते, ऊर्जा, शाळा व महाविद्यालये, सार्वजनिक वाहतूक, स्वच्छता इत्यादींवरील शासनाच्या खर्चात वाढ होते.

४) **संरक्षण खर्चात वाढ :** आधुनिक काळात अस्थिर व असमंजस आंतरराष्ट्रीय संबंधांमुळे युद्ध नसतानाही संरक्षण खर्च वाढत असतो.

५) **लोकशाही शासन पद्धतीचा प्रसार :** जगातील बहुसंख्य देशांमध्ये लोकशाही शासन पद्धती आहे. नियमित निवडणुका व इतर बाबींमुळे लोकशाही शासनपद्धती खर्चीक ठरते. त्यामुळे शासनाच्या एकूण खर्चात सतत वाढ होत जाते.

६) **भाववाढ :** एखाद्या खाजगी व्यक्तीप्रमाणेच आर्थिक व सामाजिक विकासासाठी शासनाला बाजारातून वस्तू व सेवांची खरेदी करावी लागते. सर्वसाधारणपणे किंमतवाढीची प्रवृत्ती दिसून येते, त्यामुळे शासनाला वाढीव खर्च करावा लागतो.

७) **औद्योगिक विकास :** औद्योगिक विकासामुळे अर्थव्यवस्थेत उत्पादनवाढ, रोजगारवाढ व एकूण वृद्धी घडून येते. म्हणून औद्योगिक विकासासाठी शासन मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करते. त्यात विविध योजना आणि कार्यक्रमांवर खर्च करते. परिणामी, एकूण खर्चात वाढ होते.

८) **आपत्ती व्यवस्थापन :** अलीकडील काळात भूकंप, पूर, वादळे, सामाजिक अशांतता, अशा नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती वारंवार घडून येताना दिसत आहेत. त्यामुळे शासनाला आपत्ती व्यवस्थापनावर मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. परिणामी, एकूण खर्चात वाढ होते.

आधुनिक शासन कल्याणकारी राज्यासाठी कार्य करते. त्यामुळे सार्वजनिक खर्चात वाढ होणे अपरिहार्य आहे.

**शोधा पाहू!**

वर दिलेल्या कारणांव्यतिरिक्त सार्वजनिक खर्चातील वाढीची इतर कारणे शोधा.

**शोधा पाहू!**

शासनाच्या महत्त्वाच्या समाज कल्याणकारी योजना

## II) सार्वजनिक उत्पन्न :

विविध स्रोतांद्वारे शासनाला मिळणारे एकूण उत्पन्न म्हणजे सार्वजनिक उत्पन्न होय. अर्थशास्त्राच्या अभ्यासात जे स्थान उत्पादनाचे आहे तेच स्थान सार्वजनिक वित्त व्यवहारात सार्वजनिक उत्पन्नाचे आहे. अशा प्रकारे सार्वजनिक उत्पन्नाची गरज सार्वजनिक खर्चामुळे निर्माण होते.

**सार्वजनिक उत्पन्नाचे स्रोत पुढीलप्रमाणे आहेत :**

अ) कर उत्पन्न  ब) करेतर उत्पन्न

### अ) कर (Tax) :

१) कराची व्याख्या – प्रा.टॉसिग यांच्या मते, ''शासनाकडून लागू केलेले इतर आकार आणि कर यांमधील फरकाचा मुख्य गाभा असा की, करदाता आणि शासन यांच्यात थेट लाभाचा व परताव्याचा अभाव असतो.''

२) प्रा– सेलिग्मन यांच्या मते, ''कोणत्याही विशेष लाभाच्या प्राप्तीशिवाय व्यक्तीने शासनाला दिलेले सक्तीचे देणे म्हणजे कर होय.''

कराची खालील वैशिष्ट्ये दिसून येतात :

१) कर हे शासनाला द्यावयाचे सक्तीचे देणे असते. ज्या नागरिकांवर कर लागू होतो त्यांनी ते देणे कायदेशीररीत्या बंधनकारक ठरते. कर हा सरकारी उत्पन्नाचा मोठा स्रोत आहे. जर एखाद्या व्यक्तीने कर दिला नाही तर शासन त्या व्यक्तीला शिक्षा करू शकते.

२) समाजाच्या सामाजिक हितासाठी शासनाला करावा लागणारा खर्च भागविण्यासाठी करदात्याकडून कर घेतला जातो.

३) कराच्या मोबदल्यात कोणत्याही करदात्याला शासनाकडून कोणताही थेट आणि प्रमाणशीर लाभ किंवा सेवा घेण्याचा अधिकार नसतो.

४) कर उत्पन्न, मालमत्ता किंवा वस्तूंवर व सेवांवर लागू केला जातो.

**तुम्हांला माहीत हवे!**

**कराची तत्वे :**

आधुनिक अर्थशास्त्राचे जनक ॲडम स्मिथ यांनी कराची खालील चार तत्वे सांगितलेली आहेत.

१) **समता किंवा समानतेचे तत्व :** प्रत्येक व्यक्तीने आपल्या देयक्षमतेनुसार शासनाला कर द्यावा, असे स्मिथ यांनी सुचविलेले आहे. याचा अर्थ गरिबांच्या तुलनेत श्रीमंतांनी अधिक कर द्यावा.

२) **निश्चिततेचे तत्व :** स्मिथ यांच्या मते, करदात्याला आपल्याला किती कर कोणत्या वेळी, कोणत्या स्वरूपात शासनाला द्यावयाचा आहे याचे पूर्वज्ञान असले पाहिजे. कारण असे की, निश्चित करामुळे करदात्याला कराचा भार वाटत नाही. हे तत्व भारतीय करव्यवस्थेत प्रतिबिंबित झालेले आढळते.

३) **सोयीस्करतेचे तत्व :** या तत्वानुसार प्रत्येक करदात्याला जास्तीतजास्त सोयीस्कर वेळी व सोयीस्कर पद्धतीने कर लागू केला जावा.

४) **काटकसरीचे तत्व :** या तत्त्वानुसार करवसुलीचा खर्च किमान असला पाहिजे. जर करवसुलीपैकी अधिकाधिक भाग करवसुलीसाठीच खर्च होत असेल तर तो कर आदर्श मानला जात नाही.

**कराचे प्रकार :**

कराचे मुख्य दोन प्रकार सांगता येतात त्याचा सविस्तर अभ्यास करुया.

१) प्रत्यक्ष कर  २) अप्रत्यक्ष कर

१) **प्रत्यक्ष कर :** हा कर करदात्याच्या उत्पन्न आणि संपत्तीवर दिला जातो. ज्या व्यक्तीवर हा कर लागू होतो, त्याच व्यक्तीवर कराचा भार पडतो. करदात्याला कराचा भार इतरांवर हस्तांतरित करता येत नाही. त्यामुळे प्रत्यक्ष कराचा कराघात व करभार एकाचा व्यक्तीवर पडतो. उदा., वैयक्तिक उत्पन्न कर, संपत्ती कर इत्यादी.

२) **अप्रत्यक्ष कर :** हा कर वस्तू व सेवांवर लागू केला जातो. एखाद्या वस्तू किंवा सेवेच्या उत्पादन किंवा खरेदी-विक्रीच्या वेळी हा कर दिला जातो. अप्रत्यक्ष कराचा भार करदात्याकडून इतर व्यक्ती किंवा व्यक्तीना हस्तांतरित केला जाऊ शकतो. म्हणून कराघात आणि करभार निरनिराळ्या घटकांवर पडतो. उदा., भारतात नव्याने लागू केलेला जवळजवळ सर्व अप्रत्यक्ष कराऐवजी वस्तू व सेवा कर (GST), कस्टम ड्युटी होय.

**तुम्हांला माहीत आहे का?**

कराच्या कायद्यानुसार प्रत्यक्ष कराचे वर्गीकरण तीन गटांत केले जाते.

१) **प्रमाणशीर कर :** व्यक्तीच्या उत्पन्नावर जेव्हा एकाच दराने कर आकारणी केली जाते, तेव्हा त्यास प्रमाणशीर कर असे म्हणतात.

२) **प्रगतिशील कर :** व्यक्तीच्या उत्पन्नवाढीच्या प्रमाणात जेव्हा कराचे दरही वाढत असतात तेव्हा त्यास प्रगतिशील कर असे म्हणतात. भारतात अशी प्रगतिशील कर रचना प्रचलित आहे.

३) **प्रतिगामी कर :** यात जसजसे उत्पन्न वाढत जाते, तसतसे कराचे दर कमी होतात.

**ब) करेतर उत्पन्नाचे स्रोत :**

प्रशासन, व्यापारी उपक्रम, देणग्या आणि अनुदाने इत्यादींद्वारे मिळालेल्या सार्वजनिक उत्पन्नाला करेतर उत्पन्न असे म्हणतात. हे स्रोत करापेक्षा भिन्न आहेत. याविषयी थोडक्यात माहिती पाहू या.

१) **शुल्क (fees) :** कर कोणत्याही मोबदल्याविना सक्तीने द्यावा लागतो, तर शुल्क हे शासनाने पुरवलेल्या सेवेबद्दल दिले जाते. उदा., शैक्षणिक शुल्क, नोंदणी शुल्क इत्यादी.

२) **सार्वजनिक वस्तू व सेवांच्या किमती (Prices) :** आधुनिक शासन आपल्या नागरीकांना विविध वस्तू व सेवांची विक्री करते. अशा वस्तू व सेवांचा लोकांनी शासनाला दिलेला मोबदला म्हणजे किंमत होय. उदा., रेल्वे भाडे, टपाल सेवा इत्यादी.

३) **विशेष अधिभार :** शासनाने विशिष्ट भागातील रहिवाशांना दिलेल्या विशेष सुविधांबद्दल नागरीकांनी दिलेला मोबदला म्हणजे विशेष अधिभार होय. उदा., ज्या विशिष्ट भागातील रहिवाशांना स्थानिक स्वराज्य संस्था रस्ते,

ऊर्जा, पाणीपुरवठा इत्यादी विशेष सुविधा पुरवल्याबद्दल कर लागू करू शकतात.

४) **दंड व दंडात्मक रकमा :** देशातील कायदे व नियम मोडणाऱ्या लोकांवर शासन दंड आकारते. हा दंड आकारण्याचे उद्दिष्ट उत्पन्न कमविणे नसून लोकांना शासनाचे नियम तोडण्यापासून परावृत्त करणे, हे आहे. उदा., वाहतुकीचे नियम मोडल्याबद्दल होणारा दंड.

५) **भेटी, अनुदाने व देणग्या :** शासनाला आपल्या नागरिकांकडून व इतरांकडून भेटीद्वारे उत्पन्न मिळू शकते. त्या व्यतिरिक्त शासनाला विदेशी शासन व संस्थांकडून सर्वसाधारण किंवा विशिष्ट हेतूसाठी अनुदाने मिळू शकतात. भारतासारख्या विकसनशील देशात विदेशी साहाय्य हा विकासखर्चाचा एक महत्त्वपूर्ण स्रोत झाला आहे. हा उत्पन्नाचा स्रोत अनिश्चित स्वरूपाचा आहे.

६) **विशेष कर :** ज्या वस्तूंचा उपभोग नागरिकांच्या आरोग्य आणि हितासाठी बाधक ठरतो अशा वस्तूंवर हा कर लागू केला जातो. दंडाप्रमाणेच या कराचे उद्दिष्ट उत्पन्न मिळविण्याचे नसून लोकांनी अहितकारक वस्तूंच्या उपभोगापासून परावृत्त व्हावे हे असते. उदा., मद्य, अफू आणि इतर अमली पदार्थांवरील कर इत्यादी.

७) **कर्ज :** शासनाला लोकांकडून ठेवी, कर्जरोखे इत्यादी माध्यमांतून कर्ज घेता येते. याशिवाय विदेशी शासन आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक इत्यादी संस्थांतून कर्ज मिळवू शकते. आधुनिक काळात ‘कर्ज, हा शासनाचा अधिकाधिक उत्पन्नाचा स्रोत बनत आहे.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**वस्तू आणि सेवा कर (GST)**

भारतात वस्तू आणि सेवा कर १ जुलै २०१७ पासून अमलात आला आहे. हा कर वित्तीय उत्तरदायित्व आणि अंदाजपत्रक व्यवस्थापनाच्या अंमलबजावणी कायद्यावरील केळकर कृती समितीने जुलै २००४ मध्ये सुचविला होता. भारतीय राज्यघटनेतील १०१ वी घटना दुरुस्ती सुधारणा कायदा २०१६ अन्वये वस्तू व सेवा कर परिषद स्थापण्याची तरतूद केली गेली. या परिषदेत केंद्रीय अर्थमंत्री, महसूल राज्यमंत्री आणि प्रत्येक राज्याचे अर्थमंत्री यांचा समावेश असतो. या परिषदेला वस्तू आणि सेवा कर दर, सूट आणि किमान पातळी इत्यादींबाबत शिफारशी करण्याचा अधिकार आहे.

वस्तू निर्माण किंवा विक्री यावर एकाच टप्प्यात लागू केल्या जाणाऱ्या उत्पादन शुल्क किंवा विक्री करापेक्षा वस्तू व सेवा कर वेगळा आहे. देशभरात वस्तू आणि सेवांवरील तो एक व्यापक कर आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या पुढील कराऐवजी वस्तू आणि सेवा कर लागू केला गेला. केंद्रीय उत्पादन शुल्क, सेवा कर, अतिरिक्त सीमा शुल्क, राज्यांचा मूल्यवर्धित कर, प्रवेश कर, करमणूक कर इत्यादी.

अपेक्षित उत्पन्नाच्या त्रुटीसाठी सेवा कर (CGST) : देशांतर्गत वस्तू व सेवांच्या पुरवठ्यावर केंद्र सरकारने आकारलेला कर म्हणजे केंद्रीय वस्तू व सेवा कर होय.

राज्य वस्तू व सेवा कर (SGST) : वस्तू आणि सेवांचा उपभोग घेतल्यामुळे राज्य सरकारला मिळणारा कर म्हणजे राज्य वस्तू व सेवा कर होय. हा कर वस्तू आणि सेवांच्या उत्पादनावर आकारला जात नाही.

एकत्रित वस्तू व सेवा कर (IGST) : हा कर IGST कायद्यामुळे सर्व आंतरराज्य वस्तू व सेवांच्या पुरवठ्यावर लागू केला जातो.

नुकसान भरपाई कर : राज्य शासनाच्या अपेक्षित उत्पन्नातील त्रुटीच्या भरपाईसाठी असणारा नुकसान भरपाई कर.


**वस्तू आणि सेवा करांचे अपेक्षित लाभ :**

- यामुळे भारताची एकात्म सामाईक राष्ट्रीय बाजारपेठ निर्माण होण्यास मदत होईल.
- यामुळे विदेशी गुंतवणुकीला आणि मेक इन इंडिया चळवळीला चालना मिळेल.
- यामुळे कराचे दर, प्रक्रिया आणि कायदे यांच्यात सुसूत्रीकरण होण्यास मदत होईल.
- यामुळे निर्यात आणि वस्तू निर्माण क्रियेला चालना मिळेल.
- देशातील एकूण गुंतवणूक स्थितीत सुधारणा होईल.

- देशातील करव्यवस्था सुलभ होण्यास मदत होईल.
- वस्तूची अंतिम किंमत कमी होण्यास मदत होईल.
- या करामुळे औद्योगिक क्षेत्राला चालना मिळेल.
- वस्तू आणि सेवा करामुळे अधिक रोजगार निर्मिती आणि अधिक वित्तीय संसाधनांची निर्मिती होऊन दारिद्र्य निर्मूलनास मदत होईल.

मात्र वस्तू आणि सेवा करांच्या कामगिरीचे मूल्यमापन इतक्या अल्पावधीत करणे शक्य नाही.

**वस्तू व सेवा करपावतीचा नमुना**


BILL No. : 13147 DATE : 27/12/2019
TABLE No.: 30 TIME : 08:11:59 PM
STAFF : MUJI PAX : 6

| ITEM NAME | QTY | RATE | AMOUNT |
|---|---|---|---|
| WED TO SUNDAY V | 6 | 595.00 | 3570.00 |
| BLUE LAGOON MOC | 1 | 115.00 | 115.00 |
| THANDAI COOLER | 1 | 140.00 | 140.00 |
| MANGO DELIGHT M | 1 | 125.00 | 125.00 |

SUB TOTAL : 3950.00
CGST @2.50 % : 98.75
SGST @2.50 % : 98.75
TOTAL : 4148.00
3570.00

VAT No. : 27115279743V
GST IN : 27AAXFM3502E128

COEST SIGN AUTHORISED SIGNATORY

### iii) सार्वजनिक कर्जे :

जसे वैयक्तिक पातळीवर कर्जाची गरज असते तशीच सरकारसाठी कर्ज उभारणे सर्वसाधारण कृती असते. कारण सरकारी खर्च सर्वसाधारणपणे सरकारी महसुलापेक्षा जास्त असतो. म्हणून सार्वजनिक कर्ज धोरणात कर्ज उभारणे ही महत्त्वाची भूमिका सरकारला करावी लागते.

### सार्वजनिक कर्जाचे प्रकार :

सार्वजनिक कर्जाचे मुख्य दोन प्रकार आहेत.

१) **अंतर्गत कर्ज :** जेव्हा सरकार देशातील नागरिक, बँका, मध्यवर्ती बँका, वित्तीय संस्था, औद्योगिक क्षेत्र इत्यादींकडून कर्ज घेतात. तेव्हा त्यास अंतर्गत कर्ज म्हणून ओळखले जाते.

२) **बाह्य कर्ज :** जेव्हा सरकार परकीय देशांतील सरकार, परदेशी बँका किंवा संस्था, आंतरराष्ट्रीय संस्था जसे नाणेनिधी, जागतिक बँक इत्यादींकडून कर्ज घेते ते बाह्य कर्ज म्हणून ओळखले जाते.

तक्ता क्र.८.१ यात अंतर्गत कर्ज व बाह्य कर्ज यांतील फरक दाखविला आहे.

**तक्ता क्र.८.१**

| अ. क्र. | अंतर्गत कर्ज | बाह्य कर्ज |
|---|---|---|
| १ | देशाच्या अंतर्गत अर्थव्यवस्थेत उभारले जाते. | देशाबाहेरील अर्थव्यवस्थेतून उभारले जाते. |
| २ | हे ऐच्छिक किंवा सक्तीच्या स्वरूपात असते. | ऐच्छिक स्वरूपाचे असते. |
| ३ | हे देशी चलनात असते. | हे परकीय चलनात असते. |
| ४ | व्यवस्थापनासाठी कमी गुंतागुंतीचे. | व्यवस्थापनासाठी अधिक गुंतागुंतीचे |

**हे करून पहा!**

खालील विधानांचे वर्गीकरण अंतर्गत कर्ज व बाह्य कर्ज यांत करू या.

१) शासन आपल्या नागरिकांना रोख्यांची विक्री करते.

२) पाणी पुरवठ्याच्या तरतुदीसाठी शासन जागतिक बँकेकडून कर्ज घेते.

३) व्यापारी बँकेकडून शासन पायाभूत सुविधांच्या विकासासाठी कर्ज घेते.

४) मुंबईच्या मेट्रो ट्रेन प्रकल्पासाठी भारत सरकार जागतिक बँकेकडून कर्ज घेते.

### iv) राज्य वित्तीय धोरण :

राज्य वित्तीय धोरण म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेचे नियंत्रण करण्यासाठी आणि प्रभाव पाडण्यासाठी ज्याद्वारे शासन आपल्या खर्च पातळीत आणि करदरात बदल करते असे साधन होय.

हे धोरण सार्वजनिक खर्च आणि सार्वजनिक उत्पन्नाशी निगडित आहे. थोडक्यात शासनाने राबविलेले वित्तीय धोरण म्हणजे राज्य वित्तीय धोरण होय.

### v) वित्तीय प्रशासन :

"शासनाच्या उत्पन्न खर्च आणि कर्जाची सुरळीत आणि कार्यक्षम अंमलबजावणी म्हणजेच वित्तीय प्रशासन होय."

एकंदरीत सर्वसमावेशक वृद्धी आणि स्थिरतेसाठी अंदाजपत्रकांची तयारी व अंमलबजावणी समाविष्ट असते.

### शासकीय अंदाजपत्रक :

अर्थसंकल्प हे वित्तीय प्रशासनाचे एक महत्त्वाचे साधन आहे. ज्यामुळे राज्याचे सर्व आर्थिक व्यवहार नियंत्रित केले जातात. आगामी आर्थिक वर्षातील अपेक्षित प्राप्ती आणि नियोजित खर्चाचे वित्तीय विवरण म्हणजे अंदाजपत्रक होय. भारतात १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीचे एक आर्थिक वर्ष असते. भारतीय राज्यघटनेच्या कलम ११२ अंतर्गत शासकीय अंदाजपत्रकाची तरतूद आहे. भारत सरकारच्या प्रत्येक अंदाजपत्रकात सात अंदाजपत्रकीय दस्तऐवजांद्वारे सार्वजनिक वित्त व्यवहाराच्या तपशिलाचे वर्णन केले जाते.

अंदाजपत्रक हा शब्द (Budget) फ्रेंच भाषेतील 'Bougette' पासून आला आहे. याचा अर्थ पिशवी किंवा पाकीट असा होतो, ज्यात सरकारच्या आर्थिक धोरणांविषयीचा तपशील असतो. ह्या सर्व आर्थिक योजना किंवा वित्तीय धोरणे सरकारी महसूल आणि सरकारी खर्चाच्या स्वरूपात असते.

**तुम्हांला माहीत आहे का?**

भारतीय राज्यघटनेत अंदाजपत्रक (Budget) ही संज्ञा नसून, "वार्षिक आर्थिक विवरण" असे म्हटले जाते.

### महसुली व भांडवली अंदाजपत्रक :

१) अंदाजपत्रकातील तरतुदींचे महसुली व

२) भांडवली अंदाजपत्रक असे वर्गीकरण केले जाते.

**१) महसूली अंदाजपत्रक :** महसुली अंदाजपत्रकात महसुली उत्पन्न आणि महसुली खर्चाचा समावेश होतो. महसुली प्राप्तीचे विभाजन कर आणि करेतर उत्पन्नात होते. कर उत्पन्नात उत्पन्न कर, कंपनी कर इत्यादी करांचा समावेश होतो. महसुली खर्चात करेतर उत्पन्नात कर्जावरील व्याज, गुंतवणुकीवरील लाभांश, राज्यांना दिलेली अनुदाने व साहाय्य इत्यादींचा समावेश होतो.

**२) भांडवली अंदाजपत्रक :** भांडवली अंदाजपत्रकात भांडवली उत्पन्न व भांडवली खर्च मांडलेले असतात. शासनाचे भांडवली उत्पन्न म्हणजे मध्यवर्ती बँका आणि लोकांकडून घेतलेली कर्जे, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाच्या समभागाची विक्री करून मिळालेले उत्पन्न, विदेशी शासन आणि संस्थांकडून मिळालेली कर्जे, विशेष ठेवी इत्यादी बाबींचा समावेश होतो.

भांडवली खर्चात शासनाच्या विकासप्रकल्पातील खर्च, गुंतवणुका, राज्य शासनाला, शासकीय कंपन्या, महामंडळे आणि इतर घटकांना दिलेली कर्जे इत्यादींचा समावेश होतो.

याशिवाय सामाजिक आणि सामुदायिक विकासावरील खर्च, संरक्षण आणि सर्वसाधारण सेवांवरील खर्च इत्यादींचा यात समावेश होतो.

### अंदाजपत्रकाचे प्रकार :

अर्थव्यवस्थेच्या बदलत्या गरजांनुसार सार्वजनिक खर्च आणि उत्पन्नाच्या अंदाजपत्रकीय तरतुदीही निरनिराळ्या पातळींत असणे गरजेचे असते. त्यानुसार शासकीय अंदाजपत्रकाचे तीन प्रकार पडतात.

१) समतोल अंदाजपत्रक

२) शिलकीचे अंदाजपत्रक

३) तुटीचे अंदाजपत्रक

**१) समतोल अंदाजपत्रक :** ज्या अंदाजपत्रकात सरकारचे अंदाजे महसुली उत्पन्न आणि सरकारचा महसुली खर्च या दोन्ही बाबी समान असतात त्याला समतोल अंदाजपत्रक असे म्हणतात. म्हणजेच, सरकारी महसूल = सरकारी खर्च. समतोल अंदाजपत्रकाची संकल्पना ॲडम स्मिथ यांसारख्या सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी प्रतिपादन केली आहे. या अंदाजपत्रकाचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम तटस्थ असल्याचे मानले जाते. म्हणून त्यांनी हे अंदाजपत्रक सर्वोत्तम मानले.

मात्र, आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मते समतोल अंदाजपत्रकाचे धोरण अर्थव्यवस्थेसाठी नेहमीच योग्य ठरू शकणार नाही. आधुनिक शासन कल्याणकारी संस्था असते. म्हणून खर्चाची पातळी उत्पन्न पातळीच्या प्रमाणात ठेवणे शक्य नसते.

**२) शिलकीचे अंदाजपत्रक :** ज्या अंदाजपत्रकात शासनाची अंदाजे प्राप्ती शासनाच्या अंदाजित खर्चापेक्षा अधिक असते, तेव्हा त्याला शिलकीचे अंदाजपत्रक असे म्हणतात.

**अपेक्षित सरकारी प्राप्ती > अंदाजित सरकारी खर्च**

आर्थिक तेजीच्या कालखंडात शिलकीचे अंदाजपत्रक उपयुक्त ठरू शकते. आर्थिक तेजीच्या काळात रोजगार पातळी जरी जास्त असली तरी त्याचबरोबर किंमतवाढीची प्रवृत्ती अधिक असते. विशेषतः कमी अधिक प्रमाणात स्थिर उत्पन्न असणाऱ्या लोकांच्या हितासाठी याचे नियंत्रण करण्याची आवश्यकता असते.

अर्थव्यवस्थेतील प्रभावी मागणीची पातळी घटवून किंमतवाढीवर नियंत्रण ठेवता येते. यासाठी करात वाढ करून शासकीय उत्पन्नात वाढ घडवून लोकांची खरेदी शक्ती कमी करता येते. अंतिमतः परिणामकारक मागणी कमी होऊन किंमतपातळी खालच्या दिशेने बदलू लागेल आणि भाववाढीची परिस्थिती नियंत्रणात येईल.

मात्र, तेजीव्यतिरीक्त इतर परिस्थितीत शिलकीचे अंदाजपत्रक वापरले जाऊ नये. कारण त्यामुळे अर्थव्यवस्थेत बेरोजगारी आणि कमी पातळीतील उत्पादन स्थिती निर्माण होईल.

३) **तुटीचे अंदाजपत्रक :** जेव्हा सरकारची अपेक्षित प्राप्ती अंदाजित सरकारी खर्चापेक्षा कमी असते तेव्हा त्याला तुटीचे अंदाजपत्रक असे म्हणतात.

अपेक्षित "सरकारी प्राप्ती < अंदाजित सरकारी खर्च = तुटीचे अंदाजपत्रक"

मंदीच्या काळात तुटीचे अंदाजपत्रक उपयुक्त ठरू शकते. आर्थिक मंदीच्या काळात सर्व आर्थिक व्यवहार कमी पातळीत होत असतात. त्यामुळे बेरोजगारी निर्माण होते. याचे नियंत्रण करण्यासाठी कर्ज व तुटीच्या अर्थभरण्याद्वारे शासकीय खर्चात वाढ केली जाते. यामुळे वस्तू व सेवांची प्रभावी मागणी आणि रोजगारात वाढ होईल आणि त्यातून पुढील गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळेल. आधुनिक काळात तुटीचे अंदाजपत्रक हे शासनाचे सर्वसाधारणपणे राबवले जाणारे धोरण आहे.

भारतासारख्या विकसनशील देशांनी आर्थिक विकासासाठी तुटीच्या अंदाजपत्रकाचा मार्ग सातत्याने अनुसरला आहे.

### अंदाजपत्रकाचे महत्त्व :

केंद्रीय अंदाजपत्रक महत्त्वाचे असते. कारण अनेक मार्गांनी त्याचा लोकांवर आणि एकूण अर्थव्यवस्थेवर परिणाम होत असतो. कोणत्याही अंदाजपत्रकात कर हा सर्वाधिक रोचक असा भाग असतो. करामुळे उद्योगाचे आणि व्यक्तीचे भवितव्य निश्चित होते. अंदाजपत्रकात मांडलेल्या करांच्या दरावर करदात्यांचा खर्च योग्य उत्पन्नपातळीवर अवलंबून असतो. संरक्षण, प्रशासन, पायाभूत सुविधा, शिक्षण आणि आरोग्य सेवा अशा विविध क्षेत्रावरील शासकीय खर्चाचा नागरिकांच्या जीवनावर आणि एकूण अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो. कारण देशाच्या आर्थिक धोरणाचे माध्यम म्हणून शासन त्याचा वापर करत असते.

सरकारच्या अंदाजपत्रकाच्या कृतीमुळे देशातील उत्पादन अंदाजपत्रकीय उत्पन्नाचा आकार आणि वितरण त्याचबरोबर मानवी व भौतिक संसाधनांच्या उपभोगांवर परिणाम होतो.

अंदाजपत्रकाच्या माध्यमातून शासनाने घेतलेल्या निर्णयांचा परिणाम उत्पादन, एकूण उत्पन्न आणि उत्पन्नाचे वितरण, मानवी आणि भौतिक साधनसामग्रीचा वापर यावर घडून येतो.

यामुळे आधुनिक अर्थव्यवस्थेत सार्वजनिक वित्त व्यवहाराचे महत्त्व आणि व्याप्तीमध्ये गेल्या १०० वर्षात मोठ्या प्रमाणावर तफावत झालेली दिसून येते.

## स्वाध्याय

**प्र. १. योग्य पर्याय निवडा :**

१) ऐच्छिक कार्यांमध्ये पुढीलपैकी कार्ये येतात.
   अ) परकीय आक्रमणापासून संरक्षण
   ब) शिक्षण व आरोग्य सेवा
   क) सामाजिक सुरक्षा उपाययोजना
   ड) कर संकलन

**पर्याय :** १) ब, क　२) अ, ब, क　३) ब, क, ड　४) वरील सर्व

२) सरकारच्या अनिवार्य कार्यांमध्ये पुढीलपैकी या कार्यांचा समावेश होतो.
   अ) रोजगार निर्मिती
   ब) अंतर्गत कायदा व सुव्यवस्था
   क) कल्याणकारी उपाययोजना
   ड) वस्तू व सेवांची निर्यात

**पर्याय :** १) क, ड        २) अ, ब
        ३) फक्त ब        ४) अ, क, ड

३) खालीलपैकी या अर्थशास्त्रज्ञाच्या मते सार्वजनिक वित्त व्यवहार हा अर्थशास्त्र व राज्यशास्त्र यांच्या सीमारेषेवर आहे.
   अ) ॲडम स्मिथ        ब) आल्फ्रेड मार्शल
   क) ह्यू डॅल्टन        ड) प्रा. फिडले शिराज

**पर्याय :** १) अ        २) ब
        ३) क        ४) ड

४) करेतर उत्पन्न मार्गाची/स्रोताची उदाहरणे पुढीलपैकी ही आहेत.
   अ) प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कर
   ब) प्रत्यक्ष शुल्क
   क) शुल्क आणि दंड
   ड) विशेष कर

**पर्याय :** १) ब, क        २) अ, क
        ३) अ, ब, क, ड        ४) क, ड

५) कोणत्याही शासनाच्या सार्वजनिक खर्चाची प्रवृत्ती ही खालीलप्रमाणे आहे.
   अ) स्थिर        ब) वाढता
   क) घटता        ड) बदलता (चढ-उतार)

**पर्याय :** १) अ        २) ब
        ३) क        ४) ड

६) योग्य जोडीचा पर्याय निवडा :

| अ | ब |
|---|---|
| i) प्रत्यक्ष कर | अ) करेतर उत्पन्न |
| ii) अप्रत्यक्ष कर | ब) चलनवाढ |
| iii) शुल्क व दंड | क) वस्तू व सेवा कर(GST) |
| iv) शिलकी अंदाजपत्रक | ड) व्यक्तिगत उत्पन्न कर |

अ) i – ड   ii –क   iii –ब   iv –ड
ब) i – क   ii –ड   iii –अ   iv –ब
क) i – ड   ii –क   iii –अ   iv –ब
ड) i – अ   ii –ब   iii –क   iv –ड

## प्र. २. फरक स्पष्ट करा :

१) सार्वजनिक वित्त व्यवहार आणि खाजगी वित्त व्यवहार
२) अंतर्गत कर्ज आणि बाह्य कर्ज
३) विकास खर्च आणि विकासेतर खर्च
४) विशेष अधिभार आणि विशेष कर
५) प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर

## प्र. ३. खालील विधानांशी तुम्ही सहमत/असहमत आहात काय ते सकारण स्पष्ट करा :

१) सक्तीचे कार्य हे शासनाचे एकमेव कार्य आहे.
२) सरकारला शुल्क व दंड यांपासून मोठ्या प्रमाणावर महसूल मिळतो.
३) वस्तू व सेवा (GST) कराने भारतातील जवळजवळ सर्व अप्रत्यक्ष करांची जागा घेतली.
४) आधुनिक सरकार सार्वजनिक खर्चातील वाढीसाठी पुढाकार घेत नाही.
५) खाजगी वित्त व्यवहारापेक्षा सार्वजनिक वित्त व्यवहार अधिक लवचीक असतात.

## प्र. ४. खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे द्या :

लोकांचे वृद्धत्व, अनारोग्य, अपंगत्व आणि दारिद्र्य यांवरील उपाय म्हणून शासनाने नियमित रक्कम द्यावी ही सामाजिक सुरक्षेची पारंपरिक कल्पना आहे. ही कल्पना मुळातूनच बदलली गेली पाहिजे. लाभार्थ्यांना धनादेश लिहून देण्याच्या पद्धतीपासून त्यांची काळजी घेण्यासाठी संस्थात्मक व्यवस्था करण्याकडे सामाजिक सुरक्षेत संकल्पनात्मक बदल व्हायला हवा. यामध्ये त्यांना बऱ्यापैकी स्वावलंबनाच्या दृष्टीने सक्षम करण्याचाही समावेश असला पाहिजे.

सामाजिक सुरक्षेच्या 'धनादेश लिहा' या प्रारूपाला श्रीमंत जगाच्या लोकसंख्या संक्रमणाच्या पर्याप्त अवस्थेचा वारसा लाभला आहे. लोकसंख्या संक्रमणाच्या अवस्थेत अर्थव्यवस्थेतील काम करणाऱ्या लोकांची काळजी घेण्यासाठी वसूल केले जाणारे कर पुरेशा प्रमाणात मिळू शकतील इतक्या प्रमाणात काम करणाऱ्या लोकांची संख्या असते. भारतासारख्या कमी श्रीमंत देशासाठी हे प्रारूप अनुकूल नाही. भारतातील लोकसंख्येचे वाढते आयुर्मान, वाढते शहरीकरण आणि त्यामुळे होणारे स्थलांतर यामुळे हे प्रारूप योग्य ठरत नाही. शहरीकरणाअंतर्गत सामाजिक सुरक्षा स्थितिशील समाजापेक्षा वेगळी असते.

**प्रश्न :**

१) सामाजिक सुरक्षेची पारंपरिक कल्पना सांगा.
२) या उताऱ्यात सामाजिक सुरक्षेत कोणता संकल्पनात्मक बदल सुचवण्यात आला आहे?
३) श्रीमंत जगातील सामाजिक सुरक्षेचा वारसा कोणता आहे?
४) भारताच्या कोणत्या वैशिष्ट्यामुळे सामाजिक सुरक्षेचे पारंपरिक प्रारूप अनुकूल ठरत नाही?

## प्र. ५. खालील प्रश्नांची उत्तरे द्या :

१) सरकारी अंदाजपत्रकाचे प्रकार आणि महत्त्व स्पष्ट करा.
२) कराच्या तत्वाचे स्पष्टीकरण द्या.
३) सरकारचे करेतर उत्पन्न स्रोत स्पष्ट करा.


## प्र. ६. खालील प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा :

१) सार्वजनिक खर्चात वाढ होण्याची कारणे स्पष्ट करा.

# ९ भारतातील नाणे बाजार आणि भांडवल बाजार (Money Market and Capital Market in India)

**प्रस्तावना :**


वित्त हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मूलतः वित्त हे पैशाच्या व्यवस्थापनाशी संबंधित असते. यामध्ये व्यक्ती, उद्योगसंस्था आणि शासनाला विविध उद्देशांसाठी आवश्यक असणाऱ्या निधींचा समावेश होतो. वैयक्तिक वित्त, औद्योगिक वित्त व सार्वजनिक वित्त असे वित्ताचे वर्गीकरण करता येते. निधी गतिशील करणे आणि निधीचे वाटप करण्यासाठी देशाची वित्तीय व्यवस्था जबाबदार असते. वित्तव्यवस्था देशाच्या आर्थिक विकासासाठी आवश्यक असलेल्या संपत्तीच्या निर्मितीस मदत करते. भारतातील वित्त प्रणालीमध्ये वित्तीय संस्था, वित्तीय बाजारपेठ, वित्तीय साधने आणि वित्तीय सेवा यांचा समावेश होतो.




वित्तीय बाजार हा वित्त प्रणालीचा एक महत्त्वाचा घटक आहे. या प्रकरणात आपण प्रामुख्याने वित्तीय बाजारांचा अभ्यास करणार आहोत.

**वित्तीय बाजारपेठेचा अर्थ :**

वित्तीय बाजारपेठेत रोखे (बॉण्ड), भाग(शेअर्स), व्युत्पन्न रोखे(डेरिव्हेटिव्ह), सरकारी रोखे, विदेशी चलन इत्यादींसारख्या आर्थिक मालमत्तांची खरेदी-विक्री केली जाते. वित्तीय बाजारपेठा, बँका, बिगर बँकिंग वित्तीय संस्था, दलाल, म्यूच्युअल फंड, वटणावळ गृहे इत्यादी माध्यमांतून चालतात. यामध्ये प्रामुख्याने नाणे बाजार व भांडवली बाजार या दोन भिन्न बाजारपेठांचा समावेश होतो.




**हे करून पहा!**

खाली दिलेल्या उदाहरणांमधून संबंधित वित्त प्रकार ओळखा.

(वैयक्तिक वित्त/औद्योगिक वित्त/सार्वजनिक वित्त)

- सेवानिवृत्ती निधीची निर्मिती करणे.
- समभागांच्या विक्रीतून भागभांडवल वाढवणे
- कर महसूल गोळा करणे.
- समान मासिक हप्त्याद्वारे गृहकर्जाची परतफेड करणे.
- आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या सामाजिक पायाभूत सुविधांवरील खर्च.
- कार्यरत भांडवलाचे व्यवस्थापन.

## अ) भारतातील नाणे बाजार :

**अर्थ :**

नाणे बाजार म्हणजे अल्पमुदती कर्ज देणे व घेणे होय. हा सदृश पैशाचा किंवा प्रतिपैशाचा बाजार असतो, ज्यामध्ये अल्पकालीन साधने उदा., व्यापारी हुंडी, सरकारी रोखे, वचन पत्रे इत्यादींचा समावेश होतो. अशी साधने अत्यंत तरल, कमी जोखमीची व एक वर्ष किंवा त्यापेक्षा कमी मुदतीची परिपक्वता असणारी व सहज विक्रीयोग्य असतात.

**तुम्हांला माहीत हवं!**

**काही वित्तीय साधने :**

- **रोखे** (Bonds) – दीर्घकालीन निधी घेण्याचे साधन म्हणून कंपन्या किंवा सरकारद्वारे प्रस्तुत केलेले कर्जसाधन होय.
- **समभाग भांडवल** (Equity Shares) – समभाग भांडवल म्हणजे एखादी व्यक्ती किंवा समूहाने घेतलेल्या कंपनीचे समभाग होय.
- **व्युत्पन्न**(Derivitive) – व्युत्पत्र म्हणजे वित्तीय प्रतिभूतीच्या संदर्भाने एखाद्या मूलभूत मालमत्तेचे मूल्य किंवा किंमत रोखेभाग, चलन, व्याजदर, वस्तू इत्यादींमधून मिळविणे होय.
- **सरकारी रोखे** (Government securities) – सरकारी रोखे म्हणजे परिपक्वता कालावधीत परतफेड

करण्याचे आश्वासन देऊन सरकारने प्रस्तुत केलेल्या कर्जाचे साधन होय.


- **व्यापारी बिले (Trade Bills) –** वस्तूंच्या देयकामध्ये व्यापाराद्‌वारे काढलेली व स्वीकारलेली विनिमय बिले म्हणजे व्यापारी बिले होय.
- **वचनपत्रे (Promissory Note) –**म्हणजे असे वित्तीय साधन ज्यामध्ये एका पक्षाने दुसऱ्या पक्षाला मागणीनुसार किंवा भविष्यातील तारखेला निश्चित रक्कम देण्याबद्दल दिलेले लेखी वचन दिले आहे.

**भारतातील नाणे बाजाराची संरचना :**

भारतातील नाणे बाजार हा दुहेरी स्वरूपाचा आहे. यामध्ये संघटित क्षेत्र व असंघटित क्षेत्र यांचा समावेश होतो. संघटित क्षेत्रामध्ये भारतीय रिझर्व्ह बँक (RBI), व्यापारी बँका, सहकारी बँका, विकास वित्तीय संस्था, गुंतवणूक संस्था, भारतीय सवलत व वित्त गृह (DFHI) यांचा समावेश होतो. तसेच असंघटित क्षेत्रात सावकार, स्थानिक वित्तीय पुरवठा करणाऱ्या संस्था (बँकर्स) व अनियंत्रित बिगर बँक वित्त पुरवठा, मध्यस्थ संस्था यांचा समावेश होतो.

भारतातील नाणे बाजाराचे केंद्र, मुंबई, दिल्ली व कोलकता या शहरांमध्ये एकवटले आहे. त्यामध्ये मुंबई हे एकमेव प्रभावी नाणे बाजाराचे केंद्र आहे. ज्यामध्ये भारतातील सर्व भागांमधून पैशाचा ओघ येतो.

पुढील तक्त्यावरून भारतीय नाणे बाजारातील संघटित क्षेत्राची कल्पना येऊ शकते.




आकृती ९.१

१) **संघटित क्षेत्र :** भारतातील संघटित क्षेत्रात भारतीय रिझर्व्ह बँक, व्यापारी बँका, सहकारी बँका, विकास वित्तीय संस्था, भारतीय सवलत व वित्तीय गृह या संस्थांचा समावेश होतो. त्यांचे कार्य भारतातील सर्व आर्थिक क्षेत्रात चालते. भारतातील संघटित क्षेत्रातील रचनेबाबत चर्चा करूया.

अ) **भारतीय रिझर्व्ह बँक :** भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) ही भारताची मध्यवर्ती बँक आहे. हिल्टन यंग आयोगाच्या शिफारशीनुसार भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना केली गेली. भारतीय रिझर्व्ह बँक कायदा १९३४ नुसार बँकेच्या मूलभूत कार्याला वैधानिक आधाराची तरतूद आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना १ एप्रिल १९३५ रोजी खाजगी भागधारक बँक म्हणून झाली. भारतीय रिझर्व्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण १ जानेवारी १९४९ रोजी झाले. हा नाणे बाजारातील एक महत्त्वाचा घटक आहे.

**मध्यवर्ती बँकेच्या काही प्रसिद्ध व्याख्या :**

**डॉ. एम.एच. डिकॉक –** "मध्यवर्ती बँक ही देशातील मुद्रा व बँकिंग संरचनेतील शिखर संस्था आहे."

**प्रा. डब्ल्यू ए. शॉ. –** "अर्थव्यवस्थेतील पतपुरवठ्यावर नियंत्रण ठेवणारी बँक म्हणजे मध्यवर्ती बँक होय."

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

**भारतीय रिझर्व्ह बँकेची कार्ये**

१) **चलनी नोटांची निर्मिती करणारी बँक :** रिझर्व्ह बँकेकडे एक रुपया व नाणी सोडून सर्व रूपयांच्या नोटा निर्माण करता येतात. १९५७ च्या 'किमान राखीव प्रणालीनुसार' रिझर्व्ह बँकेला किमान २०० कोटी रुपये ठेव ठेवावी लागते. यापैकी ११५ कोटी सोन्याच्या स्वरूपात आणि ८५ कोटी परकीय चलनाच्या स्वरूपात ठेवले जाते.

२) **सरकारची बँक :** रिझर्व्ह बँक सरकारची बँक, सरकारची सल्लागार आणि सरकारचा प्रतिनिधी म्हणून काम करते. ही केंद्र व राज्य सरकारच्या व्यवसायाचे व्यवहार करते,

पैसे स्विकारते आणि सरकारच्या वतीने देणी देते. तसेच सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनदेखील करते. ही सरकारला अनेक आर्थिक विषयांवर सल्ला देते.

३) **बँकांची बँक :** रिझर्व्ह बँक व्यापारी बँकांवर वैधानिक नियंत्रण ठेवते. सर्व अनुसूचित बँकांना रिझर्व्ह बँकेकडे त्यांच्या मागणी व मुदत ठेवींनुसार किमान रोख निधी राखीव ठेवणे अनिवार्य असते. रिझर्व्ह बँक व्यापारी बँकांना त्यांच्या योग्य हुंड्या वटवून देऊन आर्थिक साहाय्य करते. तसेच मंजुरी दिलेल्या तारणाच्या बदल्यात बँकांना कर्ज उपलब्ध करून देते.

४) **परकीय चलनसाठ्याचा सांभाळ करणे :** रिझर्व्ह बँक देशाच्या परकीय चलनसाठ्याचे संरक्षक म्हणून काम करते. त्यास रुपयाचे अधिकृत विनिमय दर कायम ठेवणे, स्थिरता निश्चित करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या सर्व सदस्य देशांच्या चलनांची खरेदी व विक्री करण्याचे कार्य रिझर्व्ह बँक करते.

५) **पतपैशाचे नियंत्रण :** देशातील सर्वोच्च बँक म्हणून रिझर्व्ह बँक व्यापारी बँकांच्या पतपुरवठ्याच्या आकारमानावर व वापरावर नियंत्रण ठेवते. संख्यात्मक आणि गुणात्मक साधनांचा वापर करून पतनियंत्रण केले जाते. संख्यात्मक पतनियंत्रणामध्ये बँकदर, खुल्या बाजारातील रोखे व्यवहार आणि रोकड निधीचे बदलते गुणोत्तर जसे रोकड निधीचे गुणोत्तर(C.R.R.) व सांविधानिक रोखतेचे गुणोत्तर (S.L.R) इत्यादी साधनांचा समावेश होतो. तर गुणात्मक पतनियंत्रणामध्ये कर्ज व तारण यांमधील गाळ्याचे नियमन, कर्जाचे नियंत्रित वाटप, नैतिक मनधरणी इत्यादी साधनांचा समावेश होतो.

६) **आकडेवारी गोळा करणे व प्रसिद्धीस देणे :** रिझर्व्ह बँक बँकिंग आणि अर्थव्यवस्थेच्या इतर वित्तीय क्षेत्रांच्या संबंधित सांख्यिकीय माहिती संकलित करून ती प्रसिद्ध करते.

७) **विकासाभिमुख आणि प्रोत्साहनात्मक कार्य :** रिझर्व्ह बँक निमशहरी आणि ग्रामीण भागात बँकिंग सेवा वाढविणे, ठेवीदारांना संरक्षण देणे, कृषी पतपुरवठा आणि औद्योगिक पतपुरवठा यांच्यासाठी काही विकासात्मक कामे करते.

८) **इतर कार्ये :** रिझर्व्ह बँक आपल्या सदस्य बँकांच्या खात्यामधील आपापसातील देण्याघेण्याचे व्यवहार पूर्ण करण्यासाठी निरसन केंद्र म्हणून काम करते. व्यापारी बँकांचा अंतिम ऋणदाता म्हणून आर्थिक संकटात असलेल्या बँकांना आर्थिक साहाय्य पुरवते.

**शोधा पाहू!**

खालील देशांच्या मध्यवर्ती बँकांची नावे सांगा.

- संयुक्त राज्ये (अमेरिका)
- युनायटेड किंगडम.
- कॅनडा
- स्वीडन
- रशिया
- फ्रान्स
- जर्मनी
- जपान
- चीन
- ऑस्ट्रेलिया

**आ) व्यापारी बँका :** बचत करणाऱ्यांना आणि गुंतवणूकदारांना एकत्र आणण्यासाठी व्यापारी बँका देशाच्या वित्तीय प्रणालीत मध्यस्थ म्हणून कार्य करतात. त्या नफा मिळवणाऱ्या आर्थिक संस्था आहेत. व्यापारी बँका बचतीची जमवाजमव(ठेवी स्वीकारणे) करण्यात आणि अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांत कर्ज वाटप करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. यात अनुसूचित व बिगर अनुसूचित व्यापारी बँकांचा समावेश होतो. भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम १९३४ च्या दुसऱ्या विभागात अनुसूचित व्यापारी बँकांचा समावेश आहे. मालकी आणि कार्यपद्धतीनुसार भारतातील व्यापारी बँकांचे चार घटकामध्ये वर्गीकरण केले जाते.

- सार्वजनिक क्षेत्रातील बँका
- खाजगी क्षेत्रातील बँका
- प्रादेशिक ग्रामीण बँका.
- विदेशी बँका

**व्यापारी बँकांच्या काही प्रसिद्ध व्याख्या :**

१) **भारतीय बँकिंग नियमन कायदा १९४९ :** “बँकिंग म्हणजे कर्ज देण्यासाठी किंवा गुंतवणुकीसाठी लोकांच्या ठेवी स्वीकारून त्या ठेवी मागणी केल्यानंतर किंवा इतर प्रकारे परत करणे अथवा धनादेशाद्वारे किंवा धनाकर्षाद्वारे परत करणे होय.”

२) **प्रा. केर्नक्रॉस :** “पैसा आणि पतपैशाचे व्यवहार करणाऱ्या संस्थेला बँक असे म्हणतात.”

## व्यापारी बँकांची कार्ये :

१) **ठेवी स्वीकारणे :** ठेवी म्हणजे व्यापारी बँकांसाठी निधीचा मुख्य मार्ग होय. बचतीमुळे ठेवी तयार होतात. ठेवीचे वर्गीकरण मागणी ठेवी आणि मुदत ठेवी म्हणून केले जाते.

i) **मागणी ठेवी :** मागणीनुसार पैसे काढले जाणाऱ्या ठेवींना मागणी ठेवी असे म्हणतात. त्या चालू ठेवी आणि बचत ठेवीच्या स्वरूपात आहेत.

- चालू ठेव खाते हे सामान्यपणे व्यापारी, सार्वजनिक संस्था आणि विश्वस्त मंडळाकडून उघडले जाते. चालू ठेवी खातेधारकांना शिलकीपेक्षा जास्त रक्कम काढण्याची सवलत (अधिकर्ष) दिली जाते.
- बचत ठेवी विशेषतः पगारदार वर्ग व छोटे व्यापारी यांच्याकडून ठेवल्या जातात.

ii) **निश्चित कालावधी ठेवी :** या ठरावीक कालावधीसाठी ठेवल्या जातात. यामध्येच आवर्त ठेवी व मुदतबंद ठेवी यांचा समावेश केला जातो.

- आवर्ती ठेवी ग्राहकांना नियमितरीत्या बचत करण्यास प्रोत्साहन देतात. ठरवून दिलेल्या कालावधीनंतर एक निश्चित रक्कम ग्राहकांना द्यावी लागते.
- मुदतठेवी ठरावीक कालावधीसाठी ठेवल्या जातात. या ठेवीत असलेली रक्कम ठरवून दिलेल्या कालावधीनंतर काढता येते. यावर दिला जाणारा व्याजदर तुलनेने अधिक असतो.

२) **कर्ज देणे :** व्यापारी बँका ठेवीदाराकडून घेतलेल्या ठेवींचा वापर गरजूंना कर्ज देण्यासाठी वापरतात. बँका, व्यक्ती आणि संस्थांना विविध कारणांसाठी कर्ज पुरवठा करत असतात. कर्ज, रोख कर्ज, अधिकर्ष सवलत यांचा समावेश अल्प, मध्यम आणि दीर्घ मुदतीच्या कर्जासाठी केला जातो. कर्जाचा कालावधी जितका जास्त असेल तितका व्याजदर अधिक असतो. याशिवाय बँका रोख कर्ज, अधिकर्ष सवलत व हुंडी वटवणे इत्यादी सुविधा पुरवितात.

३) **साहाय्यक कार्ये :** व्यापारी बँका निधी हस्तांतरण ग्राहकाच्या वतीने रक्कम जमा करणे, ग्राहकांच्या वतीने प्रासंगिक देणी देणे, परकीय चलन, सुरक्षित ठेव कप्पा, डिमॅट सुविधा, इंटरनेट बँकिंग, मोबाइल बँकिंग यांसारख्या अनेक सुविधा उपलब्ध करतात.

४) **पतनिर्मिती :** पतनिर्मिती करणे हे व्यापारी बँकांचे महत्त्वपूर्ण कार्य आहे. प्राथमिक ठेवींच्या आधारावर बँका पतनिर्मिती करतात. निव्वळ मागणी आणि वेळेचे दायित्व यापैकी राखीव गरजांची पूर्तता केल्यानंतरची शिल्लक रक्कम कर्ज देण्यासाठी वापरतात. अशा प्रकारे बँकांनी दिलेल्या कर्जांमधून दुय्यम ठेवी निर्माण होतात.

जेव्हा बँक आपल्या ग्राहकांना कर्ज पुरवते तेव्हा कर्जाची रक्कम ग्राहकाच्या बँक खात्यात जमा केली जाते. ठेवी म्हणून कर्जाची रक्कम मिळवणारी बँक राखीव स्वरूपात काही भाग बाजूला ठेवते. राखीव गरजा भागल्यानंतर उर्वरित रकमांमधून कर्ज दिले जाते. ही प्रक्रिया देशातील संपूर्ण बँकिंग प्रणालीद्वारे अनुसरण केली जाते. थोडक्यात व्यापारी बँका ठेवी निर्माण करतात, ठेवीतून कर्जे देतात, कर्जातून ठेवी निर्माण होतात व त्यातून पतपैशाची निर्मिती होते.




आकृती ९.२


**हे करून पहा!**

खालील दिलेल्या कंसातील बँकांशी संबंधित असलेले बोधचिन्ह शोधा.

(स्टेट बँक ऑफ इंडिया, एचएसबीसी बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, ॲक्सिस बँक, स्टँडर्ड चार्टर्ड बँक, एचडीएफसी बँक)

इ) **सहकारी बँका :** १९०४ च्या सहकारी पतसंस्था कायद्यान्वये सहकारी बँका अस्तित्वात आल्या. सहकारी बँका स्थानिक लोकसंख्येच्या कर्जाची गरज भागवून व्यापारी बँकांच्या प्रयत्नांना पूरक ठरतात. या अल्प व मध्यम उत्पन्न गटातील बँकिंग गरजा पूर्ण करतात. ग्रामीण सहकारी पतक्षेत्रात प्राथमिक सहकारी पतसंस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राज्य सहकारी बँका या संस्थांचा समावेश होतो. आकृती ९.३ सहकारी बँकींग क्षेत्राची संरचना दर्शविते.

**त्रि–स्तरीय सहकारी पतपुरवठा रचना**




**आकृती ९.३**

ई) **विकास वित्तीय संस्था (DFI) :** विकास वित्तीय संस्था अशा संस्था असतात, ज्या मध्यम आणि दीर्घ मुदतीची आर्थिक मदत पुरवतात. त्या उद्योग, कृषी आणि इतर प्रमुख क्षेत्रांच्या विकासास मदत करतात. भारतीय औद्योगिक वित्त महामंडळ (इंडस्ट्रीअल फायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया – IFCI) १९४८ मध्ये स्थापन झालेली पहिली विकसित वित्तीय संस्था आहे.

**आठवून पहा!**

तुम्ही इयत्ता ११ वी मध्ये नाबार्ड ही ग्रामीण पतपुरवठा करणारी सर्वोच्च संस्था आहे, हे अभ्यासले आहे. ही संस्था, लघु, कुटीर व ग्रामीण उद्योग, हस्तव्यवसाय इत्यादींच्या विकासाला प्रोत्साहन देते.

उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या आगमनाने विकास वित्त सांघिक (कॉर्पोरेट) क्षेत्राच्या वित्तीय गरजा मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्या शिवाय अनेक परदेशी कंपन्यांनी भारतीय कंपन्यांशी करार केला आहे. विकास वित्तीय संस्थांनी त्यांच्या कार्यात विविधता आणली आहे. व्यापारी बँकिंग, ग्राहक वित्त, दलाली(ब्रोकिंग), साहस भांडवल पुरवठा(व्हेंचर कॅपिटल फायनान्स), पायाभूत वित्तीय पुरवठा, ई–वाणिज्य इत्यादी विविध प्रकारची नवीन उत्पादने व सेवा देण्यासाठी त्यांनी सहयोगी संस्था स्थापन केल्या आहेत. अशा प्रकारे विकसित संस्था स्वतःला सार्वत्रिक बँकांमध्ये रूपांतरित करण्याच्या प्रक्रियेत आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकेने विकसित वित्तीय संस्थांना व्यवसायिक बँक होण्यासाठी मार्गदर्शक सूचना केल्या आहेत. उदा.,आयसीआयसीआय कंपनी तिच्या सहाय्यक आयसीआयसीआय (ICICI) बँकेच्या प्रतिगामी विलीनीकरणाने ही एक आघाडीची व्यापारी बँक बनली आहे.

ए) **भारतीय सवलत व वित्तीय गृह (DFHI) :** वाघुल समितीच्या शिफारशीच्या आधारे १९८८ मध्ये नाणे बाजार संस्था म्हणून भारतीय सवलत व वित्तगृहाची स्थापना करण्यात आली. यांमध्ये नाणे बाजार साधनांना तरलता प्रदान करण्यासाठी तसेच अशा साधनांसाठी सक्रिय दुय्यम बाजारपेठेच्या विकासास मदत करण्यासाठी या संस्थेची स्थापना करण्यात आली यामध्ये भारतीय रिझर्व्ह बँक, सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि वित्तीय संस्थांची संयुक्तपणे मालकी आहे.


२) **असंघटित क्षेत्र :** भारतातील असंघटित क्षेत्रातील रचनेबाबत चर्चा करू. भारतातील असंघटित नाणे बाजारात स्थानिक बँकर्स, सावकार आणि अनियंत्रित बिगर–बँक वित्तीय मध्यस्थांचा समावेश होतो. असंघटित नाणे बाजाराचे कार्य मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात आहे.

i) **स्थानिक बँकर्स :** हे वित्तीय मध्यस्थ असतात, जे बँकासारखेच कार्य करतात. ते बहुतेक हुंडीसारख्या स्वदेशी अल्पमुदतीच्या पतसाधनांमध्ये व्यवहार करतात. वेगवेगळ्या बाजारपेठेत व्याजाचा दर वेगवेगळा असतो. स्थानिक बँकर्स बहुधा ठराविक विशिष्ट सामाजिक गटाशी संबंधित असतात. बँक सुविधा नसलेल्या भागातील निधीचा हा एक महत्त्वाचा स्रोत आहेत. ते प्रत्यक्ष शेती,

व्यापार आणि उद्योगांना कर्जपुरवठा करतात. उदा., सराफी पेढी, अडते, व्यापारी, दलाल इत्यादी.

ii) **सावकार :** सावकार प्रामुख्याने ग्रामीण भागात काम करतात. सावकार सामान्यतः उच्च दराने व्याज आकारतात. सावकाराने दिलेली कर्जे बहुतेक अनुत्पादक हेतूसाठी असतात. उदा., शेतमजूर, सीमान्त आणि अल्पभूधारक शेतकरी, कारागीर, छोटे व्यापारी इत्यादी घटक सावकाराकडून कर्ज घेतात. सद्य स्थितीत सावकारांच्या शोषण करण्याच्या प्रवृत्तीमुळे रिझर्व्ह बँकेने सावकारांच्या क्रियाकलापांवर निर्बंध घातले आहेत.

iii) **अनियंत्रित बिगर बँक :** बँक वित्तीय मध्यस्थ – यात चिटफंड्स, निधी कर्जकंपन्या इत्यादींचा समावेश होतो. चिटफंडातील सदस्य यामध्ये नियमित भरणा करतात. एकमेकांनी मान्य केलेल्या निकषांच्या आधारे बोली किंवा चिठ्ठी (ड्रॉ) पद्धतीने सदस्यांची निवड केली जाते. त्यानुसार गोळा केलेला निधी सदस्याला दिला जातो. चिटफंड बहुतांश केरळ आणि तामिळनाडूमध्ये कार्यरत आहेत. निधी हा एक पारंपरिक लाभदायक प्रकार आहे. हा सदस्यांच्या योगदानावर चालतो. सभासदांना माफक व्याजदरावर कर्ज दिले जाते. कर्ज कंपन्या या वित्तीय कंपन्या असतात. त्या व्यापाऱ्यांना, लघुउद्योगांना आणि स्वयंरोजगारांना कर्ज पुरवतात. त्या अनियंत्रित असल्यामुळे कर्जावर उच्च व्याजदर आकारतात.




**तुम्हांला माहीत आहे का?**

**नाणे बाजाराची साधने :**

नाणे बाजारात पतसाधनांचा वापर होतो.

- **मागणी नाणे बाजार :** जेव्हा पैसे एका दिवसासाठी कर्ज म्हणून घेतले जाते किंवा दिले जाते. तेव्हा त्याला २४ तासासाठी वापरला जाणारा पैसा म्हणून ओळखले जाते. पैसे उसने घेतले जातात किंवा एक दिवसापेक्षा जास्त काळ व १४ दिवसापर्यंत कर्ज दिले जाते तेव्हा तो दखल पैसा (नोटीस मनी) म्हणून ओळखला जातो.
- **कोषागार बिले :** तात्पुरती तरलता कमतरता दूर करण्यासाठी सरकारच्या वतीने रिझर्व्ह बँकेने दिलेली अल्प मुदतीची साधने.
- **व्यापारी पत्रे :** ही एक असुरक्षित वचन चिठ्ठी आहे, जी एका निश्चित परिपक्वता कालावधीसह मान्यता आणि वितरणानुसार परिक्रम्य आणि हस्तांतरणीय असते.
- **ठेवींचे प्रमाणपत्र :** ही साधने असुरक्षित आहेत. वाणिज्य बँक आणि विकास वित्त संस्थांनी जारी केलेल्या वाहक स्वरुपात वाटाघाटी करण्यायोग्य साधने आहेत.
- **व्यापारी पावती :** ती अल्प जोखीम असलेली, परिक्रम्य आणि तरल साधने आहेत.

**भारतातील नाणे बाजाराची भूमिका :**

खालील पैलू भारतातील नाणे बाजाराची भूमिका स्पष्ट करतात.

१) **कर्जदाराची अल्पमुदतीची गरज :** नाणे बाजारामध्ये कर्जदाराच्या अल्पमुदतीच्या वित्तीय गरजा वास्तव दरात पूर्ण करण्यासाठी योग्य संधी उपलब्ध होते.

२) **तरलता व्यवस्थापन :** नाणे बाजार हा एक गतिमान बाजार आहे. त्यामुळे मौद्रिक धोरणाद्वारे अर्थव्यवस्थेतील तरलता आणि पैशाचे अधिक चांगले व्यवस्थापन करण्यास मदत होते. परिणामी, देशात आर्थिक स्थैर्य लाभते आणि आर्थिक विकास होतो.

३) **गुंतवणूक पत्रक व्यवस्थापन (पोर्टफोलिओ) :** नाणे बाजार गुंतवणूकदारांच्या जोखीम आणि परताव्याच्या प्राधान्यानुसार बनविलेल्या विविध प्रकारच्या आर्थिक साधनांशी निगडित असतो. याद्वारे गुंतवणूकदार निरनिराळ्या वित्तीय मालमत्तांचे तारण ठेवण्यास सक्षम होतात. यामधून जोखीम कमी करण्यात आणि जास्तीतजास्त परतावा मिळविण्यास मदत होते.

४) **समतोल यंत्रणा :** नाणे बाजार साधनांचे तर्कसंगत वाटप आणि गुंतवणूक प्रवाहातील बचत गतिशील करून अल्पमुदतीच्या निधीची मागणी आणि पुरवठा यांच्यात समतोल स्थापित करण्यास मदत करतो.

५) **सरकारच्या वित्तीय गरजा :** नाणे बाजार शासनाला कोषागार(ट्रेझरी) देयकाच्या आधारे अल्पमुदतीच्या वित्तीय गरजा पूर्ण करण्यास मदत करतो.

६) **मौद्रिक विषयक धोरणाची अंमलबजावणी :** मौद्रिक धोरणाचे उद्दिष्ट पैशाच्या प्रमाणाचे व्यवस्थापन करणे हे आहे. जेणेकरून अर्थव्यवस्थेच्या निरनिराळ्या क्षेत्रांची आवश्यकता (गरज) पूर्ण करण्यासाठी आणि आर्थिक विकासाची गती वाढविण्यासाठी उपयोगी ठरते. हे धोरण मध्यवर्ती बँकेद्वारे लागू केले जाते.

अर्थव्यवस्थेतील पूर्ण विकसित नाणे बाजार मौद्रिकविषयक धोरणाची यशस्वी अंमलबजावणी करण्याची हमी देतो. नाणे बाजारामुळे मध्यवर्ती बँकेला योग्य व्याजदर धोरण विकसित करण्यास मार्गदर्शन मिळते.

७) **रोख रकमेचा काटकसरीने वापर :** नाणे बाजाराचा संबंध प्रत्यक्ष पैशाशी नसून पैशाचा निकटचा(जवळचा) पर्याय असलेल्या विविध वित्तीय साधनांशी असतो. त्यामुळे रोख रकमेचा काटकसरीने वापर होतो.

८) **वाणिज्य, उद्योग आणि व्यापार वृद्धी :** नाणे बाजारामध्ये अल्पमुदतीच्या निधीची तातडीने गरज असलेल्या स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्यांना हुंडी वटवण्याची सुविधा उपलब्ध असते. शिवाय नाणे बाजारात कृषी आणि लघू उद्योगांसाठी खेळते भांडवल उपलब्ध होते.

### भारतीय नाणे बाजाराच्या समस्या :

विकसित देशाच्या तुलनेत भारतातील नाणे बाजार परिणाम आणि तरलतेच्या बाबतीत कमी विकसित आहे. खालील मुद्दे भारतीय नाणे बाजारातील समस्या स्पष्ट करतात.

१) **दुहेरी रचना :** नाणे बाजारामध्ये संघटित व असंघटित क्षेत्र असल्यामुळे विघटन पारदर्शकतेचा अभाव आणि वाढती अस्थिरता निर्माण होते. अशा असंघटित बाजारामध्ये समन्वयाचा अभाव असतो. शिवाय तो भारतीय रिझर्व्ह बँकेच्या थेट नियंत्रण आणि देखरेखीखाली येत नाही.

२) **व्याजदरामध्ये समानतेचा अभाव :** नाणे बाजारामध्ये व्यापारी बँका, सहकारी बँका, बिगर बँक, वित्तीय कंपन्या, विकास वित्त संस्था, गुंतवणूक कंपन्या इत्यादी विविध घटकांचा समावेश होतो. म्हणून व्याजाचे अनेक दर असतात. त्या अनुषंगाने कर्जदाराचे विविध प्रकार आहेत.

३) **निधीची कमतरता :** अपुऱ्या बचतीमुळे नाणे बाजाराला निधीची कमतरता भासते. दरडोई उत्पन्न, लोकांमध्ये बँकिंग सवयीची कमतरता, निरुपयोगी उपभोग खर्च, ग्रामीण भागात अपुऱ्या बँकिंग सुविधा इत्यादी बाबीदेखील नाणे बाजारातील निधीच्या कमतरतेसाठी जबाबदार आहेत.

४) **हंगामी चढउतार :** निधीची मागणी हंगामानुसार बदलते. विशेषतः ऑक्टोबर ते जून या हंगामकाळात कृषी उत्पादनांमध्ये व्यापार करणे, व्यवसायातील गुंतवणूक इत्यादी विविध कारणांसाठी मोठ्या प्रमाणात वित्त आवश्यक असते. यामुळे नाणे बाजारात मोठ्या प्रमाणात चढउतार आढळतात.

५) **वित्तीय समावेशनाचा अभाव :** दुर्बल घटक आणि निम्न उत्पन्न गटासारख्या असुरक्षित गटाकरिता अजूनही देशात बँकिंग सुविधा अपुऱ्या असून दुर्बल गट व कमी उत्पन्न वर्गापर्यंत त्या पोहचू शकलेल्या नाहीत. यातून वित्तीय समावेशन अभाव दिसून येते.

६) **तंत्रज्ञान सुधारणेतील दिरंगाई :** वित्तीय बाजार विकासासाठी व सुरळीत कार्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक आहे. परंतु तंत्रज्ञान सुधारणेमध्ये दिरंगाई होत असल्यामुळे नाणे बाजाराच्या कार्यात अडथळे येतात.

### नाणे बाजारातील सुधारणा :

नाणेबाजारातील काही महत्त्वाच्या सुधारणा खाली दिल्या आहेत.

i) वेगवे गळ्या मुदतपूर्ण कालावधीची कोषागार बिले, व्यावसायिक पत्रके, ठेवीचे प्रमाणपत्र आणि नाणे बाजार म्युच्युअल फंड (MMMF) यासारख्या नवीन साधनांचा समावेश करण्यात आला.

ii) तरलता समायोजन सुविधा (LAF) अंतर्गत रिझर्व्ह बँक रेपो दर आणि रिव्हर्स रेपोदर यांचा समावेश करण्यात आला.

iii) व्याजदर मुख्यत्वे बाजार शक्तींनी निर्धारीत केले जावेत.

iv) नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर (NEFT) आणि रिअल टाइम ग्रॉस सेटलमेंट (RTGS) ह्या निधी हस्तांतरणाच्या सुधारणा करण्यात आल्या.

v) तांत्रिक प्रगती आणण्यासाठी व्यवहार प्रणाली (इलेक्ट्रॉनिक डीलिंग सिस्टम) सुरू करण्यात आली.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**बँकिंग क्षेत्रातील अद्ययावत विकास :**

- **सूक्ष्म वित्त बँक :** लघू व्यावसायिक घटकांना, अल्पभूधारक शेतकऱ्यांना, सूक्ष्म आणि लघुउद्योगांना

व इतर असंघटित क्षेत्रातील संस्थांना उच्च तंत्रज्ञानाद्वारे परंतु कमी खर्चाचा पतपुरवठा करून आर्थिक समावेशास प्रोत्साहन देणे हे सूक्ष्म वित्त बँकांचे उद्दिष्ट आहे.

- **देयक बँक :** देयक बँक ही इतर बँकांसारखी असते ज्यामध्ये कोणतेही पतधोके समाविष्ट न करता छोट्या (लहान) प्रमाणात कार्य केले जाते. या बँका अनेक बँकिंगसंदर्भातील क्रिया, कर्ज व क्रेडीट कार्ड हे वगळून १ लाख रुपयेपर्यंत मागणी ठेवी स्वीकारू शकतात. तसेच पैशाचे हस्तांतरण, मोबाइल देयक, खरेदी आणि इतर बँकिंग सेवा जसे की ए.टी.एम., डेबिट कार्ड, नेट बँकिंग, तृतीय पक्ष निधी हस्तांतरित करतात.
- **सार्वत्रिक बँका :** सार्वत्रिक बँका म्हणजे अशा बँका, ज्यामध्ये भिन्न प्रकारच्या वित्तीय सेवा, उदा., व्यावसायिक बँकिंग व गुंतवणूक बँकिंग आणि विशेषतः विमा यांसारख्या विस्तृत सेवा प्रदान करतात. एकेरी खिडकीच्या माध्यमातून बँकिंग आणि वित्तीय सेवा बहुउद्देशीय आणि बहुकार्यात्मक पद्धतीने उपलब्ध करून देणारा हा उत्कृष्ट वित्तीय बाजार आहे.
- **स्थानिक क्षेत्रीय बँका :** स्थानिक क्षेत्रिय बँक योजना ऑगस्ट १९८६ साली अमलात आणली. स्थानिक संस्थेकडून विशेषतः स्थानिक खाजगी बँकांद्वारे ग्रामीण बचतीचे संकलन स्थानिक क्षेत्रात गुंतवणूकीसाठी उपलब्ध करून देणे हा तिचा उद्देश होता. त्यामुळे पतउपलब्धतेतील तफावत दूर होण्यास मदत होते आणि ग्रामीण व निमशहरी (अर्धशहरी) भागातील संस्थात्मक पतसंरचना सक्षम होण्यास मदत होते.

### भारतातील भांडवली बाजार :

**अर्थ :**

भांडवल बाजार हा देशातील आणि देशाबाहेरील एकत्रित समभाग आणि कर्ज अशा दोन्ही दीर्घमुदतीच्या निधींची बाजारपेठ आहे. हा वित्तीय प्रणालीचा एक महत्त्वाचा घटक आहे. अधिक गुंतवणुकीला चालना देण्यासाठी तसेच आर्थिक वृद्धीसाठी प्रभावी भांडवल बाजाराचा विकास आवश्यक आहे. दीर्घकालीन निधीची मागणी कृषी, व्यापार आणि उद्योगातून होते. वैयक्तिक बचतकर्ता, सांघिक बचत, बँका, विमा कंपन्या, विशेष वित्तीय संस्था इत्यादी ह्या दीर्घकालीन निधीचा पुरवठा करतात.




आकृती ९.२

### भारतातील भांडवल बाजाराची संकल्पना :

भारतातील भांडवली बाजारात सरकारी रोखे बाजार, औद्योगिक रोखे बाजार, विकास वित्तीय संस्था आणि वित्तीय मध्यस्थ यांचा समावेश असतो.

खाली दिलेला तक्ता भारताच्या भांडवल बाजाराची संरचना दर्शविते.




तक्ता क्र.९.५

१) **सरकारी रोखे बाजार :** याला सोनेरी रोखे बाजार (गिल्ट एज्ड बाजार) असे म्हणतात. या बाजारात सरकारी आणि निमसरकारी रोख्यांचा व्यवहार होतो. यावर व्याजदर निश्चित असतो.

२) **औद्योगिक रोखे बाजार :** हा बाजार जुन्या आणि नवीन कंपन्यांनी लागू केलेले भाग (शेअर) आणि ऋणपत्रे (डिबेंचर) याच्याशी संबंधित आहे. हा नंतर प्राथमिक बाजार आणि दुय्यम बाजार यामध्ये विभागला जातो. भाग आणि ऋणपत्रांच्या विक्रीतून या बाजारपेठा नवीन भांडवल उभारण्यास मदत करतात. दुय्यम बाजारात कंपन्यांनी आधीच लागू केलेल्या प्रतिभूतींसह व्यवहार चालतात. दुय्यम बाजारपेठांत वायदे बाजारांच्या माध्यमातून कार्य केले जाते. वायदे बाजार हा भांडवल बाजाराचा महत्त्वाचा घटक आहे. ही एक संघटना/व्यवस्था आहे. ज्यामध्ये समभाग (Stock), रोखे (बॉण्डस्), वस्तू इत्यादीचा व्यापार होतो. बॉम्बे वायदे बाजार (BSE) आणि राष्ट्रीय वायदे बाजार (NSE) हे देशातील प्रमुख वायदे बाजार आहेत.

३) **विकास वित्तीय संस्था (DFI) :** या खाजगी क्षेत्राला मध्यम मुदतीची आणि दीर्घ मुदतीची आर्थिक मदत पुरवितात. त्यामध्ये इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (IFCI), इंडस्ट्रिअल इनव्हेस्टमेंट बँक ऑफ इंडिया (IIBI), एक्झिम बँक इत्यादींचा समावेश आहे.

४) **वित्तीय मध्यस्थ :** वित्तीय मध्यस्थ ही अशी संस्था आहे, जी दोन्ही पक्षांच्या आर्थिक उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी गुंतवणूकदार आणि कर्जदार यांच्यात दुवा म्हणून कार्ये करते. यामध्ये व्यापारी बँका, म्यूच्युअल फंड, भाडेपट्टी (लीज) कंपन्या, उद्यम भांडवल कंपन्या इत्यादी असतात.

## भारतातील भांडवल बाजाराची भूमिका

१) **दीर्घकालीन मुदतीची बचत :** औद्योगिक संस्था आणि सरकारकडून गुंतवणुकीच्या निधीची वाढती मागणी असते. परंतु ही वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी आर्थिक स्रोतांची उपलब्धता अपुरी असते. भांडवव बाजार सुरक्षा रोख्यांच्या विक्रीतून लोकसंख्येच्या विविध विभागातील दीर्घ मुदतीच्या बचतीस एकत्रित करण्यास मदत करतो.

२) **समभाग भांडवल पुरवणे :** भांडवल बाजार उद्योजकांना समभाग भांडवल प्रदान करतो. मालमत्ता खरेदी करण्यासाठी तसेच व्यवसाय कार्यवाहीसाठी त्याचा वापर करता येऊ शकतो.

३) **परिचालन (कार्यवाही) कार्यक्षमता :** भांडवली बाजार व्यवहारातील खर्च कमी करतो व व्यवहार प्रक्रिया सुलभ करून समभागाच्या खरेदी विक्रीतील निरसनाची वेळ कमी करून कार्यवाही कार्यक्षमता प्राप्त करण्यास मदत करतो.

४) **त्वरित मूल्यांकन :** भांडवल बाजार समान समभाग आणि कर्ज (रोखे, कर्जरोखे) साधनांचे उचित आणि त्वरित मूल्य निश्चित करण्यास मदत करतो.

५) **समन्वय :** भांडवल बाजार वास्तव आणि वित्तीय क्षेत्र, समभाग आणि कर्जरोखे, सरकारी आणि खाजगी क्षेत्र, देशांतर्गत आणि बाह्य निधी इत्यादींमध्ये एकत्रीकरण करतो.

## भांडवल बाजारातील समस्या :

भारतीय भांडवल बाजारात खालीलप्रमाणे समस्या आढळून येतात.

१) **वित्तीय घोटाळे :** वाढत्या आर्थिक घोटाळ्यांचा परिणाम म्हणजे भांडवल बाजारातील न भरून येणारा तोटा. यामुळे सार्वजनिक अविश्वासदेखील वाढला आहे आणि वैयक्तिक गुंतवणुकीबाबतचा आत्मविश्वास कमी झाला आहे.

२) **अंतस्थ माहीतगार आणि किंमत गैरफेरफार :** (Insider Trading) म्हणजे कंपनीची गुप्त माहिती असल्याने एखाद्याला वैयक्तिक लाभासाठी अप्रकाशित माहितीची खरेदी-विक्री करणे. गैरप्रकारे केलेली किंमत हाताळणी म्हणजे स्वतःच्या फायद्यासाठी काही व्यक्तींच्या मदतीने खरेदी-विक्री करून भागाच्या किमती वाढवणे. अशा बेकायदेशीर पद्धतीचा भांडवल बाजाराच्या सुगम कार्यावरही परिणाम झाला आहे.

३) **कर्जाची अपुरी साधने :** कर्जाच्या साधनांमध्ये रोखे, कर्जरोखे इत्यादींचा समावेश होतो. गुंतवणुकींचे कमी प्रमाण, देयकाची जास्त किंमत, लघू व मध्यम उद्योगांना प्रवेश नसल्यामुळे कर्जाच्या सुरक्षिततेमध्ये जास्त व्यापार होत नाही.

४) **व्यापाराच्या प्रमाणातील घट :** गुंतवणूकदारांना ऑनलाइन व्यवहाराची उपलब्धता व प्राधान्य असल्यामुळे प्रादेशिक

शेअर बाजारामध्ये व्यापाराच्या प्रमाणात तीव्र घट झाली. कारण गुंतवणूकदार बॉम्बे वायदे बाजार व नॅशनल वायदे बाजार या भाग बाजारातील रोख्यांमध्ये गुंतवणूक करण्यास प्राधान्य देतात.

५) **माहितीच्या कार्यक्षमतेचा अभाव :** एखाद्या कंपनीच्या शेअर बाजारातील किमतींनी सध्याच्या किमतीमध्ये सर्व उपलब्ध माहिती समाविष्ट केली तर बाजार माहितीनुसार कार्यक्षम असल्याचे म्हटले जाते. तथापि प्रगत देशांच्या तुलनेत भारतातील शेअर बाजारात माहितीची कार्यक्षमता कमी आहे.

**शोधा पाहू!**

प्रादेशिक वायदे बाजाराची यादी.

### भारतातील भांडवल बाजारातील सुधारणा

भारतातील भांडवली बाजारातील काही महत्त्वपूर्ण सुधारणा खालीलप्रमाणे :-

i) भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाची (SEBI) १९८८ मध्ये स्थापना करण्यात आली आणि वैधानिक मान्यता १९९२ ला देण्यात आली.

ii) राष्ट्रीय शेअर बाजारात (NSE) भारतातील अग्रगण्य स्टॉक एक्सचेंजची स्थापना १९९२ मध्ये करण्यात आली.

iii) आधुनिकीकरणाचा एक भाग म्हणून संगणकीकृत (स्क्रीन आधारित) व्यापार प्रणाली (SBTS) आणली गेली.

iv) डी-मॅट खाते (D mat) - इलेक्ट्रॉनिक पद्धतीने गुंतवणूकदारांकडून समभागांची सहज खरेदी व विक्री सुलभ करण्यासाठी १९९६ पासून डी मॅट खाते सुरू केले गेले.

v) अमेरिकन ठेव पावती(ADR) आणि जागतिक ठेव पावती (GDR) च्या माध्यमातून भारतीय कंपन्यांद्वारे जागतिक निधीमध्ये वाढीव प्रवेशास परवानगी देण्यात आली.

vi) गुंतवणूदारांची जागरूकता वाढविण्यासाठी आणि गुंतवणूकदारांचे हित जपण्यासाठी २००१ मध्ये गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी (IEPF) ची स्थापना करण्यात आली.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**अर्थव्यवस्थेतील आर्थिक धोरण**

| मौद्रिक धोरण | राज्य वित्तीय धोरण |
|---|---|
| मध्यवर्ती बँकेमार्फत अंमलबजावणी केली जाते. | केंद्र सरकारमार्फत अंमलबजावणी केली जाते. |
| पैशाच्या पुरवठ्याशी निगडित असते. | कर व खर्चाशी निगडित असतात. |
| वित्तीय स्थिरता हे ध्येय असते. | आर्थिक व सामाजिक विकासाचे ध्येय असते. |
| संख्यात्मक स्वरूपाचे असते. | गुणात्मक स्वरूपाचे असते. |

## स्वाध्याय

**प्र. १. खालील विधाने पूर्ण करा :**

१) विकास वित्तीय संस्था स्थापना करण्यात आल्या कारण त्या .......................
अ) अल्प मुदतीसाठी निधी उपलब्ध करून देतात.
ब) कृषी आणि मुख्य क्षेत्रांचा विकास वाढविण्यासाठी मदत करतात.
क) नाणे बाजाराचे नियमन करतात.
ड) भांडवल बाजाराचे नियमन करतात.

२) नाणे बाजारातील निधीच्या कमतरतेचे कारण ....................... हे आहे.
अ) अपुरी बचत
ब) रोख रकमेची वाढती मागणी
क) असंघटित क्षेत्राची उपस्थिती
ड) वित्तीय गैरव्यवस्था

३) वैयक्तिक गुंतवणूकदारांची भांडवल बाजारावरील विश्वासार्हता कमी झाली. कारण .......................हे आहे.
अ) वित्तीय साधनांची कमतरता
ब) खर्चीक व्यवहार
क) कमी मोबदला
ड) वित्तीय घोटाळे

४) वित्तीय व्यवस्थेत व्यापारी बँका मध्यस्थ म्हणून काम करतात. कारण .......................
अ) नफा कमवणे.
ब) देशाच्या आर्थिक वृद्धीचा वेग वाढविणे.
क) बचती गतिमान करणे आणि उत्पादक गुंतवणुकीसाठी वाटप करणे.
ड) पतनियंत्रण करणे.

**प्र. २. सहसंबंध पूर्ण करा :**

१) नाणे बाजार : अल्पकालीन निधी :: [ ] : दीर्घकालीन निधी

२) [ ] : मध्यवर्ती बँक :: भारतीय स्टेट बँक : व्यापारी बँक

३) सहकारी बँक : स्थानिक बँकर्स :: [ ] : संघटित क्षेत्र

४) प्राथमिक बाजार : [ ] :: दुय्यम बाजार : जुने रोखे

**प्र. ३. खालील पर्यायांमध्ये विसंगत शब्द ओळखा :**

१) बँक खात्याचा प्रकार – बचत खाते, डी मॅट खाते, आवर्त ठेव खाते, चालू खाते

२) अनियंत्रित वित्तीय मध्यस्थ – म्यूच्युअल फंड, निधी, चिट फंड, कर्ज कंपन्या

३) वित्तीय मालमत्ता – रोखे, भूमी, सरकारी सुरक्षा, दुय्यम ठेवी

४) संख्यात्मक पतनियंत्रण साधने – बँक दर, खुल्या बाजारातील रोखे व्यवहार, परकीय विनिमय दर, रोकड निधीचे बदलते गुणोत्तर.

**प्र. ४. विधाने आणि तर्क प्रश्न – खालील पर्यायांमधील योग्य पर्याय निवडा.**

१) **विधान (अ) :** नाणे बाजारांमुळे रोख रक्कमेचा वापर काटकसरीने होतो.

**तर्क विधान (ब) :** नाणे बाजार पैशाचे जवळचे पर्याय असलेल्या वित्तीय साधनांशी संबंधित आहे.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
३) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून, 'ब' विधान हे 'अ'विधानाचे बरोबर स्पष्टीकरण करते.
४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून, 'ब' विधान हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

२) **विधान (अ) :** प्रादेशिक स्टॉक एक्स्चेंजमध्ये (प्रादेशिक शेअर बाजार) व्यापाराच्या प्रमाणात घट झालेली आहे.

**तर्क विधान (ब) :** गुंतवणूकदार बॉम्बे भाग बाजार, नॅशनल भाग बाजार यासारख्या मुख्य भागबाजारामध्ये रोख्यांमध्ये गुंतवणूक करण्यास प्राधान्य देतात.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
३) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून, 'ब' विधान हे 'अ'विधानाचे बरोबर स्पष्टीकरण करते.
४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून, 'ब' विधान हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

३) **विधान (अ) :** नाणे बाजारातील असंघटित क्षेत्रात पारदर्शकतेचा अभाव आहे.

**तर्क विधान (ब) :** असंघटित क्षेत्रातील प्रक्रिया प्रामुख्याने ग्रामीण भागाशी निगडित आहे.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
३) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून, 'ब' विधान हे 'अ'विधानाचे बरोबर स्पष्टीकरण करते.
४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून, 'ब' विधान हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

४) **विधान (अ) :** व्यापारी बँकेअंतर्गत परकीय विनिमय व्यवस्थापन व नियंत्रण केले जाते.

**तर्क विधान (ब) :** भारतीय रिझर्व्ह बँकेला अधिकृत विनिमय दर कायम ठेवणे आणि त्याची स्थिरता टिकवावी लागते.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
३) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून, 'ब' विधान हे 'अ'विधानाचे बरोबर स्पष्टीकरण करते.
४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून, 'ब' विधान हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**प्र. ५. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा :**

१) रघूचे वडील त्यांचे पैसे नियमितपणे भाग आणि बंधपत्रांमध्ये गुंतवितात.

२) सारा तिने व तिच्या मैत्रिणींनी संयुक्तपणे तयार केलेल्या निधीत दरमहा वर्गणी देते. नंतर जमा केलेला निधी चिठ्ठी पद्धतीने निवडलेल्या सभासदाला दिला जातो.

३) टीनाने ₹ ५०,००० रुपयांची एकरकमी रक्कम एक वर्षाकरीता बँकेत जमा केली.

४) अबक ही बँक तिच्या ग्राहकांना डी मॅट सवलती, सुरक्षित ठेव कप्पे, इंटरनेट बँकिंगची सुविधा पुरविते.

**प्र. ६. फरक स्पष्ट करा :**

१) नाणे बाजार आणि भांडवल बाजार

२) मागणी ठेवी आणि मुदत ठेवी

३) नाणे बाजारातील संघटित क्षेत्र आणि असंघटित क्षेत्र.

**प्र. ७. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

१) भारतातील नाणे बाजारासमोरील समस्या स्पष्ट करा.

२) व्यापारी बँकांची कार्ये स्पष्ट करा.

३) भारतातील भांडवल बाजाराची भूमिका स्पष्ट करा.

४) भारतातील भांडवल बाजारासमोरील समस्या स्पष्ट करा.

**प्र. ८. सविस्तर उत्तरे लिहा :**

१) भारतातील नाणे बाजाराची भूमिका स्पष्ट करा.

२) रिझर्व्ह बँकेची कार्ये स्पष्ट करा.

# १० भारताचा विदेशी व्यापार (Foreign Trade of India)

**प्रस्तावना :**

१९४७ पूर्वी भारत हा ब्रिटिशांची वसाहत होता. त्यामुळे भारताचा विदेशी व्यापार हा वसाहतवादी होता. भारत हा औद्योगिक राष्ट्रांना- विशेषतः इंग्लंडला कच्च्या मालाची निर्यात करीत होता आणि तेथून कारखान्यात तयार होणाऱ्या वस्तूंची आयात करत होता. अशा प्रकारच्या परकीय व्यापारावर अवलंबून असल्यामुळे भारताचे औद्योगिकीकरण होऊ शकले नाही. त्यामुळे अनेक स्वदेशी उद्योगांचा ऱ्हास झाला. तथापि दुसऱ्या महायुद्धानंतर ज्या अविकसित राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळाले त्या राष्ट्रांनी परकीय व्यापाराकडे एक गुंतवणूक म्हणून पाहण्यास सुरुवात केली.

**अंतर्गत व्यापाराचा अर्थ :**

"राष्ट्राच्या भौगोलिक सीमांच्या अंतर्गत केली जाणारी वस्तू व सेवांची खरेदी-विक्री म्हणजे अंतर्गत/देशांतर्गत व्यापार किंवा गृह व्यापार होय." उदा., महाराष्ट्र राज्यात उत्पादित होणाऱ्या वस्तूंची विक्री पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, तामिळनाडू इत्यादी. ह्या वेगवेगळ्या राज्यांत केली जात असेल तर अशा व्यापाराला 'अंतर्गत व्यापार' म्हटले जाते.



**आकृती १०.१**

**विदेशी व्यापाराचा अर्थ :**

विदेशी व्यापार म्हणजे जगातील विविध देशांत केला जाणारा व्यापार होय. याला आंतरराष्ट्रीय किंवा बाह्य व्यापार असेही म्हणतात.

**व्याख्या :**

प्रा. मॅक्स वॉसरमन आणि हल्टमन - "विविध देशांतील रहिवाशांमध्ये चालणाऱ्या व्यवहारांचा समावेश आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये होतो."

**विदेशी व्यापाराचे प्रकार :**

विदेशी व्यापाराचे खालीलप्रमाणे तीन प्रकार पडतात.

१) आयात व्यापार, २) निर्यात व्यापार, ३) पुनर्नियात व्यापार

१) **आयात व्यापार :** एका देशाने दुसऱ्या देशाकडून केलेली वस्तू व सेवांची खरेदी म्हणजे आयात व्यापार होय किंवा स्वदेशाकडून परदेशांतील वस्तू व सेवांचा केला गेलेला अंतःप्रवाह म्हणजे आयात व्यापार होय. उदा., भारत इराक, कुवेत, सौदी अरेबिया या देशांतून पेट्रोलियमची आयात करतो.

२) **निर्यात व्यापार :** एका देशाने दुसऱ्या देशाला केलेली वस्तू व सेवांची विक्री म्हणजे निर्यात व्यापार होय किंवा एका देशातून दुसऱ्या देशांत केला जाणारा वस्तूंचा बहिर्प्रवाह होय. उदा., भारत चीन, हाँगकाँग, सिंगापूर इत्यादी देशांना चहा, तांदूळ, ताग यांसारख्या वस्तूंची निर्यात करतो.

३) **पुनर्निर्यात व्यापार :** वस्तूची आयात करून त्यावर प्रक्रिया करून जेव्हा ती निर्यात केली जाते तेव्हा त्यास पुनर्निर्यात व्यापार म्हणतात. उदा., जपानकडून रेडिओ, धुलाई यंत्र, दूरदर्शन यांसारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची आयात इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स इत्यादी देशांतून केली जाते आणि त्यावर प्रक्रिया करून जगातील विविध देशांना विकले जाते.

**विदेशी व्यापाराची भूमिका :**

व्यापार हा आर्थिक वृद्धीची गुरुकिल्ली आहे. कारण देशाच्या आर्थिक विकासात तो महत्त्वाची भूमिका बजावतो. विकसित राष्ट्रांत आंतरराष्ट्रीय व्यापाराचा स्थूल देशांतर्गत उत्पादनात महत्त्वपूर्ण वाटा असतो. विदेशी व्यापाराच्या भूमिकेचे समर्थन खालीलप्रमाणे करता येईल.

१) **परकीय चलन प्राप्ती :** विदेशी व्यापारामुळे परकीय चलन

प्राप्त होते. त्याचा वापर विविध उत्पादक कार्यांसाठी करता येतो. विदेशी व्यापार हा बाजार विस्तारीकरणासाठी आणि उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी उल्लेखनीय ठरतो.

२) **गुंतवणुकीस प्रोत्साहन :** विदेशी व्यापार देशांतर्गत बाजारपेठेच्या पलीकडे जाण्याची उत्पादकांना संधी उपलब्ध करून देतो. त्यांना निर्यातीसाठी अधिक उत्पादन करण्याचे प्रोत्साहन मिळते. यामुळे देशातील एकूण गुंतवणुकीत वाढ होते.

३) **श्रमविभागणी आणि विशेषीकरण :** विदेशी व्यापारामुळे जागतिक पातळीवर श्रमविभागणी व विशेषीकरण होते. काही देशांत मुबलक प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध असते. असे देश कच्च्या मालाची निर्यात करू शकतात. अशा प्रकारे विदेशी व्यापारामुळे श्रमविभागणी आणि विशेषीकरण होऊन त्याचा सर्व देशांना लाभ होतो.

४) **संसाधनांचे पर्याप्त वाटप आणि वापर :** विदेशी व्यापारामुळे दुर्मिळ संसाधने अशाच वस्तूच्या उत्पादनाकडे वळविली जातात, ज्यांच्यापासून महत्तम लाभ प्राप्त होतो. अशा प्रकारे विदेशी व्यापारामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर संसाधनांचे पर्याप्त वाटप व वापर होतो.

५) **किंमतपातळीतील स्थैर्य :** विदेशी व्यापारामुळे मागणी व पुरवठा यांची स्थिती स्थिर राहते. पर्यायाने अर्थव्यवस्थेतील किंमतपातळीत स्थैर्य निर्माण होते.

६) **बहुविध पर्यायांची उपलब्धतता :** विदेशी व्यापार ग्राहकांना बहुविध आयात वस्तू उपलब्ध करून देतो. विदेशी व्यापार तीव्र स्पर्धात्मक स्वरूपाचा असल्यामुळे तो गुणात्मक व उच्च दर्जाच्या उत्पादनाची खात्री देतो. त्यामुळे राहणीमानाचा दर्जा उंचावतो.

७) **प्रतिष्ठा व नावलौकिक :** निर्यातदार देश आंतरराष्ट्रीय बाजारात प्रतिष्ठा व नावलौकिक मिळवू शकतात. जो देश निर्यात व्यापारात सहभागी झालेला आहे, त्या देशाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पत प्राप्त होते. उदा., जपान, जर्मनी, स्वित्झरलँड यांसारख्या देशांनी उच्च दर्जाच्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंची निर्यात केल्यामुळे त्यांना विदेशी बाजारात मोठ्या प्रमाणात प्रतिष्ठा व नावलौकिक मिळाला आहे.

**हे करून पहा.**

अलीकडच्या काळातील भारतातून चीन व जपान या देशांना निर्यात होणाऱ्या व या देशातून भारतात आयात होणाऱ्या वस्तूंची यादी तयार करा.

## भारताच्या विदेशी व्यापाराची रचना व दिशा :

मागील ७० वर्षांच्या कालावधीत भारताच्या विदेशी व्यापाराच्या रचनेत व दिशेत पूर्णतः बदल झाले. भारताच्या विदेशी व्यापाराच्या रचनेची व दिशेची वैशिष्ट्ये खालील-प्रमाणे आहेत.

### वैशिष्ट्ये :

### विदेशी व्यापाराची रचना :

१) **स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा वाढता हिस्सा :** १९९०-९१ मध्ये भारताच्या निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नात विदेशी व्यापाराचा (आयात-निर्यात) हिस्सा १७.५५% होता. २००६-०७ मध्ये त्यामध्ये २५% इतकी वाढ झाली. तर २०१६-१७ मध्ये ही वाढ ४८.८% झाली.

२) **व्यापाराच्या आकारमानात व मूल्यात वाढ :** १९९०-९१ मध्ये भारताच्या विदेशी व्यापाराच्या आकारमानात व मूल्यात वाढ झाली. भारत आता मोठ्या प्रमाणात अधिक मूल्य व आकारमान असलेल्या वस्तू व सेवांची निर्यात व आयात करतो.

३) **निर्यातीच्या रचनेत बदल :** स्वातंत्र्यप्राप्तीपासून भारताच्या निर्यातीच्या रचनेतही बदल झाला. स्वातंत्र्यापूर्वी भारत प्राथमिक उत्पादने उदा., ताग, कापूस, चहा, तेलबिया, चामडे, अन्नधान्य, काजू बिया, खनिज उत्पादने निर्यात करीत होता. काळाच्या ओघात भारताच्या निर्यातीत तयार कपडे, हिरे, माणके, इलेक्ट्रॉनिक वस्तू- विशेषतः संगणक हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर या वस्तूंनी प्रमुख स्थान पटकाविले आहे.

४) **आयातीच्या रचनेत बदल :** स्वातंत्र्यापूर्वी भारत औषधे, कापड, वाहने, इलेक्ट्रिकल वस्तू यांसारख्या उपभोग्य वस्तूंची आयात करीत होता. सद्य स्थितीत भारत प्रामुख्याने पेट्रोल आणि तत्सम उत्पादने, अत्याधुनिक यंत्रसामग्री, रसायने, खते, पोलाद इत्यादी वस्तूंची आयात करतो.

५) **सागरी व्यापार :** भारताचा बहुतेक व्यापार हा सागरी मार्गाने होतो. नेपाळ, अफगाणिस्तान, म्यानमार, श्रीलंका इत्यादी शेजारील देशांशी भारताचे व्यापारी संबंध आहेत. जवळपास ६८% व्यापार हा सागरी मार्गाने होतो.

६) **नवीन बंदरांचा विकास :** भारताला विदेशी व्यापारासाठी प्रामुख्याने मुंबई, कोलकता, चेन्नई या बंदरांवर अवलंबून राहावे लागत असे. त्यामुळे या बंदरांवर अतिरिक्त भार पडत होता. अलीकडे भारताने या बंदरांवरील अतिरिक्त भार कमी करण्यासाठी कांडला, कोचीन, विशाखापट्टणम, नाव्हाशिवा इत्यादी नवीन बंदरे विकसित केली आहेत.

**शोधा पाहू?**

भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील अलिकडील काळातील विदेशी व्यापाराचा हिस्सा/वाटा शोधा.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**भारताच्या आयात व्यापाराची रचना**

| वस्तू | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१५-१६ | | २०१६-१७ | |
| अ. क्र. | | खर्च (दशलक्ष डॉलर्स) | टक्केवारी | खर्च (दशलक्ष डॉलर्स) | टक्केवारी |
| १ | पेट्रोलियम तेल आणि वंगन | ८२,९४४ | २१.८ | ८६८९६ | २२.६ |
| २ | इलेक्ट्रॉनिक वस्तू | ४०,०३२ | १०.५ | ४१,९४१ | १०.९ |
| ३ | मोती आणि मौल्यवान खडे | २०,०७० | ५.३ | २३,८०९ | ६.२ |
| ४ | गोडेतेल | १०,४९२ | २.८ | १०,८९३ | २.८ |
| ५ | खते | ८,०७२ | २.१ | ५,०२४ | १.३ |
| ६ | अन्नधान्य | २७६ | ०.१ | १,४२९ | ०.४ |

**भारताच्या निर्यात व्यापाराची रचना**

| वस्तू | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१५-१६ | | २०१६-१७ | |
| अ. क्र. | | खर्च (दशलक्ष डॉलर्स) | टक्केवारी | खर्च (दशलक्ष डॉलर्स) | टक्केवारी |
| १ | तयार कपडे | १६९६४ | ६.९ | १७३६८ | ६.३ |
| २ | कच्चे लोखंड | १९१ | ०.० | १५३४ | ०.५ |
| ३ | सूत | ८८७४ | ३.४ | ८५५० | ३.१ |
| ४ | पेट्रोलियम उत्पादने | ३१२०९ | ११.९ | ३२४१६ | ११.७ |
| ५ | चामडे आणि चामड्याच्या वस्तू | ५५५४ | २.१ | ५३०८ | १.९ |
| ६ | अभियांत्रिकी वस्तू | ७२२० | २३.० | ६५२६७ | २३.७ |

स्रोत : १) रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची भारतीय अर्थव्यवस्थेवरील संख्याशास्त्राची हस्तपुस्तिका २०१६-१७.

२) भारत सरकारचा आर्थिक पाहणी अहवाल २०१७-१८.

## भारतीय विदेशी व्यापाराची दिशा :

भारतीय विदेशी व्यापाराची दिशा म्हणजे भारत आपल्या वस्तूंची निर्यात कोणत्या देशाला करतो व कोणत्या देशातून वस्तूंची आयात करतो. अशा प्रकारे व्यापाराची दिशा निर्यातीचे अंतिम स्थान तसेच आयातीचे प्रमुख स्रोत यांचा निर्देश करते. स्वातंत्र्यपूर्व काळात भारताचा बहुतांशी व्यापार ब्रिटनशी होत असल्यामुळे भारताच्या विदेशी व्यापारात इंग्लंडला प्रमुख स्थान होते. परंतु स्वातंत्र्यानंतर भारताचे इतर अनेक देशांशी व्यापार संबंध प्रस्थापित झाले. आता अमेरिका हा भारताचा प्रमुख व्यापारी भागीदार असून त्याखालोखाल जर्मनी, जपान, युनायटेड किंगडम इत्यादी देशांशी भारताचा व्यापार होतो.

### तुम्हांला माहीत आहे का ?

खालील तक्त्यांवरून भारताच्या विदेशी व्यापाराच्या दिशेची कल्पना येते.

**आयात दिशा**

| देश | | वर्ष |
|---|---|---|
| | | २०१६-१७ |
| अ.क्र. | | टक्केवारी |
| १. | OECD | २८.१ |
| २. | OPEC | २४.१ |
| ३. | पूर्व युरोप | २.४ |
| ४. | विकसनशील राष्ट्रे | ४३.२ |
| ५. | इतर | २.२ |

**निर्यात दिशा**

| देश | | वर्ष |
|---|---|---|
| | | २०१६-१७ |
| अ.क्र. | | टक्केवारी |
| १. | OECD | ३७.९ |
| २. | OPEC | १६.४ |
| ३. | पूर्व युरोप | १.० |
| ४. | विकसनशील राष्ट्रे | ४३.५ |
| ५. | इतर | १.२ |

स्रोत : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची भारतीय अर्थव्यवस्थेवरील संख्याशास्त्राची हस्तपुस्तिका २०१६-१७.

## भारताच्या विदेशी व्यापाराचा कल (२००१ पासून) :

उदारीकरणानंतर भारताच्या विदेशी व्यापारात अनेक पटींनी वाढ झाली. आयात-निर्यात वस्तूंबाबत भौगोलिक क्षेत्रातही संरचनात्मक बदल झाले.




आकृती १०.२

## सद्य स्थितीत प्रमुख वस्तूंच्या बाबतीत निर्यात कल :

१) **अभियांत्रिकी वस्तू :** अभियांत्रिकी वस्तू निर्यात प्रोत्साहन समिती (EGEPC) अहवालानुसार २०१७-१८ मध्ये भारताच्या एकूण निर्यातीत अभियांत्रिकी वस्तूमचा हिस्सा २५% इतका होता. या वस्तूमध्ये प्रामुख्याने वाहतुकीची स्वयंचलित व स्वयंपूर्ण उपकरणे, यंत्रसामग्री व साधने यांचा समावेश होतो. २०१०-११ ते २०१४-१५ या काळात वाहतुकीच्या उपकरणांची निर्यात १६ अब्ज यू.एस.डॉलर्सपासून २४.८ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढली.

२) **पेट्रोलियम उत्पादने :** २००१-०२ पासून भारताच्या तेल शुद्धीकरणाच्या क्षमतेत महत्त्वपूर्ण बदल झाला. त्यामुळे भारत पेट्रोलियम शुद्धीकरण उत्पादनाचा निर्यातदार म्हणून गणला जावू लागला. सन २०००-०१ मध्ये भारताच्या एकूण निर्यातीत पेट्रोलियम उत्पादनांचा ४.३ % इतका हिस्सा होता. २०१३-१४ मध्ये झपाट्याने म्हणजे २०.१% इतकी वाढ झाली.

३) **रसायने आणि रासायनिक उत्पादने :** गेल्या काही वर्षांत निर्यातीत महत्त्वाच्या वस्तू म्हणजे रसायने व रासायनिक उत्पादने यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. एकूण निर्यातीत यांचा वाटा १०.४% इतका होता.

४) **रत्ने आणि दागिने :** भारताच्या निर्यातीत रत्ने आणि दागिने यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. २०१४-१५ मध्ये एकूण निर्यातीत यांचा हिस्सा १३.३% इतका होता.

५) **कापड आणि तयार कपडे :** २०१४-१५ मध्ये भारताच्या निर्यातीत कापड आणि तयार कपड्यांचा वाटा ११.३% इतका आहे. वास्तविक पाहता भारत हा कापड निर्यातीच्या बाबतीत संपूर्ण जगामध्ये अग्रस्थानी आहे.

### आयात कल :

१) **पेट्रोलियम :** आर्थिक सुधारणापूर्वी व नंतरही भारताच्या आयात व्यापारात पेट्रोलियम हा घटक महत्त्वाचा राहिलेला आहे. १९९०-९२ मध्ये एकूण आयातीत याचे प्रमाण २७% इतके होते. तर सद्य स्थितीत ते ३१% इतके आहे.

२) **सोने :** पेट्रोलियमनंतर आयात केली जाणारी दुसऱ्या क्रमांकावरील वस्तू म्हणजे सोने होय. २०१३-१४ मध्ये सोन्याच्या आयातीत लक्षणीय घट झाली. सोन्याची आयात २०१०-११ मधील ५३.३ अब्ज डॉलरवरून २०१३-१४ मध्ये २७.५ अब्ज डॉलर्सपर्यंत घटली. परंतु मुख्यत्वेकरून आंतरराष्ट्रीय पातळीवर सोन्याच्या किमतीत घट झाल्यामुळे आणि सरकारच्या विविध धोरणांमुळे व सरकारच्या सोने आयातीवरील कडक निर्बंधामुळे ही घट झाली.

३) **खते :** १९९०-९१ मध्ये भारताच्या आयातीत खतांचा हिस्सा ४.१% इतका होता. २०१६-१७ मध्ये त्याचे प्रमाण १.३% पर्यंत घटले.

४) **लोह व पोलाद :** यावरील आयात खर्चाचे प्रमाण ४.९% वरून २.१% पर्यंत घटले.

### व्यवहारतोल संकल्पना :

एका वर्षाच्या कालावधीत देशाच्या सर्व आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांची पद्धतशीरपणे केलेली नोंदणी म्हणजे व्यवहारतोल होय.

१) **प्रा. एल्सवर्थ :** "एका देशातील रहिवासी व जगातील उर्वरित रहिवासी यांच्यात केल्या गेलेल्या सर्व देण्याघेण्याचे लिखित विवरण म्हणजे व्यवहारतोल होय."

२) **प्रा. वॉल्टर क्रॉझ :** "एखाद्या विशिष्ट कालावधीत (सामान्यतः एक वर्ष) एखाद्या देशातील नागरिकांच्या व जगातील उर्वरित नागरिकांच्या दरम्यान करण्यात आलेल्या संपूर्ण आर्थिक देण्याघेण्याचे व्यवस्थित विवरण म्हणजे व्यवहारतोल होय."

वरील व्याख्यांवरून स्पष्ट होते की, एक वर्षाच्या कालावधीत वेगवेगळ्या देशांतील नागरिक, व्यापारी, उद्योगसंस्था, सरकार यांच्यात वस्तू व सेवांची जी देवाण-घेवाण केली जाते, त्याच्या मूल्यांचा समावेश व्यवहारतोलात केला जातो.



**आकृती १०.३**

### व्यापारतोल संकल्पना :

विशिष्ट कालावधीतील देशाच्या आयात व निर्यात मूल्यांतील फरक म्हणजे व्यापारतोल होय. व्यापारतोलाला आंतरराष्ट्रीय व्यापारतोल असेही म्हणतात.

प्रा. बेनथम् : "एखाद्या विशिष्ट काळातील, एखाद्या देशाच्या दृश्य व अदृश्य वस्तूंचे निर्यात मूल्य आणि आयात मूल्यांच्या संबंधांना व्यापारतोल असे म्हणतात".

प्रा. सॅम्युअलसन : "जर व्यापार केला जाणाऱ्या वस्तूंचे निर्यात मूल्य आयात मूल्यापेक्षा जास्त असेल तर त्याला अनुकूल व्यापारतोल असे म्हणतात. जर आयात मूल्य निर्यात मूल्यापेक्षा जास्त असेल तर त्याला प्रतिकूल व्यवहारतोल म्हणतात".

वरील व्याख्यांवरून स्पष्ट होते की, व्यापारतोलाचा संबंध दृश्य व अदृश्य वस्तूंच्या आयात-निर्यात मूल्यांशी येतो.



**आकृती १०.४**

**शोधा पाहू?**

OPEC व OECD अंतर्गत येणाऱ्या देशांची यादी तयार करा.

# स्वाध्याय

**प्र. १. योग्य पर्याय निवडा :**

१) विदेशी व्यापाराचे प्रकार.

अ) आयात व्यापार　　ब) निर्यात व्यापार

क) पुनर्निर्यात व्यापार　　ड) अंतर्गत व्यापार

**पर्याय :** अ) अ आणि ब　　ब) अ,ब आणि क

क) वरील सर्व　　ड) यांपैकी नाही.

२) भारताच्या विदेशी व्यापाराच्या निर्यात कलातील घटक –

अ) अभियांत्रिकी वस्तू　　ब) रत्ने आणि दागिने

क) कापड आणि तयार कपडे　　ड) सोने

**पर्याय :** अ) अ आणि क　　ब) अ,ब आणि क

क) ब,क आणि ड　　ड) यांपैकी नाही

३) विदेशी व्यापाराची भूमिका –

अ) परकीय चलन निर्मिती　　ब) गुंतवणुकीस प्रोत्साहन

क) श्रमविभागणी　　ड) निर्यातीच्या रचनेत बदल

**पर्याय :** अ) अ,ब आणि क　　ब) अ आणि ड

क) वरील सर्व　　ड) यांपैकी नाही

**प्र. २. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा :**

१) भारताने इराणकडून पेट्रोलियम पदार्थ खरेदी केले.

२) महाराष्ट्राने पंजाबकडून गहू खरेदी केला.

३) इंग्लंडने भारतातून कापसाची आयात केली व त्यापासून कपडे तयार करून ते मलेशियाला विकले.

४) जपान म्यानमारला मोबाइल फोन विकतो.

**प्र. ३. फरक स्पष्ट करा :**

१) अंतर्गत व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार

२) विदेशी व्यापाराचा आयात कल आणि निर्यात कल

३) व्यवहारतोल आणि व्यापारतोल

**प्र. ४. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

१) विदेशी व्यापाराची संकल्पना स्पष्ट करून प्रकार स्पष्ट करा.

२) भारताच्या विदेशी व्यापाराच्या रचनेची कोणतीही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३) भारताच्या आयात कलाचे मुद्दे स्पष्ट करा.

**प्र. ५. खालील विधानांशी सहमत/असहमत आहात का ते सकारण स्पष्ट करा :**

१) इंग्रजांच्या काळात स्वदेशी उद्योगांचा ऱ्हास झाला.

२) व्यापार ही आर्थिक वृद्धीची गुरुकिल्ली आहे.

३) विदेशी व्यापारामुळे जागतिक पातळीवर श्रमविभागणी व विशेषीकरण होते.

**प्र. ६. खालील तक्त्याचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा.**

- भारताच्या विदेशी व्यापाराची आयात दिशा :

| अ.क्र. | देश | वर्ष | |
|---|---|---|---|
| | | १९९०-९१ टक्केवारी | २०१५-१६ टक्केवारी |
| १. | OECD | ५४.० | २८.८ |
| २. | OPEC | १६.३ | २३.६ |
| ३. | पूर्व युरोप | ७.८ | १.९ |
| ४. | विकसनशील राष्ट्रे | १८.६ | ४३.२ |
| ५. | इतर | १.४ | २.५ |

**प्रश्न :**

१) २०१५-१६ मध्ये भारताच्या आयात दिशेत कोणत्या संघटनेचा सर्वांत कमी वाटा आहे?

२) १९९०-९१ मध्ये भारताच्या आयात व्यापार दिशेत कोणत्या देशाचा सर्वांत जास्त वाटा आहे?

३) भारताच्या आयात दिशांसंदर्भात तुमचे मत सांगा.

४) १९९०-९१ च्या तुलनेत २०१५-१६ मध्ये विकसनशील राष्ट्राच्या आयातीमध्ये किती टक्क्यांनी वाढ झाली?

**प्र. ७. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

१) विदेशी व्यापार म्हणजे काय सांगून विदेशी व्यापाराची भूमिका स्पष्ट करा.

२) भारताच्या निर्यातीतील अद्ययावत कल स्पष्ट करा.

## शब्दकोश

- **अवितरित नफा :** कंपन्यांचा अवितरित नफा म्हणजे महामंडळाचे असे उत्पन्न, जे गुंतवणूकदारांना लाभांश स्वरूपात दिले जात नाही.
- **अविभाजित वस्तू :** जेव्हा एखाद्या वस्तूमधून मिळणारी उपयोगिता अनेक व्यक्ती किंवा वापरणाऱ्यावर अवलंबून असते अशा वस्तूंना अविभाजित वस्तू म्हणतात. ही संकल्पना सार्वजनिक वित्तमध्ये वापरली जाते.
- **आर्थिक प्रारूप :** "आर्थिक प्रारूप म्हणजे आर्थिक वास्तवातील निवडक आर्थिक चलामधील परस्पर संबंधाचे सुलभ प्रतिनिधित्व होय."
- **आर्थिक चल :** अर्थव्यवस्थेच्या कार्याचे मोजमाप करणारा घटक म्हणजे आर्थिक चल होय. उदा. लोकसंख्या, दारिद्र्य, बेरोजगारी, महागाई इत्यादी.
- **आर्थिक कार्यक्षमता :** जेव्हा अर्थव्यवस्थेतील सर्व वस्तू आणि उत्पादनाचे घटक त्यांच्या सर्वांत मौल्यवान वापरासाठी वितरित केले जातात किंवा त्यांना वाटप केले जातात, आणि निरुपयोगी भाग काढून टाकला जाईल किंवा कमी केला जाईल तेव्हा आर्थिक कार्यक्षमता प्राप्त होईल.
- **आर्थिक सहयोग आणि विकास संघटन (OECD) :** आर्थिक सहयोग आणि विकास संघटन १९६१ मध्ये स्थापन झाली. ती १९४८ मध्ये स्थापन झालेल्या आर्थिक सहयोग संघटनेपासून विकसित झाली. ही संघटना जागतिक व्यापार आणि आर्थिक प्रगतीला प्रोत्साहन देण्यासाठी स्थापन झाली. जगातील एकूण ३४ देश OECD चे सभासद आहेत. OECD चे मुख्य कार्यालय फ्रान्समधील पॅरिस येथे आहे.
- **उद्यम भांडवल कंपनी :** ही (स्टार्टअप) आरंभ कंपनी असून वाढत्या व्यवसायासारख्या नवीन कंपनीसाठी निधी प्रदान करते.
- **उपभोक्त्याचा समतोल :** उपभोक्त्याची मालमत्ता आणि सेवा खरेदी केल्यापासून मिळणारे उत्पन्न, सध्याचे उत्पन्न आणि सध्याच्या किमती लक्षात घेता ही एक शिल्लक स्थिती आहे.
- **करभार :** एखाद्या वस्तूच्या उत्पादन आणि उपभोगावर होणारा कराचा परिणाम म्हणजे करभार होय.

  सरकारकडून आकारलेल्या करांचे द्रव्यरूपी किंवा पैसारूपी ओझे शेवटी कोणावर पडते हे सांगणे म्हणजे करभार होय.
- **कराघात/कराचा आघात :** कर भरण्याची कायदेशीर जबाबदारी ज्याच्यावर पडते त्याच्यावर कराचा आघात झाला असे म्हणतात.

  जी व्यक्ती प्रथम सरकारकडे कर भरण्यास कायदेशीररीत्या जबाबदार असते त्या व्यक्तीवर कराघात होतो.
- **कल किंवा प्रवृत्ती :** "एखादी स्थिती उत्पादन किंवा प्रक्रिया किंवा आलेख, रेषा किंवा वक्राच्याद्वारे दर्शवलेल्या सांख्यिकी मालेतील सर्वसाधारण प्रवृत्ती किंवा सरासरी प्रवृत्तीचा आकृतिबंध होय."द्वारे
- **खिडकी प्रदर्शन :** खिडकी प्रदर्शन म्हणजे दुकानातील अशी खिडकी की, ज्यात ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी किंवा विक्री वाढवण्यासाठी वस्तूंचे त्या खिडकीत प्रदर्शन केले जाते.
- **खुल्या बाजारातील रोखे व्यवहार :** देशातील मध्यवर्ती बँक खुल्या बाजारात सरकारी कर्जरोख्यांची खरेदी-विक्री करते तेव्हा त्याला खुल्या बाजारातील रोखे व्यवहार असे म्हणतात.

- **तात्काळ पैसे पाठविणे (RTGS) :** या माध्यमातून पैसे लगेच हस्तांतरित करता येतात. Ok बटण दाबल्यावर लगेच पैसे समोरच्याच्या खात्यामध्ये जमा होतात. त्यामुळे देशातील ९५% देवाणघेवाण याच प्रणालीमधून होते. ही जगात सर्वांत जास्त वापरली जाणारी प्रक्रिया आहे.
- **तरलता समायोजन :** हे भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे वापरलेले एक प्रकारचे मौद्रिक धोरण आहे. जे व्यापारी बँकांना पुनखरेदी कराराद्वारे कर्ज घेण्यास परवानगी देते. यामध्ये रेपो दर व रिव्हर्स रेपो दरांचा समावेश आहे.
- **तृप्ती बिंदू :** तृप्तीचा बिंदू भिन्न असतो कारण कोणत्याही वस्तूची सीमान्त उपयोगिता शून्य असते.
- **निर्हस्तक्षेप धोरण :** उत्पादन वाहतूक व वस्तूंची किंमतनिश्चिती या कोणत्याही प्रक्रियेत सरकारचा हस्तक्षेप नसतो.
- **नैतिक मनधरणी :** नैतिक मनधरणी म्हणजे मध्यवर्ती बँकेने व्यापारी बँकांना सर्वसाधारण चलनविषयक धोरणाच्या बाबतीत सहकार्य करण्याच्या बाबतीत विनंती करणे व त्यांचे मन वळविणे होय.
- **पेटंट :** ठराविक वर्षासाठी एखादा शोध करण्याचा किंवा विक्री करण्याचा अधिकृत अधिकार कायदेशीर आहे.
- **प्रमाणित वस्तू :** प्रमाणित वस्तू म्हणजे समान मूलभूत वैशिष्ट्ये असणाऱ्या एकाच प्रकारच्या वस्तू.
- **बैजिक भार :** हे एखाद्या गोष्टीच्या अंतर्गत स्वरूपापेक्षा वैयक्तिक पसंतीवर आधारित किंवा निश्चित केले जातात.
- **बोधचिन्ह :** यावरून आपणास ती वस्तू/पदार्थ कोणत्या कंपनीचा आहे हे समजते.
- **बँकदर :** मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना योग्य तारणाच्या मोबदल्यात दिलेल्या कर्जावर जो किमान व्याजदर आकारते, त्याला बँकदर असे म्हणतात.

  व्यापारी बँकांना त्यांनी वटवलेल्या हुंड्या ज्या व्याजदराला पुन्हा वटवून देऊन मध्यवर्ती बँक पैसा उपलब्ध करून देते त्या दराला बँकदर असे म्हणतात.
- **भाडेपट्टी कंपनी :** ही एक बिगर बँक वित्त कंपनी आहे, जी प्रामुख्याने उपकरणे भाड्याने देणे किंवा अशा प्रकारच्या क्रियाकलापासाठी वित्तपुरवठा करण्याच्या व्यवसायात गुंतलेली असते.
- **भांडवली नफा :** भांडवली नफा म्हणजे भांडवली मालमत्तेच्या (गुंतवणुकीची किंवा स्थावर मालमत्ता) किमतीत वाढ होते जी त्यास खरेदी किमतीपेक्षा जास्त मूल्य देते.
- **भांडवली तोटा :** खरेदी किंमत आणि मालमत्ता ज्या किमतीला विकली जाते त्या किमतीतील फरक म्हणजे भांडवली तोटा. जेव्हा विक्री किंमत खरेदी किमतीपेक्षा कमी असते तेव्हा तोटा होतो.
- **मिश्र उत्पन्न :** स्वयंरोजगार केलेल्या व्यक्तीच्या मोबदल्याला मिश्र उत्पन्न म्हणून मानले जाते. स्वयंरोजगार नोकरीत सध्याच्या किंवा पूर्वीच्या गुंतवणुकीच्या परिणामी, व्यक्तीकडून, स्वत:साठी किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांच्या संदर्भात दिलेल्या संदर्भ कालावधीत मिळविलेले उत्पन्न हे वेगळे आहे.
- **मूल्य विरोधाभास :** उपयोगिता मूल्य व विनिमय मूल्य यांतील फरक
- **म्यूच्युअल फंड (परस्पर निधी) :** ही अशी कंपनी आहे, जी गुंतवणूकदारांकडून पैसे गोळा करते आणि समभाग, रोखे (बॉण्ड्स) आणि अन्य अल्पमुदतीची कर्जे, उपकरणे यांसारख्या सुरक्षा रोखे यात पैसे गुंतवते.
- **राष्ट्रीय पैसे हस्तांतरण (NEFT) :** भारतातील प्रमुख पैसे हस्तांतरणापैकी ही एक प्रणाली आहे. यात

पैसे लगेच हस्तांतरित होत नाहीत. यामध्ये प्रत्येक तासाचा वेळ टप्पा (टाइमस्लॉट) बनवलेला असतो आणि त्यानुसार पैसे दुसऱ्याला पाठविले जातात. हे इलेक्ट्रॉनिक संदेशाच्या माध्यमाने वापरले जाते. नोव्हेंबर २००५ मध्ये ही प्रणाली सुरू करण्यात आली. ही सुविधा देशाच्या जवळपास ३०,००० बँकांमध्ये उपलब्ध आहे.

- **रिव्हर्स रेपो दर :** ज्या व्याजदराला देशाची मध्यवर्ती बँक इतर बँकांकडून अल्पकाळासाठी कर्जाऊ निधी घेतो त्या व्याजदराला रिव्हर्स रेपो दर असे म्हणतात.

- **रोकड निधीचे गुणोत्तर :** सर्व देशांमध्ये प्रत्येक व्यापारी बँकेला कायद्यानुसार मध्यवर्ती बँकेकडे काही प्रमाणात रोख निधी ठेवणे आवश्यक असते. या प्रमाणाला रोकड किंवा रोख राखीव निधीचे प्रमाण असे म्हणतात.

- **रेपो दर :** तरलतेची कमतरता जाणवल्यास भारतीय रिझर्व्ह बँक अल्प कालावधीसाठी व्यापारी बँकांना सरकारी तारणाची परतफेड करते.

  हे बँकिंग प्रणालीमध्ये परिवर्तनीय अधिभरण करते.

- **सामाजिक लेखा :** ही संघटनांच्या कृतीचा सामाजिक आणि पर्यावरणीय परिणाम भागधारकांना मोजणे, परीक्षण करणे आणि अहवाल देण्याची प्रक्रिया आहे.

- **संभाव्य पुरवठा :** साठा हा पुरवठ्याचा आधार आहे. एखाद्या वस्तूचा संभाव्य किंवा एकूण पुरवठा होतो, जो अनुकूलतेवेळी विक्रीसाठी देऊ शकतो.

# विस्तृत रूप

| | | |
|---|---|---|
| • ADR | American Depository Receipts | अमेरिकन ठेव पावती |
| • BSE | Bombay Stock Exchange | मुंबई शेअर बाजार |
| • CGST | Central Goods and Service Tax | केंद्रीय वस्तू व सेवा कर |
| • CRR | Cash Reserve Ratio | रोकड निधीचे गुणोत्तर |
| • CSO | Central Statistical Organisation | केंद्रीय सांख्यिकीय संघटना |
| • DFHI | Discount and Finance House of India | भारतीय सवलत व वित्तीय गृह |
| • DFI | Development Financial Institution | विकास वित्तीय संस्था |
| • EGEPC | Engineering Goods Export Promotion Council | अभियांत्रिकी वस्तू निर्यात प्रोत्साहन समिती |
| • GDP | Gross Domestic Product | स्थूल देशांतर्गत उत्पादन |
| • GDR | Global Depository Receipts | जागतिक ठेव पावती |
| • GNP | Gross National Product | एकूण राष्ट्रीय उत्पादन |
| • GST | Goods and Service Tax | वस्तू व सेवा कर |
| • ICICI | Industrial Credit and Investment Corporation | भारतीय औद्योगिक आणि गुंतवणूक बँक |
| • IDBI | Industrial Developmant Bank of India | भारतीय औद्योगिक विकास बँक |
| • IEPF | Investor Education and Protection Fund | गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी |
| • IFCI | Industrial Finance Corporation of India | भारतीय औद्योगिक वित्त महामंडळ |
| • IGST | Integrated Goods and Service Tax | एकत्रित वस्तू व सेवा कर |
| • IIBI | Industrial Investment Bank of India | भारतीय औद्योगिक आणि गुंतवणूक बँक |
| • LAF | Liquidity Adjustment Facility | तरलता समायोजन |
| • MMMF | Money Market Mutual Funds | नाणे बाजारातील परस्पर निधी |
| • NDP | Net Domestic Product | निव्वळ देशांतर्गत उत्पादन |
| • NEFT | National Electronic Fund Transfer | राष्ट्रीय पैसे हस्तांतरण |
| • NNP | Net National Product | निव्वळ राष्ट्रीय उत्पादन |
| • NSE | National Stock Exchange | राष्ट्रीय शेअर बाजार |
| • OECD | Organisation for Economic Co-operation and Development | आर्थिक सहयोग आणि विकास संघटन |
| • OPEC | Organisation of Petroleum Exporting Countries | पेट्रोलियम निर्यातक देश संघटना |
| • RTGS | Real Time Gross Settlement | तत्काळ पैसे पाठवणे |
| • SBTS | Screen Based Trading System | संगणकीकृत व्यापार प्रणाली |
| • SEBI | Securities and Exchange Board of India | भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ |
| • SFCs | State Finance Corporation | राज्य वित्तीय निगम |
| • SGST | State Goods and Service Tax | राज्य वस्तू व सेवा कर |
| • SLR | Statutory Liquidity Ratio | सांविधानिक रोखतेचे गुणोत्तर |
| • UTI | Unit Trust of India | भारतीय युनिट ट्रस्ट |

## REFERENCES


- Ministry of Finance, Government of India (Oxford Press), Economic Survey 2017-18.


**IMPORTANT WEBSITES/LINKS**

- https://data.gov.in
- https://www.rbi.org.in – (Reserve Bank of India)
- mofapp.nic.in:8080/economic survey (Ministry of Finance, GoI)
- www.mospi.gov.in/national-sample-survey-office-nsso – (Ministry of Statistics and Programme Implementation, GoI).
- https://stats.oecd.org
- https://www.bseindia.com
- https://www.nseindia.com
- https://www.finmin.nic.in
- https://www.incometaxindia.gov.in
- https://www.gst.gov.in
- https://www.sebi.gov.in
- https://dgft.gov.in

## नोंदी

## नोंदी

## नोंदी





महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

अर्थशास्त्र इयत्ता बारावी (मराठी माध्यम)

₹ ६५.००